संस्कार-चिंतनं..

डॉ. गजानन श्रीपत

म. प्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3936

भाग ५ वा

REFBK-0024797

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे 30

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUN 19[illegible]

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ निवेदन

3936
2486
11/9/88



सदाचार चिंतनी

भाग पाचवा

व्यवहारातील अनुभवांवर
चिंतनाने सुचलेले विचार व आचार

चिंतक
डॉ. गजानन श्री. खैर
एम्. ए , पीएच्. डी.

REFBK-0024797

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
१७८६, सदाशिव, पुणे ४११ ०३०

प्रकाशक

प. भ. कुलकर्णी

एम्. एस्सी./इंजि./एफ्.टेक्./लंडन

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाकरिता

१७८६ सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९८२

मूल्य दहा रुपये फक्त

मुद्रक

म. द. कश्यप एम्. ए.

महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना

१७८६, सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

क्रमांक	लेख	पान
	लेखकाची प्रस्तावना	
१.	विचार प्रसाराची गुरुदक्षिणा	१
२.	तीन नैतिक जबाबदाऱ्या	४
३.	श्रीदत्त, देवता व सांप्रदाय	६
४.	चमत्कारांचे संशोधन हवे	८
५.	लोकशाही मनोवृत्ती	१०
६.	संत वाङ्मय आणि आजची मूल्ये	११
७.	शासक आणि उपदेशक	१४
८.	आज गीतेचा उपयोग	१६
९.	लाडावलेल्या मुलांचे थोरपण	१७
१०.	लेखक, वाचक व शासक	१९
११.	सुखाचे देणे घेणे : त्याग व भोग	२१
१२.	द्वेषाने ग्रासलेला समाज	२२
१३.	गरिबी जाण्याचा धोका	२४
१४.	मुलांना सुटी, पालकांना काम	२६
१५.	भाषा-धनाला जपा व वाढवा	२८
१६.	वर्धिष्णु असो, वृद्ध नसो	३०
१७.	माउली, मले व मवाली	३३
१८.	आपत्ती, दुःखमुक्ती व दानवृत्ती	३५
१९.	तरुणांची गुन्हेगारी, आपली जबाबदारी	३६
२०.	रायबरेली ते चिकमगलूर	३८
२१.	बेकारांचेही सहकार्य हवे	४१
२२.	व्यसनमुक्तीची संपत्ती	४३
२३.	कुटुंबातील सुख व शांती	४४
२४.	जनता, जागृती व जबाबदारी	४७
२५.	शंकराचा तिसरा डोळा	४९
२६.	गटारात जाणारा पैसा	५१
२७.	पोलीस संपाचे भाकीत	५२
२८.	भूक आणि विद्या	५५
२९.	वाढत्या अनास्थेने अपघात	५७
३०.	पारतंत्र्यातील दुर्गुणांचा पुनर्जन्म	५८

३१.	वर्गांच्या आंदोलनात जनता हैराण	६१
३२.	आपल्या भक्तीची कसोटी	६२
३३.	संक्रांती आल्या न् गेल्या	६४
३४.	पाठांतराने ज्ञानविकास	६६
३५.	मोह आणि 'मी' चे युद्ध	६७
३६.	मनाविरुद्ध गोष्टी घडणारच	६९
३७.	संगतीचा मुलांवर परिणाम	७१
३८.	अनावर सुखलालसा व गुन्हेगारी	७२
३९.	नियती व निवड	७४
४०.	व्यवसायात गीतादृष्टी	७७
४१.	एक चूक माफ, दुसरी पाप	७९
४२.	उच्च विज्ञान शिक्षणात संस्कृत	८०
४३.	अब्रूचे शत्रू	८४
४४.	आदर्श जीवनाची जबाबदारी	८६
४५.	गीतेतील बलसाधना	८७
४६.	देशातील घटनांचा बोध	८९
४७.	पुराणातील वांगी कुटुंबात	९२
४८.	निर्दोष सुटका ! कायद्याने का न्यायाने ?	९३
४९.	इतके ठार ! इतके जखमी !	९५
५०.	चूक दाखवावी पण कशी ?	९७
५१.	मनःशांती विकू नका	९८
५२.	जशास तसे, पण सर्वत्र नको	९९
५३.	आरशाचा पुरा उपयोग करा	१०१
५४.	सज्जनांना जगू द्या तरी !	१०३
५५.	कुटुंबावर गीतेचा प्रभाव	१०४
५६.	तंत्रज्ञानाला तत्वज्ञानाची जोड	१०६
५६.	प्राचीन वाङ्मयाची जिज्ञासा	१०९
५८.	जीवनातील हरण व रक्षण	११०
५९.	स्वभाव सुधारता येतो	११२
६०.	तुमची बांधिलकी	११४

लेखकाची प्रस्तावना :

सकस विचार पुन्हा पुन्हा वाचा

जीवनात कोणती गोष्ट केव्हा लागेल व केव्हा उपयोगी पडेल हे काही आधी सांगता येत नाही. म्हणून भावी उपयोगाकरता मनुष्य संग्रह करीत असतो. कशा-कशाचा संग्रह आपण करतो. ?

प्रथम क्रमांक येतो वित्ताचा, मग वस्तूंचा, नंतर व्यक्तींचा व शेवटी विचारांचा. यांत जरी एक दोन तीन चार असे क्रम लावले असले, तरी जरुरीच्या वेळी पहिला क्रमांक कोणत्याही एका गोष्टीचा लागू शकेल. वित्ताने सर्वच गोष्टी मिळत नाहीत. वित्त हवेच. पण चांगल्या व्यक्तींचा, जिवास जीव देणाऱ्या माणसांचा संग्रह ही अवश्य आहे. वित्त आहे, पण काही वस्तू आयत्या वेळी जवळ नसल्या तर मोठी अडचण भासते. वित्त, वस्तू, व्यक्ती या गोष्टी दृश्य व व्यक्त आहेत. पण आणखी एक आवश्यक व संग्राह्य घटक आहे, तो विचारांचा. ऐन प्रसंगी सुचणारा विचार माणसाला अडचणीतून पार पडायला फार उपयोगी पडतो. अशा कोणत्या विचारांचा संग्रह तुमच्या जवळ आहे ? तो मनात आहे, का वहीत आहे ? का काही पुस्तकांत आहे ?

प्रसंगाप्रसंगाने उपयोगी पडणारे विचार तिन्ही ठिकाणी असतात. ते आपल्या स्मृतीत, वहीत आणि आवडत्या पुस्तकात, अशा तिन्ही ठिकाणी असतात. असे विचार आपण आपल्या पूर्व अनुभवाने निश्चित करून मनात व स्मरणात ठेवतो. काही इतर ठिकाणचे घेतलेले किंवा प्रसंगाप्रसंगाने सुचलेले स्मरणवहीत ठेवतो. जीवनाचा खोलवर ज्यांनी विचार केला आहे व ग्रंथ लिहून ठेवले आहेत, अशा लेखकांचे ग्रंथ आपण संग्रही ठेवतो.

वित्त, वस्तू व व्यक्ती या गोष्टी जीवनात आवश्यक आहेत, त्याचप्रमाणे जीवनात वारंवार उपयोगी पडणाऱ्या विचारांचा समृद्ध असा संग्रह देखील, प्रत्येक घरात व प्रत्येक व्यक्तीजवळ असणे आवश्यक आहे. या विचारांमुळे निरनिराळ्या प्रसंगी आपले आचार कसे ठेवावेत, किंवा आपल्या मनाच्या वृत्तींना कसे वळण लावावे, ते आपणांस कळते. असे विचार केवळ संग्रही असून उपयोगी नाही; त्यांची वारंवार आवृत्ती झाली पाहिजे. ते ग्रंथ व ते विचार पुन्हा पुन्हा वाचले पाहिजेत. अनेक वेळी वाचल्याने ऐन प्रसंगी ते आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. लघुकथा, कादंबऱ्या इ. वाङ्मय व जीवनावश्यक सकस विचार, यांच्या वाचनात फरक आहे. पहिला प्रकार हलका फुलका व एकदोन वेळा वाचण्यापुरता असतो. सकस विचारांचे वाङ्मय हे पुन्हा पुन्हा वाचावे लागते. वस्तूचा व वित्ताचा किंवा व्यक्तींचा आपण जसा ऐन वेळी उपयोग करतो तसा विचारांचा व्हावा. याकरता त्या विचारांची आवृत्ती पुन्हा पुन्हा करावी लागते. असे जीवनाला मार्गदर्शन करणारे दोन-चार ग्रंथ आपल्या हाताशी नेहमी असावेत. दिवसात निदान एकदा काही तरी

विचारांचे वाचन करावे. प्रत्येक वाचनाचे वेळी काही शब्दन् शब्द किंवा प्रत्येक वाक्य वाचण्याची आवश्यकता नसते. तो विचार एकदा मनात व स्मृतीत येऊन गेला म्हणजे पुरे. त्या विचाराची ज्या वेळी आवश्यकता असेल त्या वेळी तो सहज आपल्या मनात उभा राहील.

जीवनात सतत अनेक घटना घडतात व त्या वेळी कसे वागावे, कोणती मनोवृत्ती ठेवावी, असा प्रश्न मनात उभा राहतो. मला असा अनुभव येतो की अशा वेळी, मीच सदाचार चिंतनीत या विषयावर काय विचार लिहून ठेवला आहे त्याचे स्मरण करतो, आणि योग्य तो विचार आठवला की मनाची अस्वस्थता नाहीशी होऊन पुढील मार्ग व धोरण ठरवता येते. माझ्या पुस्तकांचा मलाही उपयोग होतो.

सदाचार चिंतनीविषयी असेच अनुभव अनेक लहान मोठ्या वाचकांना आलेले त्यांनी मला कळवले आहेत व दहा पंधरा दिवसांतून असे एखादे तरी पत्र येतेच. एकदा एक हुशार विद्यार्थिनी परीक्षेत थोडे मार्क पडून नापास झाली. तिने लिहिले; 'मी तासभर खूप रडले. मग आठवले सदाचार चिंतनी घरात आहे ती वाचावी. ती वाचली अन मन शांत झाले!' योग्य वेळी योग्य विचारही मनाला शांती देऊ शकतात, की जी वित्ताने, वस्तूने किंवा व्यक्तीकडून मिळू शकत नाही.

या ग्रंथांचा स्वयंसेवावृत्तीने प्रचार करणारे अनेक स्नेही व कुटुंबे मला मिळाली आहेत. ही पुस्तके ते विकत घेतात आणि भेट म्हणून आप्तांना, व्यवसाय-मित्रांना व इतरांना देतात. काही अधिकारी अनेक प्रती घेऊन आपल्या सेवक वर्गात त्या वाटतात. या ग्रंथाचा लेखक मीच आहे. पण प्रसंगा-प्रसंगाने त्यातला एखादा भाग हातात असला की तासभर वेळ तरी त्याच्या वाचनात सहज जातो.

माझ्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी, मित्रांनी, श्रोत्यांनी व वाचकांनी हे ग्रंथ व गीतावाङ्मय खरेदी केले असेल. त्यांना माझे असे सांगणे आहे की या ग्रंथांचे सतत, नित्य, प्रतिदिनी थोडा वेळ तरी वाचन किंवा सिंहावलोकन चालू ठेवा. ग्रंथ निवळ संग्रही ठेवलेत तर, ते ग्रंथच विचारसंपन्न राहातील, पण त्यांचे वाचन व अवलोकन चालू ठेवलेत तर तुम्ही विचारसंपन्न व्हाल, व ते विचार तुमचा आचार आणि प्रवृत्ती यांना उन्नत करीत राहतील. जीवनाला सकस विचारांचे मार्गदर्शन करणारे वाङ्मय पुन्हा पुन्हा वाचा. एकदा वाचून भागत नाही. आवृत्ती हवी. त्यावर चिंतन व मनन हवे. मग ते आपल्या जीवनाचा एक अंगभूत भाग होतील. तुमचे व्यक्तिमत्त्व संपन्न करतील. तुम्हाला आनंद, शांती व सुख मिळेल. तुमच्या भोवतालच्या व्यक्तींमध्येही या गुणांचे हळूहळू संक्रमण होईल.

त्याकरताच हा पाचवा भाग सादर करीत आहे. स्वागत कराल ना?

१५-६-१९८२
८४ वा वाढदिवस



सुखी संसाराचे रहस्य

(या संग्रहात कौटुंबिक जीवनाविषयी अनेक लेख आहेत. लेखकाचे स्वतःचे कौटुंबिक जीवन कसे होते ते पुढील लेखावरून कळेल.)

सौ. कां. कुमारी अंबुताई

कुमारी अंबुताई करी या पंधरा वयाच्या मुलीला वधू म्हणून मी १९२४ साली पसंत केली. पण खरे म्हणजे तिने व माहेरच्या मंडळींनी मला पसंत केले, हे सत्याला धरून होईल. अनाथ विद्यार्थी गृहात केवळ अन्न-आच्छादन घेऊन मी आजीव सेवक झालो आहे, अशा स्थितीत मुलगी द्यायची असेल तर द्या असे मी सांगत असे. त्यामुळे ३०।३२ स्थळे मला सांगून आली पण माझी ही प्रतिज्ञा ऐकल्यानंतर मुलींचे पालक पुन्हा फिरकत नसत. पण ही अट ऐकूनही व तसे मुलीला सांगूनही तिने मला पसंत केले व २८ मे १९२४ रोजी कुमारी अंबुताई या सौ. यमुनाताई गजानन खैर झाल्या. त्यांनी माझ्याबरोबर ५६ वर्षे संसार करून ९ जानेवारी १९८० रोजी देहविसर्जन केले.

बौद्धिक जीवन

सौ. ताईंचे माहेर हुबळीचे. तेथेच कानडी मुलखात तीन यत्तांपर्यंत मराठी शिक्षण झाले. पुढे आई-वडील निवर्तल्यामुळे बार्शीला मामांकडे, सुलाखे कुटुंबात वाढल्या. शिक्षण पुढे झाले नाही. पण मी घरीच सात इयत्तांपर्यंतची मराठी पुस्तके व इंग्रजीची ३ रीडर्स त्यांचेकडून वाचून घेतली. मग इतर पुस्तके त्यांनी खूप वाचली व त्यांची यादीही ठेवली होती. वृत्तपत्रांचे वाचन त्या नियमितपणे करीत. त्यामुळे बहुश्रुतता वाढली. माझ्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या स्त्री-पुरुषांबरोबर गप्पागोष्टी करताना कमी शिक्षण उघडकीस आले नाही. अलीकडे श्रवणदोषांमुळे मी गप्पागोष्टीत फारसा भाग घेऊ शकत नव्हतो तरी ती माझी जागा सौ. ताईंनी चांगल्या तऱ्हेने भरून काढली. पण वादविवाद करणे किंवा भाषणे करणे यात त्यांना गोडी नसे व भीती वाटे.

गरिबीत सुखी संसार

सौ. ताईंचे बालपण सुखवस्तू श्रीमंतीत गेले होते तरी विवाहानंतर माझ्या गरिबीच्या जीवनात त्या सहजपणे एकजीव झाल्या होत्या. त्यांच्या कमी शिक्षणाबद्दल मी त्यांना हिणवले नाही व माझ्या गरिबीबद्दल त्यांनी कधी अवाक्षर काढले नाही. एकमेकांचे गुणदोष व कमतरता आम्ही जाणीवपूर्वक सांभाळून घेतल्या. माझे बालपण

परिस्थितीमुळे गरिबीत गेले व शिक्षणानंतर गरीब मुलांच्या सेवेकरता मी आजन्म गरिबीचे व्रत स्वीकारले. सर्व परिस्थितीत ताईनी अत्यंत समाधानाने संसार केला. खाणे-पिणे, वस्त्र-प्रावरणे, दाग-दागिने, करमणुकीची साधने, राहाणीचा दर्जा इ. कोणत्याच गोष्टींत त्यांनी कशाचाही आग्रह धरला नाही, त्याना कशाचा सोस वाटला नाही, कधी हट्ट धरला नाही कीं कधी असमाधानाचा शब्द उच्चारला नाही. याच कालखंडात स्त्रियांना मोह घालणाऱ्या अनेक वस्तू व साधने बाजारात आली व त्यांची हाव अनेक कुटुंबातील स्त्रियांना वाटली. माझे घर त्याला अपवाद होते.

माणुसकीची वागणूक

आमच्या खाजगी व सार्वजनिक जीवनात शिक्षण, संस्कृती, संपत्ती, व अधिकार या दृष्टींनी अनेक दर्जाच्या व्यक्तींशी माझ्याबरोबर ताईंचाही परिचय झाला व भेटीगाठीचे प्रसंग आले. सर्वांशी वागण्यात तिच्या ठिकाणी शालीनता, सौजन्य, आदरातिथ्य, आपुलकी, जिव्हाळा, सहानुभूती, मनमोकळेपणा, साहाय्यवृत्ती, निष्कपटी मन, इ. लोकप्रियता देणारे गुण दिसून येत. कधी कोणाला ती टाकून बोलली नाही, कोणाशी भांडला नाही, कोणाचा अपमान केला नाही किंवा उपहासात्मक वा अपमानकारक शब्द उच्चारल नाहीत. त्यामुळे तिने सर्वत्र स्नेह व सदिच्छा संपादन केली. मोलकरणी व अशिक्षित स्त्रिया यांच्याशीही ती सौजन्याने वागे व त्यांना साहाय्य व मार्गदर्शन करी. नातेवाईक, मित्रमंडळी, संस्थेचे कार्यकर्ते, हितचिंतक व आजी-माजी विद्यार्थी, माझ्या ग्रंथाचे वाचक व व्याख्यानांचे श्रोते, जिज्ञासू अपरिचित व्यक्ती, अशा अनेक थरांतील लोकांशी वागताना तिने आपुलकीची वृत्ती दाखवली, प्रसन्न मनाने व वदनाने वागून तिने अनेक माणसे जोडली.

संसारी जीवन

अगदी प्रारंभापासून तिने माझी काळजी, सेवाशुश्रूषा, आणि पथ्यपाणी यांकडे लक्ष दिले व त्यात वाढते प्रमाण ठेवले. माझी सर्वतोपरी काळजी घेणे हा तिचा स्वभावधर्मच होता. त्यामुळे मला दीर्घायुष्य, आरोग्य व कार्यक्षमता लाभली. केवळ बाह्यस्वरूपाचीच नव्हे तर माझ्या मनाच्या स्वास्थ्याचीही काळजी तिने घेतली. मनाला लागेल, चिंता वाटेल, दुःख होईल, राग येईल, नापसंती वाटेल अशा गोष्टी ती काटाक्षाने टाळी. त्यामुळे तिच्याही शरीराची व मनाची दुःखे मला नीटपणे कळू शकली नाहीत, हा तोटा झाला. ती इतरांशी खूप मोकळेपणाने गप्पा मारी, पण माझ्याशी बेतास बात बोलणे असे. साध्या गोष्टी अण्णांना काय सांगायच्या असे तिला वाटे. मला कधी उद्धटपणाने, अपमानकारक आणि तिरस्काराने बोलली नाही. माझ्याशी कधी भांडली नाही. कधी रागावली तर तात्पुरतीच खिन्नता तिच्या वागण्यात दिसे. ती माझ्याकरता जगली. क्षणोक्षणी माझ्या सुखाचा विचार तिच्या

मनात होता. माझ्याविषयी तिला कौतुक, अभिमान, आदर, गौरव, व जिव्हाळा होता. अखेरच्या दुखण्यात रुग्णालयात जाताना तिने विचारले, "कुंकवाचा करंडा घेतला का?" शेवटच्या शुद्धीतील तिच्या दुर्बल हातांची हालचाल पाहून भावाने विचारले, "ताई तुला काय पाहिजे?" तिने विचारले, "माझ्या कपाळी कुंकू आहे का रे?" त्याने सांगितले "होय, चांगले मोठे अन् स्पष्ट आहे बर." निधनानंतर तिचा चेहेरा शांत दिसत होता.

सेवा वृत्ती

आपले शिक्षण कमी असल्याने माझ्या सार्वजनिक कामात साहाय्य करता येत नसे याची तिला खंत वाटे. पण देण्यासारखे सर्व सहकार्य न मागता तिने मला दिले. आश्रमातील आजारी व अडचणीतील मुलांना ती आईप्रमाणे सर्व साहाय्य करी. माझ्याकडे येणारांचे आदरातिथ्य न कंटाळता करी. अलीकडील पंधरा वर्षे गावोगावी गीताप्रचार करण्याकरता हालअपेष्टांची फिकीर न करता लहान-मोठ्या सर्व गावांतल वस्तीची व वाहनांची गैरसोय सोसून, ती माझ्याबरोबर महाराष्ट्रात व भारतात फिरली. व्याख्यान संपेपर्यंत दाराशी पुस्तके मांडून बसणे आणि सभा संपल्यावर ग्रंथविक्री करणे हे काम ती करी. एका श्रीमंत नातलग स्त्रीने विचारले, "हे काम तू करतेस का?" त्यावर ती म्हणाली "होय. अण्णांच्या कामात मला दुसरे काय करता येणार ? जे येते ते मी करते." हा प्रसंग आठवून माझे डोळे पाणवतात, कंठ दाटून येतो, अंतःकरणात करुणा निर्माण होते. स्वतःला पूर्णपणे विसरून माझ्याशी एकरूप झालेली, स्वतःच्या असमर्थतेची कीव करणारी, आणि मला सर्वतोपरी सुखी ठेवणारी पत्नी मला मिळाली. भाग्य माझे !

धार्मिक जीवन

ताईचे धार्मिक जीवन अगदी साधे असे. कोनाड्यात बाळकृष्ण, अन्नपूर्णा व गणपती यांच्या मूर्ती असत. त्यांची रोज पूजा करी. सोवळे ओवळे पाळण्यापेक्षा स्वच्छतेवर तिचा कटाक्ष असे. धर्माचे फार स्तोम तिने केले नाही. धर्मग्रंथ व गीता वाचून जी मनोवृत्ती बनायला हवी ती तिने आत्मसात केली होती. काम, क्रोध, द्वेष, मत्सर या विकारांपासून ती अलिप्त होती. जिभेवर, वाणीवर, मनावर व देहावर तिचा संयम होता. धर्माने जे साधायचे ते तिने साध्य केले होते. पूज्य गोंदवलेकर महाराजांच्या दर्शनाला तिची आई गेली होती, तेव्हा महाराजांनी उदगार काढले होते "तुझी मुलगी भाग्यवान होईल." त्या आशीर्वादाचा लाभ तिला व मलाही झाला.

सुगृहिणीचा संसार

सांसारिक कामात प्रारंभी ताई अनभिज्ञ होती. पण निरीक्षण, वाचन, श्रवण, प्रयोगशीलता या वृत्तीमुळे ती आदर्श गृहिणी झाली. घरची आणि बाहेरची सर्व कामे तीच करी. बँकेची कामे, जमाखर्च, ग्रंथविक्रीच्या नोंदी इ. सर्व ती करी. प्रापंचिक कामातले अमुक एक मी करावे असे तिने मला कधी फर्मावले नाही- मुलामुलींचे व माझे कपडेलत्तेही खरेदी करण्याचे काम तीकरी. यामुळे सार्वजनिक कामाला, अभ्यासाला व लेखनाला मला भरपूर वेळ मिळाला. प्रपंचाची भुणभुण मागे नव्हती.

आरोग्य-रक्षण

माझ्या पथ्यपाण्याची तिने सतत काळजी घेतली. उपास-आहाराचे व जलोपचाराचे माझे प्रयोग चालत त्याबद्दल कधी त्रास मानला नाही. स्वतःच्याही प्रकृतीची तिने सतत निगा राखली. आहारावर नियंत्रण ठेवून देहाला स्थूलता येऊ दिली नाही. मधुमेहाला ताब्यात ठेवण्याकरता जिभेवर कडक नियंत्रण ठेवले. तिच्या ठिकाणी आत्मसंयमन हा नैसर्गिक सद्गुण होता, तो प्रपंचात फार उपयोगी पडला.

सुखे व दुःखे

संसार म्हणजे सुख-दुःखांचे जीवन आलेच. अत्यंत दारुण दुःख मृत्यूचे. आमचा विवाह १९२४ मध्ये झाला व पहिल्या तेरा वर्षांत झालेले तीनही पुत्र काही ना काही कारणाने इहलोक सोडून गेले. पहिला एक महिन्यातच गेला. त्याला मी पाहिलेही नव्हते ! दुसरा बालपणापासूनच अपस्माराने (एपिलेप्सी) बीमार म्हणून मेंटल हॉस्पिटलमध्ये ठेवावा लागला. तेथे तो ३२ व्या वर्षी वारला. त्याचा मृतदेह आम्ही पाहिला व घरी आणला. हॉस्पिटलमध्ये भेटीला गेल्यावर प्रत्येक वेळी म्हणे की 'घरी यायचे', पण आला की बेफाम व्हायचा. शेवटी अंतकालानंतर तो घरी आला व तसाच स्मशानात गेला ! तिसरा मुलगा दोन अडीच वर्षांचा असतानाच पोटाच्या विकाराचे निमित्त होऊन वारला. त्या वेळी मी अमेरिकेत होतो, व सौ. ताई एकटीच येथे होती. त्याच्या मृत्यूचे पत्र न्यू यॉर्कमध्ये एका शुक्रवारी आले. चार दिवस मी दुःख मनात ठेवले, पण सोमवारी युनिव्हर्सिटीतून आल्यावर दाराला आंतून कडी लावून घेतली आणि मनसोक्त रडलो. ताईची येथे काय स्थिती झाली असेल ! पोटात नऊ नऊ महिने वाढलेले तिघेही पुत्र काळाच्या उदरात गेले. १९३७ नंतर एक मुलगा व तीन मुली झाल्या. ते सर्व उत्तम शिक्षण पूर्ण करून आपापल्या संसारात सुखी आहेत. त्यांच्या सुखाने आईलाही सुखी केले. १९३९ साली मी अमेरिकेला निघालो. त्या वेळीही निरोप देताना ताईनी जो हंबरडा फोडला तो अद्याप माझ्या कानात आहे ! पहिल्या अशिक्षित पत्नीला टाकून

शिकलेली पत्नी घेण्याचा तो काळ होता. त्याचा तिच्या मनावर परिणाम झाला असावा. आपल्या नशिबात काय आहे? असा प्रश्न तिच्या मनात असावा. मी एकटा परत आलेला पाहून तिला आनंद झाला. मग पुन्हा जपानला जाताना मात्र तिने आनंदाने निरोप दिला.

प्रसन्न हास्य

सर्वांना ताईची स्मृती आहे ती त्यांच्या आनंदी, हसतमुखी, प्रसन्न, शांत, संयमी व शालीन चेहेऱ्याची. वधू म्हणून निवड करताना मी त्यांच्या याच वरवर सहज दिसणाऱ्या गुणाला महत्त्व दिले व ते सार्थ ठरले. गरिबीचा संसारही आम्ही आनंदाने केला, त्या आनंदी व प्रसन्न वृत्तीचा फार उपयोग झाला. ताईंच्या स्वभावात काही दोषही होते पण इतरांना त्याची झळ लागण्यासारखे ते नव्हते. तरी पण स्वतःच्या स्वभावाला त्यांनी पुष्कळच मुरड घातली.

सुखी संसाराचे रहस्य

२८ जून १९२४ ते ९ फेब्रुवारी १९८० पर्यंत ५६ वर्षे आम्ही सुखाचा संसार केला. परस्परांच्या गुणदोषाला व कमतरतांना सांभाळून घेतले. कधी एकेरीवर आलो नाही. परस्परांचा मान ठेवला. उभयतांनी परस्परांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर केला. आदर्शाच्या स्वप्नात न राहता पृथ्वीवर पाय ठेवून, वास्तवता ओळखून, वागलो. हेच सुखी संसाराचे रहस्य असावे.

स्मृतीत दुःख व सुख

सौ. ताईंची विस्मृती होणे कठीण आहे. ही कृतज्ञता आवश्यकच आहे. मी सकाळी स्नान झाल्यावर फोटोचे दर्शन घेतो. त्यांची आवडती मुद्रिका बोटात घालतो. त्यांच्या स्मृतीकरता अंगणात तुलसीवृंदावन बांधले आहे तेथे चार फुले ठेवतो. माझे जीवन सुखी, कृतार्थ, यशस्वी व अर्थपूर्ण करण्यात सहकार्य दिल्याबद्दल मनोमन कृतज्ञ होऊन नतमस्तक होतो आणि खिन्न मनाने दैनंदिन कामाला लागतो. जीवनातला एक आनंद कायमचा गेला, पण तो स्मृतिरूपाने राहिला. जीवनात सुखे व दुःखे दोन्ही आहेत. अर्घा पेला रिकामा आहे, पण खाली अर्घा भरलेलाही आहे.

We look before and after, And pine for what is not,
Our sincerest laughter, With some pain is fraught.
भूत-भविष्याकडे, बघुनी जे नाही त्यास्तव मन झुरते ।
वरिवरि कितिही हास्य खळाले हृदय परी शोकात जळे ।।



लेखकाचे वाङ्मय

१. **सदाचार चिंतनी** – ५ भाग. प्रत्येकी ११८ ते १५६ पाने, एकूण पाने. ६७६ कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक प्रसंगावर चिंतन. प्रत्येकी कि. रु. १०

२. **मूळ गीतेचा शोध** – पृ. २१०, ३ आवृत्त्या. गीतेची रचना व संदेश यांवर मौलिक संशोधन, गीता वाङ्मयात महत्त्वाचा ग्रंथ. रु. १०

३. **गीता विकास** – पृ.२५६, २ आवृत्त्या. संशोधनाचे आधाराने संकलित स्वरूपात विकास दाखविणारे गीतेचे विवरण छपाई चालू

४. **मराठी गीता व विवरण** – पृ. १२७. २ आवृत्त्या. अध्याय व श्लोक यांच्या क्रमाने गीतेचा अर्थ व विवरण. सुसंगती दर्शक सिंहावलोकने व प्रस्तावना. प्राथमिक वाचनार्थ आवश्यक. रु. ६

५. **त्रिकाल गीता** – पृ. ४५. ३ आवृत्त्या. गीता विकासाच्या ३ अवस्था ३ रंगांत. मूळ गीता व नंतर दोन वेळ पडलेली भर छपाई चालू

६. **गीतेतील मुख्य विचार** – पृ. ११०. ५ आवृत्त्या. मुख्य ५२ विचार, २०० श्लोक, अन्वय, अर्थ, विवरण व प्रत्यक्ष व्यवहार. अत्यंत लोकप्रिय. शिक्षण संस्था व कुटुंब यांना उपयुक्त रु. ६

७. **सर्वबोध पद्यगीता** – पृ. ८४. ३ आवृत्त्या, संपूर्ण गीतेतील ७०० श्लोकांचा आर्या व इतर वृत्तांत मराठी अनुवाद. सोपा, मधुर, व पाठांतरास सुलभ. प्रत्येक परिच्छेदाचा गद्य सारांश. रु. ३॥

८. **गीतेचा दृष्टिकोन** – पृ. १७४. २ आवृत्त्या. संपूर्ण गीतेची विषयांच्या अनुरोधाने नवीन मांडणी व विवरण. एकेका प्रकरणात एकेक संपूर्ण विषय. आधुनिक ग्रंथाप्रमाणे अभिनव रचना छपाई चालू

९. **जीवनात गीता** – पृ. २१२. पहिली आवृत्ती, गीतेतील मुख्य प्रश्न, त्यांची उत्तरे, आजच्या भाषेत त्यांची मांडणी व आजच्या जीवनात उपयोग. गीतेवरील एक नवीन व स्वतंत्र भाष्य रु. १२

१०. **गीतेतील मुख्य विचार** – पुरवणी, मराठी श्लोक, मुख्य विचारांचे २०० श्लोक. आवश्यक. पाठांतरास उपयुक्त रु. २

११. Quest for The Original Gita – पृ. २६२, पहिली आवृत्ती (संपली). गीतेवरील संशोधनाचा इंग्लिश अनुवाद व विकासदर्शक ३ रंगांत गीता. आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा ग्रंथ (सोमय्या पब्लिकेशन मुंबई) रु. ३२

१२. Gita, My Research and Interpretation – पृ. ३२, पहिली आवृत्ती. गीतेवरील संशोधनाचा संक्षिप्त सारांश व गीतेचे सुसंगत विवरण. लास्की इंस्टिटचूट, अमदाबाद, प्रकाशन. रु. ६

१३. **बालगड व इतर कथा** – पृ. २८, २ री आवृत्ती. **बालकांकरिता गोष्टी.** रु. ३



१. विचार-प्रसाराची गुरुदक्षिणा

१८९८ साली माझा जन्म झाला. आता मी १९८८ कडे वाटचाल करीत आहे आणि तेथून पुढे १९९८ कडे जाण्याची इच्छा आहे. ज्ञानार्जनाची, ज्ञानदानाची व सद्विचार–सदाचार प्रसाराची व्यापक कामे व क्षितिजे मला दिसत आहेत. पण ही कामे ज्या प्रमाणात वाढत आहेत त्याच्या उलट प्रमाणात शरिरबल व आयुष्य कमी होत आहे. समाजाच्या व्यापक कामाला एक व्यक्ती मार्ग दाखवू शकेल व साधने पुरवू शकेल. पण त्याला अधिक व्यक्तींच्या सहकाराची जरुरी आहे.

६० व्या वाढदिवशी व नंतरही, तुम्ही मला वस्तू आणि द्रव्य या रूपाने गुरुदक्षिणा दिली. आता ही गुरुदक्षिणा मी मागून घेत आहे. ती जरा निराळ्या प्रकारची आहे. द्रव्य व वस्तू नकोत. सम-कार्याची दक्षिणा द्या. माझे विद्यार्थी, सहकारी, मित्र, हितचिंतक, वाचक व श्रोते, सर्वांच्याकडे ही दक्षिणा मी मागत आहे.

मी जे शैक्षणिक कार्य केले त्यात शील-सदाचार-चारित्र्य या गुणसंवर्धनावर भर होता. मी जे वाङमय लिहिले तेही याच गुणांचा समाजात प्रसार करण्याकरता. सदाचार चिंतनीचे चारही भाग वाचकांना आवडले. भगवद्गीता याच उद्देशपूर्तीकरता उपयुक्त आणि म्हणून तिच्यावर संशोधन करून, अगदी स्वतंत्र विचार करून, तिचा तर्कशुद्ध, पृथक्करणात्मक व ग्रंथाशी जुळणारा अर्थ कसा लावावा ते सांगण्याकरता गीतावाङमय निर्माण केले. तेही लोकप्रिय झाले.

या सर्व वाङमयाचा प्रसार जाहिरातीने न होता वाचकांच्या सांगोवांगीने आजपर्यंत झाला. शिवाय १९७०-७१ पासून मी व सौ. ताईनी अथांग महाराष्ट्रात शंभरांहून अधिक गावे, बहुतेक सर्व जिल्हे, राज्याबाहेर उज्जैन–इंदोर–ग्वाल्हेर, भोपाळ, दिल्ली, झाशी, हुबळी, हैदराबाद, मद्रास, पांडीचरी इत्यादी भागात प्रवास करून गीतेवर सात-आठशे व्याख्याने दिली व वाङमय लोकांच्या घरोघर पोचविले. हा काल माझ्या सत्तरीचा व सौ. ताईंच्या साठीचा होता. सौ. ताई ९–२–८० रोजी निवर्तल्या व माझे मनुष्यबळ कमी झाले. गीता प्रसाराचे कामी त्या साध्वीने मला बहुमोल मदत केली. तिच्या निधनानंतरही माझा प्रवास, प्रचार व्याख्याने, लेखन, इ. चालू आहे. पण यापुढे त्याची गती मंदमंदच हो जाणार. हे काम तुम्ही चालू ठेवण्याची गुरुदक्षिणा मी मागत आहे. सदाचार–शील-चारित्र्याच्या वाङमय-प्रसाराचे काम तुम्ही हजारो हातांनी व हजारो मुखांनी स्वीकारा, व त्याचा प्रारंभ याच वर्षी करा. आजच.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात समाजाची नैतिक पातळी ढासळू लागली पाश्चिमात्य देशांतील इंद्रियसुखप्रधान जीवनाचे व स्वार्थी समाजद्रोही प्रवृत्तीचे वातावरण इकडे आले. यावर उपाय शोधण्याचे काम तिकडील विचारवंतही करीत आहेत. त्यांना सुचलेली उत्तरे गीतेतील उत्तराशी अगदी मिळतीजुळती आहेत. म्हणून गीतेच्या नवनवीन आवृत्त्या त्या देशात निघत आहेत व खपत आहेत. पाश्चिमात्य विज्ञान आणि भारतीय तत्त्वज्ञान यांची सांगड घालणे हे भारताचे कार्य आहे. ते माझ्या वाङमयातून चालवण्याचा माझा प्रयत्न आहे. विज्ञान आणि तत्त्वज्ञान, वैभव आणि वैराग्य, भोग आणि त्याग, वैपुल्य आणि दातृत्व, लोकशाही आणि समाजबंधने, या गोष्टींची सांगड भारतीय तत्त्वज्ञानाने घातली आहे. या विचारांचा विस्तार सदाचार चिंतनीत आणि गीतावाङमयात केलेला आहे. परमार्थ, मोक्ष, ब्रह्मज्ञान यावर माझा मुख्य भर नाही. ऐहिक जीवन सात्त्विक व नैतिक कसे करावे ते सांगितले आहे.

सदाचार चिंतनीतील एकेक विचार जीवनात परिवर्तन करणारा आहे. ही पुस्तके मला न कळत स्वतःच्या गुणांनी लोकप्रिय झाली व त्यांच्या अनेक आवृत्त्या निघू लागल्या. तसेच माझे गीतेचे विवरणही जुन्या गीताभक्तांना नवीन वाटलेच, पण तरुण पिढीलाही पुन्हा गीतेकडे आकर्षित करणारे ठरले आहे. हे वाङमय लोकांना हवे आहे. त्यांना त्याचा परिचय करून द्यायला हवा. त्याची इष्टता व उपयुक्तता, दाखवायला हवी. या कामी तुमचे सहकार्य व समकार्य हवे आहे. या पुस्तकांच्या किमती 'ना नफा ना तोटा' किंबहुना थोडा तोटाच, अशा ठेवल्या आहेत. मी आणि संस्थेने हा फायद्याचा प्रश्न मानला नसून, आम्ही हे एक मिशन, पवित्र कार्य मानले आहे. लोकांना त्याची भूक आहे. हे ताट त्यांच्याकडे नेऊन त्यांना दाखवायला हवे आहे. आग्रह करण्याची गरज नाही. ते स्वखुषीने स्वीकार करतील व तुमचे आभार मानतील. चांदा, मिरज, अहमदाबाद, गुलबुर्गा, मिरज, इत्यादी गावी एक एक हजार रुपयांची पुस्तके खपली. लोकांनी आपणहून मागून घेतली. अगदी लहान गाव असले तरी ३५० ते ५०० रुपयांची पुस्तके सहज घेतली जातात असा आम्हाला अनुभव आला.

माझी सम-कार्यरूपी गुरुदक्षिणेची मागणी साधी आहे, प्रत्येक आठवड्यात सवडीच्या वेळी तुम्ही निदान ३–४ व्यक्तींना तरी हे वाङमय दाखवून, त्यांना आवडेल ते विकावे. गळ्यात बांधायला नको. त्यांच्या हितार्थच ते घेतील. तुम्ही त्याना भेटायला पाहिजे व याची माहिती द्यायला पाहिजे. तुमच्या घरी येणारे किंवा तुम्ही ज्यांच्याकडे जाता असे लोक, नातेवाईक, मित्र, व्यावसायिक, ऑफिस मंडळी, संस्थाचालक इ. लोकांना तुम्ही भेटून हे काम करू शकाल. प्रत्येक वाढदिवसाच्या दिवशी तुम्ही मला

"शतायुषी व्हा" अशी इच्छा प्रगट कराल ना ? मग निदान शंभर लोकांना प्रतिवर्षी समक्ष भेटून या वाङमयाची माहिती द्या. त्यातील पन्नास लोकांनी संपूर्ण सेट किंवा काही पुस्तके घेतली तरी रुपये ३०० ते १००० पर्यंतचे वाङमय तुम्ही दरवर्षी प्रसृत करू शकाल. इतक्या सगळ्या लोकांपर्यंत मी केवळ तुमच्या साहाय्यानेच व सम-कार्याने पोचू शकतो. एवढी मव्यस्थी करा. या कामी कुटुंबांतील व मित्रमंडळीची सर्वांची मदत घ्या. अनेक लोकांशी बोलणे हाच एक अपूर्व अनुभव आहे. सदाचार प्रसाराचे दृष्टीने तुम्हांला अनेक गोष्टी करता येतील त्या पहा--

१. रोज रात्री सर्व कुटुंबातील व्यक्तींनी एकत्र जमून मराठी पद्यगीतेचा एक अध्याय व सदाचार चिंतनीतील एक विचार वाचावा.

२. 'गीता-वाचन मंडळ' काढून सुटीच्या दिवशी एक तास गीतावाङमय व सदाचार चिंतनीचे वाचन करून त्यावर चर्चा करावी.

३. वक्तृत्वाची आवड असल्यास या गीतावाङमयाचा अभ्यास करून तुम्ही गीतेवर प्रवचन व व्याख्यान देऊ शकाल.

४. घराशेजारील बालक व तरुण यांकरिता मराठी व संस्कृत गीता पाठांतराचा वर्ग चालवता येईल. संस्कार-केन्द्रच होईल ते एक.

५. या वाङमयाचा अभ्यास करून प्रावीण्य दाखविणाऱ्या तुमच्या गावातील शाळेच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्याची योजना करा.

६. या व अशा वाङमयाचे वाचनालय घरी सुरू करा.

७. गावातील शिक्षणसंस्था, ग्रंथालये, वाचनालये, मंडळे, इ. ठिकाणी हे वाङमय नसल्यास त्यांना दाखवा.

८. वाढदिवस, लग्न, मुंज, आनंदाचे प्रसंग इ. निमित्ताने भेटवस्तू म्हणून या वाङमयाचा उपयोग करा.

विचार केल्यास आणखी नवीन कल्पना तुम्हांलाही सुचतील.

वरील योजना व तिच्या मागील उद्देश सफल होण्याचे दृष्टीने तुमच्या काही विधायक सूचना असतील तर त्या अवश्य करा. प्रथम संस्थेकडून एक संच मागवून घेऊन तुम्ही सर्व पुस्तके पहा, म्हणजे तुमच्या आटोक्यातील व्यवहार्य योजना करणे सुलभ होईल. माझे हे काम चालूच आहे. तुमचे सम-कार्य मिळाले तर उत्साह व आनंद द्विगुणित होऊन त्यामुळे आयुष्य वाढेल. तुम्हीं व्यक्तिशः काय करू शकाल व माझे त्या कामी काय सहकार्य लागेल ते कळवा. ही नवीन गुरुदक्षिणा आता मला अपेक्षित आहे. ती देऊन मला संपन्न करा.

[१५-६-१९७७

२. तीन नैतिक जबाबदाऱ्या

जगायचे कशाकरता ? हा प्रश्न अनादी कालापासून प्रत्येक पिढीतील विचारी माणसापुढे उभा असतो. विचार न करता जे पशुतुल्य वृत्तीने जगतात ते जीवनात खाणे-पिणे, कामवासना आणि सुखोपभोग यांपलीकडे फारसे पहात नाहीत. जे विचारी. असतात ते आपापल्या बुद्धीप्रमाणे एखादे ध्येय निश्चित करून त्याकरता जगण्यात सुख मानतात.

प्राचीन विचारवंतांनी मानवी जीवनापुढे तीन ऋणांतून मुक्त होण्याची तीन उद्दिष्टे ठेविली होती, 'जायमानः हि पुरुषः त्रिभिः ऋणमान् जाय ते।' माणूस तीन ऋणे घेऊन जन्माला येतो. ऋषिऋण, पितृऋण आणि देवऋण. ऋषींनी निर्माण केलेल्या ज्ञानाचे अध्ययन करून ते पुढील पिढीला देणे हे ऋषिऋण 'ट्रान्स्मिशन ऑफ् नॉलेज् अँड कल्चर' असे आजच्या भाषेत म्हणता येईल. पितृऋण म्हणजे गृहस्थाश्रमातील कौटुंबिक व सामाजिक कर्तव्य करून, पुत्रपौत्रांना वाढवून वंशाचे सातत्य राखणे. देवऋण म्हणजे ज्या विश्वशक्तीने हे जीवन व जीवनातील सुखे दिली, तिचे स्मरण, पूजन, मनन इत्यादी करणे. कालाच्या ओघात ही ऋणे विस्मरणात लीन झाली व ती कालबाह्यही झाली. आजच्या आपल्या पिढीला कोणती ऋणे आहेत ते आपणच ठरवायचे आहे. ऋणाच्या जाणिवेशिवाय जीवन म्हणजे केवळ भोगवृत्तीचे, स्वार्थपरायण, ध्येयहीन, आकुंचित वृत्तीचे जीवन होय.

आजच्या काळातही प्रत्येक व्यक्तीवर तीन ऋणे आहेत. पालक ऋण, विद्या-ऋण आणि समाज ऋण. ऋण याचा अर्थ कर्ज किंवा देणे असा नाही. कर्ज आणि देणे यांना कायदाप्रधान अर्थ आहे. ऋण म्हणजे नैतिक जबाबदारी. ती कायद्याने बंधन-कारक नाही, पण सदसद्विवेक बुद्धीने बंधनकारक असते. या नैतिक ऋणात करार-मदार झालेले नसतात. देणारा निष्काम बुद्धीने कर्तव्य म्हणून देतो; पण ते नैतिक ऋण मानून, घेणाराने ते यथाकाल फेडावयाचे असा अलिखित संकेत असतो. कर्ज-रोखा फाडून टाकल्यानंतरही देणारांचे व घेणारांचे जे संबंध राहतात तसे या नैतिक ऋणांचे आहे.

पालक-ऋण म्हणजे आईबाप किंवा अन्य नातेवाईक यांनी, आपल्या अर्भका-वस्थेत, बालपणी आणि किशोरावस्थेत आपल्याकरता शारीरिक, आर्थिक व मानसिक

कष्ट घेऊन आपल्याला लहानाचे मोठे केलेले असते, त्यांचे ऋण फेडणे. हे द्रव्यदानाने फेडायचे नसून वृद्धापकाळात पालकांना सुखात ठेवून, त्या मार्गाने ऋणमुक्त व्हावयाचे असते. या ऋणाची जाणीव अलीकडे क्षीण होत चालली आहे. त्यामुळे वृद्धावस्थेतील अनेक व्यक्तींना कठीण अवस्थेत दिवस काढावे लागतात. या ऋणाची जाणीव आजच्या पिढीने ठेवली नाही तर कायद्याने ती त्यांच्यावर लादण्याची पाळी येण्याचा संभव आहे.

दुसरे आहे विद्या-ऋण. विद्या देणारे गुरू, शिक्षणसंस्था व वसतिगृहे यांनी आपल्या विद्यार्थिदशेत आपले अधिकाधिक शिक्षण करून, समाजात आपल्याला आर्थिक शाश्वती व मानमान्यता प्राप्त करून दिली, त्यांच्याविषयी कृतज्ञतेची सक्रिय जाणीव. विद्याग्रहणाकरता कधी थोडे फार शुल्क दिले जाते, कधी ते निःशुल्क घेतले जाते. पण चांगले विद्यादान केवळ द्रव्यदानाने होत नाही. गुरू आणि शिष्य, संस्था आणि शिष्य यांच्यात प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, आस्थेचे नाते असल्याशिवाय चांगले विद्यादान व संस्कारदान होत नाही. आस्थेने दिलेल्या विद्यादानाबद्दल कर्जरोखा लिहून घेतला जात नाही. शिष्यांनी मनात जाणीव ठेवून आपणांला सुस्थिती येऊ लागताच या ऋणातून मुक्त होण्याचा प्रारंभ करायला हवा. भारतापेक्षा अमेरिकेत ऋणविमोचनाची प्रवृत्ती फार मोठ्या प्रमाणात आहे. तिकडे अनेक संस्था केवळ लोकाश्रयावर चाललेल्या आहेत. त्यात महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृहे इत्यादी प्रकार आहेत. त्यांच्या माजी विद्यार्थ्यांचा या संस्थांना फार मोठा आधार असतो. त्याला 'ॲलम्नाय फंड' अशी संज्ञा आहे. पूर्वसंस्था व पूर्वविद्यार्थी यांचे, शिक्षणसमाप्तीनंतरही दीर्घकाळ प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध राहातात. संस्थांना त्यांच्या पूर्वविद्यार्थ्यांकडून लक्षावधी डॉलर्स मिळत असतात. नैतिक ऋणविमोचनाची जाणीव त्या देशात परंपरेने चालत आलेली आहे. सामाजिक कर्तव्यजागृतीचाच तो एक भाग आहे. या देशात अशा चांगल्या परंपरांचे अनुकरण होणे जरूर आहे. आज भारतातील लोकाश्रयी संस्थांनाही आपत्तीचे दिवस येऊ घातले आहेत. अशा काळात त्यांच्या माजी विद्यार्थ्यांच्या ठिकाणची नैतिक ऋणविमोचनाची जाणीव, हाच संस्था जिवंत, कार्यक्षम व वर्धिष्णू ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. संस्थांना याची जाणीव होऊ लागली आहे. पण पूर्वविद्यार्थ्यांच्या ठिकाणी ती अद्याप जागृत झालेली नाही.

तिसरे ऋण समाजाचे असते. समाजातील अनेक संस्थांचा आपण उपयोग केलेला असतो व करून घेत असतो. त्यांत ग्रंथालये, वाचनालये, दवाखाने, रुग्णालये, शिक्षण सहायक निधी, व्यायामशाळा, अनाथगृहे, वृद्धाश्रम, इत्यादी अनेक प्रकारच्या संस्था किंवा तत्सदृश कार्य करणाऱ्या व्यक्ती येतात. त्यांना साहाय्य

करून त्या जिवंत व कार्यक्षम ठेवणें हे नागरिकांचे ऋणविमोचन आहे व नैतिक कर्तव्य आहे. स्वत:ला, पुत्रपौत्रांना, संबंधितांना या संस्थांची केव्हा जरूर लागेल कोणी सांगावे ? स्वार्थ व परमार्थ दोन्ही दृष्टींनी हे समाजऋण अंशत: फेडीत राहिले पाहिजे.

प्राचीन काळी दैनिक जीवनात दानधर्म हा एक महत्त्वाचा भाग असे. आजच्या नागरिकांत दानाची भावना कमी होत चालली आहे. माझी प्राप्ती ही वैयक्तिक आहे व तिचा उपभोगही मी व माझे कुटंब घेईल. इतरांचाही माझ्या प्राप्तीत हिस्सा आहे ही जाणीव नष्ट झाली आहे. बालपणापासून माणसांना घेण्याची सवय असते, देण्याची वृत्ती नसते. संपत्तीचा उपभोग घेण्यात जसा आनंद आहे तसा, त्यापेक्षाही अधिक संपत्तिदानाचा, संचयदानाचा असतो. याचा एकदा तरी अनुभव घेऊन पाहा. तो पुन्हा पुन्हा भोगावासा वाटेलच. तेच सात्त्विक व संपन्न जीवन. [१४–११–१९७६

३. श्रीदत्त, देवता व सांप्रदाय

भारत अनेक देवदेवतांचा देश आहे. प्रत्येक देवतेची विशिष्ट मूर्ती असते, तिच्या उपासकांचा पंथ असतो. त्यांचा एखादा प्रमाणभूत असा ग्रंथ असतो, अनुयायांचा एक सांप्रदाय तयार होतो, त्यात अनेक सत्पुरुष व साधुसंत होतात, ते अनुयायांना सदाचाराची, भक्तीची शिकवण देतात व अनुयायांमध्ये एक प्रकारचा भ्रातृभाव निर्माण होतो. अशा अनेक देवता व त्यांचे सांप्रदाय भारतात आहेत. श्रीदत्तसांप्रदाय हा अलीकडील हजार वर्षांत वाढलेला आहे असे दिसते. महाराष्ट्रात या पंथाचा प्रसार बराच आहे व त्याची तीर्थस्थानेही अनेक आहेत. समाजाला दुराचारापासून, स्वार्थापासून आणि अतिरिक्त भोगप्रवृत्तीपासून निवृत्त करून सदाचार, बंधुभाव, परोपकार, चारित्र्य, त्यागवृत्ती, सुखदु:ख सहन करण्याचे धैर्य, व ईश्वरभक्ती यांच्याकडे त्यांची मने वळविण्याचे हे कार्य अशा सांप्रदायांनी भारतात केले आहे. समाजाला रानटी व आसुरी वृत्तीतून बाहेर काढून सुसंस्कृत करण्याचे बरेचसे श्रेय या सांप्रदायांना आहे.

भारतात आर्य लोक येण्यापूर्वीही या देशात राहणारे अनेक समाज होते. त्यांच्या विविध उपासना, देव-दैवते, त्यांच्या कथा, प्रतीके, नैतिक शिकवणी व प्रार्थना अस्तित्वात होत्या. त्यांत आर्य लोकांच्या वैदिक देवदेवतांची अधिक भर पडली. इंद्र, वरुण, अग्नी इत्यादी तेहेतीस प्रकारचे देव व देवगण वैदिक सांप्रदायात होते. आर्य-पूर्व देव-देवतांत

या नवीन दैवतांची व त्यांच्या उपासनांची भर पडली. प्रत्येक देवतेचे व पंथाचे अनुयायांना आपले दैवत श्रेष्ठ व इतरांचे गौण असे वाटते, हे आजही आपल्या अनुभवाला येते. धार्मिक भेदभाव भारताला नवीन नाहीत. ते पूर्वापार चालत आलेले आहेत. त्यांच्यातील भिन्नता कमी करून त्यांत ऐक्य कसे निर्माण करावे ही भारतातील विचारवंतांपुढे फार प्राचीन काळापासून ज्वलंत समस्या आहे. अनेक धर्मांत भावनात्मक ऐक्य निर्माण कसे करावे, हा आजही भारतापुढे प्रश्न आहे, तसाच तो पूर्वीही होता.

अनेक देव-देवतांच्या पंथातील महत्त्वाच्या तत्त्वांचा समावेश करून या देवतांची संख्या कमी करण्याचा भारतीय नेत्यांनी प्रयत्न केला. ईश्वरविषयक तात्त्विक कल्पना समाजाला दिली. जगन्नियंता ईश्वर एकच, अनादी, अनन्त, अव्यक्त, सर्वव्यापी, सर्व विश्वात भरून राहिला आहे, त्यालाच ब्रह्म म्हणतात. हे महान तत्त्व ऋषींनी शोधून काढले. त्या परब्रह्माची उपासना करण्याकरिता मानवाला दृश्य प्रतीके पाहिजेत म्हणून भक्तांनी आपापल्या देवदेवतांची सगुण उपासना करावी, पण मूलतः व तात्त्विक दृष्टीने, सर्व प्रतीके व देवता ही त्या एका विश्वचैतन्याची दृश्य स्वरूपे आहेत अशी शिकवण देऊन धार्मिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

देवतांची संख्या कमी करण्याकरता धर्मधुरीणांनी ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवतांमध्ये अनेक देवदेवतांची वैशिष्ट्ये समाविष्ट करून त्यांची उपासना प्रस्थापित केली. पुढे असे अनुभवाला आले की, या तीन पंथांच्या अनुयायांत आपलाच पंथ व आपलेच दैवत श्रेष्ठ असा दुरभिमान निर्माण होऊन समाज विभक्त व असहिष्णू होऊ लागला. म्हणून या तीनही देवतांचा समन्वय करून एक नवीन दैवत निर्माण करण्याची कल्पना धर्मकारणातील विचारवंतांना सुचली व त्यातून श्रीदत्तात्रेय ही देवता निर्माण झाली. या मूर्तीत तिन्ही देवतांची व भारतीय तत्त्वज्ञानाची प्रतीके आहेत. ब्रह्माचे यज्ञोपवीत, खडावा व कमंडलू आहे, विष्णूचे चार हात व त्यात शंख–चक्र–गदा–पद्म ही चिन्हे आहेत; आणि शिवाची झोळी, चंद्र, गंगा, भस्म, वन्य प्राणी इत्यादी चिन्हे आहेत; आणि ही देवता अव्यक्त परब्रह्माची सगुण व दृश्य मूर्ती आहे ही जाणीव करून देण्याकरिता त्याच्या वर्णनात्मक वाङ्मयात व प्रार्थनेत तूच परब्रह्म आहेस असे वारंवार उल्लेख केलेले आहेत.

त्वमेवैकः परंब्रह्म सच्चिदानन्दम् अद्वयम् । अव्यक्तम् व्यक्तिमापन्नम् इ.

अवधूत सदानंद परब्रह्म स्वरूपिणे । ब्रह्मसमाधियुक्तम् ।

दत्तात्रेयो महायोगी भगवान् भूतभावनः । चतुर्भुजो महाविष्णुः

दत्तात्रेयं शिवं शान्तम् । इ. इ.

कालान्तराने प्रत्येक देवतेसंबंधी कथापुराणे निर्माण झाली, त्या वेळी सामान्य-जनांच्या करमणुकीकरता अत्रिऋषी, त्यांची पत्नी अनसूया, इंद्राची चिंता, ब्रह्मा-विष्णु-महेशांची इच्छाभोजनाची मागणी इत्यादी कथा जोडल्या गेल्या. नुसते तत्त्वज्ञान व नीतितत्त्वे ऐकणे बहुजन समाजाला कंटाळवाणे वाटते. म्हणून आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, सुशिक्षित-अशिक्षित अशा सर्वांचे मनोरंजन करून शिवाय धर्मतत्त्वे, नीतितत्त्वे व सदाचार यांचे शिक्षण देणारी कथापुराणे मानवांनीच कल्पनेने व प्रतिभेने निर्माण केली. पण परिणाम मात्र उलटा होतो. पातिव्रत्य, एकपत्नीव्रत, आतिथ्यधर्म, वात्सल्य, इत्यादी सद्गुणांकडे लक्ष न जाता भलत्याच गोष्टींकडे श्रोत्यांचे लक्ष जाते ! हा मनुष्यस्वभाव आहे.

महाराष्ट्रात श्रीदत्तसांप्रदायाच्या निमित्ताने साधु-संत सत्पुरुष होऊन गेले व त्यांनी जनतेला सदाचार, नैतिक जाणीव, सुसंस्कृत जीवन यांची शिकवण दिली. सांस्कृतिक इतिहासात व सामाजिक उन्नतीत ही घटना महत्त्वाची आहे.

आजच्या तरुण पिढीला या सर्व गोष्टींचे आकर्षण वाटते काय ? वाटेल काय ? विज्ञानयुगात व बुद्धिवादी वातावरणात या सांप्रदायाचे भवितव्य काय, हा प्रश्न विचारवंतांनी दृष्टीपुढे ठेवला पाहिजे. प्रत्येक सांप्रदायात काही भाग श्रद्धाप्रधान असतो, काही बुद्धिप्रधान असतो, काही तात्कालिक स्वरूपाचा व काही चिरकालीन महत्त्वाचा असतो, त्या दृष्टीने विचार करून बुद्धीला पटणारा सदाचार, नीती, मानवता, सुसंस्कृतता यांना प्रवृत्त करणारा भाग निवडून तो नव्या पिढीपुढे मांडला पाहिजे. हे काम या विविध सांप्रदायांतील विचारवंतांपुढे असावे हे इष्ट आहे. नाही तर नव्या पिढीत हे सांप्रदाय अर्थशून्य होतील. कुटुंबातील प्रौढांनी आपल्या तरुण मुलामुलींशी या विषयावर विचारविनिमय करून पहावा म्हणजे मार्ग दिसेल.

[१५-१२-१९७६

४. चमत्कारांचे संशोधन हवे

उपलब्ध तर्कशुद्ध ज्ञानाने ज्या घटनांचा कार्यकारणभाव समजत नाही, जी घटना घडवून आणणे सामान्य जनांच्या आटोक्यात नसते, जिच्यामुळे सामान्य माणूस हतबुद्ध होतो, त्या घटनेला चमत्कार म्हणता येईल. चमत्काराकडे चिकित्सक बुद्धीने जरूर पहावे, पण ते सर्व संपूर्ण खरेच आहेत अशी, अथवा खोटेच आहेत अशी दोन्ही

प्रकारची अंधश्रद्धा ठेवू नये. चमत्कार ही सत्य घटना असू शकते का ? या प्रश्नाला माझे उत्तर 'हो!' असे आहे. माझ्या स्वतःच्या माहितीची अशी कित्येक उदाहरणे आहेत. एका अवघ्या ४–५ वर्षांच्या मुलाला अतींद्रिय ज्ञान असल्याचे मी पाहिले आहे. परगावी असलेले 'काका आजारी असल्याने येऊ शकणार नाहीत' असे त्याने सांगितलेले खरे ठरले. ग्रामोफोनच्या रेकॉर्डवर केवळ हात फिरवून, हा अद्याप लिहिता वाचता न येणारा मुलगा, ती रेकॉर्ड कोणत्या गाण्याची आहे हे ओळखत असे. गीताईचे प्रचारक असणारे माझ्या माहितीचे एक अत्यंत बुद्धिनिष्ठ गृहस्थ आहेत. त्यांना एक अद्भुत अज्ञात व्यक्ती मार्गदर्शन करते असा त्यांचा अनुभव आहे. रीडर्स डायजेस्टमध्ये एका खाणकामगाराची साधार सत्य हकीकत प्रसिद्ध झालेली आहे .हा इसम साध्या चाकूने, भूल दिल्याविना ऑपरेशन्स करीत असे. त्याच्याकडून हे काम एक मृत जर्मन डॉक्टर करवून घेत असे अशी उपपत्ती लागली.

अर्थात चमत्कार खरे असतात असे मानले तरी चमत्कार व ईश्वरी कृपासिद्धी यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. निरीश्वर नास्तिक व्यक्तीलाही चमत्कार-शक्ती साध्य असणे शक्य आहे. चमत्कार हे वेगळे शास्त्र आहे. चमत्कारांच्या संशोधनात नेहमीची विज्ञानपद्धती उपयोगी पडणार नाही. त्यांचेसाठी मोजपट्टी नाही. अनेक व्यक्तींचे अनुभव जमेस धरूनच काही निष्कर्ष काढावयास हवेत. अनेक जणांच्या आयुष्यात अनेक असामान्य घटना घडतात. अशिक्षित व्यक्ती घडाघडा संस्कृत मंत्रपठण करते असे उदाहरण आहे. तळघराला आग लागली असता कोणी अज्ञात व्यक्तीने हाका मारून उठवल्याच्या घटना आहेत. हे अतींद्रिय मानसशास्त्र (पॅरासायकॉलॉजी) असून त्याची साधने वेगळी, व नेहमीच्या नियमांपेक्षा त्याचे नियम वेगळे आहेत. त्याचे संशोधन होणे जरूर आहे.

चमत्कार व ईश्वरी कृपा यांची सांगड सामान्य लोक घालतात आणि त्यामुळे लोक अशा चमत्कार करणाऱ्या बुवांच्या भजनी लागतात हे अनिष्ट आहे; पण त्याला विरोध किती तीव्रतेने करावा ? बुद्धिवादी दृष्टिकोनाचा ज्ञानप्रसार करीत राहावे व पुढे ज्याच्या त्याच्या इच्छेवर सोडावे. विज्ञानाची अनेक दालने अजून उघडावयाची आहेत. चमत्कार हेही असेच अज्ञात दालन आहे. त्याचा सखोल अभ्यास व्हावा हे इष्टच आहे. [१४–१–१९७७

□ □ □

५. लोकशाही मनोवृत्ती

लोकशाहीचे तत्त्वज्ञान राजकीय क्षेत्रापुरतेच मर्यादित नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या तत्त्वाचा उपयोग करून ती मनोवृत्ती वाढविणे आवश्यक असते. राजकारण हे एक मोठे व महत्त्वाचे क्षेत्र आहे, पण त्याच्यापेक्षा जी लहान कार्यक्षेत्रे आहेत, त्या सामाजिक जीवनातही लोकशाही तत्त्वाचा उपयोग करायला हवा. असा उपयोग करता करता लोकशाही मनोवृत्ती वनत जाते व राजकारणात तिचा आविष्कार दिसू लागतो.

अशी अनेक क्षेत्रे आहेत की जेथे या लोकशाही मनोवृत्तीचा उपयोग होऊ शकतो. कुटुंब, कचेरी, कारखाने, समित्या, सार्वजनिक संस्था, ठराव संमत करण्याकरिता जमणाऱ्या सभा—अशा अनेक ठिकाणी लोकशाही मनोवृत्तीने व पद्धतीने काम चालविले असता हे तत्त्वज्ञान हळूहळू समाजात पसरत जाते, व त्याचा राजकीय क्षेत्रातही उपयोग होतो.

जेथे जेथे एकापेक्षा अधिक व्यक्तींचा समुदाय आहे तेथे तेथे प्रत्येक व्यक्तीच्या बुद्धीचा, प्रतिभेचा, संशोधन वृत्तीचा, कर्तृत्वाचा उपयोग सर्व समूहाला व्हावा. त्यामुळे त्या व्यक्तीची विचारशक्ती जागृत राहावी व समुदायालाही तिचा फायदा व्हावा हे लोकशाहीतील तत्त्वज्ञान आहे. त्याकरता प्रत्येक व्यक्तीच्या बुद्धीला, विचारशक्तीला व प्रतिभेला चालना दिली पाहिजे. अशा व्यक्तींना त्यांचे त्यांचे विचार मुक्तपणाने मांडण्याला आवाहन केले पाहिजे व त्यांचे विचार इतरांनी शांतपणे ऐकून घेतले पाहिजेत. अशा अनेक व्यक्तींच्या अनेक विचारांतून परस्परांच्या विचारांवर क्रिया-प्रतिक्रिया होतात व अंतिम निर्णय घेण्याला सर्वांच्या विचारांचा उपयोग होतो. अनेक व्यक्तींच्या विचारात विविधता व भिन्नता असणारच. त्यांतून बहुसंख्य व्यक्तींना मान्य होणारा निर्णय घ्यावयाचा असतो. असा निर्णय बहुमताचा निर्णय म्हणून विरोधी विचारांच्या व्यक्तींनीही शिरसावंद्य मानून आचरणात आणावयाचा असतो. याला लोकशाही मनोवृत्ती असे नाव आहे. ही आपल्या समाजात अद्याप दृढमूल व्हावयाची आहे.

आपल्याच समाजातील नव्हे, तर जगातील सर्वच समाजांतील चालत आलेली परंपरा ही व्यक्तिनिष्ठेची, व्यक्तिपूजेची, स्वतःविचार न करण्याची व मनात आलेला विचार न बोलण्याची अशी आहे. कुटुंबात, संघटनेत व समुदायात एक व्यक्ती प्रमुख. त्या व्यक्तीचे सर्वांनी निमूटपणे ऐकायचे व त्या व्यक्तीला संतुष्ट ठेवायचे. ही सर्व

जगातच प्राचीन कालापासून चालत आलेली मानवाची मनोवृत्ती आहे. त्यामुळे कुटुंबात कुटुंबाचा प्रमुख सर्वसत्ताधारी राहातो. संघटनेत तेथील मुख्य व्यक्ती सत्ताधारी राहाते आणि इतर व्यक्ती केवळ आज्ञापालनाची व अनुयायीपणाची भूमिका घेतात. ही पूर्वापार पद्धती त्या त्या प्रमुख व्यक्तीला मोठेपणा, मानसन्मान, अधिकार, सत्ता, सवलती देणारी असते; त्यामुळे त्या व्यक्तीचे समाधान होते, पण अनुयायी वर्गातील स्वतंत्र विचाराच्या व्यक्तींच्या मनाचा कोंडमारा होतो, हा एक तोटा; आणि अनेक व्यक्तींच्या बुद्धीचा व प्रतिभेचा उपयोग समाजाला होऊ शकत नाही, त्यामुळे समाज अप्रगत व अविकसित राहातो हे फार मोठे सामुदायिक नुकसान आहे.

मी माझ्या जीवनात अनुयायाची भूमिका केली आहे, आणि प्रमुखाचीही भूमिका केली आहे. माझ्या कुटुंबात वागताना कुटुंबातील सर्व व्यक्तींना विचार करायला लावून, त्यांच्या उपयुक्त सूचनांचा कुटुंबहिताकरता उपयोग केला आहे. संस्था, विद्यालय, विविध संघटना व समित्या, इत्यादी ठिकाणी कामे करताना सहकारी अथवा सहायक अशा सर्वांचा इतकेच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्याही विचारांचा मी उपयोग करून घेतला आहे. लोकशाही वृत्ती सर्वत्र जागृत ठेवावी लागते. तिच्यामुळे प्रमुखास सर्वांच्या बुद्धीचा परिचय होतो व अन्तिम निर्णयाला भरपूर सूचक, सर्वांगीण व विधायक विचार मिळतात. या निर्णयात आपण सहभागी होतो या विचाराने तो कार्यवाहीत आणण्याची जबाबदारी सर्वांना वाटते. एका व्यक्तीचा निर्णय आणि अनेक व्यक्तींच्या विचाराने घेतलेला निर्णय यात प्रारंभी, मध्ये आणि परिणामी मोठा, फार मोठा फरक पडतो, याचा प्रत्येक प्रमुखाने व अनुयायांनी अनुभव घ्यावा. अशी लोकशाही मनोवृत्ती कुटुंब, संस्था, ग्रामपंचायती येथपासून वरपर्यंत पसरून अथांग समाज या वृत्तीचा बनला म्हणजे राजकीय लोकशाहीदेखील चिरस्थायी स्वरूपाची होईल.

[१२–२–१९७७

६. संतवाङ्मय आणि आजची मूल्ये

अलीकडच्या दहा बीस वर्षांत संतवाङ्मयाच्या प्रसिद्धीला व प्रसाराला अधिक गती प्राप्त झाली आहे असे लक्षात येते. दुसरे महायुद्ध संपले. भारताला स्वातंत्र्य मिळाले. जगाशी अधिक घनिष्ठ संबंध आला. या सर्वांचा परिणाम भारतातील आबाल-वृद्धांच्या मनावर झाला. जुन्या श्रद्धा व मूल्ये ही निरुपयोगी वाटू लागली. पुढारलेल्या राष्ट्रांकडून आलेले विचार आणि मूल्ये यांचे अधिक महत्त्व वाटू लागले. ऐहिक जीवना-

तील सुखोपभोग, वैयक्तिक महत्त्वाकांक्षांची तृप्ती, जीवनातील सर्व प्रकारच्या सुखाविषयी लागलेली ओढ, स्वार्थनिष्ठा, त्यागापेक्षा भोगाची प्रवृत्ती, अशा प्रकारच्या प्रवृत्ती जीवनात, वाङमयात, करमणुकीत, सर्वत्र दिसून येऊ लागल्या. विचारी माणसांना याबद्दल चिंता वाटू लागली, आणि वहात चाललेल्या समाजाला योग्य व इष्ट मार्गावर आणण्याकरता धर्माकडे अधिक लक्ष वेधण्याचा प्रयत्न चाललेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून गेल्या ७००–८०० वर्षांत होऊन गेलेल्या साधुसंतांच्या वाङमयाचे प्रकाशन, तत्संबंधी मासिके, सत्पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी, त्यांच्या ग्रंथांची पारायणे, अशा गोष्टी वाढत्या प्रमाणावर चालू आहेत.

हे सर्व उपक्रम चालू आहेत ते ज्यांच्याकरता म्हणून उद्देशून आहेत ती तरुण पिढी या सर्व चळवळीपासून अलिप्त व तिच्याविषयी उदासीन आहे. व्याख्याने, प्रवचने, पारायणे या कार्यक्रमांना उपस्थित असलेल्या बहुसंख्य श्रोत्यांची वये पन्नाशीच्या पुढची आहेत असे आढळून येते. त्यांतील किती लोक जिज्ञासेने येतात, आणि किती श्रोते केवळ कालक्रमण करण्याकरिता येतात, हा विचार मनात आल्यावाचून राहात नाही. चाळीस किंवा पन्नास वर्षे वयाच्या अलीकडील पिढी अशा कार्यक्रमात फारसा भाग घेत नाही. त्यात तिला गोडी वाटत नाही, त्याविषयी तिला आस्था नाही, आणि त्याकरिता वेळ द्यायलाही तरुण पिढी तयार नाही.

गेली सात आठ वर्षे महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांत लहान मोठ्या गावी गीतेवर व्याख्यानाकरिता मी प्रवास केलेला आहे, आणि अनेक ठिकाणचे श्रोते पाहिले आहेत. गीतेच्या व्याख्यानाला श्रोते मिळणे कठीण जाते आणि तरुण पिढीतील श्रोते मिळणे अधिकच कठीण असते. पहिल्या व्याख्यानानंतर माझ्या विचारसरणीची दिशा सांगोवांगीने ऐकल्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी अधिक श्रोते येतात व त्यांत तरुणांचाही भरणा असतो. सांप्रदायिक पद्धतीने माझी व्याख्याने झाली असती तर थोड्या वयोवृद्ध श्रोत्यांवर मला संतुष्ट राहावे लागले असते. बी. ए. व एम्., ए. च्या वर्गांना ज्ञानेश्वरी शिकविणाऱ्या एका मराठीच्या विद्वान प्राध्यापकांना मी प्रश्न विचारला की, 'ज्ञानेश्वरीच्या अध्ययनात विद्यार्थ्यांना कितपत गोडी वाटते ?' एक क्षणाचाही विलंब न करता हातवारे करून दोनच शब्दांत त्यानी उत्तर दिले, "काही नाही." जो अनुभव अध्यापनाच्या बाबतीत तोच संतवाङमयाचे वाचन-पारायण इत्यादी इतर कार्यक्रमांत येत असल्यास काही नवल नाही.

या वस्तुस्थितीचा आपण शांतपणे विचार केला पाहिजे. यात कोणाचे चुकते ? आपले चुकते की तरुण पिढीचे चुकते ? याचा प्रौढांनी विचार करायला हवा. ज्या चरित्रांनी आणि वाङमयाने गेली सहासात शतके समाजाला प्रेरणा आणि स्फूर्ती दिली

तेच वाङ्मय, तशाच स्वरूपात, त्याच परिभाषेत, त्याच संदर्भात, आजच्या तरुण पिढीला, आजच्या बुद्धिवादी जगात, विज्ञान प्रगतीच्या या काळात, प्रेरणा देण्याला समर्थ आहे काय ? ही वस्तुस्थिती भारतातच आहे असे नाही. इतर देशांत आणि इतर धर्मांत जवळजवळ अशीच वस्तुस्थिती आहे. या विषयावर मी जो विचार केला तो वाचकांच्या चिंतनाकरिता सादर करीत आहे. त्यावर चिंतन आणि मनन केल्यास त्याचा समाजाला उपयोग होईलच, परंतु प्रत्येक कुटुंबातही त्याचा उपयोग होऊ शकेल.

साधुसंत ज्या काळात होऊन गेले आणि ज्या परिस्थितीत त्यांनी आपले वाङ्मय लिहिले व त्याचा प्रसार केला, तो काळ आणि ती परिस्थिती यांत आज फार बदल झालेला आहे. आज जगातील सर्व विचारांशी आपला संबंध आलेला आहे. ऐहिक आणि पारमार्थिक, वैयक्तिक आणि सामाजिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक, अशा प्रकारचे आधुनिक विचारांचे वारे आपल्या देशातच नव्हे, सर्व जगात वहात आहेत. त्यांचा परिणाम तरुण पिढीच्या जीवनाच्या दृष्टीवर, त्यांच्या जीवनातील मूल्यांवर आणि त्याच्या अंतर्बाह्य राहणीवर झालेला आहे. त्यामुळे आधुनिक काळात पाश्चात्य देशांत आणि आपल्या देशातही काही जीवनसमस्या निर्माण झालेल्या आहेत. काही नवीन मूल्ये जीवनांत आलेली आहेत; काही जुनी मूल्ये निरर्थक झाली आहेत. आजच्या समाजातील मूल्यांना धरून, आजच्या जीवनातील सभस्या लक्षात घेऊन, आजचे सामाजिक व नैतिक प्रश्न लक्षात घेऊन, आज आपण वापरीत असलेली परिभाषा नीट समजावून घेऊन, त्या सर्वांच्या संदर्भात संतचरित्रांचा आणि संतवाङ्मयाचा विचार झाला पाहिजे. संतवाङ्मयातील कोणती मूल्ये निरर्थक झालेली आहेत आणि कोणत्या मूल्यांना आजही अर्थ आहे याचा विचारवंतांनी अभ्यास करावयाला हवा. जी मूल्ये कालबाह्य झालेली आहेत त्यांना फारसे महत्त्व न देता, जी मूल्ये आजही उपयुक्त आहेत, ज्यांचा उपयोग आजच्या भारतीय आणि जागतिक समस्या सोडवण्यासाठी होणार आहे, ती मूल्ये आणि ते विचार निवडून ते समाजापुढे मांडले पाहिजेत. हे बौद्धिक श्रमाचे, निरीक्षणाचे, व चिंतनाचे असे विधायक कार्य आहे. ते जर झाले नाही, तर भावी पिढीच्या दृष्टीने, संतवाङ्मयविषयक चळवळीचा काहीही उपयोग होणार नाही.

संतवाङ्मयात भक्तीला अतिशय प्राधान्य आहे. ईश्वराची भक्ती आणि त्याची प्राप्ती हे आजच्या जीवनातील मूल्य आहे काय ! पुनर्जन्मापासून सुटका, मोक्षप्राप्ती, ब्रह्मज्ञान, ईश्वरदर्शन इत्यादी गोष्टींविषयी संतकालीन समाजाला जे आकर्षण होते ते आजच्या समाजाला आहे काय ? आजच्या समाजाचे प्रश्न मुख्यतः नैतिक, सामाजिक, मानसिक, आर्थिक अशा स्वरूपाचे आहेत. भ्रष्टाचारापासून मुक्ती आणि सदा-

चाराचा प्रसार, चारित्र्य आणि शील यांना महत्त्व, सामाजिक सद्‌गुण, मानवता, बंधु-प्रेम, समतादृष्टी, समाजातील दुःखे कमी करण्याची आस्था, मानसिक चिंता, ताण, संघर्ष, यांपासून मुक्त होऊन चित्तशांतीची प्राप्ती, हे प्रश्न आज भारतातच नव्हे, तर सर्व जगात महत्त्वाचे आहेत. या समस्या सोडविण्याकरता उपयोगी पडणारे असे अनेक विचार संतवाङ्मयातही आहेत, त्यांची निवड करून, आजच्या परिभाषेत त्यांची मांडणी करून आजच्या जीवनात ते कसे उपयोगी आहेत हे तरुण पिढीला दाखविणे आवश्यक आणि विधायक असे काम आहे. या दृष्टीने विचार केला तर संतवाङ्मयातील काही भाग आजही तरुण पिढीला आकर्षित करू शकेल. सांप्रदायिक पद्धतीनेच आपण सर्व गोष्टी चालू ठेवल्या तर तरुण पिढी त्यापासून अलिप्त राहील यात शंका नाही. त्याकरता तिला दोषही देता येणार नाही.

[४–४–१९७७

७. शासक आणि उपदेशक

अनेक कुटुंबे, जाती-जमाती व व्यावसायिक एकत्र आले की समाज निर्माण होतो. त्याबरोबर वैयक्तिक व सामाजिक वर्तनाचे नियंत्रण, शासन व मार्गदर्शन हे प्रश्न निर्माण होतात. याकरता पूर्वी दोन संस्था अस्तित्वात आल्या–एक राज्यशासन व दुसरा धर्म. या दोहोंचे मार्ग भिन्न होते. शासनाचा मार्ग विविध कायदेकानू, नियम करणे आणि त्यांचे उल्लंघन करणाऱांना आर्थिक वा शारीरिक शिक्षा करणे. धर्माचे काम पारलौकिक आश्वासने व प्रलोभने दाखवून मानवाला सदाचाराने वागायला प्रवृत्त करणे. प्रत्येक देशात व समाजात या दोन महत्त्वाच्या संस्था अस्तित्वात आल्या.

आज सर्वत्र शासनाचा व्याप प्रचंड वाढला आहे. समाजाचे आकार व व्याप मोठे झाले आहेत. सामाजिक व्यवहारांची संख्या वाढली आहे त्याबरोबर कायदा मोडून गुन्हे करणाऱांना गुंतवणारे, आणि सोडवणारे, कायदातज्ज्ञ वकीलही वाढले आहेत. परिणामी न्याय आणि नीती यांचा कोंडमारा झाला आहे. न्यायालये ही मुख्यत कायदालये आहेत. कायद्याचे पालन अथवा उल्लंघन झाले आहे काय एवढे ती पाहू शकतात. न्यायालयातून सुटलेला माणूस निरपराधी व बेगुन्हा असेलच असे नाही. तो पुन्हा दुराचार करायला मुक्त असतो !

दुसऱ्या बाजूला धर्मसंस्थेची बंधने शिथिल झाली आहेत. विज्ञानाच्या व बुद्धि-

वादी विचारसरणीच्या वाढीमुळे पारलौकिक जीवन, ईश्वरी कृपा अथवा कोप, मृत्यूनंतर पाप-पुण्याला शिक्षा अथवा पारितोषिके, या कल्पनांचा प्रभाव यापुढे पडणार नाही. मानवाला स्वतःला सदाचारी राहावेसे वाटले तरच तो सदाचारी राहील, धर्माच्या बंधनाने तो तसा राहील असा काळ यापुढे नाही.

धर्म आणि नैतिक जीवन यांची पूर्वी सांगड घातलेली असे. आता धर्मावरचीच श्रद्धा कमी होत चालली, त्याबरोबर नीतीवरचीही श्रद्धा ढासळू लागली आहे. धर्माच्या आधारावर नैतिक जीवनाचे समर्थन करणे यापुढे कठीण आहे. सदाचार आणि नैतिक जीवन हे व्यक्तीच्या हिताचे व सुखाचे साधन आहे. सामाजिक नीती पाळल्यामुळे व्यक्तीचेही सुख-समाधान वाढेल अशी श्रद्धा समाजात दृढमूल झाली तरच सदाचाराला प्रतिष्ठा प्राप्त होईल. धर्मबंधनापेक्षा आंतरिक बंधनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

आज सर्व जगात, सर्व शांतदे, बहुजनसमाज स्वतंत्र व स्वसामर्थ्याविषयी जागृत झालेला आहे. त्याला पूर्वकाळी साधुसंतांनी धर्माच्या आधाराने सदाचाराची शिकवण दिली. आज धर्माचा प्रभाव कमी झाला आहे. अशा स्थितीत केवळ शासन कायद्याच्या जोरावर व्यक्तिजीवनाचे नैतिक नियंत्रण करू शकणार नाही. सदाचाराच्या मूल्यांची व महत्त्वाची जाणीव प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात निर्माण झाली पाहिजे. सदाचाराने समाज सुस्थितीत राहातो, व त्यामुळे मीही सुखासमाधानात राहू शकेन असे शिक्षण समाजाला देणारे उपदेशक अधिक प्रमाणात निर्माण झाले पाहिजेत. आपल्या कुटुंबातले व शेजारातले वातावरण नैतिक भावनांनी आणि सदाचार विचारांनी प्रभावित करणे प्रत्येक सुशिक्षिताने आपले कर्तव्य मानायला हवे. कुटुंब प्रमुख, कचेरी प्रमुख, शासन प्रमुख, शिक्षक, लेखक, वक्ते, कलाकार, धर्मोपदेशक, कीर्तन-प्रवचनकार, पुराणिक, आकाशवाणी, दूरचित्रदर्शन, नाट्यकार, लोकनाट्यकार अशा सर्वांनीच या कामाची जबाबदारी उचलली पाहिजे. केवळ शासक हे काम करू शकणार नाहीत, शासकांच्या जोडीला उपदेशकांची व आचरणाने नैतिक आदर्श ठेवणारांची संख्या फार मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे. प्रत्येकाने या कामातील आपला वाटा उचलला पाहिजे. यात तुम्हीही आलात. आजच प्रारंभ करा.

[१३-१०-१९७७

□ □ □

८. आज गीतेचा उपयोग

संतवाङमय ही बहुजन समाजाची जीवन शिक्षणाची शाळा आहे. भारतातील व महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला सुसंस्कृत व बहुश्रुत करण्याचे काम गेली आठ शतके संतवाणीने केले आहे. आपल्याकडे पूर्वी सक्तीचे प्राथमिक शिक्षण नव्हते; ती कल्पना अलीकडची आहे. त्यामुळे लेखन-वाचन करणारा वर्ग लहान होता. पण श्रवणाच्या मार्गाने जनतेला जीवनमूल्यांची शिकवण देण्याचे काम परंपरेने अनेक संतांनी व त्यांच्या सांप्रदायातील अनुयायांनी केले आहे ही घटना समाजाच्या व शिक्षणाच्या इतिहासात नमूद करावयास हवी.

संतांनी लोकांना राजकारणापासून पराङमुख केले व केवळ टाळकुटे बनविले असा एक आक्षेप घेतला जातो. त्या वेळी आक्षेपक हे विसरतात की प्रत्येक व्यवसायाचे कांही विशिष्ट काम असते. संत आणि राजकारणी हे दोन व्यावसायिक वर्ग भिन्न आहेत. संत वैयक्तिक जीवनाचे शिक्षण देतात, राजकारणी पुरुष राजकीय गोष्टीचे शिक्षण देतात. प्रत्येकाच्या कामाला काही मर्यादा असतात, त्या दोघांच्याही कार्याला पडलेल्या आहेत. तुकाराम राजकारणात पडले नाहीत आणि शिवाजी-बाजीराव धर्मकारणात पडले नाहीत. परस्परांविषयी आदर बाळगून दोन्ही वर्गांनी आपापली कामे केली. दोहोंची सांगड घालणारा अशोकासारखा एखादाच अलौकिक पुरुष निघतो.

प्राचीन आणि अर्वाचीन संतांच्या शिकवणुकीचा धागा गेली आठ-नऊ शतके एकच आहे. परमेश्वराची भक्ती करावी, प्राणिमात्रावर प्रेम करावे आणि शुद्ध नैतिक आचारविचार ठेवावेत हे सर्व शिकवणुकीचे सारसर्वस्व आहे. याच्या जोडीला कधी कधी कर्म आणि ज्ञान यांचाही उल्लेख केला जातो. पण एकूण वाङमयात व सांप्रदायात त्यांना स्थान मर्यादितच आहे. ईश्वराचे दर्शन, त्याची प्राप्ती, त्याची कृपा, अंतकाली मुक्ती हे मुख्य ध्येय; आणि त्याचे साधन म्हणून भक्ती, शुद्ध आचारविचार व भूतदया. पण ही साधने; म्हणून गौण. ईश्वराची कृपा हे मुख्य साध्य.

या सर्व विचारांचा उगम भगवद्गीतेत आहे. भारतीय धर्मकारणात व सामाजिक स्थित्यंतरात गीतेने फार मोठे कार्य केले आहे. ज्ञान, कर्म व ध्यान या साधनांच्या आश्रयाने योगवृत्ती (म्हणजे चित्तवृत्तीचे संस्करण) साध्य करावी ही गीतेची प्रामुख्याने शिकवण. सामान्य माणसांना अमूर्त ब्रह्मतत्त्वाचे ध्यान करणे कठीण जाते म्हणून सगुण मूर्तीचे (द्विभुज चक्र-गदाधारी श्रीकृष्णाचे) ध्यान करावे, आणि त्याची

रात्रं-दिवस भक्ती करावी हा मार्ग गीतेने सुचविला आहे. संस्कृत गीतेचे महत्त्व ओळखून ज्ञानेश्वरांनी ती मराठी भाषेत आणून त्या वेळेला ती भाषा बोलणारांच्या शब्दांत सांगितली. आज ती भाषा दुर्बोध आहे; त्या वेळी ती सुबोध होती. हा ज्ञानेश्वरी ग्रंथ, संतवाङमयाचा मूळ आधार आहे. परंपरेने एक पाऊल मागे गेलो म्हणजे गीता हा संतवाङमयाचा मूळ आधार आहे असे मानावे लागते.

ज्ञानेश्वरांनी गीतेतील कर्म, ज्ञान, ध्यान व भक्ती यांना मूळ ग्रंथाप्रमाणेच त्या त्या ठिकाणी ते ते आणि तितके महत्त्व दिले. पण स्वानुभव आणि स्वरुची यांना अनुसरून हठयोग व भगवद्भक्ती यांना मूळ गीतेपेक्षा अधिक उठाव दिला. त्यातील भक्तीचा भाग पुढील साधुसंतांनी अधिक उत्साहाने व जोमाने उचलून धरला. कर्माला आणि ज्ञानाला हळूहळू गौण स्थान प्राप्त झाले. कर्म-ज्ञानाला गौणता आल्यामुळे हा भक्तिसांप्रदाय निवृत्तिमार्गाकडे झुकला. ज्ञानाला गौणत्व आल्यामुळे त्यातला वैचारिक भाग कमी होऊन श्रद्धाप्रधान भाग वाढीला लागला. अशा रीतीने संत वाङमयाने एकीकडे सामान्य समाज सुसंस्कृत केला पण त्याला उत्साहयुक्त कर्म आणि वैचारिक पायावरील श्रद्धा यांपासून दूर नेले.

या दृष्टिकोनातूनच तुलनात्मक दृष्टीने भगवद्गीता आणि संतवाङमय यांचा अभ्यास करून गीतेतील ज्या गोष्टींकडे, तत्त्वांकडे, विचारांकडे आजपर्यंत समाजाने दुर्लक्ष केले, त्या गोष्टी त्याच्या प्रामुख्याने निदर्शनास आणल्या पाहिजेत. हे काम बहुजन समाजातील सुशिक्षित बुद्धिमंतांनी करायला हवे. त्याकरता त्यांनी भगवद्गीतेचा सखोल अभ्यास केला पाहिजे. गीतेतील तत्त्वज्ञान हे जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करणारे, ऐहिक व आध्यात्मिक जीवनाची सांगड घालणारे, वैयक्तिक व सामाजिक दोन्ही जीवनांचा विचार करणारे, लिंग-जाति-कुलनिरपेक्ष समता मानणारे असे आहे. त्याचा अर्थ नीट समजून घेऊन त्याचा प्रसार केल्यास संतांच्या उद्देशाला ते पूरक, उपकारक, पोषक आणि पुनर्जन्मदायी ठरेल यात शंका नाही. [१२–११–१९७७

९. लाडावलेल्या मुलांचे थोरपण

कुटुंबात जन्माला आलेल्या पहिल्या मुलाचे खूप लाड होतात, पण पुढे त्याच्या पाठीवर मुले झाली की हे लाड कमी होतात पण अगदी धाकट्या मुलावर, म्हणजे शेंडेफळावर सर्व लाडांचा वर्षाव होतो, अथवा घरात अगदी एकच एक अपत्य असेल तर

त्याचे सतत लाड होतात. कसेही असो. लाडात वाढलेल्या अपत्यांचे विशिष्ट स्वभाव, लहानपणीच बनतात आणि ते पुढे त्यांच्या थोरवयातही दृष्टीस पडतात व इतरांच्या अनुभवात येतात. बालपणी बालवयातला स्वभाव म्हणून ज्याकडे दुर्लक्ष केले जाते तेच थोरवयात दुर्गुण होतात व त्याचा दुष्परिणाम त्या व्यक्तीला आणि तिच्या सान्निध्यात येणाऱ्या माणसांना भोगावे लागतात.

आपले लाडके मूल रडू नये म्हणून, ते नाखूष होऊ नये म्हणून, त्याच्या सर्व इच्छा पुऱ्या कराव्यात म्हणून, शक्य ते सर्व सुख त्याला द्यावे म्हणून, अशा अनेक कारणांनी पालक मुलाच्या इष्ट-अनिष्ट सर्व इच्छांना शरण जातात व त्या पुऱ्या करतात त्याच्या इच्छेविरुद्ध वागून त्याला असंतुष्ट करायला ते धजत नाहीत. कालांतराने मुलांना अशीच सवय लागते की, आपल्या सर्व इच्छा इतरांनी पुऱ्या केल्याच पाहिजेत. कोणी इच्छेविरुद्ध गेलेले त्यांना सहन होत नाही. बालपणी या इच्छा पुऱ्या होतात पण प्रौढपणी समाजातील व्यवहारात पडल्यावर त्या पुऱ्या होणे कठीण जाते.

आपल्या सर्व इच्छांना पालक व भोवतालची माणसे मान देतात त्यामुळे मुलांचा अहंकारही प्रबळ होत जातो. अहंकारापोटी स्वभाव स्वार्थी व स्वकेंद्रित बनतो. जगातल्या सगळ्या चांगल्या गोष्टी मला हव्यात, संपत्ती, कीर्ती, सत्ता, अधिकार, सुख भोग, सेवा, निष्ठा, सर्व 'मला' मिळायलाच पाहिजेत अशी वृत्ती बनते.

असा माणूस सामान्य पदावर राहिला तर आजूबाजूच्या थोड्या लोकांना त्याचा उपसर्ग पोचतो. पण असा माणूस जसजसा वरच्या पदावर व अधिकारावर जातो तसतसा तो भोवतालच्या कनिष्ठ आणि समान दर्जाच्या माणसांना अधिकाधिक तापदायक होतो. कनिष्ठ सहकाऱ्यांशी तो अहंकाराने व उन्मत्तपणे वागतो आणि समान दर्जाच्या अधिकाऱ्यांशी वागताना हट्टीपणाचे व हेकेखोरपणाचे प्रदर्शन करतो. या गोष्टी जशा इतरांना त्रासदायक होतात तशाच त्या, त्या व्यक्तीलाही तापदायक होतात. आत्मनिरीक्षण करून आपल्या स्वतःच्या स्वभावात सुधारणा करून घेणारी व्यक्ती असेल तर ती आपल्या मनोवृत्तींना मुरड घालून स्वार्थ, अहंकार, हेकेखोरपणा, हट्ट अशा दुर्गुणांना हळूहळू जिंकून आटोक्यात आणते. पण अशा अहंकारी व्यक्तीत माझेच बरोबर, इतरांचे चूक अशी वृत्ती असल्याने त्याच्या ठिकाणी आत्मनिरीक्षण आणि स्वयंसुधारणा यांची शक्यता फार कमी असते.

तुमच्या भोवताली पाहा म्हणजे अशा अनेक व्यक्ती तुम्हाला दिसतील. कुटुंबात, कचेरीत, कारखान्यात, समाजकार्यात, राजकारणात, राज्यकारभारात सर्वत्र त्या आहेत. कनिष्ठ माणसे त्यांना त्यांच्या दुर्गुणांची जाणीव करून देऊ शकत नाहीत.

बरोबरीची माणसे अशा माणसांकडून स्वतःचा स्वार्थ साधण्याकरता त्यांना प्रोत्साहान देत असतात व त्यांचा अहंकार आणि स्वार्थवृत्ती यांना इंधन पुरवतात. निःस्पृह असा एखादाच सहकारी त्यांना त्यांच्या दुर्गुणांची व स्वभावाची जाणीव करून देऊ शकतो. पण आपला अनेक वर्षे बनलेला स्वभाव बदलणे सोपे नाही. त्याला आत्मनिरीक्षण, जाणीव, दृढनिश्चय आणि स्वार्थापेक्षा हाती घेतलेल्या कार्यावर निस्सीम प्रेम या गुणांची गरज असते. असा माणूस सुधारू शकतो. अशक्य काही नाही.

माणसांचे स्वभाव व त्या स्वभावांचा बालपणातील उगम या दृष्टीने स्वतःकडे पाहा व सुधारणा करा. इतरांकडे पाहून शक्य तेथे त्यांना स्वभाव सुधारण्याला साहाय्य करा. त्यामुळे जगाच्या सुखात व स्वतःच्या सुखात भर पडेल. पालकांनीही या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यायला हवे. राजकीय अथवा अन्य क्षेत्रातील एखाद्या विशिष्ट व्यक्तीला उद्देशून हा लेख नसून सर्वकालीन सर्वसामान्य मानसशास्त्रीय घटना म्हणून विवेचन केले आहे. [१२-१२-१९७७

१०. लेखक, वाचक व शासक

पुण्यात नुकतेच साहित्यसंमेलन भरले होते, ते काही वादामुळे व घटनांमुळे बरेच गाजले. त्या सर्व वादविवादांचा व आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा खाली बसल्यानंतर काही गोष्टींचा तात्त्विक विचार करायला हरकत नाही. त्याचा उपयोग केवळ नवीन लेखकांनाच नव्हे, तर तुमच्या माझ्यासारख्या सामान्य वाचकालाही आहे.

राजकारणातल्या व्यक्तीने साहित्य परिषदेच्या किंवा संमेलनाच्या व्यास-पीठावर यावे की नाही आणि कोणत्या नात्याने यावे, हा प्रश्न मागील व या वर्षी नवीनच उत्पन्न झाला आहे. सामान्य सभासद, किंवा प्रतिनिधी, किंवा स्वागत सभा-सभासद या नात्याने राजकारणी व्यक्ती यायला काही हरकत नाही. सामान्यसाहित्य-प्रेमी नागरिक म्हणून तो त्या व्यक्तीचा हक्क आहे. दुसरा प्रश्न अशा व्यक्तीला एखादी मानाची जागा साहित्य परिषदेत द्यावी का नाही ? तशी देण्याविरुद्ध एक आक्षेप असा येतो, की त्यामुळे साहित्यिकांच्या विचारांवर व विचारप्रदर्शनावर राजकारणी लोकांचे दडपण येते. मला या आक्षेपात काही तथ्य वाटत नाही. लेखकांनी आपले विचार-स्वातंत्र्य कायम ठेवून कोणाचेही अनुकूल अथवा प्रतिकूल विचार ऐकायला व ऐक-

वायला भिण्याचे कारण नाही. अन्य कोणत्याही व्यवसायातील व्यक्तीला साहित्यिकांपुढे बोलण्याचा अधिकार आहे, तसा राजकारणी व्यक्तीलाही आहे. साहित्यिक ही काही वेगळी जात नाही, की तिला अन्य वृत्तीच्या विचारांचा विटाळ व्हावा. आपण म्हणजे जगावेगळे आहोत ही काव्यातली कल्पना साहित्यिकांनी सोडून दिली पाहिजे. अथांग समाजाशी त्यांचा वैचारिक संबंध आला पाहिजे, वैचारिक संघर्षही झाला पाहिजे. राजकारणी व्यक्ती वाचक म्हणून साहित्याशी संबंधित असू शकेल. तिला आपले वाङ्मयविषयक विचार मांडण्याची संधी मिळाली तर साहित्यिकांनाही उपयोग होईल. काही राजकारणी व्यक्ती स्वत: विचारवंत व लेखकही असतात. राजा भर्तृहरी राजा असून कवीही होता. तात्यासाहेब केळकर, काकासाहेब गाडगीळ, पं. नेहरू, राजगोपाळचारी इत्यादी कितीतरी लोक राजकारणी असूनही उत्कृष्ट लेखक होते. तेव्हा कोणत्याही व्यवसायाच्या व्यक्तीला आपल्या व्यासपीठावर बोलवायला साहित्यिकांनी मुळीच अपमान करू नये. 'वुई मस्ट एज्युकेट अवर मास्टर्स' अशी उदात्तवृत्ती ठेवून शासकांनाही चांगल्या विचारांच्या वातावरणात आणले पाहिजे.

साहित्यिकांनी शासकीय मानमरातब, बक्षिसे, लेखन-भाषणार्थ निमंत्रणे स्वीकारावीत की नाही हा दुसरा वादग्रस्त प्रश्न झाला आहे. कमकुवत लेखकाच्या मनात असे प्रश्न निर्माण होऊ शकतील. ज्याला असे वाटत असेल, की शासकीय आश्रय घेतल्यामुळे आपल्या विचार-अभिव्यक्तीला मर्यादा पडेल, त्याने तसा आश्रय घेऊ नये. हा प्रामाणिकपणा होईल. पण माझ्याप्रमाणेच इतरांनीही असा आश्रय घेऊ नये, हे म्हणणे योग्य नाही. शासक जो आश्रय देतात ते द्रव्य ते काही स्व:ताच्या बँक खात्यातून देत नाहीत. जनतेचा पैसाच ते या कामाकरता उपयोगात आणतात. द्रव्याला विटाळ नाही. विटाळ मनाला लागू देता कामा नये. द्रव्य घेऊनही नि:स्पृहपणा व विचार-स्वातंत्र्य टिकवू शकेल तोच समाजाला काही शिकवू शकेल. याज्ञवल्क्य, शेक्सपियर, कालीदास, टेनिसन इत्यादी थोर साहित्यिकांना राजाश्रय होता. म्हणून त्यांच्या लेखनाला मर्यादा पडली नाही व कमीपणाही आला नाही. खरा प्रश्न लेखकाच्या मानसिक बलाचा व धैर्याचा आहे. मन निश्चयी व ध्येयनिष्ठ असेल तर त्याला शासकीय अथवा धनिकाच्या द्रव्याचा उपसर्ग होण्याचे काही कारण नाही. योग्य प्रसंगी नि:स्पृहपणा दाखविण्याचे सामर्थ्य व आत्मविश्वास त्याच्या स्वभावात हवा. अखेर पक्षी हा प्रश्न राजकारण अथवा अर्थकारण यांचा नसून साहित्यिकांच्या व लेखकांच्या अंत:करणाचा आहे. त्या अंत:करणात काही ठाम विचार, ध्येयवाद, तळमळ, समाजहितबुद्धी आहे की नाही हा खरा प्रश्न आहे. तो असेल तर तिच्या पूर्तीकरता बाहेरचे कोणतेही सहकार्य घ्यायला काही हरकत नाही. उपलब्ध अशा सर्व साधनांचा उपयोग समाजहितार्थ करायला हवा.

दुसऱ्या प्रकारात आपल्या सुखाचा अंशतः अथवा पूर्णतः त्याग करून ते इतरांना देण्याचा भाग आहे. असे केल्याने ते सुख घेणारा सुखी होतो पण तो सुखी झालेला पाहून देणारालाही सुख होते. हे त्यागातून मिळणारे सुख आहे. ते इंद्रियांना जाणवले नाही तरी मनाला जाणवते. आणि एखाद्या अनुभवात सुख आहे की दुःख, हे आपले मन ठरविते.

आपण इतरांकरता सुखाचा त्याग करतो तशा इतरही थोडक्या व्यक्ती अशा असतात की त्याही परतफेड म्हणून किंवा स्व-भाग म्हणून तुम्हांला सुख देतात व त्याकरता आपल्या सुखाचा त्याग करतात. पण या त्यांच्या त्यागानें त्यांनाही सुख मिळते आणि घेणाऱ्याला प्रत्यक्षच ते मिळते.

आता सुखदुःख हा विचाराचा इतका मोठा प्रांत आहे की तेथे वरील प्रकारांपेक्षाही अनेक प्रकार संभवतात. पण व्यक्तिशः आत्मनिरीक्षण करण्याचे दृष्टीने आपण निरनिराळ्या प्रसंगी वरीलपैकी कोणत्या प्रकारात बसतो ते पाहाणे हिताचे होईल.

पहिल्या प्रकारच्या सुखात आपण सुख भोगतो पण त्याचबरोबर इतरांचा हेवा, मत्सर, द्वेष इत्यादी भावनांचा विषय होतो. स्वार्थी वृत्तीने सुख भोगणारा इतरांना फारसा प्रिय नसतो. दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकारात इतरांमध्ये द्वेषापेक्षा आपण प्रेम आदर, सहानुभूती, कौतुक, कृतज्ञता या भावना निर्माण. करतो व त्याही आपणाला सुखच देतात.

अद्वेषपक्षी आपल्या मनावर व इतरांच्या मनावर काय परिणाम होतो यालाच फार महत्त्व आहे असे मला वाटते. [१४–२–१९७८

१२. द्वेषाने ग्रासलेला समाज

प्रेम आणि द्वेष या विरोधी भावना प्रत्येक मानवाच्या ठिकाणी कमी अधिक प्रमाणात जन्मापासूनच असतात. जीवनाचा विकास करायचा असेल तर प्रेमाची भावना विकसित करून द्वेषाची भावना जिंकायला हवी. प्रेमाने माणुसकी व संस्कृती वाढीला लागते. द्वेषाने शत्रुत्व आणि हिंसात्मक वृत्तीचा प्रादुर्भाव होतो.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये देशादेशात प्रेम, सहिष्णुता, सहकार्य, मैत्री या भावना

वाढवण्याकरता सर्व जगात प्रयत्न चालू आहेत. भारतही आपल्या शेजारच्या व लांबच्या सर्वच देशांशी प्रेमाचे व मैत्रीचे संबंध वाढवीत आहे. पण त्याच वेळी आपल्या देशात काय चालले आहे ?

आपल्या देशात द्वेषाची भावना फार मोठ्या स्वरूपात समाजाला ग्रासून टाकीत आहे. विविध पातळ्यांवर, तत्त्वांवर व कारणांवर समाजात गट पडलेले आहेत आणि त्या विविध गटांत परस्परांविषयी आत्यंतिक द्वेष वाढत आहे.

सामाजिक, राजकीय, धार्मिक, प्रांतिक, भाषिक अशा अनेक क्षेत्रांत विविध गट पूर्वीचेच आहेत व नवीनही निर्माण होत आहेत. आपल्या गटाचे हित साधण्याकरता प्रत्येक गटातील पुढारी दुसऱ्या गटाचा द्वेष वाढीला लावीत आहेत.

अगदी ताजा अनुभव या निवडणुकीचा. तीन राजकीय पक्ष आखाड्यात उतरले आणि शत्रूसारखे एकमेकांवर तुटून पडले. ब्रिटिश सरकारच्या काळात त्या परकीय सत्तेचा द्वेष केला नसेल इतका आम्ही आमच्याच देशबांधवांचा करू लागलो; कारण ते आमच्या पक्षात नाहीत ! 'अमुक पक्ष 'आमचा शत्रू नंबर एक आहे, अशी भाषा मोठ-मोठ्या पुढाऱ्यांच्या तोंडी येऊ लागली. त्यांचे अनुयायी केवळ भाषेवर थांबले नाहीत. शत्रू म्हटल्यानंतर त्याचा निःपात केलाच पाहिजे. मग स्वाभाविकच लाठ्या, काठ्या, दगड, चाकू इ. साधनांचा वापर अनुयायी करू लागले. राजकीय मतभेद सामोपचाराने व मतपरिवर्तनाने मिटवावेत याकरता लोकशाही अस्तित्वात आली. आम्ही तिला हिंसात्मक व द्वेषमूलक भाषेची व कृतीची जोड दिली ! लोकशाहीचा अर्थ आमच्या जनतेला अद्याप आम्ही शिकवला नाही.

जाती-जातींतील द्वेष असाच वाढीला लागत आहे. आज शेकडो वर्षे चालत आलेला जातिभेद नष्ट करायला हवा यात शंकाच नाही. पण त्याकरता जातिद्वेष वाढीला लावला जात आहे त्यामुळे जातिभेद नष्ट होणार नाही; उलट तो वाढीला लागेल. प्रत्येक जात आपापली समाज-संघटना मजबूत करीत आहे. द्वेषामुळे आत्मसंरक्षणाची प्रवृत्ती प्रत्येक जातीत वाढत आहे. प्रत्येक जातीला त्या जातीतला पुढारी हवा, दुसऱ्या जातीचा चालणार नाही अशी स्थिती येत आहे. जातीय द्वेषामुळे एकराष्ट्रीयत्वाच्या वृत्तीचे पोषण न होता आकुंचित वृत्तीचे संवर्धन होत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी जी राष्ट्रीय वृत्ती भारतात होती ती आज राहिलेली नाही.

प्रांताप्रांतातले व राज्याराज्यातले वाद त्या त्या समाज गटात द्वेषाची वाढ करीत आहेत. दोन परकीय राष्ट्रांत सीमावाद चालतो तसा या देशात प्रांताप्रांतात चालला

आहे. त्यापायी एकाच देशातले दोन नागरिक गट परस्परांचे शत्रुत्व करीत आहेत. एकाच कारखान्यात दोन तीन कामगार संघटना असल्या की त्यांतील सभासद परस्परांना शत्रूसारखे मानतात. एकदा शत्रू म्हटल्यानंतर त्या मागोमाग हिंसाचार आलाच त्याची उदाहरणे मधूनमधून घडत आहेत. कामगार गटातल्या मारामाऱ्या आणि खून ही या द्वेषभावनेने प्रेरित झालेल्या व्यक्तीची बाह्याकृती आहे.

अशा प्रकारे प्रत्येक क्षेत्रात द्वेषाची भावना भारतीय समाजाला ग्रासून टाकीत आहे; यावर उपाय काय ? द्वेषामुळे व्यक्तीचा, गटाचा व समाजाचा अधःपात होतो याची जाणीव आधी आमच्या पुढाऱ्यांना झाली पाहिजे. त्यांच्या मनात व वृत्तीत सुधारणा झाली तर प्रथम भाषेत सुधारणा होईल. ती झाली की हळूहळू त्यांच्या अनुयायांच्या भाषेत, वृत्तीत आणि कृतीतही सुधारणा होऊ लागेल. ज्येष्ठांना ही द्वेषाची अनिष्टता कळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. [१०-३-१९७८

१३. गरिबी जाण्याचा धोका !

गरिबी दूर होण्यात अनेक धोके आहेत, अनेकांचे नुकसान होणार आहे, अनेक लोकांना कार्यक्रम मिळणार नाहीत, हे कोणाच्या लक्षात आले आहे का ?

गरिबीचे उच्चाटन करण्याचा संकल्प सर्वच राजकीय पक्षांनी केलेला आहे. आपलाच पक्ष गरिबी हटवणार आहे, ते काम इतर पक्षांना जमणार नाही, असे जनतेला पटविण्याची कोशीस चालू आहे. प्रत्यक्ष गरिबी हटवण्यापेक्षा या आपल्या कार्यक्रमालाच अधिकाधिक प्रसिद्धी कशी मिळेल आणि त्याचा निवडणुकीत आणि अप्रत्यक्षपणे सत्तासंपादनात कसा उपयोग होईल याची विवंचना यात अधिक दिसते. किंबहुना एखाद्या पक्षाकडून खरोखरच गरिबीचे उच्चाटन झाले तर इतर पक्षांची निराशा होऊन त्यांना फार वाईट वाटेल; आपल्या हातचे हुकमी प्रचाराचे व मतप्राप्तीचे साधन गेले, त्याची जागा आता कोणत्या घोषणेने भरून काढावी या विवंचनेत पक्षाचे पुढारी पडतील. पण या अडचणीतूनही मार्ग काढता येतो बरं का !

गरिबीची व्याख्याच बदलत राहायचे. वर्षाला दोन हजार रुपये उत्पन्नवाले सध्या गरिबीत जमा असले तर पुढल्या निवडणुकीत ही मर्यादा सहा हजारावर नेता येईल त्याच्या पुढच्या वेळी ती बारा हजारावर नेता येईल ; दरमहा चार-पाच हजार

रुपये पगार मिळविणारे वैमानिक देखील आपली उपासमार होते म्हणून संपावर जातात आणि त्यांचे पगार व सुखसोयी वाढवून मिळतात.

या लोकांना व पुढाऱ्यांना गरिबांबद्दल खरोखर कळवळा आहे का? लोकसभा, राज्यसभा, विधानसभा इत्यादींमधील स्थानामुळे ज्यांना चांगली सन्मानवेतने आणि भत्ते मिळतात, त्यातून किती जणांनी गरिबांना मदत केली आहे? महापूर, भूकंप, वादळे, दुष्काळ इत्यादी प्रसंगी किती जणांनी किती देणग्या दिल्या त्याचे आकडे प्रसिद्ध केले तर या लोकांच्या सचोटीचे काही मोजमाप तरी होईल! आणि खरीच गरिबी दूर करण्याची आस्था आहे, तर सारे पक्ष या एका प्रश्नावर एकजुटीने लक्ष केंद्रित करून, सहकार्याने एक प्रचंड कार्यक्रम का आखत नाहीत? याचे कारण एकच आहे; हे काम झालेच तर माझ्या पक्षाकडून झाले पाहिजे, त्याचे श्रेय माझ्या पक्षाला मिळाले पाहिजे, त्याचा फायदा मिवडणुकीत व्हायला हवा ही प्रत्येकाची दृष्टी आहे. याचा अर्थ काय? पक्षाला महत्त्व आहे. समाजाला, गरिबांना, देशाला त्यामानाने कमी महत्त्व आहे. पक्ष जगवणे आणि तो पुढे आणणे हे महत्त्वाचे; देश आणि समाज यांचे प्रश्न गौण; ते केवळ साधन म्हणून उपयोगी आहेत.

पण या बाबतीत राजकीय पक्षांना आणि पुढाऱ्यांनाच दोष देण्यात अर्थ नाही. गरिबांच्या गरिबीवर गब्बर होणारे इतर अनेक लोक व व्यवसाय समाजात आहेत. ते खालच्या वर्गात आहेत, वरिष्ठ वर्गात आहेत, कामगारात आहेत. मध्यम वर्गात आहेत, समाज सेवकात आहेत आणि साहित्य-कला क्षेत्रातही आहेत.लहान मुले पळवून न्यायची त्यांचे हातपाय मोडून अधू करायचे आणि शहरात त्यांना भीक मागायला लावून त्या द्रव्यावर पैसा मिळवणारे भिकाऱ्यांचे पुढारी आहेत. कामगारांना वेतनवाढीची आमिषे दाखवून, निष्कारण संप घडवून आणून, त्यातून द्रव्यसंचय करणारे कामगार पुढारी आहेत. गरिबांच्या संस्थांना अनुदाने देण्याच्या सरकारी योजना जाहीर झाल्या की, भराभर अनेक संस्था काढून, त्या अनुदानातून आपली संपत्ती वाढवणारे कार्यकर्ते आहेत. भूकंप, पूर, दुष्काळ, वादळ इत्यादी आपत्तींच्या प्रसंगी निधी जमवून त्याचा अपहार करणारे कार्यकर्ते आहेत. गरिबांचे दैन्य, हालअपेष्टा इ.नाटक-सिनेमात दाखवून त्यावर पैसा मिळवणारे लोक कलाक्षेत्रात आहेत. सारांश. गरिबीचे भांडवल करून अंतःकरणात खरे प्रेम, सहानुभूती, आस्था, मानवता, दया, अनुकंपा, काहीही नसताना केवळ आपापल्या स्वार्थाकरता गरिबांच्या उद्धाराचा वरवर कळवळा दाखवणारे व त्यावर द्रव्यसंचय करणारे अनेक लोक समाजात आहेत. राजकीय पुढारी व पक्ष हे त्यांच्यापैकीच एक भाग आहेत.

गरिबांकरता काया-वाचा-मने करून काम करणारांना असा अनुभव येतो की

त्यांच्या कार्याकडे या पुढाऱ्यांचे व पक्षांचे कधीच लक्ष जात नाही. गरीब मुलांकरता प्रत्येक जिल्ह्यात एकेक वसतिगृह सरकारने चालवावे असा ठराव विधान परिषदेत असताना मी मांडला होता. पण मी स्वतंत्र व निष्पक्ष म्हणून विरोधी बाजूचा; त्यामुळे ठराव पास होण्याची शक्यताच नव्हती. पण असे काम बीस-पंचवीस वर्षात करण्याची संधी प्रत्येक राजकीय पक्षाला होती. झीज सोसून असे काम करणारे किती आहेत ? सरकारी तिजोरीतून पैसा घ्या आणि गरिबी हटवा ! आपल्या पदराला, शरीराला आणि पैशाला तोपीस लागायला नको. असे करायला अंतःकरणातून गरिबाविषयी, जनतेच्या दुःखाविषयी, अनाथांच्या आपत्तीविषयी सहानुभूती व आस्था लागते. ती निर्माण झाली तरच गरिबांचे खरे कल्याण होईल.

गरिबीत वाढलेला आणि गरिबांकरता आयुष्यभर काम करणारा एक अनुभवी कार्यकर्ता म्हणून माझ्या मनात हे विचार उत्कटतेने आले. ते मी कागदावर टिपले. यात कोणत्याही व्यक्तीचा, अथवा व्यवसायाचा अनादर करण्याचा माझा हेतू नाही. गरिबीबद्दल खरा कळवळा वाटून सहकारितेने, निःस्वार्थ बुद्धीने, पक्षातीत वृत्तीने, राष्ट्रीय आपत्ती या दृष्टीने हे कार्य व्हावे असे मला वाटते. मन असलेल्या प्रत्येकाने विचार केला तर त्यालाही असेच वाटेल. [८–४–१९७८

१४. मुलांना सुटी, पालकांना काम

वार्षिक परीक्षा झाल्या की मुलामुलींना उन्हाळ्याची दीडदोन महिन्यांची सुटी असते. शाळा चालू असताना सहासात तास शाळेत आणि तीनचार तास घरच्या अभ्यासात गुंतून राहाणारी मुले आता दिवसभर मोकळी असतात. अभ्यास करून त्यांना कंटाळा आलेला असतो. काही तरी नवीन करावे व पहावे असे वाटत असते; पण आपल्याकडे सुटीमध्ये मुलांना उपयुक्तपणे गुंतवून ठेवण्यासारखी साधने नाहीत, ही पालकांची फार मोठी अडचण आहे.

मोठ्या शहरांतून अलीकडे सुटीतील शिक्षणाचे लहानलहान अभ्यासक्रम अनेक संस्थांमधून योजले जातात. प्रत्येक गावातील शाळेनेही हे काम करण्यासारखे आहे. चित्रकला, पोहणे, गायन, हस्तव्यवसाय, फोटोग्राफी, रेडिओ रिपेअरिंग इत्यादी अनेक प्रकारचे वर्ग शहरात चालतात. त्यांचा फायदा पालकांनी अवश्य घ्यावा, व थोडा खर्च लागला तरी तो करून मुलांना नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी

द्यावी. या अवांतर शिक्षणाचा भावी जीवनात फार उपयोग होतो.

अशा प्रकारचे वर्गही दिवसातून फार तर १–२ तास होतात. शाळेप्रमाणे पाच-सहा तास मुलांना उद्योगात ठेवण्याचे काम ते करू शकत नाहीत. कोणतेही शिक्षण द्यायचे म्हटले की त्याला पैसा लागतो. आजकाल केवळ स्वयंसेवा वृत्तीने फुकट काम करणारी माणसे मिळत नाहीत. फुकट शिक्षण मिळण्याचा काळ आता गेला ! आज प्रत्येक प्रकारच्या शिक्षणाला फी मोजायला लागते व लागणार. हा नवीन जमान्याचा नियम यापुढे पालकांनी लक्षात ठेवायला हवा, आणि मुलांना काही नवीन शिकवायचे असेल तर खर्च करायची तयारी ठेवावी. आपल्या पश्चात मुलांना संपत्ती ठेवण्यापेक्षा आपल्या हयातीत, त्यांना विविध प्रकारचे शिक्षण देण्यात ती खर्च केली तर मुलामुलींचे व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न व सर्वांगपूर्ण होऊन जगातील धकाधकीत यशस्वी होण्याला त्यांना ते अधिक उपयोगी पडेल.

घरात आपली (आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांची) मुले रिकामटेकडी असली की, ती काही काळ गुण्या-गोविंदाने खेळतात पण थोड्याच वेळात हमरी-तुमरीवर येऊन भांडू लागतात, मारामाऱ्या करतात, रडतात, ओरडतात, घरच्या माणसांना जीव नकोसा करून सोडतात. प्रत्येकाची तक्रार असते की, दुसऱ्याने अन्याय केला आणि मारले. खरोखर या मुलांच्या भांडणात प्रथम खोडी कोणी काढली हे शोधून काढणे फार अवघड असते. पण थोडा विचार करा. क्रीडांगणावर कॉलेजमधली मुले आणि मोठ्या सामन्यात मोठमोठी माणसे काय कमी भांडतात अन् मारामाऱ्या करून क्रीडांगणावरील फर्निचर, कंपौंड यांची मोडतोड करतात? मुलांत आणि मोठ्या माणसांत पशुवृत्ती सहज वर उफाळून येते. अशाच निमित्ताने मुलांचे अन् मोठ्या माणसांचेही शिक्षण करावे लागते. हे जाणत्या पालकांचे व जनता पुढाऱ्यांचे काम आहे.

मुलांना स्वस्थ बसा म्हणून आपण सांगतो, पण ती निसर्गाविरुद्ध गोष्ट आहे. हालचाल, क्रिया, उद्योग, खटाटोप करण्याकरताच माणूस जन्माला आलेला आहे आणि त्याचा हा स्वभाव बालपणी अतिशय बलवत्तर असतो. मुलांना सतत गुंतवून ठेवायला हवे. त्यांना आवडेल अशा उद्योगात त्यांना मग्न ठेवायला हवे. वाचन, हस्तव्यवसाय, खेळ, घरकाम, चित्रवाणी, कथाश्रवण अशा कोणत्याही उद्योगात मुले रममाण होतात. असे उद्योग त्यांना देणे हे विचारी व सुजाण पालकांचे काम आहे.

आज अनेक सुशिक्षित स्त्रिया, ग्रामीण आणि नागरी भागात आहेत. त्यांना या सुटीत एकदीड महिना सांस्कृतिक वर्ग चालवता येतील. शेजारपाजारची मुलेमुली

जमवून त्यांना गोष्टी सांगणे, पाठांतर करवून घेणे, बैठे खेळ शिकवणे, वक्तृत्व लेखनकला शिकवणे, शुद्धलेखन–हस्ताक्षर सुधारणे, अशा किती तरी गोष्टींत मुलांना दोनतीन तास गुंतवून ठेवता येईल. दोनतीन भगिनींनी एकत्र येऊन असे वर्ग चालवावेत. त्यात आपल्या मुलांचा फायदा होईल, शेजारच्या मुलांचाही वेळ शिक्षणात जाईल. तुमच्या आळीत असे वर्ग निघाले तर आळीतल्या मुलांचा स्वभाव व वर्तन यात सुधारणा होऊन तुमच्या मुलांना चांगली संगत मिळेल. वाईट संगतीने चांगली मुलेही बिघडतात; तो धोका अंशतः टळेल.

आता घरचे घरी देखील किती उद्योग आहेत ते पाहा. त्यांत मुलांना गोडी ध्यायला लावा. सध्या शाळेत कार्यानुभव (वर्क एक्सपीरिअन्स) म्हणून एक विषय असतो. मुलांच्या हाताला, शरीराला व मनाला कामाचे वळण लागावे हा त्यात उद्देश आहे. आता या कार्यानुभवाला घरीच किती तरी संधी आहे. घरातील स्वच्छता, अंगणातील साफसफाई, रंगरंगोटी, बागबगीचा, स्वयंपाकघर, अडगळीची व्यवस्था, रद्दीची वासलात, अशी कितीतरी कामे मुलामुलींनी करण्यासारखी आहेत. प्रत्येक मुलाला आणि मुलीला स्वयंपाक करता आला पाहिजे. त्याचा भावी संसारात त्यांना फार उपयोग होईल. मुलांनाही स्वयंपाक यायला हवा यावर माझा कटाक्ष आहे. विज्ञान, यंत्रशास्त्र व हस्तव्यवसाय शिकणारी मुले आणि मुली स्वयंपाक, भांडी घासणे, कपडे धुणे, झाडणे इत्यादी मेहेनतीची कामे करू लागली की, ती विचार करू लागतील. ही कामे करण्याच्या शास्त्रोक्त पद्धती, कष्ट वाचवण्याकरिता साधनांची निर्मिती, विज्ञानाची प्रत्येक कामात नियुक्ती, या दृष्टीने सुशिक्षित मुलामुलींनी अनुभव घेऊन विचार व संशोधन केल्यास आपले घरगुती जीवन कितीतरी सुधारेल.

सारांश, 'मुलांची सुटी म्हणजे पालकांना काम' असे न म्हणता, 'मुलांची सुटी म्हणजे पालकांना संधी' अशा दृष्टीने या प्रश्नाकडे पाहा. अनेक मार्ग सुचतील. ते व्यवहारात आणा आणि त्यांना प्रसिद्धी द्या. [१२–५–१९७८

१५. भाषा-धनाला जपा व वाढवा

आज आपण दैनंदिन व्यवहारात व लेखन-वाचनात जी भाषा वापरतो ती केव्हा, कशी सुरू झाली ? तिच्या मागे कित्येक हजार वर्षांचा इतिहास व तपश्चर्या आहे

याचा विचार करा म्हणजे मनात आश्चर्य आणि आनंद या भावना निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत.

मानव व इतर प्राणीमात्र यांत महत्त्वाचा फरक आहे भाषेचा. आपण बोलतो इतर पशु-पक्षी-मासे यांना आपल्यासारखे बोलता येत नाही. मर्यादित आवाज काढून आवश्यक त्या भावना व विचार ते व्यक्त करतात. पण मानवाला ओठ, जीभ, कंठ, स्वरयंत्र व कान दिलेले आहेत. त्यांची रचना विस्मयजनक आहे. त्यामुळे आपण अनेक प्रकारचे आवाज व त्यांच्यात विविध प्रकार व्यक्त करू शकतो व ऐकू शकतो. तोंड आणि कान नसते तर भाषेची वाढच झाली नसती. लेखन-वाचन या कला भाषेच्या विकासात फार फार उशिरा आल्या.

भावना व विचार सर्व प्राणिमात्रात आहेत. आत्मरक्षण, जगण्याची जिद्द, अन्नसंशोधन, प्रेम, अपत्य इच्छा, राग, द्वेष, आपले-दुसऱ्याचे, क्रोध, कृतज्ञता इत्यादी भावना काही प्राण्यांतही आहेत. पण भाषेच्या साहाय्याने आपण या भावना व विचार यांची वाढ करू शकतो व त्यामुळे संस्कृती जन्म घेते. संस्कृतीच्या विकासात भाषेचा उपयोग फार महत्त्वाचा आहे. भाषा नसती तर साहित्य, विज्ञान, इतिहास, कला, व्यापार, यंत्रशास्त्र इत्यादींची वाढ झाली नसती.

आता या भाषेचा प्रारंभ आद्य मानवाने अगदी प्रारंभावस्थेत कसा केला असेल याची कल्पना करा. आवश्यक वस्तू व आवश्यक क्रिया यांच्याकरिता मानवाने प्रथम एक अक्षरी उद्‌गार काढले. पा (पिणे), दा (देणे), या (जाणे), कु (आवाज करणे), चि (जमविणे), धा (ठेवणे), धू (हालविणे), न (नाही), नी (नेणे), च (आणि), द्वि (दोन), त्रि (तीन) इत्यादी. हे एकाक्षरी शब्द संस्कृत भाषेचा पायाच आहेत. आदिवासी जनांनीही त्या त्या भागात आपले एकाक्षरी शब्द निर्माण केले. मराठीतील एकाक्षरी शब्दांचा विचार करा म्हणजे लक्षात येईल की, अगदी प्राथमिक व आवश्यक वस्तू, व्यक्ती व क्रिया दर्शविण्याकरिता एकाक्षरी शब्द अनेक शतके चालत आलेले आहेत. मी, तू, ती, तो, दे, घे, ये, जा, खा, गा, पी इत्यादी शब्दांच्या मागे हजारो वर्षांचा इतिहास आहे.

हळूहळू मानवाने दोन अक्षरी, तीन-चार अक्षरी असे शब्द निर्माण केले. मग दोन शब्द जोडून सामासिक शब्द तयार केले. मग मनातल्या भावना व तात्त्विक विचार व्यक्त करण्याचे शब्द बनवले. या शब्दांचे परस्पर संबंध निश्चित करण्याकरिता व्याकरण बनवले. पुढे पुढे इतर मानवसमूहाशी संबंध आल्यावर त्यांच्यातले शब्द उचलून आत्मसात केले. अशा या व्यवहाराने व क्रियेने हजारो वर्षांनी जी

भाषा तयार झाली ती मी लिहीत आहे, ती तुम्ही वाचीत आहा, आणि त्याच भाषेने या लेखातील आश्चर्यकारक माहिती इतरांना सांगत आहात. पूर्वजांनी वाढवलेल्या या भाषा-धनाचे आपण वारसदार आहोत. हे धन योग्य रीतीने वापरणे, जपणे, वाढवणे, संपन्न व सुंदर करणे आपल्या हातात आहे.

या धनाचा जीवनात चांगला आणि वाईट दोन्ही रीतींनी उपयोग करता येईल. या भाषेमुळे तुम्ही मित्र कराल तसेच शत्रूही कराल; दुसऱ्याला आनंद द्याल तसेच दुःख व यातनाही द्याल; इतरांना खरे ज्ञान द्याल किंवा सत्य लपवण्याच्या कामीही त्याचा उपयोग कराल; आपल्या गरजा इतरांना सांगाल व त्यांच्या गरजाही जाणून घ्याल. भाषेचे असे कितीतरी सदुपयोग आणि दुरुपयोग करता येतील. आपण सदुपयोगच करीत असाल असे मी धरून चालतो.

मी जेव्हा गीता वाचतो तेव्हा मनात असा विचार येतो की, कित्येक हजार वर्षांपूर्वी माझ्या पूर्वजांनी उच्चारलेले शब्द मी त्याच स्वरूपात उच्चारीत आहे. भाषेचा विकास झाला, लेखन-वाचनाची कला वाढली म्हणून मी हा आनंद भोगीत आहे.

त्या भाषेची अभिवृद्धी व्हावी, ती सुंदर, संपन्न, अर्थवाही व्हावी याकरिता आपणही प्रयत्न करू या. पुढची पिढी आपली ऋणी राहील. [१५-६-१९७८

१६. वर्धिष्णु असो, वृद्ध नसो

वर्धिष्णु म्हणजे वाढण्याची किंवा विकासाची इच्छा असणारा. जसे जिज्ञासू म्हणजे ज्ञानाची इच्छा असलेला, पिपासू म्हणजे पिण्याची (पाणी, ज्ञान इ.) इच्छा असणारा इत्यादी. वृद्ध म्हणजे वाढलेला, वाढ खुंटलेला, विकास पूर्ण झालेला. माणूस कोणत्याही वयाचा असो, त्याने सर्व प्रकारे वर्धिष्णु असावे; वाढ, विकास आणि प्रगती करीत राहावे. वाढ थांबू देऊ नये. वाढ थांबली की जीवनात अर्थ राहात नाही, आयुष्य नीरस होते, माणूस जगू इच्छित नाही, पण जाण्यालाही नाखूष असतो.

माणसाच्या वाढीचे विविध प्रकार आहेत, आणि प्रत्येक जीवन-घटकाच्या

वाढीचा काळ, वेग आणि अखंडता यातही भिन्नता असते. देह, बुद्धी आणि मन हे आपल्या जीवनाचे तीन मुख्य घटक आहेत. या प्रत्येक घटकाची पुन्हा अनेक अंगे आहेत, आणि त्या त्या अंगांच्या वाढीचे निरनिराळे वय व कालखंड असतात. आपल्या प्रत्येकाजवळ या सर्व गोष्टी आहेत पण अतिपरिचयामुळे आपण त्यांचा कधी विचारच करीत नाही.

देहातील इंद्रिये, मेंदू, हाडे, स्नायू, मज्जातंतू इत्यादी अनेक भागांची वा निरनिराळ्या कालखंडात होते. पुढे वाढ थांबते पण कार्यक्षमता दीर्घकाळ राहाते. ही कार्यक्षमता कायम ठेवणे आणि वाढविणे ज्याच्या त्याच्या हातात असते. पूर्व वयात व्यायामाने व आरोग्य रक्षणाने वाढलेले शरीर सतत व्यायामाने व आरोग्य नियम पाळून दीर्घकाळ टिकवता येते. अपघात अथवा असाध्य रोग न झाल्यास माणूस दीर्घायुषी होऊ शकतो. केस आणि नखे यांची वाढ होत राहाते. नवीन रक्तवाढ चालू असते. जुन्या पेशी नष्ट होऊन नवीन पेशींचा जन्म होत राहातो. अप्रत्यक्षपणे देहाची वाढ चालू राहाते.

मानवाचे शरीर लवकर थकते पण त्याची बुद्धी दीर्घकाळ कार्यक्षम राहू शकते; मात्र त्याकरता त्याने आपल्या बौद्धिक अंगांचा उपयोग व वाढ स्वप्रयत्नाने व सतत चालू ठेवली पाहिजे. उत्तर वयात अनुभवाने व ज्ञानाने बुद्धीला परिपक्वता आलेली असते त्यामुळे आकलनशक्ती वाढते, विचारातील सत्यासत्यता जाणता येते व नवीन विचारांची निर्मिती होऊ शकते. अनेक उत्कृष्ट ग्रंथांचे लेखन व अलौकिक शोध त्या लेखकांच्या व वैज्ञानिकांच्या जीवनाच्या उत्तर कालखंडात झालेले आहेत. आपली स्मरणशक्ती प्रौढपणी कमी होते असे म्हणतात. मी गेल्या वर्षी सर्वबोध पद्य गीतेचे सहाशे श्लोक मुखोदगत केले. बुद्धीच्या विविध अंगांची कार्यक्षमता सतत उपयोगाने आपण दीर्घकाल विकासावस्थेत टिकवू शकतो.

मनाचेही तसेच आहे. मन हे असंख्य वृत्तींचे व भावनांचे स्थान आहे. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, अहंकार, भय इ. अनिष्टवृत्ती, आणि दया, क्षमा, प्रेम, मैत्री, सहिष्णुता, आत्मसंयमन, दृढनिश्चय, शांती, समाधान, आनंद इत्यादी इष्टवृत्ती मनातच निर्माण होतात. ज्या वृत्ती वारंवार येतात त्या आपल्या स्वभावाला व्यक्तिमत्त्व देतात. हे व्यक्तीमत्व इष्ट दिशेने वाढविणे किंवा अनिष्ट दिशेने वाढवणे आपल्या हातात आहे. तापटपणा, मोहवशता, संयमहीनता, द्वेष, अहंकार, स्वार्थ या वृत्तींचे नियमन आपण जीवनाच्या उत्तर वयातही स्वप्रयत्नाने करू शकतो व वाढवू शकतो.

एका प्राध्यापकाला सिगारेटचे बलवत्तर व्यसन होते. अनेक वेळा ते सोडूनही

कायमचे सुटले नाही. एकदा रात्री सहज माझे एक पुस्तक चाळीत असता त्यांच्या वाचनात पुढील वाक्य आले–

"मनावर संयम ठेवता येत नसेल आणि केलेला निश्चय टिकविता येत नसेल तर विद्वान माणसाच्याही जीवनाला काही अर्थ नाही." हे वाक्य वाचल्याबरोबर त्याने शेगडी पेटवली आणि सगळ्या सिगारेट जाळून टाकल्या. पुन्हा त्यांना स्पर्श केला नाही. त्याने संयमवृत्ती संपादन केली, हीच प्रगती.

असाच एकदा कोल्हापूरला बसमधून जात होतो. शेजारी एक श्रीमंत व्यापारी बसला होता. त्याने एका तासाला दोनतीन वेळा तंबाखूचा बार भरला. मी त्याला म्हणालो,

"तंबाखूचे व्यसन हळूहळू कमी करा. माझ्या दोन मित्रांना तिच्यामुळे गालाचा कॅन्सर झाला. ऑपरेशन करूनही ते मृत्युमुखी पडले."

पुढल्याच एका मुक्कामावर गाडीत चढून बसल्यावर तो मला म्हणाला, 'साहेब, मी या क्षणापासून तंबाखू सोडली.' मी म्हणालो, 'एकदम सुटायची नाही, हळूहळू सोडा' तो माणूस म्हणाला, 'अहो त्यात काय आहे, जशी खायला सुरुवात केली तशी सोडली.' या माणसाने दृढनिश्चय वृत्ती संपादन केली.

आपला स्वभाव माणसाला बदलता येतो, सवयी बदलता येतात हे तत्त्व अनुभवाने तुमच्याही प्रत्ययाला येईल. प्रयोग करून पाहा.

एकदा आत्मनिरीक्षण करून, तुमच्या व्यक्तिमत्त्वाला कमीपणा, दुर्बलता, सदोषता देणाऱ्या दुर्गुणांचा विचार करा. त्याच्या उलट जे सद्गुण ते वाढवण्याचा संकल्प करा. तो दृढनिश्चयाने अंमलात आणा. प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वभावाप्रमाणे हा कार्यक्रम आखावा लागेल. सामान्यपणे अहंकार, स्वार्थ, क्रोध, लोभ, द्वेष, मत्सर, गर्व, भित्रेपणा, दुर्बल मन, व्यर्थ चिंता इ. दोष अनेकांच्या ठिकाणी असतात. त्यांच्या उलट जे गुण, परोपकार, औदार्य, शांती, त्याग, प्रेम, सहानुभूती, सौजन्य, निर्भयता, निश्चयी वृत्ती, निश्चितता इ. गुणांचे संगोपन करता येते. हे गुण ज्याने संपादन केले त्याचे आयुष्य सार्थकी लागले. ते न करता जो जगला त्याची वाढ आपुरी राहिली. तो आजन्म बाल्यावस्थेतच राहिला, फक्त वय वाढले असे होईल.

देह, मन व बुद्धी यांचे धर्म क्रिया, भावना व विचार हे आहेत. उपयोगाने

विकास आणि अनुपयोगाने विनाश हे निसर्गचे तत्त्व आहे. तेच आपल्या जीवनालाही लागू आहे. संपन्न जीवन जगण्याकरता या सर्व शक्ती सतत उपयोगात ठेवाव्यात.

सारांश, देहाने, बुद्धीने व मनाने आपण सतत वाढत राहावे, कार्यक्षम राहावे, सर्व शक्तींचा व अंगांचा उपयोग व विकास करावा असे ज्याला वाटते व त्याप्रमाणे जो वागतो तो माणूस वृद्ध नसून वर्धिष्णु आहे. असे आपले जीवन वयाच्या प्रत्येक कालखंडात वर्धिष्णु, विकासशील कार्यक्षम व उपयोगप्रवण राहो अशी मनीषा प्रत्येकाला बाळगता येईल. माझाही तोच प्रयत्न आहे, प्रयत्न राहो. [१०–७–१९७८

१७. माउली, मुले व मवाली

तुमच्या मुला-मुलींचा स्वभाव दोन मार्गांनी घडत असतो. काही गुण ते जन्मतःच आनुवंशिक वारसा म्हणून घेऊन येतात आणि काही गुण त्यांना कुटुंबात व समाजात मिळणाऱ्या संस्काराने येतात. मुलांना जाणीव करून दिल्यानंतर व त्यांना जाणीव आल्यानंतरही मिळालेल्या संस्कारात व गुणात मुले सुधारणा करू शकतात. स्वभावात वज्रलेप असे काही नाही.

स्वभाव म्हणजे तरी काय ? आपल्या मनात अनेक भावना व विचार असतात त्याप्रमाणे वागण्याच्या प्रवृत्ती निर्माण होतात; असे वारंवार वागण्याने स्वभाव बनतो. तापट आणि शांत, स्वार्थी आणि त्यागी, आळशी आणि कष्टाळू, स्वैर आणि संयमी, भित्रा आणि निर्भय, इत्यादी गुण हे आपल्या भावनांचे व प्रवृत्तींचे आविष्कार आहेत. मानवाच्या ठिकाणी अशा शंभराहून अधिक प्रवृत्ती आहेत. प्रत्येक व्यक्तीत हे मिश्रण कमीअधिक प्रमाणात असते. एकाच माता-पित्याच्या घरात जन्मलेली मुले विविध स्वभावाची असतात. पण हे स्वभाव घडवता, बदलता येतात, सुधारता येतात ही फार मोठी आशादायक गोष्ट आहे. त्यामुळे दुर्गुणी सद्गुणी होतो, सामान्य माणूसही नराचा नारायण होतो व मोठा होऊ शकतो.

बालपणी कुटुंबात मिळणारे संस्कार जीवनावर अधिक काळ प्रभावी राहतात. त्यामुळे आईबापांनी दिलेले शिक्षण अतिशय महत्त्वाचे असते. 'दि चाईल्ड इज फादर ऑफ दि मॅन' असा वडस्वर्थच्या कवितेत एक चरण आहे. बालपणच्या संस्कारातून प्रौढांचे व्यक्तिमत्त्व निर्माण होते.

कुटुंबात पित्यापेक्षा मातेचा सहवास मुलांना अधिक मिळतो. म्हणून आईने दिलेल्या सुसंस्कारांमुळे अनेक थोर पुरुष घडवले गेले आहेत. विदुला मातेचा संजय, जिजामातेचे शिवाजी, अब्राहम लिंकन, साने गुरुजी अशी किती तरी उदाहरणे देता येतील. 'घडविले तयांना माउलींनी' या नावाचे श्री. गजाननराव खोले यांचे एक पुस्तक मागील आठवड्यात प्रसिद्ध झाले. त्यात अशी अनेक आधुनिक उदाहरणे आहेत. (त्यात अस्मादिकही आहेतच!)

चांगले सद्गुण, संस्कार व स्वभावाचे पैलू प्रसंगाप्रसंगाने संपादन होत असतात. अशा प्रसंगांचा फायदा घेऊन कधी गोड बोलून, कधी धाक दाखवून, कधी स्वतःच्या उदाहरणाने, कधी शिक्षा करून, तर कधी स्वतः शिक्षा घेऊन, आईबापांनी मुलां-मुलींवर चांगले संस्कार करावेत. हाच त्यांचा वारसा संपत्तीपेक्षा मुलांना अधिक उपयोगी पडेल.

आपण घरी संस्कार देतो तसे समाजातूनही संस्कार मुलांना मिळत असतात. त्यांवर लक्ष ठेवणे तर फारच महत्त्वाचे आहे.

समवयस्क मित्र व मैत्रिणी यांच्याकडून मुले अनुकरणाने अनेक सवयी व प्रवृत्ती उचलतात. या मित्रमैत्रिणींतही मवाली प्रवृत्तीची अनेक मुले असण्याचा संभव असतो. लबाड, खादाड, व्यसनी, उडाणटप्पू, चोर, उधळपट्टीबाज अशा प्रवृत्तीची काही मुले असतात. या मुलांच्या टोळचा (गँग्ज) बनतात. त्यांत अशा मुलामुलींना पुढारीपण मिळते. त्यामुळे अनेक मुले-मुली बिघडण्याची उदाहरणे आपल्या भोवती दिसतात.

सिनेमा, नाटके, कथा-कादंबऱ्या इत्यादींमधून खल पुरुषांची व मवाल्यांची पात्रे दाखविली जातात; त्यांचाही मुलांच्या मनावर प्रभाव पडत असतो. समाजातील काही कंटक व मवालीही मुलांना हाताशी धरून आपली दुष्कृत्ये करतात व त्यां मुलांनाही मवाली करतात. या सगळ्या संस्कारांना तोंड देऊन आपले चांगले संस्कार टिकविण्याचे शिक्षण मुलांना देणे आई-बापांचे काम आहे.

मुला-मुलींत दोन प्रकार असतात—खंबीर स्वभावाची, आणि दुर्बल, कमकुवत स्वभावाची. सुदृढ स्वभावाची मुले प्रतिकूल परिस्थितीतही आपले चांगले संस्कार हे टिकवू शकतात दुर्बल मनाची मुले बदलत्या परिस्थितीत आपले चांगले संस्कार सोडून वाईट संस्कार त्वरित घेतात. मुलांची मने खंबीर करणे, त्यांना आत्मसंयमन शिकवणे, बरे-वाईट जाणण्याचे ज्ञान देणे हेही महत्त्वाचे आहे.

म्हणून बाल्य-किशोर-तारुण्य अवस्थेत मुला-मुलींना माउलींनीं चांगले संस्कार व वळण प्रयत्न-पूर्वक व त्यागपूर्वक लावावे; नाहीतर तेच काम पण विरुद्ध दिशेने मवाली करतील. मुलांच्या जन्माचे नुकसान होईल. याकरता कुटुंबसंस्था आवश्यक आहे व हेच कुटुंबातील आई-बापांचे कर्तव्य आहे. 'घडविले तयांना माउलींनी' हा एक वर्ग आणि 'बिघडविले तयांना मवाल्यांनी' हा दुसरा वर्ग. तुमची मुले कोणत्या वर्गात असावीत ते तुम्ही ठरवा.

[१५-८-१९७८

१८. आपत्ती, दुःखमुक्ती व दानवृत्ती

उत्तर भारतात लहानमोठ्या नद्यांना पूर येऊन त्यात शेकडो गावे बुडाली. शेतांतील पिके, जनावरे, माणसे, घरेदारे, वाहून गेली. अनेक कुटुंबे निराधार झाली. इराणात परवा धरणीकंप झाला. त्यात पंधरा हजार माणसे मृत्युमुखी पडली, कित्येक हजार जखमी झाली, सर्व गाव बेचिराख झाले. मराठवाड्यात सामाजिक प्रश्नावरून आंदोलन झाले त्यात अनेक निरपराधी व्यक्ती व कुटुंबे बळी पडली.

एकीकडे भौतिक सुधारणांची व सुखसोयींची वाढ, ज्ञानाचा व शिक्षणाचा प्रसार, मानवता, समता व बंधुभाव यांचे जयजयकार आणि एकीकडे हजारो व्यक्तींची व कुटुंबांची ही दुःखे काही अस्मानी, काही इन्सानी, काही सैतानी ! दुःखात सापडलेल्या मानवांचा व कुटुंबांचा विचार केल्यानंतर मन अस्वस्थ होते. आपल्या असहायतेची खंत वाटते. आपण भोगत असलेल्या सुखाबद्दल अपराधी भावना जागृत होते.

दुःख हे जगामध्ये आहेच. पूर्वी होते, यापुढेही येत राहील. कितीही भौतिक सुधारणा झाल्या तरी अनेक प्रकारची दुःखे कधी नष्ट होणार नाहीत. नवनवीन आपत्ती येत राहतील. मानवी दुःखामुळेच धर्म व तत्त्वज्ञान यांची निर्मिती झाली. भगवान बुद्धाने मानवी दुःखे पाहिली आणि बौद्ध धर्माचा उदय झाला. दुष्ट, पापी माणसांनी आपल्याच बांधवांना दिलेली दुःखे येशू ख्रिस्ताने पाहिली व ख्रिस्ती धर्म निर्माण झाला. भारतीय सांख्य तत्त्वज्ञान हे दुःखमुक्तीकरताच जन्माला आले. अर्जुनाच्या व अप्रत्यक्षपणे मानवाच्या दुःखांचा सर्वांगीण विचार करण्याकरता भगवद्गीता सांगितली गेली.

जगात दुःख आहे त्याचबरोबर दुःखितांविषयी करुणा, भूतदया, सहानुभूती, औदार्य, सहकार्य, त्यागबुद्धी, दानवृत्ती याही भावना निसर्गानेच मानवाच्या हृदयात बीजरूपाने पेरून ठेवल्या आहेत. त्यांची जाणीव करून घेऊन विकास करण्याचे काम प्रत्येक व्यक्तीने केले पाहिजे. प्रत्येक धर्मात व भारतीय जीवनक्रमात दानाचे महत्त्व सांगितले आहे ते याकरताच. आपल्या दानवृत्तीने जगातील थोडे तरी दुःख कमी व्हावे हा उद्देश आहे.

आज आपल्यापैकी जे सुखात आहेत त्यांच्या सुखाची तरी शाश्वती आहे का ? पानशेतचे धरण फुटून अर्धे पुणे पाण्यात बुडेल असे स्वप्नात तरी वाटले होते का ? समुद्र-लाट आंध्रकिनाऱ्यावर येईल असे वाटले होते का ? पण ते घडते ! सुखात रमलेली माणसे दुःखात लोटली गेली. धरणीकंप कोयना परिसरात आणि इराणातच होईल, आपल्या पायाखाली होणार नाही अशी हमी कोणी देऊ शकेल काय ? अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ, वादळे, अग्निप्रलय इत्यादी आपत्ती कोठेही, केव्हाही, कोणावरही येतील. आपला अपवाद त्यांना नाही. आपल्या मनाची तयारी हवी; आणि त्या वेळी इतरांच्या सहानुभूतीची, करुणेची, सहकार्याची, औदार्याची, दानबुद्धीची आपल्यालाही गरज लागेल. जो प्रसंग इतरांवर येतो तो आपल्यावरही येण्याचा संभव आहे अशी मनाची सतत तयारी असावी.

अशा आपत्तीत सापडलेल्या कुटुंबांचे थोडे तरी दुःख आपल्या दानामुळे, त्यागाने, सेवेमधून, सहानुभूतीने, औदार्याने कमी कसे करता येईल याचा प्रत्येकाने विचार करून तो आचरणात आणायला हवा. आपल्या प्राप्तीपैकी काही भाग अशा दुःखमुक्तीच्या सत्कार्याकरता बाजूला काढून ठेवायला हवा. कारण अशा आपत्ती कोठे ना कोठे आपल्या गावात, राज्यात, देशात व जगात येत राहणार. मदत करायची, दुःखविमोचनार्थ यथाशक्य त्यागाची, दानाची व सहकार्याची आपली तयारी हवी. मानव मानवाकरता इतके करीत राहील तरच तो 'माणूस' या संज्ञेला जगात पात्र होईल.

[२०-९-१९७८

१९. तरुणांची गुन्हेगारी, आपली जबाबदारी

पुण्यात गेल्या वर्षी दहा खून झाले व गुन्ह्यांचा शोध होऊन, कायदेशीर कामकाज चालून खटल्याचे निकाल लागले. शिक्षाही जाहीर झाल्या. पोलीसखात्यातील एका

अनुभवी व्यक्तीने असा अनुभव लिहिला आहे की, अलीकडे अठरा-वीस ते अठ्ठावीस-तीस वयाच्या तरुणांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. वृत्तपत्रे वाचून आपल्यालाही तीच शंका वाटू लागते.

या गुन्हेगारीत आपण पालक, शिक्षक, अध्यापक, लेखक आणि कलाकार यांचाही काही भाग आहे. म्हणून गुन्हेगार तरुणांना झालेल्या शिक्षेबद्दल आपल्यालाही पश्चात्ताप झाला पाहिजे. आपल्या अकर्तेपणाची, बेजबाबदारीची, कर्तव्यच्युतीची, मनोवृत्ती अंशतः तरी या गुन्हेगारीला कारणीभूत झालेली आहे हे नाकारता येणार नाही.

आम्ही गृहशिक्षणात, शाला-महाविद्यालयीन शिक्षणात वाङ्मयातून, व इतर माध्यमातून दुराचार असा बुद्धिपूर्वक शिकवला नाही हे मला मान्य आहे व त्याबद्दल आपण प्रशंसेस पात्र आहोत! पण आजच्या परिस्थितीत बुद्धिपुरःसर, जाणीवपूर्वक, योजनाबद्ध रीतीने आम्ही, सदाचाराचे व दुराचार टाळण्याचे संस्कार व विचार तरुणांना दिले नाहीत. ही देखील आपली अक्षम्य चूक झालेली आहे, तिचा आज तरी विचार केला पाहिजे. तो केला तर १९८८ साली व त्यानंतर होणाऱ्या गुन्हेगारीत तरुणांच्या संख्येत काही घट होईल.

मला आश्चर्य वाटते ते हे की, पालक, शिक्षक, अध्यापक व लेखक या वर्गाला, या तरुणांच्या प्रवृत्तीशी आपला काही संबंध आहे अशी जाणीवच झालेली दिसत नाही ! उमलत्या तरुण पिढीत, शिक्षण घेतलेल्या व घेत असलेल्या तरुणांत ही दुराचार प्रवृत्ती का वाढत आहे, आपापल्या परीने आपण तिला कशा रीतीने आळा घालू शकू याची चर्चा घरोघरी, शाळांतून, महाविद्यालयांतून, शिक्षकसंघटनांतून, लेखांतून व्हायला पाहिजे. चार बुद्धिमान तरुणांना ऐन उमेदीच्या वयात फाशीची शिक्षा होणे ही अगदी मामुली गोष्ट आहे का? खटला ऐकायला, गुन्हेगाराला पाहायला खूप गर्दी जमत असे. निकाल लागल्यावर सगळ्यांना न्याय झाल्यासारखे वाटले. पण या सर्व प्रकरणात आपापली भूमिका काय आहे याचा कोणी विचार केला नाही. केवळ पोलीस-खाते, न्यायखाते, व तुरुंगखाते, यांच्याव्यतिरिक्त इतरांना काय करता येईल, ही गुन्हेगारी कशी टाळता येईल याचा विचार समाजात आजच मोठ्या प्रमाणावर व्हायला पाहिजे. आपल्या गृहशिक्षणात, शालेय शिक्षणात, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात, वाङ्मयात काहीतरी कमी पडत आहे याची जाणीव व्हायला हवी. ती जर झाली नाही तर १९७८ पेक्षा १९८८ व त्याहीपेक्षा १९९८ सालात या गुन्हेगारीचे प्रमाण वाढत्या श्रेणीने पसरलेले दिसेल.

तरुण पिढीची मनोवृत्ती सुधारण्याचा हा मूळ प्रश्न आहे. आज सुखोपभोगाची वृत्ती वाढत आहे; हॉटेल, सिनेमा, सिगारेट, मद्यपान, उंची पोशाख अशा ख्याली-

खुशालीच्या सवयी वाढत आहेत; त्यांचा उगम घराघरातून होतो व शाळाकॉलेजांतून तो दिसतो. श्रीमंत तरुणांचे अनुकरण मध्यम-गरीब वर्गातील तरुण करतात. त्यांना अशा वागण्याला पैसे कमी पडू लागले की कमी प्रयासाने पैसा मिळविण्याच्या युक्त्या शोधल्या जातात. सिनेमा-रहस्यकथांतून अशा तयार युक्त्या व मार्ग सुचवले जातात. या सर्वांतून आजच्या तरुणांच्या गुन्हेगारीचा जन्म झाला आहे. यापेक्षा इतरही अनेक कारणे असू शकतील पण त्या सर्वांचा साकल्याने विचार होणे आज जरूर आहे. ज्यांच्या हातात जे जे आहे ते ते त्यांनी आज सुरू करावे .घरोघरी कुटुंब-प्रमुखांनी, शाळा-कॉलेजातील शिक्षक मुख्याध्यापकांनी, प्राचार्य-प्राध्यापकांनी, विद्याखात्यांनी, लेखकांनी, सर्वांनीच आपापल्या परी या प्रश्नाचा विचार करून उपाययोजनेला प्रारंभ केला पाहिजे. विद्यार्थी संघटनांनी तर या कामी अधिक उत्साहाने व आपुलकीने विचार व कृती करायला हव्यात. तरुणाची प्रवृत्ती दुराचाराकडून सदाचाराकडे कशी वळवता येईल त्याची योजना केली पाहिजे. या कामी सर्व सहकार्य द्यायला मी तयार आहे. माझ्या कुवतीप्रमाणे मीही प्रयत्न करीत आहे.

[१६–१०–१९७८

२०. रायबरेली ते चिकमगलूर

रायबरेलीत मार्च ७७ मध्ये श्रीमती इंदिरा गांधींचा दारुण पराभव झाला; पावणेदोन वर्षांनी नोव्हेंबरमध्ये त्यांनाच चिकमगलूरमध्ये नेत्रदीपक विजय मिळाला. या दोन घटनांचा राजकारणाचे दृष्टीने, राजकीय तत्त्वज्ञानाच्या विचाराने आणि भारतीय जनतेच्या मानसशास्त्राचे संदर्भात काय अर्थ आहे? या प्रश्नाचा परामर्श आपल्याला फार उपयुक्त होईल. मी त्याकडे केवळ शैक्षणिक दृष्टीने पहातो. बालक-युवक-प्रौढ यांच्या शिक्षणात राजकीय-सामाजिक जागृतीचे दृष्टीने काय करायला हवे त्याचा मी विधायक विचार करतो. निवडणूक हे एक निमित्त आहे. तात्कालिक घटनेतून चिरकालीन तत्त्व काढावे ही माझी मनोवृत्ती आहे. 'लाडक्या लेकीस (अनु) शासन' असा लेख मी श्रीमती गांधींच्या पराभवाला उद्देशून ३–४–७७ ला लिहिला होता. त्यात त्यांच्या स्वभावाच्या गुणदोषांची मीमांसा केली होती. आज जनतेच्या स्वभावाची मीमांसा करू या.

या लेखाची मूलभूत मांडणी मी २१–३–७७ रोजी माझ्या वहीत करून

ठेवलेली आहे. रायबरेलीत व उत्तरेत अन्यत्र मार्च ७७ मध्ये जनता पक्षाचा विजय झाला होता. हा विजय लोकशाही तत्त्वज्ञानाचा विजय आहे, अशी चिकित्सा भारतीय व परदेशी तज्ज्ञांनी त्या वेळी केली होती. त्या उत्साहाच्या वातावरणात लोकशाही यशाला गौणत्व देणारा आपला विचार इतक्यात प्रदर्शित करायला नको म्हणून मी आजपर्यंत म्हणजे पावणेदोन वर्षे थांबलो. पण परवाच्या चिकमगलूरच्या निवडणुकीने माझी पूर्वीचीच चिकित्सा दृढमूल झाली. म्हणून आज मी तिची मांडणी करीत आहे.

राजकीय तत्त्वज्ञानात आता लोकशाही आणि हुकुमशाही असे दोन स्थूल विभाग पडले आहेत. ब्रिटिश सत्ता येण्यापूर्वी अनेक शतके भारतात राजेलोकांच्या हुकुमशाही राजवटीच चालू होत्या. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या स्वतःच्या देशात लोकशाही होती तरी भारतात त्यांची हुकुमशाहीच होती. म्हणजे शतकानुशतके भारतीय जनतेला राजे, महाराजे, बादशहा, नबाब, सरदार अशा हुकुमशाही राजवटीचाच अनुभव आहे. वरून येणाऱ्या हुकुमाप्रमाणे वागायचे, स्वतःचा स्वतंत्र विचार करायचा नाही, एवढेच येथील जनतेला माहीत आहे. भारतातील संस्थानांचे विलीनीकरण पंचवीस-तीस वर्षांपूर्वी झाले पण या संस्थानी प्रजेला अद्याप राजे-राण्या-राजपुत्र-राजकन्या यांच्याविषयी परम आदर व प्रेम आहे. महाराजांची गाडी रस्त्यावरून जात असली तर जमिनीपर्यंत वाकून सलाम-नमस्कार केलेले लोक अद्याप महाराष्ट्रात व भारतात आहेत. समाजाला अद्याप लोकशाही व हुकुमशाही यांतील फरक कळलेला नाही. शहरातील मूठभर सुशिक्षितांना लोकशाहीचे ज्ञान आहे. पण त्यांच्यातही अनेक लोक हुकुमशाहीचे पुरस्कर्ते आहेत. १९३० ते १९५० या काळातील यूरोपमधील हुकुमशाही व तिचे परिणाम त्यांना कळले नाहीत व आकलन झाले नाहीत.

जनतेला लोकशाही-हुकुमशाही यांतील भेद समजत नाही. पण जुलमी राजवट आणि प्रेमाची राजवट यांतील फरक कळतो. रावण हा जुलमी राजा होता व रामाचे आपल्या प्रजेवर प्रेम होते. म्हणून भारतात रामराज्य हवे असे मोठमोठे पुढारीही म्हणत असत. रामराज्य म्हणजे एका व्यक्तीच्या हुकुमाचे राज्य म्हणजे हुकुमशाहीच, पण ती जुलमी नसल्याने अशा राजवटीला जनतेची मान्यता असते. उलट कशाही पद्धतीने निवडून दिलेला एखादा मंत्री, मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान जुलमी असला तर जनतेमध्ये तो प्रिय होत नाही, त्याला ती जुलूम अनुभवलेली प्रजा पुन्हा निवडून देत नाही. त्यापेक्षा ती एखाद्या क्रियाहीन उमेदवाराला (स्वतंत्र) निवडून देणे पसंत करील.

पुढील कोष्टकात हा फरक स्पष्ट दाखवता येतो.--

लोकशाही घटना	हुकूमशाही घटना
१ जनता प्रेमी	४ जनता प्रेमी
२ त्रयस्थ स्वतंत्र	५ त्रयस्थ स्वतंत्र
३ जुलमी	६ जुलमी

म्हणजे राजवटीत वरीलप्रमाणे एकूण सहा प्रकार होतात. उमेदवार निवडताना लोकशाही अथवा हुकुमशाही असा विचार जनता करीत नाही, तर जनता-प्रेमी किंवा जुलमी एवढा एकच महत्त्वाचा व अनुभवाचा निकष ती लावते. या निकषावर रायबरेली आणि चिकमगलूर येथील निवडणुकांचा विचार करा म्हणजे भारतीय जनतेचे राजकीय मानसशास्त्र समजेल.

उत्तरेतील ज्या राज्यांत लोकांना कुटुंबनियोजन, शहरसुधारणा, मारुती कारखाना इत्यादी बाबतींत जुलमाचा अनुभव आला त्यांनी श्रीमती गांधींना झिडकारले. त्या जुलमाचा यत्किंचितही अनुभव चिकमगलूरमधील जनतेला आला नसल्याने त्या हुकुमशहा आहेत इत्यादी कितीही प्रचार झाला तरी जनतेने त्यांना निवडून दिले. तीच व्यक्ती, तीच विचारसरणी, त्याच मनोवृत्ती, पण त्यांचा जुलमाच्या स्वरूपात अनुभव किंवा अननुभव यांमुळे अपयश आणि यश इतका फरक पडला.

आता यापासून लोकशिक्षणार्थ बोध काय घ्यायचा ? लोकांना हे शिकवायला पाहिजे की हुकुमशाही जुलमी झाली तरी ती आपण बदलू शकत नाही, ती कायमची आपल्या डोक्यावर बसते. पण जुलमी लोकशाही असली तर ती आपण बदलू शकतो. दुसरा धडा उमेदवारांना आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या उमेदवारांनी जुलमाचे धोरण न ठेवता जनता-प्रेमी उमेदवाराला, तो हुकुमशाही वृत्तीचा असला तरी, निवडून देतील. तसा न मिळाल्यास ते एखाद्या त्रयस्थ स्वतंत्र उमेदवाराला निवडून देतील, पण जुलमी उमेदवाराला निवडून देणार नाहीत.

[मूळ विचार ३-११-७७ : लेखन २१-११-७८

□ □ □

२१. बेकारांचेही सहकार्य हवे

सुशिक्षित, अशिक्षित आणि अर्धशिक्षित अशा सर्वच वर्गात बेकारी वाढत आहे. ती कमी करण्याचा यथाशक्य प्रयत्न शासन करीत आहेच. त्या प्रयत्नांना यश येण्याकरता बेकार व्यक्तींकडूनही काही प्रयत्न झाले पाहिजेत, त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

सामान्य माणूस नोकरीची अपेक्षा करतो; स्वतंत्र वृत्तीचा माणूस आपला स्वत:चा व्यवसाय निर्माण करतो. बेकार व्यक्तीने प्रथम हा विचार करावा की, माझ्या ठिकाणी नोकर-वृत्ती आहे का मालकवृत्ती आहे ? त्या वृत्तीला अनुसरून गुण माझ्यात आहेत का ? आधी नोकरवृत्तीचा विचार करू.

अनेक अर्जदार आपल्या अर्जात लिहितात की मी गरीब आहे, माझ्यावर इतकी माणसे अवलंबून आहेत, मी स्वावलंबनाने शिक्षण घेतले आहे, इत्यादी. आता नोकरी देणारा माणूस तुमच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहील याचा विचार करा. तुम्ही गरीब व गरजू आहात म्हणून तो नोकरी देईल का त्याचे काम करायला तुम्हीच लायक आहात म्हणून काम देईल ? गरीब माणसाला पाचदहा रुपये तो एकदा देईल पण दरमहा पगार देण्याचे कायमचे ओझे तो कसे स्वीकारील ? तेव्हा नोकरी मागताना 'तुमचे अमुक काम चांगले करू शकेन, त्यामुळे तुमचा व्यवसाय चांगला चालेल व माझेही काम होईल' असे सांगणाऱ्या अर्जदाराचा काही विचार तरी होईल. आता त्या मालकाचे ते काम करण्याची तुमची पात्रता इतर पाचपन्नास अर्जदारांपेक्षा तुम्ही जास्त वाढविली आहे का याचाही विचार करा. साधे कारकुनाचे काम आहे असे समजा. तुमचे मराठी व इंग्रजी अक्षर उत्तम केले आहे का ? मराठी शुद्धलेखन आणि इंग्रजी स्पेलिंग यात तुम्ही प्रावीण्य मिळविले आहे का ? साधे हिशेब मांडण्याचे शास्त्र तुम्ही अवगत करून घेतले आहे का ? ज्या जागेकरता आपण अर्ज करतो किंवा करणार असू त्या जागी काम करण्याची आपली पात्रता यथाशक्य वाढवावी. असे केले तर अनेकांत तुम्ही एक उठून दिसाल व तुमची निवड होईल. गुणहीन व पात्रताहीन बेकाराचे कायमचे ओझे कोण अंगावर घेईल ? हे जसे कारकुनीच्या नोकरीचे तोच नियम इतर नोकऱ्यांना देखील आहे. त्या कामाकरता तुमची लायकी इतरांच्यापेक्षा कांकणभर, नव्हे कासराभर, अधिक आहे हे मालकाला दिसेल तरच तो तुमची निवड करील.

ज्यांना स्वतंत्र वृत्तीने काम करायची धमक आहे त्यांना आज किती तरी विविध मार्गांनी बँका, शासन, उद्योगखाते इ. मदत करायला तयार आहेत. समाजाची गरज काय आहे, कोठे आहे, केव्हा आहे, याचा विचार करून ती गरज भागविण्याचा जो प्रयत्न करतो त्याला उद्योगधंदा मिळतो. एखाद्या नवीन ठिकाणी काही समारंभ, शिबिर किंवा उत्सव आयोजित झाला की, त्या ठिकाणी चहापाण्याची, फराळाची, करमणुकीची दुकाने कशी येतात ? त्यांना कोणी बोलवायला लागत नाही. आपल्या मालाची समाजात कोठे, किती, केव्हा गरज आहे इकडे या स्वतंत्र व्यावसायिकांचे लक्ष असते म्हणून ते उद्योग करून पोट भरतात व संसार चालवतात. साधी भिक्षा मागणारे भिक्षेकरी देखील हेरीत असतात की दानधर्म करणारी माणसे कुठे, केव्हा जाणार येणार आहेत. आजकाल प्रत्येक गाव व शहर वाढत आहे. नवीन वसाहती होत आहेत. तेथे किराणा मालाची, बेकरीच्या मालाची, परटाची, चहाची दुकाने कोण काढतो ? त्यांना तेथे कोण बोलावतो ? मी काय निर्माण करू शकतो हा पहिला प्रश्न. माझ्या मालाला व सेवेला कोठे मागणी आहे हा दुसरा प्रश्न. असा विचार केला तर स्वतंत्र वृत्तीच्या बेकाराला काही तरी मार्ग दिसेल. शक्यता वाढेल.

आता उच्च शिक्षण घेतलेले बेकारही वाढत आहेत. पूर्वीच्या नोकर--पदवीधराकडे पाहून ते तितक्या पगाराची व त्या पातळीच्या नोकरीची अपेक्षा करतात. पण प्रत्येक खात्यात अशा जागा व नोकऱ्या थोड्या असतात, दरवर्षी त्यात थोड्या जागा रिकाम्या होतात, आणि तेथे वशिल्याची माणसे लावली जातात. तेव्हा उच्च शिक्षित बेकारांनी प्रारंभी थोड्या प्राप्तीवर संतोष मानून मिळेल ते काम स्वीकारावे किंवा लहानसहान व्यवसाय सुरू करावा. आपल्या बुद्धीचा, कसबाचा, व्यवहारज्ञानाचा, कष्टाचा उपयोग केला तर तोच धंदा वाढेल आणि इतर बेकारांना नोकऱ्या देईल.

बेकारीचा प्रश्न कठीण आहे, तो चुटकीसारखा सुटणारा नाही, केवळ लेख लिहून तो सुटत नाही हे मला माहीत आहे. पण बेकारांनी आपली पात्रता वाढवीत राहावे, संधी शोधात राहावे, प्रारंभी थोड्या प्राप्तीवर समाधान मानावे, मिळेल ते काम कष्टाने व आस्थेने करावे, या बाबतीत तर काही मतभेद होणार नाहीत ना ? शासनाचे, बँकांचे, समाजाचे, उद्योगखात्यांचे जसे प्रयत्न चालले आहेत त्या प्रयत्नांना साथ देण्याकरता व यश येण्याकरता बेकारांनीही काही प्रयत्न केले पाहिजेत. केवळ नोकऱ्या व कामे येतील अशी वाट पाहात वेळ घालवू नये. शोध आणि पात्रतावाढ करीत रहावे असे माझे सांगणे आहे. [१६–१२–१९७८

□ □ □

२२. व्यसनमुक्तीची संपत्ती

व्यसनापासून मुक्ती ही एक संपत्ती आहे हे फारसे कोणाच्या लक्षात येत नाही. माझ्याजवळ शिकून गेलेले बहुसंख्य माजी विद्यार्थी व्यसनमुक्त आहेत. व्यसनात दरमहा अंदाजे पंधरा ते पन्नास रुपये खर्च होतात, ती त्यांची बचत होते. वर्षाकाठी रु. २०० ते रु. ६०० म्हणजे तीस-चाळीस वर्षात आठदहा ते पंचवीस तीस हजार रुपयांची बचत होते. ही त्यांना मी भेटच दिली आहे असे मी समजतो. शिवाय व्यसनामुळे जडणारी दुखणी, त्यावर होणारा डॉक्टरांचा व औषधांचा खर्च, रजेमध्ये व आजारात जाणारे फुकट दिवस, यांत होणारी खर्चाची बचत त्यात मिळवा म्हणजे केवढी रक्कम होते ते लक्षात येईल ! आजच्या खर्चाच्या राहाणीत आपण मुलांना काही फार मोठी संपत्ती ठेवू शकत नाही, पण ही व्यसनमुक्तीची संपत्ती आपण त्यांना देऊ शकतो; एवढा वारसा आपल्या तरुण पिढीला द्या. निर्व्यसनीपणामुळे त्यांचे जीवन आरोग्यसंपन्न, आनंदी, सुखी होईल. निर्व्यसनी नवरा दिल्याबद्दल तुमच्या सुना तुम्हाला दुवा देतील व मुलांचे संसार सुखी होतील. तुमच्या भाग्यवान घराण्याच्या आणखी एक दोन पिढ्या तरी व्यसनमुक्त राहण्याची शक्यता आहे.

गेल्या दोन तीन शतकांत शिक्षणाचा प्रसार खूप झाला. माणसे पुस्तके वाचायला शिकली, ज्ञान मिळवायला शिकली, पण मन जिंकायचे कसे, मनावर नियंत्रण कसे ठेवायचे ते शिकली नाहोत. त्यामुळे माणसे शिक्षित (सु-शिक्षित नव्हे, साक्षर, सज्ञान) झाली पण शहाणी झाली नाहीत. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत व्हावा ही अपेक्षा, ती पुरी झाली नाही. एकीकडे शिक्षणाचा प्रचंड प्रसार व दुसरीकडे तितक्याच भयंकर प्रमाणात व्यसनाधीनतेचा प्रसार. तंबाखू, सिगरेट, मद्य, मादक द्रव्य यांनी पुढारलेल्या व सुधारलेल्या देशातील तरुण पिढीला ग्रासले आहे. वयस्क पिढीने हाच मोठा दुष्ट वारसा आपल्या मुला-मुलींना दिला आहे. तेच लोण आज सिनेमा, वाङ्मय, प्रवास इ. मार्गांनी भारतातही येत आहे. आपल्या स्वतःच्या कुटुंबात तरी त्याला आपण प्रतिबंध करू शकाल.

तुम्ही पालक आज निर्व्यसनी असाल; पण त्यामुळे तुमची मुले आपोआप तशीच राहातील याची खात्री बाळगू नका. त्यांना आज व्यसनग्रस्त अशा जगात वावरायचे आहे व जगायचे आहे, व्यवसाय-धंदा करायचा आहे. भोवताली व्यसनी समाज असला तरी आपण व्यसनमुक्त कसे राहावे ते मुलांना शिकवायला हवे. त्याकरता दोन गोष्टींची शिकवण द्यायला हवी. व्यसनांचे भयंकर परिणाम प्रकृतीवर,

कुटुंबावर, आर्थिक स्थितीवर, बुद्धीवर, कार्यक्षमतेवर कसे होतात ते पूर्ववयातच त्यांना सांगितले पाहिजे. त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. त्याचा परिणाम दीर्घकाल राहातो हे मी माझ्या मित्रांच्या अनुभवावरून सांगू शकतो. मी जगाचा प्रवास करून आलो व मद्य, तंबाखू, सिगरेट, इ. वापरणाऱ्या समाजात वावरून आलो. या व्यसनांचा मोह मला कधी झाला नाही. एकच पेला आणि एकच सिगरेट हा प्राणघातक व्यसनांचा प्रारंभ आहे अशी खूणगाठ मनाशी बांधून मी कधी त्या मोहात सापडलो नाही. ही पहिली शिकवण मुलांना घरी द्या. दुसरी शिकवण आत्मसंयमनाची. व्यसनांच्याच नव्हे, तर सर्वच क्षेत्रात हा सद्गुण उपयोगी पडेल. कुटुंबात लहान सहान प्रसंग अनेक येतात की त्या वेळी मुले व पालक आपल्या भावनांना वळी पडतात. खाण्या-पिण्यात अतिरेक, मनाविरुद्ध काही झाले की संताप, वर्दळीवर येण्याची व भांडण्याची प्रवृत्ती, इतरांना मारण्याची सवय अशा अनेक वृत्ती ताब्यात ठेवण्याकरता कुटुंबातील व्यक्तींच्या स्वभावात आत्मसंयमन हवे. हा एक सद्गुण मुलांना आपण दिला तर त्यांना व्यसनमुक्त राहण्याच्या प्रयत्नांत आणि भ्रष्टाचार, लाचलुचपत इत्यादी दुर्गुणांपासून अलिप्त राहण्याच्या ध्येयात फार उपयोगी पडेल.

व्यसनाधीन व्यक्तींच्या वर्तुळात एखादी व्यक्ती निर्व्यसनी असली की तिचा उपहास होतो, थट्टा होते, टिंगल केली जाते हे सर्व खरे आहे. पण अंतर्यामी या सर्वांच्या मनात त्या व्यक्तीविषयी आदर वाटतो आणि स्वतःच्या व्यसनाबद्दल स्वतः-चीच कीव वाटते. निर्व्यसनी व्यक्तीने हा उपहासही प्रारंभी सहन करायला शिकले पाहिजे. एकदा आपल्या तात्त्विक भूमिकेची इतरांना माहिती झाली की नंतर कोणी वाटेला जात नाही. उपहास-सहनतेची ही प्रारंभीची तपश्चर्या प्रत्येक निर्व्यसनी व्यक्तीने करायला हवी. तिचे फल मिळाल्याखेरीज राहणार नाही.

[१४–१–१९७९

२३. कुटुंबातील सुख व शांती

कुटुंबातील वातावरणाचा प्रत्येक व्यक्तीवर परिणाम होत असतो. शांत व खेळीमेळीची परिस्थिती काही अंशी बाह्य गोष्टींवर व काही अंशी अंतःकरणावर अवलंबून असते. घराची जागा, आर्थिक प्राप्ती, शेजारपाजार अशा गोष्टी सर्वस्वी आपल्या इच्छेवर अवलंबून नसतात. पण अंतःकरणाच्या प्रवृत्ती व स्वभाव ही प्रत्ये-काच्या स्वाधीनची बाब आहे. बाह्य परिस्थिती कितीही अनुकूल असली तरी घरांतील

माणसांचे स्वभाव चमत्कारिक व विसंवादी असले तर कोणालाच सुख मिळणार नाही. उलट बाह्य परिस्थिती प्रतिकूल असली तरी कुटुंबियांचे स्वभावात जर सुसंवाद असेल तर त्या घरात सुखाचे आणि शांतीचे वातावरण निर्माण होईल.

एकदा आम्ही पाचसहा माणसे जेवायला बसलो होतो. मी सर्वांना जो एक प्रश्न विचारला तो प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींनी आपापसात चर्चेला घेण्यासारखा आहे. प्रश्न असा : कुटुंबात शांत व सुखाचे वातावरण टिकवण्याकरता प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी कोणते तीन महत्त्वाचे गुण आवश्यक आहेत ? किंवा उलटही हाच प्रश्न निराळ्या पद्धतीने विचारता येईल. व्यक्तीच्या कोणत्या मनोवृत्तीमुळे, स्वभावामुळे व गुणामुळे कुटुंबातील सलोख्याचे व प्रेमाचे वातावरण कलुषित होते ? हा प्रश्न विचारल्याबरोबर प्रत्येक जण दुसऱ्या व्यक्तीच्या गुण-दोषांकडे प्रथम पाहील आणि स्वतःला वगळून इतरांच्या दोषांचा प्रथम विचार करील. तसे केले तरी चालेल, कारण हा मनुष्यस्वभाव आहे. इतरांच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही अशी सार्थ व अनुभवसिद्ध म्हण आहे.

घरातल्या इतर सर्वांच्या गुणदोषांची खानेसुमारी एखाद्या कागदावर लिहून काढावी. या या गुणांमुळे किंवा स्वभावातील घटकांमुळे इतर सर्वांना सुख होते व या या दोषांमुळे इतरांच्या मनाला त्रास, वैताग, दुःख, संताप, निराशा इत्यादी प्रकारचे क्लेश होतात. आपल्या घरात शांत व सलोख्याचे वातावरण हवे की नाही हे प्रथम ठरवावे. मग घरातील सर्वच व्यक्तींनी त्या वातावरणाला पोषक व उपकारक असा बदल आपल्या स्वभावात करायचा, हळूहळू घडवून आणायचा, असा निश्चय करावा. या प्रयोगाला थोडे जरी यश आले तरी घरातला आनंद वाढेल व सर्वांना उपलब्ध अशा सुखाचा तरी उपभोग शांत मनाने घेता येईल.

आज आपली कुटुंबे बेसूर व बदसूर होत चालली आहेत. प्रत्येकाचे विचार निराळे, स्वभाव भिन्न, अभिरुची जुनी-नवी, शिक्षणाची पातळी कमी-अधिक, अशाही स्थितीत माणसांना सुखाने एकत्र राहायचे आहे, तर अधिकाधिक सुख, आनंद आणि शांती आणण्याचा प्रयत्न का करू नये ?

कुटुंबात प्रेमाचे वातावरण निर्माण होण्याकरता व्यक्तींच्या स्वभावात कोणते गुण असावेत असा विचार मी करतो तेव्हा माझ्यापुढे जे गुण येतात ते असे :

दुसऱ्या माणसांची सोय पाहण्याची वृत्ती असावी, आपल्या पायापुरते पाहू नये. इतरांना अधिकाधिक सुख व आनंद देण्याकरता मी कसे वागावे, हा विचार नेहमी

मनात असावा. त्याकरता स्वार्थी वृत्ती आणि अहंकार यांना जरा मुरड घालावी लागेल. त्यामुळे तुम्ही घरात सर्वांना प्रिय व्हाल. त्यागवृत्तीची जोपासना करा.

लहानसहान गोष्टींवरून, आपल्या मनविरुद्ध थोडे काही झाले की चिडायची सवय अनेकांना असते. याचेच तापटपणात, रागवारागवीत व भांडणात पर्यवसान होते. याकरिता क्षमाशीलता व सहिष्णुवृत्ती यांचा थोडथोडा अभ्यास करावा. दया, क्षमा, मैत्री इत्यादी वृत्ती प्रेमापोटी येतात. तापटपणा कमी होऊन स्वभावात शांतपणा आला तर घरातच नव्हे, तर समाजातही तुम्ही लोकप्रिय व्हाल.

जीवनात आत्मसंयमनाचा उपयोग फार आहे. विशेषतः आपल्या बोलण्यात व वागण्यात हा गुण आवश्यक आहे. कठोर बोलण्याचा व दुसऱ्याला मारण्याचा मोह टाळला पाहिजे. वडील माणसांनी हा नियम पाळला तर त्यांच्या मुलांवरही चांगले संस्कार होतील.

कौतुक करण्याची वृत्ती आपल्यात फार कमी आहे, ती वाढवायला हवी. आपल्यापेक्षा लहान अथवा मोठ्या व्यक्तीने एखादी चांगली गोष्ट केली तर तिच्याबद्दल तुमची प्रशंसेची भावना योग्य शब्दात व्यक्त करा. त्यामुळे चांगले वागणाराला व काम करणाराला प्रोत्साहन मिळते.

चारपाच माणसे एकत्र राहिली की, कधी तरी लहान सहान भांडणे होणारच. ही भांडणे विसरण्याची मनोवृत्ती वाढवा. भांडणे मनात ठेवू नका, व उगाळत बसू नका. लहान मुलांचा आदर्श या बाबतीत डोळ्यापुढे ठेवा. ती घटकेत भांडतील की, थोड्या वेळाने हातात हात घालून खेळू लागतील.

सहज सुचलेल्या काही मनोवृत्ती या लेखात आहेत. उद्देश हा की या दृष्टीने आपल्या कुटुंबातील वातावरणाकडे आपण पहावे, व आपल्या स्वभावात काय सुधारणा केली म्हणजे इतर लोक आणि आपणही सुखी होऊ, या दिशेने प्रयत्न व्हावा. कुटुंबात शांती व सलोखा वाढला तर तुमचेही मन शांत राहून कर्तृत्व वाढेल आणि उपलब्ध परिस्थितीत जीवन सुखाचे होईल. वसे शांती ज्या घरी तेथे लक्ष्मी वास करी.

[२१-२-१९७९

□ □ □

२४. जनता, जागृती आणि जबाबदारी

गेल्या तीन शतकांत जे सामाजिक बदल झाले त्यांत सामान्य जनतेच्या जागृतीला प्रथम क्रमांक द्यावा लागेल. राजे-सरदार-उमराव यांचे युग हळूहळू लयाला जाऊन आज जगातील सर्वच देशांतील सर्वसामान्य माणूस आपल्या हक्कांविषयी जागृत झाला आहे. ही प्रवृत्ती प्रथम इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांत निर्माण झाली आणि या देशांचा प्रभाव जगात जेथे जेथे पडला तेथे तेथे सामान्य लोक आपल्या परिस्थितीविषयी विचार करू लागले आहेत. जी परिस्थिती एके काळी युरोपात होती तीच आज आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडांतील देशांत निर्माण झाली आहे. सामान्य माणूस आपल्या कनिष्ठ परिस्थितीबद्दल असमाधानी झाला आहे, आपल्या हक्काची त्याला जाणीव होत आहे. आपल्यामध्ये एक सामुदायिक शक्ती आहे आणि तिच्या जोरावर आपण अधिकाराला व सत्तेला आव्हान देऊ शकतो असा आत्मविश्वास जनतेला आला नाही.

जनतेच्या या जागृतीचे प्रारंभीचे पुढारी व मार्गदर्शक उच्च व मध्यम वर्गातून आलेले होते. गेल्या पन्नास साठ वर्षांत ही परिस्थिती बदलत आहे. आता जनतेचे नेतृत्व जनतेतूनच निर्माण व्हावे असे वाटत आहे आणि त्या मार्गाने बदल घडून येत आहे. येत्या पंचवीस तीस वर्षांत हे स्थित्यंतर मोठ्या प्रमाणात पहावयास मिळेल.

जनतेमधील या जागृतीचे सर्वांनी स्वागत करावयात हवे आणि तसे ते होतही आहे. पण जनता ज्या समाजाचा व देशाचा एक अविभाज्य भाग आहे, ज्याच्या प्रगतीवर जनतेचेही सुखदुःख व प्रगती अवलंबून आहे त्या समाजाचे-देशाचे हित यांचा उभयतांनी एकाच वेळी विचार करायला हवा. तसे आज होत नाही. सत्ता व अधिकार ज्यांच्या हातात आहे ते लोक नित्याचा धर्म व नैसर्गिक स्वभाव म्हणून जनतेच्या हिताचा विचार करीत नाहीत. त्यामुळे जनता-शक्ती आणि अधिकारी-सत्ताधारी यांची शक्ती यांत संघर्ष निर्माण होतात आणि त्यात सर्वसामान्य नागरिक भरडले जातात, त्यामुळे जनता-जागृतीविषयी एकीकडे कौतुक वाटते पण एकीकडे या जागृतीच्या प्रदर्शनाचा व आविष्काराचा अतिरेक होत आहे असे वाटल्यावाचून राहात नाही.

रेल्वेची एखादी गाडी उशिरा आली किंवा रद्द झाली की जनतेने ताळतंत्र सोडून डब्यांची नासधूस करणे, तारा तोडणे, जाळपोळ करणे, यात काय साध्य

होते ? दोन राजकीय पक्षांतील भांडणात एखाद्या पक्षातील लोकांनी गाववंदी करून दिवे फोडणे, पोस्ट ऑफिसे, रेल्वे स्टेशने, बसेस, इ. जाळणे, अशा अत्याचारांमुळे कोण कोणाचे नुकसान करतो व शेवटी गैरसोयी कोणाला सोसाव्या लागतात ? या सर्व सोयी पुन्हा निर्माण करण्याकरता जादा कर कोणावर लादावे लागतात ? खाजगी किंवा सरकारी व्यवसायात सर्वत्र संपाची लाट पसरलेली आहे. कामगार आणि अधिकारी सर्वच आता आपापल्या हक्काकरिता संप करू लागले आहेत ! संप झाला की दूध, पाणी, वीज, दवाखाने, वाहने, खाणावळी, उपाहारगृहे या सर्वांवर त्याचा परिणाम होऊन सर्व निरपराधी समाजाला त्याचे प्रायश्चित्त भोगावे लागते. या संपाशी काही संबंध नाही अशांना त्यांचे नित्याचे जीवन जगणे असह्य व अशक्य होऊन जाते.

सारांश, जनता–जागृती, कामगार वर्गाच्या व अधिकारीवर्गाच्या मागण्या, संप इ. घटनांची कारणे रास्त असली तरी त्यांचे असंतोष-प्रदर्शनाचे मार्ग हे सामान्य नागरिकांना तापदायक होतात. त्यांच्या हातात संपकारांच्या मागण्या पुरवण्याचे सामर्थ्यही नसते किंवा अनवश्यक अन्याय्य संपकारांना धडा शिकवण्याचेही साधन नसते. या सर्वच गोष्टींचा विचार समाजधुरीणांनी आता करायला हवा. जनतेची जागृती स्वागतार्ह आहे पण त्या जागृतीची प्रदर्शने सहनशक्तीबाहेर जात चालली आहेत; जनतेचे फाजील कौतुक होत आहे असे वाटू लागले आहे.

जनतेतूनच विचारी समंजस नेतृत्व कसे निर्माण होईल हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मोठ्या प्रमाणावर प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम आंखून त्यांत समाजहित आणि जनताहित यांची संघर्ष न येता सांगड कशी घालावी, याचे विचार दिले पाहिजेत. कार्यक्रमाचा हा एक भाग. ज्या कारणांकरिता असंतोष निर्माण होऊन त्यांचे अत्याचारात रूपांतर होते, ती कारणे निर्माण झाल्याबरोबर त्यांचे निराकरण करण्याची अंतर्गत यंत्रणा प्रत्येक खात्यात निर्माण करायला हवी. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, तसे संप केल्याशिवाय अन्याय-निरसन होत नाही अशी स्थिती जे आणतात व चालू ठेवतात ते सत्ताधारी आणि अधिकारीही तितकेच या अत्याचारांना जबाबदार आहेत. एका हाताने टाळी वाजत नाही. या दृष्टीने कारभारात सुधारणा झाली पाहिजे. हे शासकांचे काम आहे.

आज आपण बहुसंख्य नागरिक तरी असहाय झालो आहोत असे झाले आहे. दोन रेड्यांच्या टकरीत लहान पोरे सापडून जखमी व्हावीत तशी नागरिकांची स्थिती झाली आहे. त्यांना कोणी वाली नाही !

[१४–३–१९७९

२५. शंकराचा तिसरा डोळा

कविकुलगुरू कालिदासाने कुमारसंभव नावाचे महाकाव्य लिहिले आहे; ते त्याच्या रघुवंशाइतकेच रसाळ, प्रासादिक व विचारपरिप्लुत आहे. यातील एक सुंदर श्लोक माझ्या मनात फार वारंवार येतो तो इतरांना सांगावासा वाटतो म्हणून तुम्हाला सांगतो--

क्रोधं प्रभो संहर संहरेति । यावद् गिरः खे मरुतां चरन्ति ।।
तावत् स वन्हिः हर-नेत्र-जन्मा । भस्मावशेषं मदनं चकार ।।

शब्दार्थ – (संहर–आवर, गिर–वाणी, खे–आकाशात, मरुताम्–देवांची, चरन्ति–पसरते, हर-नेत्र-जन्मा–शंकराच्या नेत्रातून निघालेला, चकार–केले)

मराठी – **'निज क्रोध शिवा आवर, आवर' जै वाक्य देव नभि वदत ।**
शिवनेत्र-अग्नि तोवरि मदना जाळोनि भस्ममय करित ।।

पुराणातील ही कथा अनेकांना माहीत आहे. शंकर ध्यानस्थ होऊन तपश्चर्येला बसले होते. त्यांना त्यांच्या ध्यानातून विचलित व ध्यानच्युत करण्याचा मदनाने प्रयत्न केला व तो शंकरावर आपल्या कुसुमायुधाचे शरसंधान करू लागला. ते लक्षात आल्याबरोबर शंकराच्या तृतीय नेत्रातून एक प्रखर अग्निशलाका बाहेर पडली. 'शंकरा, क्रोध आवर. शांत हो' असे आकाशस्थ देव प्रार्थना करतात न करतात तोच त्या अग्निशलाकेने मदनाचे भस्म करून टाकले. या प्रसंगाचा उपयोग कालिदासाने आपल्या काव्याकरता केलाच, पण त्यानंतर मदनभार्या जी रती तिने जो शोक केला त्याचे काव्यमय वर्णनही हृदयाला भिडणारे आहे. एका मराठी कवीने कालिदासाचे वर्णन असे केले आहे–

सांगाया निजवल्लभेस वदला तो यक्ष जे जे घना ।
सीतेचा पतिला निरोप, रतिचा तो शोक भेदी मना ।।
ज्याते ही कविता मुखेच कविच्या ऐकावया सापडे ।
त्याचे भाग्य विशेष दुर्लभ जगी हा लाभ ज्याते घडे ।।

हा भाग्यवान राजा होता उज्जयिनीचा विक्रम. पण हे भाग्य आपणांला आजही कालिदासाचे काव्य वाचून प्राप्त करून घेता येते. वरील श्लोकात मेघदूत, रघुवंश आणि कुमारसंभव अशा तीन वाङ्मयप्रसिद्ध काव्यांचा उल्लेख केलेला आहे. असो.

आता काव्यप्रांतातून मानसशास्त्राच्या प्रांतात थोडा वेळ येऊ.

शंकराच्या तृतीय नेत्रातून अग्नी बाहेर पडला व त्याने मदनाचे दहन केले या रूपकाचा अर्थ काय? पौराणिक व वाङ्मयीन रूपक ध्यानात घेऊन त्याच्या अंतस्थ अर्थाचा विचार करू. मदनाचा जन्म हा मनातच होतो. त्याला संस्कृतमध्ये 'मनसिज' (मनात जन्मणारा– असा शब्द आहे. अभिज्ञानशाकुन्तलम् या कालिदासाच्या संस्कृत नाटकात हा शब्द या अर्थाने अनेक वेळा आला आहे

कामं प्रिया न सुलभा, मनस्तु तद्भावदर्शनाश्वासी ।
अकृतार्थेऽपि 'मनसिजे' रतिमुभयप्रार्थना कुरुते ।।

शकुन्तलेला पाहून दुष्यन्ताच्या मनात प्रणय निर्माण झाला. प्रणयभावना हाच मदन. त्याचा जन्म मनात होतो. पण ध्यानाच्या आणि तपश्चर्येच्या वेळी त्याचा उद्भव झाला तर तो व्यक्तीच्या मनोबल व साधनेला बाधक आहे; हे लक्षात आल्या बरोबर शंकराने आपला तृतीय नेत्र उघडला आणि मदनाला जाळून भस्म केले. मदनाचा जन्म जसा मनात तसा या तृतीय नेत्राच्या अग्नीचा जन्मही मनातच झालेला. चित्रकार व मूर्तिकार शंकराचा हा तृतीय नेत्र कपाळावर दाखवितात पण त्याचे खरे स्थान आहे मनात. आत्मसंयम आणि इच्छाशक्ती या अग्नीने मदनभावनेचे मनातच भस्म करून टाकले. प्रणयाची भावना ही अकाली, अस्थानी आल्याबरोबर तिला मनातच भस्मसात करून टाकले इतके शंकराचे मनोबल होते हे कालिदासाला व पौराणिकांना सुचवावयाचे आहे. हा अर्थ लक्षात घेतला नाही तर शंकर, तृतीय नेत्र, मदनाचे दहन इत्यादी दृष्टान्त व्यर्थ गेल्यासारखा होईल. असे अरसिक आपण होऊ नये म्हणून एक कवी ब्रह्मदेवाला प्रार्थना करतो–

अरसिकेषु कवित्वनिवेदनम् ।
शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख ।।

(शिरसि–कपाळावर, नशिबात. मा लिख–लिहू नकोस)

मराठी– ब्रह्मदेवा, अरसिक, म्हणजे अलंकारात व्यक्त केलेला गूढ अर्थ ज्यांना कळत नाही अशा, श्रोत्यांच्या आणि वाचकांच्या पुढे आपले कवित्व दाखविण्याचे दुर्भाग्य आमच्या कपाळी लिहू नकोस.

आपले मन हे अनेक इष्ट आणि अनिष्ट भावनांचे उगमस्थान आहे. काम क्रोध, लोभ, मोह, मत्सर, भय, अहंकार इत्यादी अनिष्ट भावना मनात येतात. त्या अधिक काळ मनात राहू दिल्या तर आपल्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडतात आणि

आपले वर्तन बिघडते. त्या भावनांवर, त्यांचा उगम मनात झाल्या बरोबर नियंत्रण घाला, आल्या क्षणीच त्यांना जाळून टाका. हा जाळून टाकण्याचा तृतीय नेत्र आपल्या प्रत्येकाजवळ आहे; आत्मसंयमन आणि इच्छाशक्ती. चर्मचक्षूंनी बाह्य जग पहा आणि अंतश्चक्षूंनी अंतरंगातील जग पाहून तेथे येणाऱ्या अनिष्ट भावनांचा त्या त्या क्षणीच संयम करा. मनात चालणाऱ्या अनिष्ट भावनांच्या आणि आत्मसंयमाच्या या संघर्षाला उद्देशून संत तुकाराम म्हणतात–

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।

युद्ध आपल्या प्रत्येकाच्या मनात आहे पण त्यात बिजयी होण्याकरिता शंकराचा तृतीय नेत्रही आपल्याजवळ आहे. त्याचे तेज कायम ठेवा. मोहाच्या प्रसंगी तो अधःपातापासून तुम्हांला वाचवील. [१७–४–१९७९

२६. गटारात जाणारा पैसा

आपला स्वतःचा पैसा आपण जितक्या काटकसरीने, काळजीने व विचाराने वापरतो, तितक्याच काटेकोरपणे सार्वजनिक पैसा वापरतो का ? हा प्रश्न सार्वजनिक व सामाजिक क्षेत्रात काम करणारांनी आपल्या मनाला विचारावा. त्याचे उत्तर बहुसंख्य नागरिकांच्या मनात नकारार्थीच येईल. हाच प्रश्न दुसऱ्या एका पद्धतीने आपल्या मनाला विचारावा, की ज्या कामाबद्दल मला समाजाचा सार्वजनिक पैसा मिळतो त्या पैशाचा मोबदला मी कामाच्या, हजेरीच्या, विचाराच्या किंवा अन्य उपयुक्त अशा स्वरूपात देतो का ? त्याचेही उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल असे वाटते. मात्र याला अनेक चांगले अपवाद आहेत. त्यांनी या वर्गवारीतून स्वतःला वगळावे. व मनाला लावून घेऊ नये. सार्वजनिक द्रव्याचा, वेळेचा, श्रमाचा, बुद्धीचा अपव्यय. किती मार्गांनी व प्रकारांनी चालला आहे याची समाजाला जाणीव व्हावी याकरता हे आत्मचिंतन आहे.

खून, चोऱ्या, दरोडे, बलात्कार, अपहार इ. प्रकरणे न्यायालय-प्रविष्ट होतात आणि अनेक महिने किंवा वर्षे चालू असतात. या प्रकरणांचे निकाल लावण्याकरता न्यायाधीश, न्यायालयसंस्था व अन्य यंत्रणा यांच्यावर किती वेळ व पैसा खर्च होतो त्याचा विचार करा. हा सर्व अनुत्पादक खर्च आहे. एवढ्या खुनाच्या खटल्यात न्याया-

धीशाने आपले निकालपत्र हजारबाराशे पानांचे लिहिले असे वाचल्यानंतर मला-वाटते, इतक्या उच्च बुद्धिमत्तेचा उपयोग इतक्या क्षुद्र प्रकरणांच्या चिकित्सेत खर्च व्हावा ! काय ही शोकांतिका आहे मानवी बुद्धीची ! गुन्हेगारांना वाचविण्याच्या आणि अडकविण्याच्या कामी वकिलांची बुद्धिमत्ता व वेळ यांचा खर्च म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचाच हा खर्च आहे. हा सगळा काही प्रमाणात अपरिहार्य आहे हे मान्य. पण त्याचे प्रमाण किती वाढणार आहे याचा विचार करायला हवा. निदान समाजात जाणीव हवी–कोणी तरी कधी तरी, उपाय शोधून काढील ही आशा ! हा बुद्धीचा व द्रव्याचा अपव्यय.

सध्या 'वॉक औट' ची फॅशन रूढ झाली आहे. म्युनिसिपालिटीच्या सभा, विधिमंडळाची अधिवेशने, लोकसभेच्या बैठकी यांत क्षुद्र कारणाकरता तहकुबी, वॉक औट, कामकाज बंद पाडण्याचे प्रयत्न मोठचा प्रमाणात वाढत आहेत. यांत तुमचा, माझा, समाजाचा, देशाचा किती पैसा निष्कारण खर्च होत आहे याचा विचार करा. तहकुबी, वॉक औट, सभाबंदी इ. करणारांच्या खिशाला या प्रकारांनी काडी-चीही झीज लागत नाही. गंमत म्हणजे या सर्व खटाटोपाकरता ते आपली सन्मानवेतने, भत्ते, प्रवाससवलती इ. घेतच असतात. समाजाचा पैसा खाऊन त्याच्या मोबदल्यात विधायक, उत्पादक व उपयुक्त काम न देणे म्हणजे समाजाचा पैसा पाण्यात घालवण्या-सारखेच नाही का ? या प्रकारांना आळा घालायला एकच युक्ती आहे. ज्या अधि-वेशनाच्या दिवशी किमान चार तास काम झाले नसेल, व त्या कामाला सभासद हजर नसेल त्या दिवसाचे वेतन व भत्ते मासिक वेतनातून व भत्त्यातून कापले जावेत. ही आपली स्वप्न–योजना आहे. कारण ही वेतने आणि भत्ते ठरवण्याचे काम सभासदच करीत असल्यामुळे आपल्या खिशाला कोण कात्री लावून घेईल ? वास्तविक पहाता वेतन-भत्ते इ. ठरवणारी यंत्रणा आणि वेतनभत्ते घेणारी सभासद मंडळे ही भिन्न असायला हवीत. मीच माझा पगार-भत्ता ठरवणारा झालो की, आपला हात जगन्नाथ ! जितक्या उदारपणे मी माझा पगार-भत्ता इ. ठरवतो तितक्याच कसोशीने माझ्या कामाचा तपशील आणि उपस्थितीचा वेळ, अटी, इ. ठरवतो का, याचा विचार सार्वजनिक पैशाने काम करणाऱ्या सर्वच व्यक्तींनी, आपल्या सदसद्विवेक बुद्धीला विचारावा.

सरकारी वेतन घेणारे नोकर, निमसरकारी नोकर आणि कामगार वर्ग यांच्या वाढत्या संप-प्रवृत्तीमुळे किती कामाचे तास, यंत्रसामग्रीवर होणारा खर्च, भांडवला-वरील व्याज व मानवी बुद्धी यांचा अपव्यय होतो याचाही विचार केला की सामा-जिक संपत्तीची सर्व बाजूंनी होणारी उधळपट्टी मनाला विषण्ण करते. आपला देश गरीब; संपन्न राष्ट्रांनी आम्हांल कर्जे द्यावीत, आमच्या योजनांना भांडवल पुरवावे इ.

अपेक्षा आणि मागण्या; आणि एकीकडे मानवी श्रमाची, वेळेची, बुद्धीची व द्रव्याची होणारी ही उधळपट्टी ! ती पाहिल्यानंतर विचारी माणसाला असेच वाटत राहणार की समाजाचा पैसा गटारात जात आहे त्यातून काही निष्पन्न होत नाही. हा समाजाचा पैसा तुमच्या माझ्या, गरीब–मध्यम–श्रीमंत इ. सर्वांच्याच निढळाच्या घामाचा आहे. तो किती मार्गांनी पाण्यात जात आहे याची जाणीव तरी समाजात निर्माण होवो.

[२२–५–१९७९

२७. पोलीस संपाचे भाकीत

गेल्या महिन्यात पोलीससंपाची लाट उत्तरेत निर्माण झाली आणि अवघ्या तीनचार आठवड्यांत ती अनेक राज्यांत पसरली. तिच्या विस्ताराचे गांभीर्य ओळखून अनेक राज्यसरकारांनी पोलिसांच्या मागण्या उदारमनाने व मुक्तहस्ताने मान्य केल्या आणि आजपर्यंत न दिलेल्या अवांतर सवलती दिल्याची किंवा देण्याची घोषण केली. इतक्या तातडीने व अगत्याने आजपर्यंत कोणत्याच क्षेत्रातील शासकीय कामगारांच्या मागण्या मान्य झाल्याचे उदाहरण मला आठवत नाही.

शासकीय सेवेत सुरू झालेल्या संपाचे लोण कोठपर्यंत जाईल त्याचे भाकीत नऊ वर्षांपूर्वीच १९७० डिसेंबरच्या समाचार मासिकात केले होते; दुर्दैवाने ते खरे ठरले आहे. सदाचार चिंतनी, भाग ३ रा मध्ये पान ८३ ते ८५ वर ४५. 'भारताचा तिबेट किंवा चेको होणार काय ?, 'भारताचा तिबेट' या मथळ्याखाली तो लेख प्रसिद्ध झाला आहे. खाजगी उद्योगधंद्यांतील सेवक आणि शासकीय सेवेतील सेवक यांच्या प्रश्नांचा विचार व निकाल कसा व्हावा याविषयी त्या लेखात विचार आहेत. त्याचा शेवटचा परिच्छेद असा आहे––

"शासनाच्या ताब्यातील उद्योगधंदे, व्यवस्थापन व इतर व्यवहार यांची कामे करणारे वरिष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे सर्वच अधिकारी व कामगार यांनी समाजवादातील संपत्यागाचे पथ्य पाळायला पाहिजे. नाही तर हे संपाचे लोण कोठपर्यंत जाईल व त्याचे परिणाम काय होतील त्याचा विचार करा. उद्या पोलीसखात्यात संप होईल. मग नागरिकांचे रक्षण फक्त चोर–दरोडेखोर आणि गुंड करणार ! त्यानंतर संरक्षण खात्यात संप होईल. मग दारुगोळा व शस्त्रनिर्मिती थांबेल. शेवटी सैनिकांचा संप. त्याचा परिणाम ? शेजारच्या आक्रमक राष्ट्रांचा भारतावर हल्ला–

भारताचा तिबेट किंवा चेको होणार! या कल्पना नाहीत, हा वास्तववाद आहे. तुम्हाआम्हाला भिडणारा वास्तववाद आहे. लोकशाही आणि समाजवाद यांच्या मर्यादा काय आणि त्यांची बंधने काय, या गोष्टी आजच स्पष्ट करून घ्या. गुळमुळीत आणि उदासीन राहाल तर पश्चात्तापाची पाळी येईल. राष्ट्रीयीकरण आणि संपाचा हक्क यांची पथ्यापथ्ये सांभाळली पाहिजेत" (९ डिसेंबर १९७०)

सेवकवर्गाची वेतने, सेवा नियम, सुखसोयी इत्यादी सर्वगोष्टी समाधानकारक असायलाच पाहिजेत या मताचा मी आहे. १९५२ ते १९५८ या काळात मी विधान परिषदेचा सभासद होतो. डॉ. जीवराज मेहता त्या वेळी अर्थमंत्री होते. एका वर्षी अंदाजपत्रकावर टीका करताना "पोलिसांची वेतने व सेवानियम यात सुधारणा व्हायला पाहिजेत" असा मुद्दा मी मांडला होता. अशा चर्चेमुळे त्या वर्गात असंतोष निर्माण होईल अशी शंका त्या वेळी अर्थमंत्र्यांना वाटली. सरकार हे आदर्श मालक (एम्प्लॉयर) असावे असा विचार मी वारंवार मांडीत असे. सरकारी सेवकांना संताप करण्याचा प्रसंगच न येईल अशी अंतर्गत यंत्रणा (इनबिल्ट मेकॅनिझम) करणे जरूर आहे. तक्रार व गाऱ्हाणे निर्माण झाल्याबरोबर त्याची दाद लागेल अशी योजना हवी. दर तीन ते पाच वर्षांनी वेतनविषयक बाबींचा व इतर सोयीसवलतींचा फेरविचार करणारी समिती असावी शासन आणि उच्च अधिकारी आपल्या हिताची, गाऱ्हाण्यांची व व्यवसायप्रतिष्ठेची काळजी घेतात असा विश्वास सेवकांमध्ये निर्माण व्हायला हवा, अशा प्रकारची यंत्रणा शासनाने निर्माण केली आणि त्यामुळे सेवकवर्ग समाधानी व सेवातत्पर राहिला तर त्या पद्धतीचे अनुकरण खाजगी उद्योगधंद्याच्या क्षेत्रातही होईल. संपामुळे संपाशी काहीही संबंध नसलेल्या बहुजन समाजाला अनेक गैरसोयी व हालअपेष्टा सोसाव्या लागतात. संप करणाऱ्यांच्या कुटुंबांनाही आळीपाळीने त्याची झळ पोचते. औद्योगिक क्षेत्रातील प्राथमिक संघर्षाच्या काळात निर्माण झालेले हे तंत्र आहे. आजच्या प्रगत विचाराच्या समाजात त्याला पर्यायी अशी यंत्रणा शोधून काढली पाहिजे. पीछेसे आयी आगे चलायी, असे अंध अनुकरण आपण किती दिवस करणार? आपल्या संशोधक बुद्धीचा, विचाराचा व अनुभवाचा उपयोग करून एक नवीन तंत्र भारताने शोधून काढले तर जगातल्या प्रगत आणि अप्रगत सर्वच समाजांना व देशांना त्याचा उपयोग होईल. [१५-६-१९७९

□ □ □

२८. भूक आणि विद्या

सत्तर-बहात्तर वर्षांपूर्वीचा एक दिवस, आषाढ वद्य एकादशी. मी माधुकरी मागून शाळा करीत होतो. एकादशीचा उपास सर्वत्र असल्याने माधुकरीत फार अन्न आले नाही. एक वेळ जेमतेम भागली. रात्रीचा प्रश्न. घरात एक पैसा होता, त्याचा साबुदाणा आणून बिनादूधसाखर खीर खाल्ली. एकदोन तासात पोट रिकामे झाले. सपाटून भूक लागली. शेजारच्या घरी आदल्या दिवशीची शिळी भाकरी व आमटी होती ती त्यांनी दिली. ती पोटात गेली तेव्हा अंतरात्मा शांत झाला. मग झोप आली. असे असते गरिबांचे बालपण ! बालदिन, बालकवर्ष इ. येतात आणि जातात. पण ती कोणाकरता ?

माध्यमिक शाळेच्या तिसऱ्या इयत्तेत होतो. आजच्या भाषेत सातवी किंवा आठवी. सरकारी हायस्कूल, विश्रामबागवाड्यात त्या वेळी होते. मागील तिसऱ्या चौकात आमचा वर्ग. शाळा सुरू होऊन दोन तीन आठवडे झाले असतील. 'नवीन इयत्तेची पुस्तके आणा' म्हणून गुरुजींनी बजावले होते. 'आज पुस्तके कोणाजवळ नाहीत ते उभे रहा ?' आम्ही दोघे भाऊ उभे राहिलो. 'वर्गाच्या बाहेर जा. पुस्तके आणल्या शिवाय वर्गात येऊ नका.' आम्ही रडत रडत आईकडे गेलो. ती एका मोठ्या पूर्व–सरदार कुटुंबात स्वयंपाकाच्या कामाला होती. चाळीस पन्नास माणसांचा स्वयंपाक. चार रुपये पगार. मास्तर पुस्तकाशिवाय वर्गात घेत नाहीत म्हणून सांगितले. ती मालकाकडे गेली आणि आगाऊ किंवा उसने पैसे मागू लागली. नाही मिळाले. आम्हीं हात हालवीत घरी आलो. दुपारी आईने घरातला एक पाण्याचा हंडा गहाण टाकून पैसे काढले. आम्हाला दिले. आमच्या शिक्षणातला खंड टळला. अशी विद्या संपादन करायला लागली.

अन्न ही प्राणिमात्राची गरज आहे. मुंगीपासून घारीपर्यंत, मांजरापासून मानवापर्यंत सर्व प्राणी अन्नाच्या शोधात असतात. सतत अन्नाचाच विचार करीत असतात. मुंग्या, झुरळे, माशा, पाली, इतस्ततः फिरत असतात. कशाकरता ? अन्नाचा शोध सतत चालू असतो. कवीला दिसतात फुलावरून फिरणारी फुलपाखरे आणि वसंतऋतूत गाणारे कोकिळ; पण हे सर्व प्राणी सतत अन्नाच्या शोधात असतात. मानवाच्या जगात तेच दिसते आहे. बेकार पदवीधर नोकरी कशाकरता शोधतात ? खेड्यापाड्यातून ग्रामीण जनतेचे लोंढे शहराकडे का येतात ? अन्नासाठी दाही दिशा । आम्हा फिरविशी जगदीशा । कृपाळू बा हृषीकेशा । इ. व्यंकटेश

स्तोत्रातील हे शब्द मला वारंवार आठवतात. किती अमर सत्य आहे ते! एकदा चर्चगेट स्टेशनवर उतरलो आणि उजव्या बाजूच्या रस्त्याने सभास्थानाकडे जाऊ लागलो. स्टेशनच्या बाहेर दिसलेले दृश्य अजून डोळ्यांपुढे आहे. हॉटेलमध्ये पानात टाकलेले सर्व अन्न गोळा करून आणून ते एकत्र करून पाचसहा माणसे आपल्या भुकेची शांती करीत होते. अशी कितीतरी चित्रे रोज दृष्टीस पडत असतात. गरीब बालकांच्यापुढे अन्न ही फार मोठी समस्या असते. त्यानंतर विद्या.

पूर्वीच्या मानाने आज शिक्षण घेणाऱ्या गरिबांना अनेक सोयी उपलब्ध झाल्या. आहेत. शिक्षणाच्या संस्थाही खूप आहेत. पण हे सर्व बेकारी वाढवणारे शिक्षण. ज्याला पुढे पोटापाण्याची सोय पहायची आहे त्याला तांत्रिक शिक्षणाची गरज असते, अशा शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळण्यापासून सर्व अडचणी. प्रवेश मिळाल्यावर जबर फीची व्यवस्था. मग क्रमिक पुस्तके, स्टेशनरी साहित्य, वाहन, कपडेलत्ते, राहण्याजेवण्याची सोय. अशा अनंत अडचणी विद्या घेऊ इच्छिणाऱ्या निर्धन विद्यार्थ्यांपुढे उभ्या असतात. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या, पण पूर्णपणे नाही.

आज जगात सुविद्य सुसंस्कृत नागरिक म्हणून जगायचे असेल तर विद्या संपादन करायला हवी आणि ती संपादन करण्यापूर्वी भूक भागविण्याची सोय हवी. निर्धन स्थितीतील द्रोण ऋषीच्या अश्वत्थामा या पुत्रापासून आजच्या पिढीतील सर्व गरीब मुलामुलींचे हेच प्रश्न आहेत. अन्न आणि विद्या. या दोन गोष्टी योग्य श्रमात उपलब्ध होतील तेव्हाच समाज सुखी होईल. याकरता पूर्वापार चालत आलेल्या प्रार्थनांचा अर्थ समजून घ्यावा व त्याच्या पूर्ततेकरता संचित अर्थाचा त्याग करावा.

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।।
लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ।।
अन्नाद् भवन्ति भूतानि ।।
विद्या नाम नरस्य भूषणम् ।।

[१-७-१९७९

□ □ □

२९. वाढत्या अनास्थेने अपघात

पुण्याहून मुंबईला निघालेले विमान डोंगरावर आदळून सर्व माणसे प्राणास मुकतात. स्टेशनमध्ये एक पॅसेंजर गाडी उभी असता दुसरी मालगाडी तिच्यावर आदळून मागल्या डब्यांचा व माणसांचा चक्काचूर करते. पॅसेंजर बस नदीत कोसळून सर्व माणसे गुदमरून नाकातोंडात पाणी जाऊन जलसमाधी घेतात. असे अपघातांचे चक्र सतत चालू असते. त्या त्या वेळी आपण वाचून मृतांविषयी हळहळतो. अपघाताला जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर चिडतो, संतापतो आणि लवकरच सर्व विसरून जातो !

या अपघातांच्या मुळाशी जाऊन मानव किती प्रमाणात जबाबदार आहे आणि निसर्ग किती कारणीभूत आहे याचा विचार केला तर बहुसंख्य अपघातांना मानवाचा, जबाबदार व्यक्तीचा दोष कारणीभूत आहे हे लक्षात येईल. काही अपघात अपरिहार्य आहेत काळजी घेऊनही ते होतील हे मान्य; पण अनेक अपघात निष्काळजीपणाने झालेले आहेत असे आढळून येईल. आपल्या सर्वांच्याच ठिकाणी, काम करण्यात निष्काळजीपणा, अनास्था, बेजबाबदारी वाढत आहे; कार्यक्षमता, दक्षता, आपुलकी, कळकळ, परिणामांची दृष्टी, जबाबदारीची जाणीव हे गुण कमी कमी होत चालले आहेत. ही वृत्ती सर्व क्षेत्रात वाढत आहे. ती एरवी फारशी लक्षात येत नाही. अत्यंत गतिमान वाहने चालवणाऱ्याच्या ठिकाणी तीच वृत्ती निर्माण झाली की तिचे पर्यवसान अपघातात होते. निसर्गाच्या नियमांना अपवाद नाही; क्षमा मंजूर नाही.

विमान, बस, रेल्वे, इ. वेगवान वाहने चालवणाऱ्यांमध्ये मद्यपान करणारे किती आहेत ? रात्री जागरण करून दिवसा वाहने चालवणारे किती आहेत ? मद्याचा आणि जागरणाचा माणसाच्या मनावर व एकाग्रतेवर काही परिणाम होतो की नाही ? आपल्यावर अनेक जीवांची जबाबदारी आहे हे जाणून नशेपासून आणि जागरणापासून अलिप्त राहाणारे किती वाहक असतील ! त्यांना नावे ठेवायला नको. वाहकांव्यतिरिक्त इतर सर्व कामांमध्ये ही अनास्था अधिकाधिक प्रमाणात दिसू लागली आहे. जलद वाहनांच्या बाबतीत ती गंभीर स्वरूप धारण करते, म्हणून आपल्या लक्षात येते. इतर क्षेत्रातही तीच वृत्ती आहे. तिचे परिणामही समाजावर होत असतात, पण त्यांची तीव्रता कमी असल्याने आपल्या लक्षात येत नाही.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून कारकुनांच्या कामातील दक्षता व विश्वस-

नीयता किती प्रमाणात वाढली आहे किंवा घटली आहे हे त्या क्षेत्राशी संबंधित व्यक्ती सहज सांगू शकतील. कारकुनांच्या कामात चालढकल वृत्ती निश्चितपणे वाढली आहे. हेच लोक जलदवाहनाचे वाहक झाले की अपघात करतील. दोघांच्या ठिकाणची मूळ वृत्ती एकच आहे. कामे निराळी आहेत त्यामुळे चुकांचे परिणाम सौम्य किंवा तीव्र असे भिन्न भिन्न होतात. सरकारी क्षेत्रातील सर्व कामांत दिरंगाई आणि चालढकल वृत्ती दिसते; तो अनास्था आणि अपघातांच्या मुळाशी असलेली अनास्था एकाच वृत्तीची स्वरूपे आहेत. हॉस्पिटलमध्ये जन्मलेल्या मुलांची अदलाबदल होणे, मूल कुत्र्याने पळवून नेणे इ. चे कारण हीच मनोवृत्ती आहे. दक्षतेचा, कार्यक्षमतेचा अभाव, मानवी जीविताविषयी बेपर्वाई. एस. टी. ची गाडी निघते आणि १०–१२ मैल जाते न जाते तोच ब्रेकडाऊन होऊन वंद पडते. दुसरी गाडी येईपर्यंत पॅसेंजर शिव्याशाप देत वाट पहातात. पण याच पॅसेंजरमध्ये आपापली कामे बेपर्वाईने, दिरंगाईने, अकार्यक्षमतेने करणारी माणसे असतात. सर्वत्र सफाई करणारे कामगार आणि त्यांचे मुकादम यांच्याविषयी काय लिहावे व सांगावे ?

आपला राष्ट्रीय स्वभावच सुधारला पाहिजे. कोणतेही काम कार्यक्षमतेने, दक्षतेने, काटेकोरपणे, आस्थेने, परिणामांची दृष्टी ठेवून जबाबदारीने, समाजसेवावृत्तीने करण्याची मनोवृत्ती वाढवली पाहिजे. ती सवय ज्याची त्याने स्वत:ला लावून घेतली पाहिजे. प्रत्येकाने आत्मनिरीक्षण करून आपण आपले काम दक्षतेने करतो का निष्काळजीपणाने, याचा विचार करावा, आणि देशाचा नागरिक या नात्याने दक्षतेचा व कार्यक्षमतेचा गुण वाढवण्याचा प्रयत्न करावा. असे वातावरण कुटुंबांत शिक्षणसंस्थांत, कार्यालयांत, कारखान्यांत सर्वत्र निर्माण झाले तरच राष्ट्राची पातळी वाढेल. इनइफीशिअन्सीचा, अकार्यक्षमतेचा, दुर्गुण असलेल्या नागरिकांचे राष्ट्र पहिल्या दर्जाच्या राष्ट्राबरोबर टिकाव धरू शकणार नाही. [२६–८–१९७९

३०. पारतंत्र्यातील दुर्गुणांचा पुनर्जन्म

मागल्या पिढीतील राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये डॉ. बाबासाहेब परांजपे नावाचे एक अत्यंत नि:स्पृह व विचारवंत कार्यकर्ते होऊन गेले. त्या वेळी महात्मा गांधींना देखील 'तुमचे इथे चुकते आहे' असे, सुनावण्याइतका प्रामाणिक स्पष्टवक्तेपणा त्यांच्या ठिकाणी होता. आम्ही तरुण त्यांना विचारायचे -- 'बाबासाहेब, भारताला स्वातंत्र्य केव्हा मिळेल ?' त्यावर त्यांचे उत्तर असे, 'ज्या दुर्गुणां-

मुळे पारतंत्र्य आले ते नाहीसे झाले की स्वातंत्र्य मिळेल.' भारताच्या पारतंत्र्याच्या इतिहासाकडे पाहिल्यावर त्यांचे म्हणणे पटते. आज त्यांच्या विधानाला पुरवणी जोडावीशी वाटते. स्वातंत्र्य केव्हा जाते ? असा प्रश्न आपल्या मनाशीच विचारला तर त्याचे उत्तर काय येईल ? ज्या दुर्गुणांमुळे पूर्वी पारतंत्र्य आले त्या दोषांचा पुन्हा प्रभाव पडू लागला की, स्वातंत्र्याला ग्रहण लागणार असे समजावे. प्रत्येक राष्ट्राला व समाजाला काहीएक राष्ट्रीय स्वभाव असतो. तो बुद्धिपुरःसर घडवावा लागतो व घडवता येतो.

आजच्या राजकारणाकडे, आणि राजकीय मंचावर वावरणारी प्रमुख पात्रे व पक्ष यांच्याकडे पाहिल्यानंतर अशी शंका येते, भीती वाटते, की देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या थोर पुढाऱ्यांचे सद्गुण आम्ही विसरत चाललो आहोत आणि पारतंत्र्याला निमंत्रण करणाऱ्या दुर्गुणांचा हळूहळू आश्रय घेऊ लागलो आहोत.

भारतात एका वेळी अनेक राज्ये होती. राजे, सरदार, संस्थानिक इत्यादी त्यांचे प्रमुख होते. त्यांनी आपल्या दुर्गुणांनी पारतंत्र्य सुकर केले. प्रत्येक राजाच्या ठिकाणी अहंकार, स्वार्थ, जात-कुल-धर्म-नातलग यांचे हितरक्षण, ऐक्यभावनेचा अभाव, आणि व्यापक देशहितापेक्षा या आकुंचित निष्ठांना अग्रक्रम देण्याची प्रवृत्ती, यांमुळे स्वतंत्र राज्ये क्रमाक्रमाने पारतंत्र्याखाली गेली, आणि अथांग भारत परतंत्र झाला. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अनेक क्रांतिकारक, यांनी जनतेला स्वार्थत्याग, देशनिष्ठा प्राधान्य, ऐक्यभावना, व्यक्तिपूजेपेक्षा देशप्रेमाला प्राधान्य, कुल-जाति-धर्म-पक्ष इ. निष्ठांचे गौणत्व, या गुणांची शिकवण दिली. तो आमचा राष्ट्रीय स्वभाव बनत चालला म्हणून स्वातंत्र्य मिळाले. पण याच गुणांचा हळुहळू लोप होत चालला आहे; ही गोष्ट भयावह आहे.

प्रत्येक समाजाला काही राष्ट्रीय स्वभाव असतो. त्याचे बुद्धिपुरःसर संगोपन करावे लागते. ते आपण गेल्या तीस वर्षांत केले नाही. त्याचा परिणाम असा झाला की, ग्रामपंचायतीच्या अध्यक्ष-सभासदापासून तो देशाच्या पंतप्रधान-लोकसभा सदस्यांपर्यंत सर्व उच्च-पदस्थ लोकांत काही समान दुर्गुणांचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. त्याची वाढ होण्यापूर्वीच विचारवंतांनी देशाला इशारा दिला पाहिजे. अहंकार, स्वार्थ, सत्तालोभ, आकुंचित पक्षनिष्ठा, अनैतिक द्रव्यसंचय, व्यक्तिपूजा, पक्ष-जाति-धर्म-प्रांत-कुल-प्रधाननिष्ठा, फुटीरपणा, वचनभंग इत्यादी स्वभावदोष देशाच्या ऐक्याला, स्थिरतेला व प्रगतीला मारक आहेत. या गोष्टीची जाणीव बाल, तरुण, प्रौढ, उच्च, मध्य, सामान्य जन अशा सर्व समाजाला, उपलब्ध अशा सर्व जागृतीच्या

साधनांनी करून द्यायला हवी. या देशाला त्याचे स्वतःचे असे जीवनाचे तत्त्वज्ञान आहे याची जाणीव शिक्षणसंस्था, वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी, चित्रवाणी, वाङ्मय इ. सर्व साधनांच्या द्वारे करून दिली पाहिजे. या जागृतीला आजचा काळ अनुकूल आहे. पुरेशी अधोगती झाल्याशिवाय आपल्या दुर्गुणांची जाणीव होत नाही व माणूस आत्मनिरीक्षण करीत नाही. तो काळ आज आला आहे. सामाजिक व राजकीय जीवनाची अधोगती होत आहे असे राजकारणात स्वार्थ नसलेल्या अनेक त्रयस्थ नागरिकांना वाटत आहे.

शिक्षणाची, लोकजागृतीची व विचार-प्रसाराची साधने ज्यांच्या हातात आहेत त्यांनाही याची गरज वाटायला हवी. वाणीचे व लेखणीचे सामर्थ्य ज्यांच्या ठिकाणी आहे त्यांनी याची जाणीव ठेवून कृतीची गरज ओळखावी. १९७९–८० हे वर्ष या वैचारिक दृष्टीने क्रांतीचे व संक्रमणाचे ठरो. प्रत्येकाने आपआपल्या क्षेत्रातील वैचारिक व आचारात्मक वातावरणाचे शुद्धीकरण करण्याचा यथाशक्ती प्रयत्न करावा. मी एकटा काय करणार असे म्हणून स्वस्थ बसू नये. आपल्या स्वतःपासून व कुटुंबापासून प्रारंभ करावा. व्यवसायाच्या ठिकाणी, मित्रमंडळीत, आळीत, गावात, सर्वत्र एक नवीन वातावरण निर्माण करा. त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. सुधारणेला प्रारंभ स्वतःपासून करावा. पुढाऱ्यांतले दोष दिसतात ते माझ्यातही आहेत, ही देखील जाणीव ठेवायला हवी. आपण सर्वच एका वैचारिक व भावनात्मक वातावरणात वाढलो आहोत. आपण आज घरातल्या खुर्चीवर बसून जे करतो तेच उद्या दिल्लीतील खुर्चीत बसून करू. आपल्या सर्वांचा स्वभावच बदलायला हवा. अहंकार, स्वार्थ, फुटीरता, वचनभंग, सत्ता-संपत्ती, अधिकारांचा हव्यास, कुल-जात-धर्म-पक्ष-युनियनपुरती क्षुद्र दृष्टी, हे दोष समाजातूनच नष्ट झाले पाहिजेत. सहिष्णुता, त्यागवृत्ती, ऐक्यभावना, वचनाशी इमान, व्यक्तिपूजेऐवजी तत्त्वनिष्ठा, कठोर नैतिकता, व्यापक समाजहितदृष्टी या गुणांचा विकास करण्याचे वातावरण निर्माण करू या. हेच या वर्षीचे नैतिक सीमोल्लंघन होवो.

(माझ्या गीतावाङ्मयाकडे व गीताप्रचार कार्याकडे या नवीन दृष्टिकोनातून पहा. या ग्रंथाने लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरू यांना भारतीय दृष्टिकोन दिला. त्याची आज गरज आहे.)

[२२–९–१९७९

□

३१. वर्गांच्या आंदोलनात जनता हैराण

वर्ग-संघर्ष अपरिहार्य असोत की परिहार्य असोत. त्या वादात मी शिरत नाही. मला एवढेच दिसते की सध्या जे वर्गलढे 'खेळले' किंवा 'लढविले' जात आहेत ते वर्गावर्गातील नसून, 'वर्ग विरुद्ध तमाम जनता' अशा पवित्र्याने चालवले जात जात आहेत. कसे ते पहा.

कामगारांच्या लढ्याकरता गाव बंद केला, जनतेचे हाल झाले. एस. टी. च्या कामगारांनी लढा सुरू केला, जनतेची कुचंबणा झाली. बँक कामगारांनी संघर्ष सुरू केला, जनतेच्या आर्थिक नाड्या आवळल्या. शिक्षकप्राध्यापकांनी आंदोलन सुरू केले, सर्व विद्यार्थी व पालक हतबुद्ध झाले. राजकीय पक्षाने गावबंदी जारी केली, जनता अडचणीत आली. आता शेतकऱ्यांनी जागृत होऊन आव्हान दिले, सर्वच वाहतूक थांबली. यापुढे शेत-मजुरांचा लढा सुरू होईल; जनतेच्या उपासमारीची भीती उत्पन्न झाली. प्रत्येक लढ्यात, आंदोलनात, संघर्षात दर तीनचार महिन्यांनी एकेक वर्ग उतरतो. त्याचा लढा दोनतीन वर्षांतून एकदाच असतो, पण प्रत्येक मोहिमेत दर दोनतीन महिन्यांनी जनतेचा बळी दिला जातो. निरपराधी लोकांचे मुडदे पडतात. अनेक जण जखमी होतात. कोणाच्या सायकली, कोणाच्या स्कूटर्स, कोणाच्या मोटारी यांची नासधूस होते, अग्निकुंडात त्या भस्मसात होतात. हॉटेल-खानावळी बंद होतात, बेघर लोकांना उपासमार सहन करावी लागते. वाहतूक थांबते. दवाखान्यात, कामाला, प्रवासाला जाणारांची गैरसोय होते. सार्वजनिक मालमत्तेची हानी किती होते तिला पत्ताच नाही. रस्त्यावरचे दिवे, दूध-केंद्रे, सार्वजनिक बसेस, रेल्वेगाड्यांचे डबे, रूळ, एंजिने यांची नासधूस होते. त्यांची दुरुस्ती होईपर्यंत गैरसोय कोणाची ? जनतेची. या सर्व वर्गविग्रहवादी बंधूंनी आपले लढे अवश्य चालवावेत पण ते तत्त्वतः कोणाविरुद्ध आहेत, आणि त्यात प्रत्यक्षतः कोण बळी पडतो इकडे जरा तरी पहावे. लढ्याचे लक्ष्य राहाते बाजूला आणि हाल होतात जनतेचे !

तुमच्या एका मागणीशी संबंध असतो एका व्यक्तीचा–मुख्य मंत्र्याचा. त्याची खात्री पटविण्याकरता लाखो लोकांना ओलीस धरायला पाहिजे का ? लोकशाहीत आता मुख्यमंत्री, खातेमंत्री, उपमंत्री, विधिमंडळ सभासद इत्यादी घटकांचे राज्य आहे. त्यांची अडवणूक होईल व तुमच्या मागण्या मान्य होतील असे काय वाटेल ते करा पण प्रत्येक वेळी जनतेचा बळी का घेता ? ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांच्याशी वाटाघाटी करा, त्यांना पटवून द्या, न जमल्यास त्यांची नाकेबंदी करा. आपल्या

न्याय्य, वाजवी, रास्त मागण्या मान्य होण्याकरता जनतेला सभा इ. घ्यायला प्रवृत्त करा. पण दोन वर्गांच्या लढचात जनता चिरडली जात आहे हे तिला आता असह्य झाले आहे. सर्व वर्गांच्या सुबुद्ध नेत्यांनो आता आपल्या साधनांचा फेरविचार करावा असे नम्रपणे सर्व जनता सुचवीत आहे. तिच्या मूक रुदनाकडे विविध वर्गांचे बुद्धिमान पुढारी कान देतील काय ?

[२१-११-१९८०

३२. आपल्या भक्तीची कसोटी

भक्ती म्हणजे आत्यंतिक प्रेम. विशेषत: परमेश्वराविषयी जे उत्कट प्रेम त्याला भक्ती असे नाव आहे. त्या मार्गाने ईश्वरप्राप्ती होऊ शकते म्हणून त्या मार्गाला भक्ति-मार्ग अशी विशेष संज्ञा आहे.

ईश्वरप्राप्ती याचा अर्थ नीट लक्षात ठेवला तर भक्तिमार्गात लवकर प्रगती होऊ शकेल. ईश्वरप्राप्ती म्हणजे माणसाला कशाची तरी प्राप्ती होते असे नाही त्याला सद्गती मिळते म्हणजे तो कोठेही जात नाही. साक्षात्कार होतो म्हणजे त्याला ईश्वर दिसतो असेही नाही. ईश्वर हा अव्यक्त, अचिंत्य, अनादी, अनंत असा आहे. पण आपल्या सोयीकरिता आपण त्याचे लहान प्रतीक घेऊन तोच ईश्वर आहे असे समजून त्याची उपासना करतो. चिंतन, मनन व ध्यान करण्याकरता दिसू शकणारी, स्पर्श होऊ शकणारी, आकार असलेली वस्तू असली की तिच्यावर मन एकाग्र करता येते. जी वस्तू डोळ्यांना दिसू शकत नाही आणि जिला हात लावता येत नाही अशा वस्तूचे ध्यान करणे कठीण व अशक्य असते. म्हणून एखाद्या मूर्तीत तो विश्व-व्यापी, अदृश्य, अगम्य, अचिंत्य, आकाररहित, वर्णरहित, स्थल-कालाला व्यापून राहाणारा ईश्वर आहे, अशी कल्पना करून व ईश्वराचे हे तात्त्विक स्वरूप ध्यानात ठेवून, मूर्तीची किंवा अन्य प्रतीकाची पूजा व उपासना करावी.

ही उपासना इतकी उत्कट पाहिजे की तिच्यापुढे इतर सर्व सुखे गौण व हीन वाटायला पाहिजेत. माणसाने आपले सर्व जीवन या भक्तिरूपी उपासनेत ओतले पाहिजे. इंद्रिये, देह, मन आणि बुद्धी या सर्वांनी त्या एका ईश्वरी प्रतीकाचे ध्यान, म्हणजे त्याचा ध्यास घेतला पाहिजे. तुकाराम महाराजांनी एका अभंगात स्वत:ला उपदेश केला आहे –

घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठ्ठलाचे ।।
डोळे तुम्ही घ्यारे सुख । पहा विठ्ठलाचे मुख ।।
आईका रे तुम्ही कान । माझ्या विठ्ठताचे गुण ।।
मना तेथे धाव घेई । राहि विठ्ठलाचे पायी

आता या अनन्य भक्तीचा उद्देशही नीट लक्षात ठेवला पाहिजे. आपल्या मनात काम, क्रोध, लोभ, मत्सर, अहंकार, स्वार्थ, हिंसा, भीती असे अनेक विकार असतात. या विकारांना मनात व विचारात जागा व वेळ राहू नये हा भक्तीचा उद्देश आहे. मनात विकार आले की तेथून देव गेला, देव आला की विकार गेले, अशी स्थिती व्हावी व होते. म्हणून नित्य, सतत, रात्रंदिन, अखंडित, मूर्तीच्याद्वारे अव्यक्त अमूर्त व विश्वव्यापी ईश्वराचा ध्यास घ्यावा असा भक्तीचा उद्देश आहे.

मनातले विकार नष्ट झाले तरी एवढ्यानेही भागत नाही. त्या ठिकाणी प्रेम दया, सहानुभूती, क्षमा, आत्मसंयम, अहिंसा, शांतता, सहनशीलता इत्यादी सद्भावनांचा विकासही झाला पाहिजे, आणि आपल्या कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक व राजकीय जीवनात तो व्यवहारात उतरला पाहिजे. आदर्श भक्ताच्या ठिकाणी कोणत्या वृत्ती नसाव्यात व कोणत्या वृत्ती असाव्यात याचे प्रदीर्घ वर्णन गीतेतील बाराव्या अध्यायाच्या शेवटी केले आहे. त्यातील पहिल्या श्लोकातील सात्त्विक गुणांची कसोटी भक्तिमार्गातील प्रत्येकाने स्वतःला लावून पहावी व किती गुण मिळतील ते मोजावेत.

न करी द्वेष कुणाचा, करुणा, मैत्री वहात हृदयात ।
निर्मम निरहंकारी, सुखदुःखी सम सदा, क्षमावंत ।। १२, १३

तुम्ही भक्त म्हणवता का ? मग तुमच्या मनातला द्वेष, अहंकार, स्वार्थ, क्रौर्य, शत्रुत्व, विषाद, सूडबुद्धी या वृत्ती जाऊन त्या जागी प्रेम, दया, मैत्री, त्यागवृत्ती व्यापकदृष्टी, समत्वबुद्धी, क्षमाशीलता या चांगल्या वृत्ती आल्या आहेत का ? असेच आत्म-निरीक्षण करीत शेवटच्या श्लोकापर्यंत जा म्हणजे 'मी कोण आहे' हे कळेल. 'मी कसा असावा' याची प्रतिमा मनात तयार करा. ही तयार करताना ईश्वराचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा. भक्तिमार्गातील ईश्वर सद्गुणांनी युक्त असा आहे. ते गुण आपल्या ठिकाणी यावेत याकरता भक्ती करावयाची. आपले सर्व विकार जाऊन सर्व सद्गुणांचा विकास झाला की ईश्वराशी साम्य व साधर्म्य आले. ईश्वराशी एकरूप होण्याची ही उपान्त्य पायरी आहे. शेवटी विचाराने, भावनेने व कृतीने ईश्वराशी ध्यानाने एकरूप होऊन जाणे ही खरी भक्ती आहे. हाच खरा

साक्षात्कार आहे. हेच खरे ईश्वर-दर्शन आहे. आपल्या मनाने सांगितले पाहिजे की मी ईश्वरासारखा शुद्ध, शांत, स्नेहल व विशाल आहे. हे आपल्या भक्तीचे अंतिम ध्येय ठेवून भक्ती केली तरच ती फलदाई होईल. इतर सर्व गोष्टी, आपल्या या ज्या ध्येयाला पूरक व पोषक असतील त्याही कराव्या.

[१८-१२-८०

३३. संक्रांती आल्या न् गेल्या

पूर्वजांनी सणांच्या रीति-रिवाजांची योजना फार चातुर्याने केली आहे; पण त्यांच्या योजनांमागील नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक हेतू ओळखून तो यशस्वी करण्यात आपण पुरेसे चातुर्य दाखवीत नाही. कुटुंबातील व समाजातील व्यक्तींचे संबंध प्रेमाचे, स्नेहाचे व सलोख्याचे राहावेत, द्वेष-मत्सराची प्रवृत्ती कमी व्हावी, सहकार्यवृत्ती वाढावी, एकमेकांकडे जाणे-येणे वाढावे, ज्येष्ठ व कनिष्ठ व्यक्तींचे संबंध वाढावेत, नातेवाईकांचे प्रेमाचे बंध दृढ व्हावेत, असे अनेक हेतू दृष्टीपुढे ठेवून पाडवा, विजया दशमी, मकर संक्रांत, भाऊबीज, इत्यादी सणांच्या प्रथा समाजात बुद्धिपुरःसर रूढ केलेल्या आहेत. त्यांचा हेतू लक्षात ठेवून आपण वर्षभर वागलो तर आपले व संबंधितांचे जीवनात सुख, आनंद, उत्साह, आशावाद आणि शांती यांचा विकास होईल.

तीळगूळ घ्या अन् गोड बोला; यात किती तरी अर्थ भरलेला आहे. निरनिराळ्या व्यक्तींशी, विविध कारणांवरून, अनेक विषयांवर बोलण्याचे योग येतात. त्या सर्व वेळी बोलण्यातील गोडवा कमी होऊ देऊ नका. एकच आशय अनेक प्रकारांनी व्यक्त करता येतो. त्यात गोडवा कशात आहे आणि कटुता कशात आहे हे ऐकणाराच्या लक्षात सहज येते. गोडी किंवा कटुता कशावर अवलंबून आहेत ?

पहिली गोष्ट अंतःकरणातील भावना. दुसऱ्या व्यक्तीविषयी तुमच्या मनात प्रेम, द्वेष, आदर, अनादर, आपुलकी, दुरावा, ज्येष्ठता, कनिष्ठता, इत्यादींपैकी जी भावना असेल ती शब्दात व आवाजात व्यक्त होईल. म्हणून दुसऱ्या व्यक्तीविषयी शत्रुत्व, द्वेष, मत्सर, मूड, तुच्छता, तिरस्कार अशा भावना ठेवू नका. शक्य तितक्या त्या कमी करा. अंतःकरणात द्वेष ठेवून जिभेवर प्रेमाची भाषा येणार नाही. ते ढोंग उघडे पडते.

शब्दांची योजना आपण कशी करतो त्यावरही गोडी, कटुता किंवा रुक्षता यांचा अनुभव ऐकणाराला येतो. तुम्हाला पाणी हवे आहे, ते किती प्रकारांनी मागता येईल ? मला पाणी दे. मला पाणी देशील का ? मला थोडे पाणी हवे आहे. थोडे पाणी मिळालं तर बरं होईल. अशा अनेक प्रकारांनी एकच मागणी सौम्य भाषेत किंवा तुसट भाषेत करता येईल. आज्ञा, हुकूम, अपेक्षा आणि विनंती हे भाव वाणीत व्यक्त होतात.

आपल्या आवाजातही गोडवा किंवा रुक्षता असू शकते. आवाज काही लिहिता येत नाही. पण श्रोत्याला तो जाणवतो. आवाजातील चढ-उतार किंवा मार्दव-कठोरता यावरून शब्दामागील प्रेम, आपुलकी, सौजन्य आणि संस्कारसंपन्नता इत्यादी अनेक भाव व्यक्त होतात. आवाजातील कठोरता कमी करून त्यात कोमलता आणा.

भाषेतील सरलता आणि वक्रता ही स्वभावाची व भावनांची निदर्शक आहेत. बऱ्याच काळानंतर एखादा माणूस आपल्याकडे आला तर त्याचे स्वागत अनेक प्रकारांनी करता येते. इकडे कुठे वाट चुकली ? आज काय काम काढलं ? या, बऱ्याच दिवसांनी भेटलात, आनंद झाला. परवाच तुमची आठवण झाली होती इत्यादी.

सारांश, अभ्यासपूर्वक आपल्या बोलण्याचे निरीक्षण करा आणि त्यातील कठोरता, तीव्रता, कटुता, उपहास, उपरोध इत्यादी दोष कमी करून इतरांना सुख, समाधान व प्रेम वाटेल असे बोला. अखेर पक्षी या जगात आपण एकमेकांना काय देऊ शकतो ? आनंद , समाधान, आदर, मान, गौरव अशा भावना व्यक्त करायला काही द्रव्य खर्च करावे लागत नाही. मन स्वच्छ व प्रेमळ हवे आणि ते भाषेतून व्यक्त झाले पाहिजे. नाही तर संक्रांती आल्या आणि गेल्या, आपण पूर्वीसारखेच, असे होऊ नये. आपल्या वाणीचे निरीक्षण व सुधारणा करण्याची आठवण देणारा सण म्हणजे संक्रांत. आपले संस्कार वाणीत व्यक्त होऊ द्या.

[१४-१-१९८१

□ □ □

३४. पाठांतराने ज्ञानविकास

प्राचीन भारतीयांनी ज्ञानसंवर्धनाला फार महत्त्व दिले आहे. ज्ञानाशिवाय समाजाची प्रगती होणार नाही ही जाणीव भारतीयांनी सतत जोपासली आहे. अलीकडे शिक्षण आणि पदवीपत्रके म्हणजे ज्ञान अशी कल्पना झाली आहे. ती पूर्वी नव्हती. ज्ञानाकरता ज्ञान, ज्ञानाच्या आनंदाकरता ज्ञान, बुद्धिविकासाकरता ज्ञान, पशूचा माणूस होण्याकरता ज्ञान, ही पूर्वी कल्पना होती. ज्ञान संपादन करणाराला त्या क्रियेत आनंद वाटला तरच ते ज्ञान जीवनात उतरेल.

ज्ञान पक्के होण्याकरता व ते हरएक प्रसंगी उपयोगी पडण्याकरता भारतीय शिक्षणतज्ज्ञांनी अनेक पद्धती निवडल्या. त्यांतील पद्यरचना आणि पाठांतर या दोन पद्धतींचा त्यांना अतिशय उपयोग झाला. शास्त्रीय ग्रंथ पद्य रचनेत तयार झाल्याने महत्त्वाचे ज्ञान मुखोद्गत करण्याची फार सोय झाली. आयुर्वेद, ज्योतिष, स्मृती (कायदे), धर्मशास्त्र इत्यादी अनेक शास्त्रांची रचना वृत्तमय पद्य आहे. त्यामुळे ते ते व्यवसाय करणारांना महत्त्वाचे सिद्धांत मुखोद्गत असत. विद्या त्याच्या जिभेवर खेळते, असे संस्कृत वचन प्रसिद्ध आहे. (अमुष्य विद्या रसनाग्रनर्तकी ।) या म्हणीचा अनुभव ज्योतिषी, वैद्य, इ. व्यावसायिकांशी बोलतांना नेहमी येतो.

पाठांतर बालपणी व विद्यार्थी अवस्थेतच होऊ शकते, प्रौढांना ते जमत नाही असा एक गैरसमज आहे, तो खोटा आहे. तुम्हांला जे महत्त्वाचे वाटते ते कोणत्याही वयात पाठ होऊ शकेल. मी ७८ व्या वर्षी गीतेतील ७०० श्लोकांचा मराठी पद्यात अनुवाद केला आणि ८० व्या वर्षी ते श्लोक पाठ केले. गीतेवर व्याख्याने देताना हे अनेक श्लोक मी धडाधड म्हणून दाखवतो, तेव्हा श्रोत्यांना अचंबा वाटतो. मी या माझ्या पाठांतराचा अनुभव श्रोत्यांना मुद्दाम सांगून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतो व त्यांना पाठांतर करण्याची प्रेरणा देतो.

पाठांतरविषयक स्मरणशक्तीचे काही मानसशास्त्रीय नियम आहेत ते लक्षात ठेवणे जरूर आहे. एका बैठकीत आपण जे पाठांतर करतो त्यापैकी ६०–७० टक्के २–३ दिवसांत विसरले जाते. पुन्हा दुसऱ्या बैठकीत तो भाग पाठ करून ही गळती भरून काढावी लागते. तरी २५–३० टक्के विसरले जाते. पुन्हा तिसऱ्या बैठकीत हा कच्चा भाग पक्का करावा लागतो. तरी काही दिवसांनी पुन्हा गळती होतेच. म्हणून पुनः पुन्हा आवृत्ती केल्याशिवाय शेकडा १०० पाठांतर कायम राहू

शकत नाही. रोज ठराविक वेळ २५–३० मिनिटे पाठांतराला व पुनरावृत्तीला दिला तर किती तरी ज्ञान मुखोद्‌गत होऊ शकेल. मग आपले लक्ष नसले तरी जीभ व तोंड न कळत पाठांतराचे कार्य करतात.

पाठांतर श्रवणीय स्वरात मोठ्याने करावे म्हणजे ते जिभेवर कायम बसते. २५–३० मिनिटे किंवा अधिक काळ असे उच्च स्वरात पाठांतर केल्याने जठराग्नी प्रदीप्त होऊन भूक व अन्नपचन सुधारते हा आणखी एक फायदा ! लेखन, वक्तृत्त्व, संवाद इ. प्रसंगी या पाठांतरामुळे आपली विद्वत्ता इतरांच्या लक्षात येते. विचाराला व चिंतनाला त्याचा फार उपयोग होतो. प्रवासातील तासचे तास मी मुखोद्‌गत गीता-श्लोकांच्या चिंतन-मननात घालवतो व मग त्यातून नवीन नवीन अर्थ ध्यानात येतात. उतार वयात कान व डोळे यांची शक्ती क्षीण होऊन श्रवण-वाचनाने ज्ञान मिळवणे अशक्य होते तेव्हा तर या पाठांतराचा फारच उपयोग होतो. पाठांतर चालू ठेवा. स्मरणशक्ती वाढेल व टिकेल.

हा विचार बाल, युवक, प्रौढ व वृद्ध सर्वांनाच फार उपयोगी आहे. अनुभव घेणारा हवा. [२२–२–१९८२

३५. मोह आणि 'मी' चे युद्ध

चांगली दणदाकट प्रकृती का बिघडली ? खाण्यापिण्याचा मोह. कुटुंब धुळीला का मिळाले ? व्यसनांचा मोह. तोंडाचा कॅन्सर का झाला ? सिगरेटस्‌चा मोह. लिव्हर का बिघडली ? मद्यपानाचा मोह. लाच-भ्रष्टाचार का करतो ? बेकायदा प्राप्तीचा मोह. काळाबाजार, साठेबाजी का चालते ? फाजील फायद्याचा मोह. विद्वान वाया का जातात ? ज्ञानानंदाऐवजी अन्य सुखांचा मोह. राजकारण का बिघडते ? सत्ता - संपत्ती - अधिकाराचा मोह. सर्वत्र मोहाचे साम्राज्य पसरले आहे. बहुसंख्य माणसे त्यात गुलाम-वृत्तीने राहातात. पण काही थोडे मोहाला पायाखाली तुडवून स्वतंत्र होतात.

जगात सुख देणारी साधने सर्वत्र पसरली आहेत. ती आपल्याकरताच अहेत; पण त्यांतील कोणती सुखे घ्यायची आणि कोणती टाळायची याचे ज्ञान आपल्याला पाहिजे. प्राणी आणि वनस्पती यांनाही कळते की आपल्या जीवनाला कोणती सुखे हितावह आहेत आणि कोणती मारक आहेत. जमिनीत सर्व द्रव्ये असतात, पण

आंब्याचे झाड आणि गुलाबाचे रोप स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक अशीच द्रव्ये स्वीकारील, बाकीची नाकारील. वनातले प्राणी आपल्या शरीराला उपकारक तेच अन्न, ठराविक प्रमाणात घेतील, बाकीचे टाकून देतील. पण माणसाचे तसे नाही. त्याला सुखाचा हव्यास फार मोठा असतो. तो टाळणारे खरे सुख अनुभवतात. त्याला बळी पडणारे सुखाऐवजी दुःखाने जर्जर होतात.

मोहाचे विषय अनेक आहेत आणि ते प्रत्येकाच्या भोवताली आहेत. मोहाचा प्रतिकार करावा अशी इच्छा असते. पण ती पूर्ण करण्याकरता लागणारा दृढनिश्चय नसतो आणि आत्मसंयमाकरता मनाचे सामर्थ्य नसते. ज्यांच्याजवळ निश्चय व संयम असतो, ते मोहाचा प्रतिकार करतात, किंवा त्यात सापडले तरी आत्मसामर्थ्याने बाहेर पडून मुक्त होतात. जे कमकुवत असतात ते त्या मोहातच खितपत रहातात. मोह आणि व्यक्ती यांत मोह बलवान ठरतो, व्यक्ती दुर्बल ठरते.

मोहाचा प्रतिकार करण्याकरता माणसाजवळ स्वाभिमान हवा. मी 'मी' आहे, माझे व्यक्तिमत्त्व मी श्रेष्ट मानतो. त्याला कमीपणा आणणारी सुखे व त्यांचे मोह मी झिडकारून टाकीन. मोहाला शरण जाऊन मिळणारे सुख श्रेष्ठ का 'मी' श्रेष्ठ हा प्रश्न आहे. मी आणि मोह यांच्या युद्धात मी मोहाला शरण जाणार नाही, त्याच्याकडून पराभव पत्करणार नाही, त्याला जिंकून माझ्या ताब्यात ठेवीन. मोहाने मिळणारे क्षुद्र सुख कोणीकडे आणि माझे व्यक्तिमत्त्व कोणीकडे. त्या क्षुद्र सुखाकरता माझ्या व्यक्तिमत्त्वाचा बळी मी देणार नाही. हा स्वाभिमान आपण जागृत ठेवला तर मोहाच्या अनेक प्रसंगी तो उपयोगी पडेल. एकेका मोहावर तुम्ही विजय मिळवाल तसतसे तुमचे मनःसामर्थ्य व निश्चयशक्ती वाढती राहील आणि तुमच्यातला 'मी' तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमचे स्वत्व विशाल, उदात्त आणि उन्नत होत राहील. हाच जीवनाचा उद्देश आहे.

१९२२ साली एम. ए. च्या परीक्षेकरता इंग्लिश वाङ्मयाचा अभ्यास करताना बायरन कवीचे मॅन फ्रेड हे काव्य माझ्या वाचनात आले. त्यात सैतानाला (डेव्हिल) उद्देशून मानव म्हणतो –

माय् स्पिरिट् इज् ॲज ब्राइट ॲंड रिफल्जंट ॲज दाईन्, ॲंड शॅल नॉट यील्ड टु दी, दो कूप्ड् इन क्ले.

(माझा आत्मा तुझ्याइतकाच तेजस्वी आणि ज्वलंत आहे. तो हाडामासात बंदिस्त असला तरी तुला शरण येणार नाही.)

ज्या कुटुंबात, ज्या शिक्षण संस्थात, ज्या कार्यालयात, ज्या शासनालयात, ज्या उद्योगधंद्यात, ज्या राजकीय पक्षात मोहावर विजय मिळविणाऱ्या तेजस्वी व्यक्ती आहेत त्यांच्या सामर्थ्यानेच समाजाचे व देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल व तसे राहील. [२०-३-१९८१

३६. मनाविरुद्ध गोष्टी घडणारच

जगातल्या, म्हणजे आपल्या भोवतालच्या चिमुकल्या समाजातल्या, सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणे व्हाव्यात असे प्रत्येकाला वाटत असते. त्या तशा घडल्या नाहीत, लोक आपल्या मनासारखे वागले नाहीत की आपण चिडतो, संतापतो, रागावतो, जळफळतो. आपल्यापेक्षा दुर्बल माणूस असला तर त्याला मारायला उठतो. आपला श्रेष्ठ अधिकारी असला तर मनातले मनात कुढत राहातो, आणि त्याच्यावरचा आपला राग घरातल्या माणसांवर काढतो. सारांश, इच्छेविरुद्ध वागणाऱ्या व्यक्ती निराळ्याच असतात, त्या आनंदात असतात, आणि आपण मात्र निष्कारण मनाला त्रास करून घेतो. नुकसान आपलेच होते. आपण आपल्या मनःशांतीला व सुखाला मुकतो.

व्यक्तीचा हा स्वभाव बालपणापासूनच वाढत जातो. पोर रडते म्हणून किंवा लाडाकरता म्हणून, भोवतालची सगळी माणसे मुलाच्या मनाप्रमाणे वागतात व त्याला वागू देतात. ही मुले पुढे मोठी झाली की जगाकडून तीच अपेक्षा करतात. ती पुरी झाली नाही की नाराज होतात, संतापतात किंवा मनात कष्टी होतात. मनाविरुद्ध झालेले सहन करण्याची सवय बालपणापासूनच लागली पाहिजे.

माणसाच्या स्वभावात, आवडी-नावडीत व विचारात भिन्नता असणे हा निसर्गाचा नियम आहे. ही वस्तुस्थिती आहे. ती प्रत्येकाने ध्यानात घ्यायला हवी. आपण आपल्या मनाप्रमाणे वागू इच्छितो तसेच इतर व्यक्तींनाही त्यांच्या त्यांच्या कलाप्रमाणे वागावेसे वाटते. ज्यांच्या जीवनावर आपले नियंत्रण नाही त्या व्यक्ती त्यांच्या मनाप्रमाणे व कलाप्रमाणे वागणार. ते आपल्याला कधी पसंत पडेल तर कधी पसंत पडणार नही. अशा वेळी आपल्या इच्छेविरुद्ध व मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टीही शांतपणे सहन केल्या पाहिजेत. हा प्रत्येकाच्या स्वभावाचा प्रश्न आहे असा विचार करून मन शांत व संतुष्ट ठेवावे. तोल ढळू देऊ नये. आपल्यालाच त्रास होईल.

तुमच्यावर जे लोक अवलंबून आहेत किंवा तुमच्यापेक्षा कनिष्ठ आहेत ते फार तर तोंडापुरते तुमच्या मनाप्रमाणे वागतील पण आतून नाराज असतील. ज्यांचे जीवन तुमच्यावर अवलंबून नाही ती माणसे त्यांच्या मनाप्रमाणे वागतील. आपले, त्या व्यक्तीचे, किंवा समाजाचे फार नुकसान होत नाही तोपर्यंत माणसे आपापल्या मनाप्रमाणे वागल्यास दुर्लक्ष करावे. हा स्वभावभिन्नतेचा परिणाम अपरिहार्य आहे असे ओळखून सहनशीलता दाखवावी. स्वभावातील भिन्नता आणि त्यामुळे व्यक्त होणारी त्यांच्या विचारातील, भावनेतील व आचरणातील भिन्नता अपरिहार्य आहे ही वस्तुस्थिती ओळखून शांत राहावे.

आपल्या मनाप्रमाणे दुसऱ्याने वागावे असे पतीला, पत्नीला, आई-बापांना, मुलांना, नातलगांना, शेजाऱ्यांना, कनिष्ठ नोकरांना, वरिष्ठ अधिकाऱ्यांना, पुढाऱ्यांना अनुयायांना—सर्वांना वाटत असते. तसे घडले नाही की संघर्ष निर्माण होतात. व्यक्तींच्या स्वभावातील नैसर्गिक भिन्नता लक्षात घेऊन माणसे वागू लागली तर जगातली निम्मी भांडणे कमी होतील.

काही माणसांचा स्वभाव अनिष्ट असतो व त्यांचे वागणेही चुकीचे असते. त्यांना तसे सांगणे व मार्गदर्शन करणे आपल्या हातात आहे. वागायची सक्ती करणे आपल्या हातात नाही. ही सुधारणा ज्याची त्यानेच केली पाहिजे. एक म्हण आहे.–

वन मॅन कॅन टेक दि हॉर्स टु दि वॉटर; बट ए थौजंट कॅनॉट मेक हिम ड्रिंक. (घोड्याला नदीवर न्यायला एक माणूस पुरे; पण तेथे हजार माणसे आली तरी ते घोड्याला पाणी प्यायला लावू शकणार नाहीत.)

आपण काही गोष्टी आपल्या मनाविरुद्ध आपणहून करतो किंवा परिस्थितीमुळे आपल्याला त्या कराव्या लागतात. प्रेम, आदर, कौतुक, कृतज्ञता, कर्तव्यबुद्धी, सक्ती, मर्जी सांभाळणे इत्यादी अनेक कारणांकरता आपल्या मनाला पसंत नसणाऱ्या गोष्टीही आपण करतो किंवा कराव्या लागतात. माता, पिता, गुरुजी, आदरणीय व्यक्ती यांचे प्रेम टिकवण्याकरता व संपादन करण्याकरता नावडत्या गोष्टी आपण स्वेच्छेने करतो. आणि त्यात वावगे काही नाही. वरिष्ठ अधिकारी, सत्ताधारी व्यक्ती, व्यवसायात स्थैर्य, नियमपालन याकरताही न आवडणाऱ्या गोष्टी कराव्या लागतात. त्याविषयी काही खंत बाळगू नये. जगात तडजोड करावी लागते, आणि तशी केल्याने काही आभाळ कोसळून पडत नाही. मात्र अगदी महत्त्वाच्या तत्त्वांच्या मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टी सहन करायची व वेळ-प्रसंगी स्वतः करायची सवय ठेवा म्हणजे जीवन सुखी, समाधानी व शांत राहील.

मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टी सहन करायची सवय वाढवा म्हणजे जीवन सुखी व शांत होईल. [२२-४-१९८१

३७. संगतीचा मुलांवर परिणाम

तुमची मुले-मुली कोणाच्या संगतीत व सहवासात आहेत त्यावर लक्ष ठेवा; उदासीन राहून "आपल्याला काय करायचे" अशी वृत्ती ठेवू नका. त्या मुलांचे प्रौढ मित्र होण्याचा तुम्हीही प्रयत्न करा.

एकदा एक दांपत्य आपल्या नववीतल्या नापास मुलाला घेऊन मजकडे आले. डोळ्यात अश्रू आणून म्हणाले, "मुलाला वाईट संगत लागली, त्यामुळे त्याचे अभ्यासावरून लक्ष उडाले व नापास झाला. शाळा बदलल्याशिवाय त्याची जुनी संगत सुटायची नाही. तुमच्या शाळेत तुमच्या देखरेखीखाली त्याला घ्या." मी त्याला शाळेत घेतला आणि विश्वासातही घेऊन पास होण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली. "तू नापास झालास तर तुझे पालक मला नापास समजतील. मला यश देण्याकरता तू यश मिळव." मुलगा पास झाला, आणि उद्योगाला, स्वतःच्या स्वतंत्र उद्योगाला लागला.

मुलांना शिक्षण जसे कुटुंबात व शाळेत मिळते तसेच त्यांच्या मित्र-मैत्रिणींच्या टोळ्यात किंवा संघातही मिळत असते. त्याला जरा गौण अर्थाने 'गँग्स' अशी संज्ञा आहे. त्या गँगमध्ये एक म्होरक्या (बॉस) असतो. शरीराने व शक्तीने चांगला, अभ्यासात बेताचा, पण नेतृत्वाचे कसब असलेला असा असतो. दुर्बल मनाची मुले त्याच्या प्रभावाखाली जातात. पण ही गँग चांगल्या मुलांची व हुषार सद्गुणी मुलांच्या प्रभावाखालची अशीही असू शकते.

सध्या गुन्हेगारीमध्ये शाळा-कॉलेजात शिकणारी श्रीमंतांची मुलेही सापडत आहेत. बाप पैसे मिळवण्याच्या मागे, आई शॉपिंग आणि क्लबच्या मागे आणि मुले आपल्या गँगच्या मागे ! तिघांची विश्वे निराळी. त्यांचे कुटुंब म्हणजे एक बोर्डिंग लॉजिंग. अशा कुटुंबातील मुले गुन्हेगार निघण्याचा फार संभव असतो.

तुमच्या मुलांना ज्यांची संगत आहे त्यांची नीट माहिती घ्या. ती निर्व्यसनी,

उधळपट्टी न करणारी, अभ्यासू, चांगल्या अभिरुचीची, बौद्धिक कलात्मक क्षेत्रात गोडी वाटणारी, सद्वर्तनी अशी असावीत. त्या मुलां-मुलींशी तुम्हीही संबंध ठेवा-त्यांच्या घरची, अभ्यासाची, संवयींची, आवडी-निवडींची विचारपूस करा. आपल्या विषयी मित्राच्या पालकांनाही आस्था व आपुलकी आहे असे त्यांना वाटावे. या मुलामुलींचे कोणते गुण व संस्कार घ्यावेत व कोणते घेऊ नयेत त्याविषयी स्वतःच्या मुलांना सौम्य शब्दात मार्गदर्शन करा. धाकदपटशाचा प्रयोग करू नका. उलटीच प्रतिक्रिया होईल.

आता थोडे आत्मपरीक्षण करा. मुलांना आपल्या घरी तुम्ही काय संस्का. देता? नियमित व्यायाम, काही सद्विचारांचे वाचन, एखाद्या कलेचे शिक्षण, चांगले पाठांतर, सात्त्विक आहार, बुद्धी व कौशल्य वाढवणारे बैठे खेळ, अशा काही गोष्टींत सुट्टीच्या दिवशी तरी मुलांना मार्गदर्शन करा. आपल्या सर्व कार्यक्रमांत आईबापांना गोडी आहे असे मुलांना वाटावे. याला तसा फारसा वेळ लागत नाही; पण या धोरणाची, प्रवृत्तीची व दृष्टीची सतत जाणीव पालकांना हवी.

अगदी अशिक्षित गरीब पालकांची मुलेही पालकांच्या दक्षतेमुळे कर्तबगार व सद्गुणी निघतात. उलट सुशिक्षित श्रीमंत पालकांची मुलेही दुर्लक्षामुळे उडाणटप्पू व गुन्हेगार निघू शकतात. पालकांची गरिबी-श्रीमंती किंवा निरक्षरता सुशिक्षितता यांचा हा प्रश्न नसून त्यांच्या दृष्टीचा, धोरणाचा, जागरूकतेचा व जाणिवेचा प्रश्न आहे.

मुलांच्या संगतीकडे आपुलकीने, प्रेमाने पण चौकसपणाने पहा व लक्ष ठेवा.

[१८-५-१९८१

३८. अनावर सुखलालसा व गुन्हेगारी

समाजातील व्यक्तींची दानत व चारित्र्य सुधारण्याचे दृष्टीने अनेक सज्जन, कार्यकर्ते, समाजसेवक, विचारवंत व संस्था कार्य करीत आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन, लाच प्रतिबंधक मोहीम, दारुबंदी, हुंडाबंदी, इत्यादी अनेक मार्गांनी समाजाची सुधारणा करण्याचे प्रयत्न लेख, व्याख्याने, संघटना इ. मार्गांनी चालू आहेत. ते सर्व आवश्यक, इष्ट आणि अभिनंदनीय आहेत. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवणे जरूर आहे की वरील माजदोष, हे काही मनोवृत्तींची बाह्य लक्षणे आहेत. मूळच्या

विकृतीत दोष मानवी स्वभावाच्या विकृतीत आहे. तेथेही सुधारणा व आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रयत्न इतर कामांचे अनुषंगाने झाला पाहिजे.

सुखाची इच्छा ही सर्व प्राण्यांमध्ये आहे. तशी माणसांमध्येही आहे. काही प्रमाणात ती असायलाच हवी, त्यामुळे माणूस प्रयत्नशील राहातो व समाजराहाटी चालू रहाते. पण या इच्छांची विकृती होऊन त्या जेव्हा अनावर व उच्छृंखल होतात, तेव्हा त्या व्यक्तीच्या जीवनात पापप्रवृत्ती निर्माण होते. अनावर वासना तृप्त करण्याकरता भरपूर द्रव्य पाहिजे. प्रामाणिक कष्ट करून व थोड्या वेळात फारशी संपत्ती मिळत नाही. मग वाममार्गांनी, नीति अनीतीची फिकीर न करता, समाजहितावर निखारे ठेवून, कायदेकानू-निर्बंध-संकेत सर्व धाब्यावर बसवून, लोकांना फसवून, संपत्ती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. हुंड्याची अवास्तव मागणी, माहेरचे द्रव्य आणण्याकरता पत्नीचा छळ, त्याकरता तिला सासुरवास, मारहाण, जाळणे, खून करणे या थरापर्यंत स्त्रीपुरुष जातात. ही उदाहरणे वाढत्या प्रमाणात चाललेली आपल्या वाचनात येत आहेत. दिवसाढवळ्या लोकांच्या घरात शिरून तिजोऱ्या फोडणे व वस्तू लांबवणे, भररस्त्यात भगिनींच्या गळ्यातील मंगळसूत्रे तोडणे स्त्रियांच्याच काय पुरुषांच्याही डब्यात शिरून चाकू सुरा-पिस्तुलाचा धाक दाखवून दागिने व पैसे लुबाडणे, लोकांच्या स्कूटर्स-मोटारी पळवणे, निरपराध लोकांचे खून करून त्यांची घरे लुटणे, दिवसाढवळ्या बंदुकीचा धाक दाखवून बँका लुटणे, बालकांच्या अंगावरील दागिन्याकरता त्यांना पळवून ओलीस धरणे व जिवे मारणे, ही सर्व नीच कृत्ये करण्यात शिकलेले तरुणही तरबेज व निर्धास्त होऊ लागले आहेत. हा सर्व कशाचा परिणाम आहे ? समाजातील वैचारिक वातावरणाचा. लोकशिक्षणाच्या सर्व साधनांचा दुरुपयोग आज होत आहे. उत्तान वाङ्मय-गल्लाभरू चित्रपट व नाटके, मोहक कामुक जाहिराती, ही सर्वसामान्य जनतेची सुख, लालसा, कामुकता, विलासी प्रवृत्ती, व्यभिचार, गुन्हेगारी, व्यसनाधीनता इत्यादी प्रवृत्तींना खतपाणी घालून त्यांचा परिपोष करीत आहेत. त्याला छेद देणारे वाङ्मय व विचारधन समाजात त्या प्रमाणात निर्माण होत नाही. वाङ्मयात नीतिबोध, सदाचार शिकवण या गोष्टी नकोत अशी साहित्यिकांची मनोवृत्ती व धोरण आहे. नीती आणि सदाचार नकोत, त्याचबरोबर अनीती दुराचारही पोसले जाऊ नयेत असे ठामपणाने व ओरडून सांगणारे साहित्य आज नाही. त्यामुळे तरुण पिढीच्या मनावर सर्व अनिष्ट विचारांचा व विकारांचा मारा केला जात आहे.

आपल्या सुखवस्तू व श्रीमंती कुटुंबातली राहणी ही वरील प्रवृत्तींना न कळत अनुकूल होत चालली आहे याची संपन्न स्थितीतील पालकांना कल्पना आलेली नाही. ज्यांना आज जरूरीपेक्षा अधिक मुबक पैसा मिळत आहे, कश्रीमंती राहणी, कपडे

लत्ते, हॉटेल, सिनेमा, नाटके, धूम्रपान, मद्यपान, क्लब, पार्टया, यांवर खर्च होत आहे. आपल्या प्राप्तीत समाजातील अभागी लोकांचाही वाटा आहे व त्यांच्याकरता काही दानधर्मरूपाने त्याग केला पाहिजे ही सुशिक्षित श्रीमंतांना जाणीव नाही. त्यांच्या मुला-मुलींना याच ऐषारामाच्या व खर्चिक सवयी अंगवळणी पडतात. ही मुले मोठी झाल्यावर व्यवसायाच्या पूर्वकाळात त्यांना स्वतःच्या चैनी भागवण्याइतकी प्राप्ती होऊ शकत नाही. मग त्या भागवण्याकरता हुंडामागणी, माहेरच्या द्रव्याकरता बायकांना छळणे, व्यभिचार, गुन्हेगारी इत्यादी प्रवृत्ती आज सुखवस्तू व श्रीमंत कुटुंबातील तरुण पिढीत वाढीस लागल्या आहेत. या गोष्टींचा सर्वच पालकांनी गंभीर विचार केला पाहिजे. साधी राहणी, कष्टवृत्ती, काटकसर आणि काटकपणा या गोष्टींचा उपहास न करता त्या वाढीस लावल्या पाहिजेत. कुटुंबात, आळीतील वातावरणात चांगल्या विचारांचे वातावरण कसे निर्माण होईल तो प्रयत्न केला पाहिजे.

समाजात अनिष्ट अनैतिक कामुक विचार, प्रवृत्ती व आचार आज इतक्या प्रमाणात वाढले आहेत की सुधारणेच्या कामाला कोणी कोठून प्रारंभ करावा हेच कोणाला सुचत नाही. अशा स्थितीत सदसद्विवेक बुद्धी जागृत झालेल्या व जिवंत असणाऱ्या पालकांनी, शिक्षकांनी, अध्यापकांनी, लेखकांनी, वक्त्यांनी, व्यावसायिकांनी व प्रत्येकाने आपल्याला जे जे शक्य ते ते उपाय अनेक मार्गांनी केले पाहिजेत. समाज मानसातच परिवर्तन सुरू झाले पाहिजे.

[१५-६-१९८१

३९. नियती व निवड

आपले जीवनातील व्यवहार आपण कशाकरता करतो, याचा कोणी फारसा विचार करीत नाही. पण न कळत, अभावितपणे, प्रत्येकाची धडपड सुख मिळवण्याकरता व दुःख टाळण्याकरता चाललेली असते. थोडे आत्मनिरीक्षण, आणि काही बाह्य निरीक्षण, केले तर हे सत्य लक्षात येईल. सुखामुळे आनंद, समाधान व शांती मिळते. दुःखामुळे निराशा, असमाधान व अस्वस्थता निर्माण होतात. या सुखाची अनेक साधने आहेत. त्यांतील काही स्वाधीन म्हणजे आपल्या हाती आहेत; तर काही पराधीन, म्हणजे आटोक्याबाहेरील, आपोआप दैवाने किंवा नियतीने प्राप्त होणारी अशी असतात. या साधनांचा थोडा अधिक विचार व वर्गवारी करू या.

काही गोष्टी पूर्णतः नियतीवर अवलंबून असतात. त्या पराधीन वर्गात येतात. आपले जन्मस्थान, कुल, माता, पिता, बंधू-भगिनी, पुत्र-कन्या अशा काही बाबी दैवाधीन असतात. त्यांत आपण निवड किंवा बदल करू शकत नाही. त्या आहेत तशा स्वीकारणे यात शहाणपणा आहे, समाधान आहे. त्या त्या परिस्थितीशी आपण सुज्ञपणाने जमवून घेतले पाहिजे. जीवनात तडजोड लागते ती अशा गोष्टीत.

आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या (पर्सनॅलिटी) दृष्टीने विचार केला, तर असे लक्षात येईल की, ते काही अंशी दैवावर व काही अंशी आपल्या प्रयत्नावर अवलंबून आहे. ंग, रूप, ठेवण, सौंदर्य, बुद्धी, कर्तृत्व, स्वभाव या गोष्टी आपण जन्मतःच बरोबर घेऊन येतो. त्यांतील काही बाबतीत आपण बदल करू शकत नाही, पण त्यांतील कमीपणाची भरपाई आपल्या प्रयत्नांनी करू शकतो. रंग-रूप-ठेवण आपल्या हातात नसली, तरी मिळालेल्या भांडवलाला आपल्या इतर गुणांची जोड देऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाला उठाव देऊ शकतो. बुद्धी, कर्तृत्व व स्वभाव, ही आपण जन्मतः बरोबर आणतो; पण स्व-प्रयत्नाने त्यांचा यथाशक्य विकास करणे आपल्या स्वाधीन आहे. तसे केल्यास रंग-रूप इत्यादी गोष्टी गौण ठरून, तो कमीपणा इतर उठावदार गुणांपुढे अगदी गौण ठरतो, हे लक्षात ठेवावे.

नातेवाईकांपैकी पतीची किंवा पत्नीची निवड आपण करू शकतो. पण त्या निवडीलाही फार बंधने पडतात. जातगोत, आर्थिक स्थिती, शिक्षण, रूप-रंग-ठेवण, अशा पराधीन गोष्टींवर आपली निवड अवलंबून राहते. आणि वरवर पाहून परिचयानंतर, जरी निवड केली, तरी निवडलेली व्यक्ती, आपल्या अपेक्षा सर्वस्वी पुऱ्या करू शकत नाही. म्हणजे येथेही आपल्या निवडीवर नियतीचे बंधन येतेच. येथे तडजोड करणे आवश्यक असते. ती न केल्यास असमाधान वाटचाला येते.

जीवनातील भावी यशाला शिक्षणाचा उपयोग होतो, ही गोष्ट अंशतः सत्य आहे. पण शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची निवड व कालमर्यादा याही गोष्टी सर्वस्वी स्वाधीन नसतात. बुद्धी, आर्थिक स्थिती, शिक्षणाच्या सोयी, इत्यादी गोष्टीही पराधीन राहतात. उपलब्ध साधनांत व परिस्थितीत, अधिकाधिक शिकणे आपल्या हातात आहे. तसेच विद्यार्थिदशेत पुरेसे शिक्षण घेता आले नाही, तरी व्यवसाय करता करता उच्च पातळी व पात्रता संपादन करता येते. अनेक व्यक्तींच्या चरित्रांवरून आपल्याला हे कळू शकेल. नियतीचा कमीपणा प्रयत्नाने अंशतः भरून काढता येतो. निसर्गाने दिलेली बुद्धी काही प्रमाणात वाढवता येते, कर्तृत्वाला उठाव देता येतो, आणि स्वभाव सुधारता येतो. आपल्या स्वाधीन असलेल्या गोष्टींची कास धरून नियतीवर मात करता येते.

व्यवसायाची निवड करायचे स्वातंत्र्य आपल्याला आहे, पण तेही अंशतः नियतीवर व परिस्थितीवर काही प्रमाणात अवलंबून आहे. व्यवसायाचे स्वरूप, उपलब्ध भांडवल, वशिला, व्यवसायाची जागा, यशापयश, आर्थिक प्राप्ती, मान, सन्मान, मोठेपणा, कीर्ती, सत्ता, सामाजिक दर्जा इत्यादी घटक सर्वांनाच अनुकूल असतात असे नाही. जी जी संधी उपलब्ध आहे, तिचा अधिकाधिक उपयोग आपण करून घेतो की नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तो करून घेतल्यानंतर मिळणाऱ्या फळावर समाधान मानणे, हे सूज्ञपणाचे लक्षण आहे. त्यामुळे उपलब्ध परिस्थितीत शांती, सुख व समाधान लाभेल. प्रथम यथाशक्ती प्रयत्न आणि नंतर समाधानी वृत्ती हा क्रम लक्षात ठेवा.

सर्वस्वी आपल्या इच्छेप्रमाणे निवड करून, चोखंदळपणे पारखून व विचार करून आपण वस्तू व वास्तू विकत घेतो. पण त्या तरी आपल्या अपेक्षेप्रमाणे तंतोतंत निघतात का ? कधी निघतात, कधी नाही. येथे निवडीला प्राधान्य व स्वातंत्र्य असले तरी नियतीचाही अंश आहे ही अपेक्षा ठेवूनच चालावे.

या सर्व चर्चेचे सार काय आहे ? जीवनात निवड आणि नियती, प्रयत्न आणि दैव, स्वाधीन घटक आणि पराधीन घटक, प्रयत्न व परिस्थिती, यांचे मिश्रण आहे. ते प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये निरनिराळ्या प्रमाणात असते. ते प्रमाण आपल्या हातात नाही. प्रयत्न, निवड, संधीचा कमाल मर्यादेपर्यंत उपयोग करणे, आपल्या हातात आहे. तो केल्यानंतर मिळणाऱ्या जीवनात समाधानी राहावे, हा वास्तववाद आहे. अनेक गोष्टींतील नियतीचा दोष आपण प्रयत्नाने भरून काढण्याचा प्रयत्न करू अशी जिद्द आपण ठेवावी.

नियती, दैव, नशीब, योगायोग, ईश्वरेच्छा, या सर्वांचा आशय एकच आहे; आपल्या स्वाधीन नसलेल्या पण घडणाऱ्या घटना या कधी अनुकूल असतात तर कधी प्रतिकूल असतात. पण आपला स्वभाव कसा आहे पहा ! अनुकूल गोष्टी घडल्या की त्याचे श्रेय आपण घेतो. प्रतिकूल अनुभव आले की नियती, दैव, नशीब, इत्यादींना दोष देतो. पण इतरांना अनुकूल घटना झाली की, त्याचे सुदैव, नशीब असे म्हणतो. त्याच्या कर्तृत्वाला श्रेय देत नाही ! योगायोग वाईट असतात तसे चांगलेही असतात. आरोग्य, धडधाकट शरीर, चांगले कुळ, पती, पत्नी, मित्र, चांगले पुस्तक, चांगला विचार, चांगला गुरू, योग्य उपदेश इ. अनेक गोष्टी, निदान त्यांतील काही अनुकूल असतात, तेही दैवच आहे. सारांश, सर्व घटनांकडे समतोल मनाने पहावे. दैवाला किंवा देवाला दोष देण्यापूर्वी श्रेयही देणे जरूर आहे हे लक्षात असावे. देव किंवा दैव काही तुमचा शत्रू नाही ही श्रद्धा ठेवा.

[१७-७-१९८१

४०. व्यवसायात गीता–दृष्टी

आपला रोजचा व्यवसाय, उद्योगधंदा, नोकरी, सेवा, ऑफिसची कामे, ही सर्व कर्मेच आहेत. कर्मयोग म्हणून ती करता येतील. रोजचा व्यवहार करताना गीतेने दिलेली दृष्टी ठेवता येईल. ती ठेवावी हाच गीता-वाचनाचा हेतू.

बहुसंख्य माणसे आपल्या कामाकडे केवळ स्वार्थाच्या दृष्टिकोनातून पाहतात. त्यात काही फारशी चूक नाही. पण ही दृष्टी अपुरी आहे. तिच्यात थोडी सुधारणा करता येईल का पहा. माझा धंदा, नोकरी, व्यवसाय हा जसा मी स्वार्थाकरता करतो, तसाच तो माझ्या उन्नतीकरता, चित्तशुद्धीकरता, आत्मविकासाकरताही करतो, ही गीतेने दिलेली दृष्टी लक्षात ठेवून आपापले उद्योगधंदे केले, तर मनाला किती आनंद समाधान, शांती मिळेल त्याचा अनुभव घेऊन पहा !

काया–बुद्धी–मनाची कर्मे, वा निवळ इंद्रियांचेही ।
करितो मन शुद्धीस्तव, धरितो योगी न वासना काही ।।५. ११

व्यवसाय करता करता अनेक बरे वाईट प्रसंग येतात, अनेक मोह येतात अनेक प्रकारच्या घटना घडतात, विविध मनोवृतींच्या व्यक्तींशी संबंध येतो. यशा-पयशाचे, आशा-निराशेचे, मानापमाचे, लोभाचे असे प्रसंग येतात. या सर्व प्रसंगांच्या व घटनांच्या कारणांनी आपल्या मनातही नाना प्रकारचे विकार उत्पन्न होतात. स्वार्थ, लोभ, मोह, तापटपणा मत्सर, लबाडी, दुःख, निराशा, तिरसट वृत्ती, आळस, चुकारपणा, उद्धटपणा, शत्रुत्व, अप्रिय भाषण, असे अनेक विकार किंवा अनिष्ट वृत्ती मनात निर्माण होतात; व त्यांचा आपल्या व्यवसायाच्या बरेवाईट-पणावर व मनःशांतीवर परिणाम होतो. याच्या उलट असलेल्या इष्ट अशा भावनांचे व मनोवृत्तींचे आचरण करण्याला, मनाला तशी सवय लावायला, हेच प्रसंग उपयोगी पडतात. माझा व्यवसाय करता करता मला माझा स्वभावही बनवावयाचा आहे, सुधारावयाचा आहे, योग वृत्ती साध्य करावयाची आहे, अशी दृष्टी ठेवली, तर हेच अनेक प्रसंग आपल्याला चित्तशुद्धीकरता, आत्मविकासाकरता उपयोगी पडू शकतील.

योगाच्या शिखरावरी चढण्या साधनचि होत सत्कर्म ।
योगचि दे मग शांती, शांतीने प्राप्त होतसे ब्रह्म ।। ६.३

मागील एका ठिकाणी दिलेल्या वचनाप्रमाणे–दि मॉरल सेन्स ग्रोज बट बाय एक्झरसाईज. माणसाची नैतिक वृत्ती ही अभ्यासाने, पुनरावृत्तीने घडत जाते. माणूस हळूहळू पूर्णतेकडे जात राहतो. आपल्या कर्माकडे, व्यवसायाकडे पाहण्याचा हा किती उदात्त आणि व्यापक दृष्टिकोन आहे! जीवनातली भारतीय दृष्टी हीच आहे. जीवनात, व्यवसायात, रोजच्या कामात, जी अध्यात्मदृष्टी ठेवावी ती हीच आहे. याकरता गीता सांगते की कर्मसंन्यासापेक्षा कर्म श्रेष्ठ आहे. योगाच्या दृष्टीने, कर्मयोगाच्या वृत्तीने, कर्म केले तरच आपली आध्यात्मिक प्रगती होत राहील. गीता व तत्त्वज्ञान या विषयांवरील केवळ ग्रंथ वाचून किंवा भाषणे ऐकून आत्मोन्नती होणार नाही. आपले रोजचे जीवन-व्यवहार करताना योगवृत्तीची दृष्टी अंगवळणी पडली पाहिजे. ही आत्मविकासाची दृष्टी आपल्या वैयक्तिक उन्नतीच्या दृष्टीचे झाली, हिलाच दुसरी सामाजिक आणि सार्वजनिक बाजूही आहे. कशी ते पहा.

धरुनी लोभ फलाचा कर्म करी या जगी जशी अज्ञ ।
लोकसंग्रहार्थचि ते निर्लोभे कर्म आचरी सुज्ञ ॥ ३.२५

आपला व्यवसाय ही एक सामाजिक गरज आहे. हे भागवणे हे पहिले आपले कर्तव्य आहे. लोकांच्या उपयोगी पडण्याकरता आपला व्यवसाय आहे. त्या लोकसेवेला अग्रहक्क दिला पाहिजे. माझा स्वार्थ, माझी प्राप्ती, माझा फायदा, ही दृष्टी गौण मानायला हवी. सरकारी नोकरी, व्यापारी, कारखानदार, कामगार, अध्यापक, वाहने चालविणारे लोक, अशा सर्व व्यवसाय करणाऱ्या लोकांनीही सामाजिक दृष्टी, लोकसंग्रहाची दृष्टी सतत ठेवली पाहिजे. केवळ स्वार्थापेक्षा, ही सामाजिक दृष्टी ठेवून काम करून, मनाला किती समाधान मिळते, त्याचा अनुभव घेऊन पहा.

सध्या गावोगावी निघत असलेल्या रोटरी, लायन्स इत्यादी क्लबांची शिकवण आहे.–सर्व्हिस अबव्ह सेल्फ. स्वार्थापेक्षा सेवावृत्तीला प्राधान्य द्या ही गीतेचीच शिकवण आहे. ती आता अमेरिकेमार्फत आली म्हणून काही नवीन नाही. रोटरी क्लबची ब्रीदवचनें देणाराचे नाव आहे हॅरिस. गीतेचा उपदेश देणारा आहे हरी. हॅरिस आणि हरी, दोघांची शिकवण एकच आहे. आपला व्यवसाय आत्मविकासाचे व समाजसेवेचे दृष्टीने करा. ऑल ग्रेट माइंडस थिंक अलाइक. थोर माणसांचे विचार समान असतात. तेच आपलेही असावेत, असू शकतील. [२२–८–१९८१

४१. एक चूक माफ, दुसरी पाप

चुका होणे स्वाभाविक आहे. चुका करीत राहणे पाप आहे.

चूक सर्वांच्या हातून होत असते, त्याला कोणीही अपवाद नाही. सर्व इतिहास जसा पराक्रमांनी भरला आहे, तसाच चुकांनीही भरला आहे. संसारात, व्यवसायात, सामाजिक जीवनात, राजकारणात, जागतिक राजनीतीत, शास्त्रीय संशोधनात सर्वत्र चुका होत आलेल्या आहेत, होत आहेत, होतीलही. आपल्या चुका उमजून घेतल्या पाहिजेत व सुधारल्या पाहिजेत. इतरांच्या चुकांपासून बोध घेऊन आपण, सावधगिरी बाळगली पाहिजे.

साठ वर्षांपूर्वीची एक घटना. मी नुकताच सार्वजनिक जीवनात प्रवेश केला होता. 'खुर्चीवर' बसलो होतो. बाकावरून खुर्चीवर बसल्यावर खुर्ची माझ्या मस्तकात भिनली. आश्रमात प्रवेश देण्याकरता नुकत्याच परीक्षा झाल्या होत्या. त्यातील एका नापास मुलाच्या बाजूने रदबदली करण्याकरता एक वयस्क प्रौढ गृहस्थ आले. गु. दादासाहेब केतकर व मी कार्यालयात होतो. त्या गृहस्थांनी विचारले 'या मुलाला का नाही घेतले? इ. इ.' मी जरा गुर्मीत व उद्धटपणानेच उत्तर दिले. खुर्चीवर होतो ना! ते गृहस्थ गेल्यावर दादा म्हणाले, "त्या गृहस्थांना तू ओळखले नाहीस. संस्थेला गोत्यात आणणे त्यांच्या हातात आहे! ते अधिकारी आहेत." त्या वेळेपासून मी बोध घेतला. संकल्प केला. तो निश्चयाने पाळला. देणगीदार असो की मागणीदार असो, कोणाशीही उद्धटपणे बोलायचे, वागायचे नाही. सर्वांशी नम्रपणे, सभ्यपणे वागायचे हा नियम मी साठ वर्षे पाळीत आलो आहे. त्याचा मला जीवनात फार उपयोग झाला. मी अनेक मित्र केले. शत्रू केले नाहीत. शत्रूनांही मित्र केले!

या घटनेतील चुकीचा हा एक प्रकार झाला. असे अनेक प्रकार आहेत. बोलू नये ते बोलणे, करू नये ते करणे, वागू नये तसे वागणे इ. चुकांचे प्रकार आहेत. वर्तन आणि कृती या क्रिया काल-स्थल-प्रसंग-व्यक्ती इ. पाहून विचारपूर्वक झाल्या पाहिजेत. उतावीळपणामुळे अनेक चुका होतात. थोडे धीमेपणाने, विचारपूर्वक, भाषण, वर्तन व कृती करण्याची सवय ठेवल्यास चुका कमी होतील. अविचार, अपुरी माहिती, राग-द्वेष-मत्सर-अहंकार इ. विकारांचा प्रभाव--यांमुळे चुका होतात.

समाधानाची गोष्ट अशी की आपण सर्व जण चुका करतो. त्यामुळे ही जाणीव

ठेवून, इतरांच्या चुकांबद्दल सहिष्णू, सहनशील, क्षमाशील वृत्ती ठेवावी. 'चुकला असेल बिचारा, जाऊ दे की. काय एवढे मनाला लावून घ्यायचे ?' अशी वृत्ती ठेवावी. मग तो माणूस लहान असो वा मोठा असो. लहान व मोठी, शहाणी व अडाणी, सुशिक्षित व निरक्षर, ज्ञानी व अज्ञानी, प्रौढ व बाल, मालक व नोकर, अधिकारी व सहायक, आईबाप व मुले मुली, पती व पत्नी, चालक व नोकर, तज्ज्ञ व अतज्ज्ञ अशा दोन्हीही पातळींवरील माणसे कधी ना कधी तरी चुका करतातच. आपण खबरदारी घ्यावी, इतरांच्या चुकांविषयी सहनशीलता बाळगावी.

चुकांनंतर आपण पश्चात्ताप करतो की चुकीचे समर्थन करतो हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हट्टी, आडमुठी, अहंकारी, गर्विष्ठ माणसे आपल्या चुकीचे बाहेर समर्थन करतात आणि स्वतःच्या सद्विवेक बुद्धीलाही फसवतात. पण त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या जीवनावर होतो. इतर लोक त्यांचा तिटकारा करतात, त्यांची किंमत करतात. उलट पश्चात्ताप करणारा माणूस विनयशील, विवेकी, प्रांजळ, मोकळ्या मनाचा असतो. चुका करणारा असला तरी सर्वांना तो आवडतो. त्याच्याही मनाला शांती व सुख मिळते.

चुकांनंतर पश्चात्ताप व्हायला हवा. पश्चात्तापानंतर आत्मनिरीक्षण करून चूक पुन्हा न करण्याचा संकल्प व प्रतिज्ञा हवी. तो संकल्प व ती प्रतिज्ञा वर्तनात आणण्याचा दृढनिश्चयपूर्वक प्रयत्न हवा. या सर्व अवस्था नीट लक्षात ठेवा. हेच मानसशास्त्र आहे.

चूक, पश्चात्ताप, संकल्प, दृढनिश्चय, सुधारणा, ही सुधारणेची साखळी आहे. सोन्याची !

[२१-९-१९८१

---

४२. उच्च विज्ञान शिक्षणात संस्कृत

पहिली शंभर वर्षे

संस्कृत भाषेचे व त्या भाषेतील विषयांचे शिक्षण प्राचीन काळापासून, भारतात ब्रिटिश अंमल येईपर्यंत चालू होते. आधुनिक शिक्षणाची नवी पद्धती कायम करण्यापूर्वी प्राचीन परंपरेचे संस्कृत शिक्षण की आधुनिक स्वरूपाचे इंग्रजी भाषेचे शिक्षण, असा

वाद निर्माण झाला. त्यात संस्कृतच्या बाजूने काही हिंदी व ब्रिटिश विचारवंत होते, त्याचप्रमाणे इंग्रजीच्याही बाजूने अनेक भारतीय व ब्रिटिश विद्वान होते. शेवटी सर्व बाजूंचा विचार होऊन इंग्रजी पद्धतीच्या, भाषेच्या व त्या भाषेतील विषयांच्या, शिक्षणाला प्राधान्य मिळून नवीन शिक्षणपद्धतीचा प्रारंभ, १८३७ चे सुमारास झाला. मुंबई, मद्रास व कलकत्ता ही विद्यापीठे १८५८ चे सुमारास अस्तित्वात आली. इंग्लिश माध्यमातून माध्यमिक व उच्च शिक्षण पद्धती सुरू झाली तरी एक ऐच्छिक विषय म्हणून संस्कृतला माध्यमिक व उच्च शिक्षणात महत्त्वाचे स्थान होते. शालान्त परीक्षेत बहुसंख्य विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रवेशाकरता संस्कृत भाषेचे शिक्षण घ्यावे लागले. त्यामुळे १९४० पर्यंत कला, वाङ्मय अथवा विज्ञान, तंत्रज्ञान इ. सर्व शाखांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचे उच्च पातळीचे ज्ञान मिळालेले असे. त्या वेळेपर्यंत वाङ्मय-कला शाखा पदवीधर असोत की इंजिनिअरिंग-मेडिकल-विज्ञान शाखांचे पदवीधर असोत, सर्वांना संस्कृतचे ज्ञान अवगत असे. श्री चिंतामणराव देशमुखांसारखे अर्थशास्त्रज्ञही संस्कृत विषयात पारंगत असत. त्या वेळच्या माध्यमिक शाळांतील संस्कृत शिक्षणाची पातळी उच्च दर्जाची होती. १९३७ सालच्या कालखंडापासून संस्कृतला जी उतरती कळा लागली त्या प्रक्रियेचा १९७७–८० च्या कालखंडापर्यंत शेवटच झाला. आज माध्यमिक शाळांत संस्कृत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत अल्प झाली आहे आणि कॉलेजमध्ये भाषा-कलाविभागाकडे जाणारे विद्यार्थीच नसल्याने उच्च पातळीवरील संस्कृत शाखाही अर्धांगवाताच्या अवस्थेला आलेल्या आहेत.

आजची स्थिती

संस्कृत भाषेच्या या अवस्थेला संस्कृतचे रखवालदारच जबाबदार आहेत. अभ्यासक्रमाचे नियोजक, पाठ्यपुस्तक लेखक, शिक्षक, प्राध्यापक, परीक्षक सर्वच वर्ग या परिस्थितीला जबाबदार आहेत. पूर्वापार आपण जे शिकलो त्याचाच अभ्यासक्रम तयार करायचा, तोच शिकवायचा, त्याच्यावरच पाठ्यपुस्तके लिहायची व उतारे निवडायचे, त्याच्याच परीक्षा घेऊन मानधन संपादन करायचे हा कार्यक्रम शंभर वर्षे चालला. या काळात जीवनातील अनेक क्षेत्रांतील ज्ञान वाढले, इंग्रजी-मातृभाषा-संस्कृतव्यतिरिक्त इतर भारतीय भाषाज्ञानाची आवश्यकता वाढली, माध्यमिक शाळांतील आवश्यक विषयसंख्या वाढली; विज्ञान, तंत्रज्ञान, युद्धविद्या, स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी पाश्चिमात्य देशांनी वाढविलेल्या ज्ञानाचा संभार वाढला. आजच्या जीवनाला, राष्ट्राच्या प्रगतीला, संरक्षणाला व अस्तित्वाला या विषयांची गरज असल्याने त्यांनाच माध्यमिक व उच्च शिक्षणात हळूहळू स्थान मिळत गेले. विषयांचा भार वाढला म्हणून, त्याला जागा देण्याकरता भावी जीवनाला अनवश्यक विषयांचा बोजा अभ्यासक्रमांतून कमी होऊ लागला. त्यात अग्रक्रम संस्कृतला मिळाला. आजच्या वाढत्या आधुनिक जीवनात संस्कृतलाही फार महत्त्वाचे स्थान आहे ही गोष्ट

नव्या अभ्यासक्रमनियोजकांना पटवून देण्याच्या प्रयत्नाला संस्कृतचे अभिमानी कधी लागले नाहीत. किंबहुना असा काही संस्कृत भाषेचा उपयोग आहे, त्या प्रकारचा अभ्यासक्रम आपण तयार करू शकू; आजच्या वैज्ञानिक-तांत्रिक युगाला आवश्यक असेही ज्ञान संस्कृत भाषेत आहे, ते जमवून त्याचा अभ्यासक्रम बनवू शकू; कला-वाङ्मय व विज्ञान शाखातील उच्च शिक्षणाला आवश्यक अशा संस्कृत ज्ञानाचा अभ्यासक्रम आपण करू शकू, अशी जाणीव संस्कृतज्ञांना झाली नाही. त्यामुळे संस्कृत भाषा माध्यमिक आणि उच्च अशा दोन्ही क्षेत्रांतून नामशेष होण्याच्या मार्गाला लागली आहे. पण अद्यापही संधी गेली नाही. संस्कृतला शिक्षणात स्थान असावे असे मानणारा मोठा वर्ग समाजात आहे. पण विषय–चुरशीच्या व उपयुक्त ज्ञान-मागणीच्या आजच्या युगात हे स्थान कसे देता येईल याचा मार्ग कोणाला दिसत नाही.

नवे अभ्यासक्रम आवश्यक

आज माध्यमिक शालांत परीक्षांना जे विषय आहेत त्यांना, उच्च शिक्षणात कोठे ना कोठे तरी स्थान आहे, व त्या विषयांची उच्च शिक्षणाला आवश्यकता आहे. आयुर्वेद शाळेच्या प्रवेश परीक्षेला संस्कृत आवश्यक आहे म्हणून विद्यार्थी तो विषय आपोआप घेतात. तशी गरज इतर विषयांच्या उच्च शिक्षणातही आहे. ती भाग-विण्यासारखा संस्कृतचा नवा अभ्यासक्रम तयार करता येईल, या दिशेने संस्कृतज्ञांनी विचाराला लागले पाहिजे. संस्कृतची गरज पटवून द्यावी, तसे उपयुक्त ज्ञानसंग्रह उपलब्ध करून द्यावेत आणि मग आग्रह धरावा की यांचा उच्च शिक्षणात समावेश करणे आवश्यक आहे.

भाषा शिक्षणाचा विषय घ्या. पदवी परीक्षांना मराठी, हिंदी, गुजराथी इ. भाषा घेऊन बसणारे विद्यार्थी अनेक असतात. त्यांच्या उच्च अभ्यासक्रमांना पोषक असा संस्कृतचा भाग निवडून काढून त्याचा अभ्यासक्रम तयार केला पाहिजे. मराठी, हिंदी, गुजराथी इ. भाषांतील शब्दसंग्रह, शब्दसिद्धी, व्युत्पत्ती, व्याकरण इ. करता आवश्यक असा संस्कृतचा भाग निवडून त्याचा अभ्यासक्रम तयार करता येईल. त्यातील निरनिराळ्या पातळीवरील ज्ञान बी. ए., एम. ए. व पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना कसे उपयुक्त आहे ते त्या विषयातील शाखांच्या तज्ज्ञांना पटवून देता येईल व त्याचा आवश्यक अभ्यासक्रमात समावेश होऊ शकेल. त्यामुळे उच्च पातळी-वरील देशी भाषांचे शिक्षण अधिक सकस व उच्च दर्जाचे होईल, व ते संशोधनालाही साहाय्यक होईल.

तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, मानसशास्त्र इ. च्या क्षेत्रात संस्कृत वाङ्मय विपुल आहे. त्यातील महत्त्वाचे मूळ उतारे बी. ए., एम. ए., पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांकरता

सहज काढता येतील. भारतीय पूर्वज्ञानातील मूळ वाङमयाचा अभ्यास न करता पदव्या देणे हे किती वर्षे चालू राहणार ?

सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रातही भारतीयांनी पुष्कळ विचार केलेला आहे. त्यांचा अभ्यास सोशल सायन्सेसना उपकारक ठरेल. भारतीय सामाजिक विचार काय होते, समाजरचनेची सूत्रे काय होती, यांचे मूळ उतारे अभ्यासार्थ उपयुक्त ठरतील.

वैद्यकीय ज्ञानाच्या क्षेत्रात ॲलोपाथीचा अभ्यास करणारांनाही प्राचीन संस्कृत वाङमयातील काही सिद्धांत, अभ्यासपद्धती, निदान-चिकित्सापद्धती यांची मूळ उताऱ्यांच्या आधाराने माहिती देणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय वैद्यक-विषयीचे ग्रह तर्कशुद्ध होतील व आयुर्वेदाच्या संशोधनाला, प्रगतीला अधिक तज्ज्ञांचे साहाय्य होईल. आयुर्वेदाला धरून वाढलेल्या भारतीय शारीरशास्त्र, रसायन, वनस्पति शास्त्र, इ. ज्ञानशाखांतील मूळ उतारे त्या त्या विद्याशाखांना अभ्यासाला उपकारक ठरतील. गणित, ज्योतिष या क्षेत्रातील भारतीय ज्ञानाची परंपरा त्या शाखांतील-विद्यार्थ्यांना ग्रंथातील उताऱ्यांवरून माहीत होणे जरूर आहे.

उपेक्षित साहित्याचे संकलन

आपल्याकडे आजपर्यंत माध्यमिक व उच्च शिक्षणात जो संस्कृत वाङमयाचा अभ्यास झाला तो साहित्य वाङमय, व्याकरण, वेदान्त, अलंकार इत्यादी काही ठराविक विद्याशाखांचाच झाला. वैज्ञानिक क्षेत्रातील संस्कृत वाङमयाचा परिचय आपल्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांनाही फारसा झालेला नाही. त्यामुळे अभ्यासक्रमाची, रचना करणारांनी स्वतः अभ्यासलेल्या विषयांच्या पलीकडील इतर संस्कृत वाङमया-कडे फारसे पाहिले नाही. उपलब्ध झालेल्या सर्व संस्कृत वाङमयाचे परिशीलन करून, आजच्या शिक्षणातील ज्ञानशाखांना त्यातील जे जे ज्ञान संबद्ध व उपकारक आहे, त्याची माहिती जमवून ती उपलब्ध केली पाहिजे. निरनिराळ्या ज्ञानशाखांना उप-युक्त अशा ग्रंथांचे साधनग्रंथ (सोर्सबुक्स) तयार केले पाहिजेत. मग त्यातील महत्त्वाचे उतारे काढून त्यांची मध्यम व उच्च पातळीवर निवड करून ते ग्रंथस्वरूपात छापले पाहिजेत. त्यानंतरच असा आग्रह धरता येईल की, पदवी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना या भारतीय ज्ञानाची मूळ उताऱ्यांवरून ओळख होणे जरूर आहे; त्या-करता उच्च शिक्षणाच्या सर्व शाखांना संस्कृतचे प्राथमिक ज्ञान आवश्यक आहे.

संघटित कामाची जरुरी

हे काम एखाद्या व्यक्तीचे नसून संस्कृतच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व

संस्थांनी व विद्वानांनी योजनापूर्वक सहकार्य केले पाहिजे.

महत्त्व व मागणी

यापुढे केवळ वाङ्मयाकरता किंवा वेदान्त-व्याकरण-अलंकाराकरता फारसे लोक संस्कृत शिकणार नाहीत. पण इतर विज्ञानक्षेत्रातील व जीवनक्षेत्रातील संस्कृत भाषेतील ज्ञान पद्धतशीर स्वरूपात उपलब्ध झाल्यास त्याचा उच्च शिक्षणात अवश्य समावेश होऊ शकेल; व उच्च शिक्षणाला आवश्यक म्हणून माध्यमिक शिक्षणातही संस्कृतला महत्त्व व मागणी येईल. संस्कृत प्रसार करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं व संस्थांनी या दिशेने संघटित प्रयत्न केल्यास पाचसहा वर्षांत सध्याची औदासिन्याची स्थिती निश्चितपणे बदलता येईल. [दीपावली, १०–१९८१

□ □ □

४३. अब्रूचे शत्रू

व्यसने, व्यभिचार आणि अपहार हे अब्रूचे तीन शत्रू आहेत. अब्रूने जगावे अशी विचारवंतांची पूर्वापार शिकवण आहे. आपल्या वंशजांनी आपल्या कुलाचा नावलौकिक वाढवावा अशी आईबापांची इच्छा असते. कुलात सदाचारी व्यक्ती निघाल्या आणि सदाचाराच्या जोडीने एखाद्या क्षेत्रात अलौकिक कर्तबगारी दाखवणारा पुरुष निघाला म्हणजे त्या कुलाचे नाव प्रसिद्ध होते. तो पुरुष आपल्या वंशजांना कर्तबगारीची स्फूर्ती देत राहातो. पण अशा कुळात एखादीच व्यक्ती व्यसनी, व्यभिचारी आणि अपहारी निघाली की सबंध कुळाचा नावलौकिक जातो. त्या व्यक्तीची अब्रू जातेच, कुलाचीही अब्रू जाते.

अब्रू म्हणजे नावलौकिक. चांगल्या कृतीविषयी समाजात आदर, प्रेम व प्रसिद्धी लाभणे म्हणजे अब्रू. अब्रूने जगावे अशी इच्छा प्रत्येक व्यक्तीने बाळगावी. अब्रू आणि कीर्ती यांत काय फरक आहे ? बराच फरक आहे. संख्येचा आणि कर्तृत्वाचा. अब्रूने जगणे प्रत्येकाला शक्य आहे. कीर्ती मिळविणे फार थोड्यांना शक्य आहे. कीर्तीमध्ये अलौकिक बुद्धी आणि कृती या गोष्टींचा समावेश होतो. अब्रू या शब्दात नैतिक अर्थाचा भाग अधिक आहे. सदाचाराने जन्मभर वागणारा कोणताही माणूस अब्रूने जगू शकतो. सामान्य बुद्धीचा आणि कर्तबगारीचा माणूसही आपल्या जीवन व्यवहारातील सद्गुणांमुळे अब्रू संपादन करू शकतो. सदाचाराबरोबर ती आपोआप येते. पण

एखाद्याही प्रासंगिक दुराचारामुळे अब्रू जाऊ शकते. जन्मभर चांगल्या वर्तनाने वागणारा माणूस द्रव्याच्या आणि इंद्रियसुखाच्या लोभाने, एखाद्या प्रसंगाने व घटनेनेही मिळालेली अब्रू घालवू शकतो. अशा प्रसंगात तीन गोष्टी प्रामुख्याने येतात,—व्यसने, व्यभिचार आणि अपहार.

व्यसनामध्ये मुख्यतः दारू व इतर मादक पदार्थ येतात. मद्याचा प्रसार हळूहळू सुशिक्षित वर्गात अधिकाधिक प्रमाणात होऊ लागला आहे. निर्व्यसनता हे पूर्वी सुसंस्कृत माणसाचे लक्षण समजले जात असे. तो समज आता कमी झाला आहे; पण ही आपली प्रगती नसून अधोगती आहे, असे स्पष्टपणे सांगणारी माणसे पाहिजेत. श्रीमंत, सुशिक्षित व प्रतिष्ठित लोकही मद्यपान करीत असले तरी त्यांची ती चूक आहे. हे व्यसन व्यक्तीला गोत्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. कामगार वर्गातील दारूच्या व्यसनामुळे त्यांच्या कुटुंबांची दैना उघड्या डोळ्यांनी पाहणारांना या व्यसनाचे परिणाम दिसू नयेत हे आश्चर्य आहे. हा बुद्धिवंतांचा निर्बुद्धपणाच आहे. या एका गोष्टीत विवेकाला कुलूप लावून ठेवावे हे योग्य नव्हे. व्यसनाधीन व्यक्तींनी विचारपूर्वक आपली मुक्तता करावी आणि इतरांनी या व्यसनापासून पूर्णपणे अलिप्त राहावे. व्यसनामुळे धुळीला मिळालेल्या सधन व्यक्तींची मुले अनाथ होऊन समाजात निराधार झालेली मी पाहिली आहेत. ही माणसे अब्रूने जगली असे म्हणाल का ?

व्यभिचार हा अब्रूचा दुसरा शत्रू आहे. गर्दीमध्ये आपण सहज सुटून जाऊ अशा समजुतीने भगिनींचा विनयभंग करणाऱ्या तरुणांची संख्या वाढत आहे. त्यांची संपूर्ण नावे वृत्तपत्रात आल्यावर आईबापांना काय वाटत असेल ! त्या कुटुंबाला ओळखणाऱ्या नातेवाईकांचे आणि मित्रमंडळीचे त्या व्यक्तीविषयी व कुटुंबाविषयी काय मत होईल ? बलात्काराच्या घटना सध्या वाढत्या प्रमाणावर ऐकायला व वाचायला मिळतात. या दुष्कृत्यात सामील झालेल्या व्यक्ती व त्यांची कुटुंबे यांच्या अब्रूची काय किंमत होत असेल ! आजकाल वैषयिक वासना चेतवणारे वातावरण सर्वत्र आहे. अशा काळात नैतिक दृष्टीने शुद्ध व संशयातीत वर्तन ठेवणाऱ्या आदर्श व्यक्तींची गरज आहे. व्यभिचार करून स्वतःची व घराण्याची अब्रू धुळीला मिळवू नका असा विचार समाजात प्रभावी केला पाहिजे.

तिसरा मोहरूपी शत्रू आहे द्रव्याचा अपहार. सार्वजनिक पैशाचा संबंध ज्या ज्या व्यवहारात येतो तेथे मोठमोठ्या रकमा हाताळाव्या लागतात. अशा प्रसंगी, खोटे व्यवहार करून पैसे मिळविण्याचा अनावर मोह दुर्बल मनाच्या व्यक्तीला होतो. पण अशा व्यवहाराला कधीतरी वाचा फुटतेच, आणि लबाडी करणारा म्हणून अशा व्यक्तीची हकालपट्टी होते. अप्रामाणिक माणूस म्हणून त्याला कोणी

दारात उभा करीत नाही. त्याची आणि त्याच्या कुटुंबाची अब्रू धुळीला मिळते.

कीर्ती मिळवणे काही अलौकिक व्यक्तींना शक्य आहे. पण अब्रूने जगणे हे सर्वसामान्य माणसालाही शक्य आहे. त्याने या तीन शत्रूंपासून—व्यसन, व्यभिचार आणि अपहार यांपासून — स्वतःचे संरक्षण करावे. आत्मसंयमन आणि दृढनिश्चय हीच दोन शस्त्रे अशा संघर्षात उपयोगी पडतील. [२२–११–१९८१

४४. आदर्श जीवनाची जबाबदारी

गेल्या शंभर वर्षांत काही देशांनी शिक्षणात अभूतपूर्व अशी प्रगती केलेली आहे. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान, फ्रान्स, रशिया इत्यादी राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक झाले असून सर्व प्रजा साक्षर आहे. माध्यमिक व उच्च शिक्षणही निवडक अशा बुद्धिमान विद्यार्थ्यांना पूर्ण काळ व इतर जिज्ञासूंना अल्पकाळ असे उपलब्ध आहे. त्यामुळे पदवीधर नागरिकांचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे. भारत देश त्याच मार्गावर प्रगती करीत आहे; आणि पुढील २५–३० वर्षांत प्रगत राष्ट्रांबरोबर येऊ शकेल. आजही आपण प्रगत आणि अप्रगत अशा सर्वच देशांना विविध क्षेत्रातील तज्ज्ञ पदवीधर पुरवू शकतो. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढते राहील.

शिक्षणाबरोबर समाजात ज्ञानी, सुशिक्षित व्यक्तींच्या संख्येत वाढ झाली, ज्ञानाबरोबर माणसाच्या ठिकाणी मानवता, नैतिकता, समाजहितबुद्धी, आदर्श वर्तनाची जबाबदारी हे गुण यावेत अशी पूर्वापार अपेक्षा आहे. विविध व्यवसायांतील बहुसंख्य व्यक्तींच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर असे वाटते की, या देशात एके काळी ज्ञान आणि वैयक्तिक शुद्ध जीवन यांची जी सांगड होती ती कमी होत चालली आहे. अज्ञान विद्यार्थि-वर्ग व बहुजन समाज यांच्यापुढे अनुकरणीय आदर्श असायला हवेत ते पुरेसे नाहीत. नैतिक दृष्टीने बालकांची व अज्ञ जनतेची उपासमार होत आहे.

प्राचीन काळच्या भारतीय समाजरचनेत आदर्श चारित्र्याची व अनुकरणीय जीवनाची जबाबदारी ब्राह्मण वर्गावर सोपविली होती. स्वच्छता, नैतिक वर्तन, ज्ञान संपादन, समाजहित विचार, मनःशांती इत्यादी मनोवृत्तींचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवावा अशी कल्पना होती. पण अनुभवाने असे दिसून आले की, कोठलाही एकच वर्ग

अशी जबाबदारी संपूर्णपणे पेलू शकत नाही. प्रत्येक समाजगटापुढे त्या वर्गातील प्रौढ ज्ञानी व्यक्तींचा आदर्श त्या त्या समाजापुढे असणे आवश्यक असते.

पूर्वीचा व्यावसायिक ब्राह्मणवर्ग म्हणजे आजचा शिक्षकवर्ग. त्याने आपले वर्तन तरुण पिढी आणि समाजापुढे कित्ता म्हणून ठेवावे अशी अपेक्षा केली जाते. हीअ पेक्षा रास्त आहे. पण ती अपुरी, मर्यादित आणि सदोष आहे. शिक्षकवर्गाने जसे ज्ञान संपाद नकेलेले असते त्याच ज्ञानमार्गातून सरकारी अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर, व्यापारी, कारखानदार इत्यादी सर्व व्यवसायांतील लोकही गेलेले असतात. विद्यार्थ्यांपुढे जसा शिक्षकांच्या जीवनाचा आदर्श हवा, तसाच बहुजन समाजापुढेही सर्व व्यवसायांतील सुशिक्षित व्यक्तींचा आदर्श त्या त्या व्यक्तींनी ठेवायला हवा. ही जबाबदारी केवळ शिक्षकांवर टाकून भागणार नाही. हे चारित्र्य शिक्षणाचे, नैतिकता वाढीचे व आदर्श जीवनाचे शिक्षण देण्याची जबाबदारी सर्व शिक्षितांनी उचलली पाहिजे. ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे.ज्ञानसंवर्धन, निर्व्यसनता, शुद्धचारित्र्य, समाजहित दृष्टी या मनोवृत्ती शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या ठिकाणी रुजवाव्यात; याच मनोवृत्ती बहुजन समाजात दृढमूल करण्याचे काम अधिकारी, वकील, डॉक्टर, करखानदार, व्यापारी इत्यादी व्यावसायिकांनीही केले तरच समाजाची नैतिक प्रगती होईल. विद्यार्थ्यांनी कितीही उदात्त कल्पना शाळा-महाविद्यालयांतून घेतलेल्या असल्या तरी त्यांना समाजात अनुकूल वातावरण मिळाले नाही तर त्यांचा न कळत लोप होऊन जातो, असे सध्या चालले आहे. शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी आणि बहुजन समाज या दोन्ही वर्गांत समाजाच्या सर्वच थरावर चांगले विचार, सात्त्विक भावना, नैतिक आचार यांचा प्रचार व प्रसार सतत होत राहिला तर भारतीय समाजाचे काही तरी निराळे वैशिष्ट्ये दिसून येईल, नाहीतर आज पश्चिमात्य देशांत शिक्षणाचा प्रसार होऊनही नैतिकतेचे प्रमाण घसरत चालले आहे. तीच स्थिती भारतातही येईल, येत आहे.

[१६-११-१९७९

४५. गीतेतील बलसाधना

गीता हा निवळ अध्यात्माचा ग्रंथ आहे असा समज आज अनेक शतके चालत आला आहे. तो दूर करण्याची फार गरज आहे. गीता लोकप्रिय करण्याच्या मार्गातील तो एक फार मोठा अडसर आहे. हे विधान अनेकांना अप्रिय व कटू वाटेल, पण ते सत्य आहे. गीता जीवनाच्या सर्वांगीण विकासाचे मार्गदर्शन करते. त्यात शरीर,

मन आणि बुद्धी या तीनही घटकांचा समावेश आहे. यांचा पूर्ण विकास झाला तरच अध्यात्माची पूर्वतयारी होते, त्यापूर्वी नाही. यांतील शारीरिक बल आणि आरोग्य कसे राखावे याचे मार्गदर्शनही फार उपयुक्त आहे.

माणसाच्या आहार-विहाराच्या सवयीमुळे त्याचे बल टिकते किंवा घटते याची जाणीव गीताकारांनी करून दिलेली आहे. आहार, निद्रा आणि हालचाली यांच्यात समतोल राखला तर आरोग्य व बल टिकते, अतिरेक झाला की तो रोगांना म्हणजे दुःखांना कारणीभूत होतो (अ. ६ श्लोक १६, १७).

शारीरिक बल आहारावर अवलंबून आहे. तो योग्य असला तर माणूस बल-संपन्न व निरोगी राहतो. चुकीच्या आहाराने बलहानी होऊन माणूस आजाराला आमंत्रण देतो. त्याकरिता माणसाने सात्त्विक आहार सेवावा व राजस-तामस आहार वर्ज्य करावा. त्यासंबंधी श्लोक असे आहेत-- (८ अ. १७ श्लोक ८।९।१०).

सारांश, प्रमाण आणि गुण (क्वाँटिटेटिव्ह आणि क्वॉलिटेटिव्ह), अशा दोन्ही दृष्टींनी आहाराचे प्रमाण किती असावे व त्यातील द्रव्यांचे गुणधर्म काय असावेत त्याचे तपशीलवार वर्णन गीतेने केले आहे. आहार आणि देहबल व मनोबल यांचा निकटचा संबंध आहे म्हणून गीतेने इतका तपशील दिला आहे.

शारीरिक बल कितीही संपादन केले तरी मनाच्या बलाशिवाय त्याचा काहीएक उपयोग नाही. कोणत्याही मनोविकाराने मनाचे बल हरण केले की, शरीरातील सर्व घटकांचा शक्तिपात कसा होतो ते अगदी पहिल्याच अध्यायात अर्जुनाच्या मनः-स्थितीच्या वर्णनात गीतेने सांगितले आहे (अ. १, श्लोक २८ –३०).

कोणत्याही प्रबळ मनोविकाराचा परिणाम माणसाच्या देहावर होऊन त्याचे बल निरुपयोगी होते; कारण बुद्धीवर ताबा राहात नाही, त्यामुळे शरीरावरचा ताबाही सुटतो. क्रीडाक्षेत्रात हा अनुभव फार येतो. नर्व्हस झालेला उत्तम खेळाडूही पराभव खातो. तसाच क्रोधाधीन झालेला क्रीडापटूही अंदाज चुकल्यामुळे हारला जातो.

गीतेने जो योग सांगितला आहे त्यामुळे मनाची शांती व समतोलता कायम राहाते. त्यामुळे अवयवांच्या क्रिया आणि बुद्धीचे निर्णय बिनचूक होतात व इष्ट हेतू साध्य होतात. बलाची साधना करणाराने गीतेतील योगवृत्ति-साधनेचा नीट अभ्यास करून ती मनोवृत्ती साध्य केली तर देहबल व मनोबल दोन्ही साध्य होतील. योग हे

मनोबलसंवर्धक शास्त्र आहे.

बल, शौर्य, तेज, धृती, पौरुष, पराक्रम, ओजस्विता या मूल्यांना गीतेने अतिशय महत्त्व दिलेले आहे. परंतु या सर्व शक्तींचा उपयोग न्याय, नीती, सदाचार, परोपकार, आत्मविकास यांच्या कामी झाला पाहिजे. सात्त्विक-ध्येय-साधनार्थ शारीरिक शक्तीचा उपयोग झाला तरच ते अभिनंदनीय आहे. राजस-तामस हेतू साध्य करण्याकरिता झाल्यास ती शक्ती निंद्य आहे.

मानसिक व शारीरिक बलाबरोबर माणसाच्या ठिकाणी जिजीविषा म्हणजे जगण्याची जिद्द हवी, ती निर्माण होण्याकरिता काही तरी उच्च ध्येय हवे, त्यामुळे त्याच्या मनात आशावाद राहतो. निराशावाद आला की माणूस मरणाचा विचार करू लागतो. केवळ स्वार्थ हे जगण्याला पुरेसे ध्येय होऊ शकत नाही. त्याचे वैय्यर्थ्य पुढे पुढे जाणवू लागते व माणूस आत्महत्येच्या विचाराकडे धाव घेतो. पुरे झाले हे जगणे असे त्याला वाटू लागते. अर्जुनाचे तसे झाले होते (अ. १ श्लोक ३२).

'स्वजनांच्या वधाचे दुःख भोगत जगण्यात काय अर्थ आहे?' असे तो विचारतो. त्याच्या पुढे श्रीकृष्णाने व्यापक समाजहिताचे ध्येय ठेवले आहे. 'बाबारे, केवळ स्वतःच्या सुख-दुःखाकडे पाहू नकोस, जगाच्या सुखदुःखाकडे पाहून त्याच्याशी एकजीव हो. 'स्व' ची व्याख्या व्यापक कर म्हणजे जीवनाला ध्येय राहील.

शरीरबल आणि मनोबल यांच्या साधनेचा विचार इतक्या व्यापक भूमिकेवरून गीतेने केला आहे. व्यापक व्यक्तिविकासाचा तो एक आवश्यक व निगडित असा भाग आहे. [३०–११–७९

४६. देशातील घटनांचा बोध

देशात व जगात मोठ्या घडामोडी होत असतात. त्यांवर अनेक व्यक्तींचा व त्यांच्या स्वभावांचा प्रभाव पडतो. व्यक्तिशः आपल्याला त्या घटनांविषयी काही करता येत नाही; पण त्यांतून बोध घेऊन आपले वैयक्तिक जीवन व आपला स्वभाव कसा सुधारता येईल असा विचार केल्यास त्या अनुभवाचा काय उपयोग होईल, या दृष्टीने मी या घटनांकडे पाहतो.

सुमारे तीन वर्षांपूर्वी श्रीमती इंदिरा गांधींचा निवडणुकीत दारुण पराभव झाला व आता त्या राजकारणातून कायमच्या उठल्या असा भास झाला. परंतु अगदी थोड्या काळात त्यांनी आपल्या मनाला सावरले आणि धिमेपणाने पुढची पावले विचार-पूर्वक व योजनापूर्वक टाकली. आता भारतालाच नव्हे तर सर्व जगाला आश्चर्यचकित करण्याइतके अभूतपूर्व यश जानेवारीतील निवडणुकीत त्यांनी मिळविले. स्वभावातील ही जिद्द, धिमेपणा, कणखरपणा, धैर्य हे गुण प्रत्येक व्यक्तीला अनुकरणीय आहेत असे मला वाटते. या प्रसंगी काही सुभाषितांची आठवण होते व त्यांची सत्यता पटते.

विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥ --भर्तृहरी
केला जरी पोत बळेचि खाले ।
ज्वाला तरी ते वरती उफाळे । --वामनपंडित

कौटुंबिक जीवनात, व्यवसायात, परीक्षेत, सार्वजनिक चळवळीत, संस्था चालवण्यात, आजारीपणात, कोर्ट-कचेरीच्या खटल्यात, अशा अनेक प्रसंगी व्यक्तीला यश आणि अपयश येत असते. यशाने हुरळून जाऊ नये आणि अपयशाने निराश होऊ नये हा धडा इंदिराजींनी सर्व समाजाला आपल्या उदाहरणाने शिकवला आहे. तो आपण घेतला पाहिजे आणि आपल्या मुलामुलींना शिकवला पाहिजे. राजकीय मतांचे व कार्याचे दृष्टीने त्यांच्याशी मतभेद व विरोध असणारांनीही हा धडा घेतला पहिजे. ज्या पक्षांना व त्यांच्या नेत्यांना आज अपयश आले आहे त्यांनाही या घटनेपासून बोध घ्यायला हवा व पुढचा मार्ग धिमेपणाने चालायला हवा. नामोहरम न होता काम करीत राहणे हा राष्ट्रीय स्वभाव बनायला हवा. समाजाचा स्वभाव घडवण्याचे दृष्टीने या घटनेकडे मी पाहातो.

श्रीमती इंदिराजी या व्यक्तीने जसा एक गुण सुचवला तसा जनतेनेही दुसरा गुण शिकवला आहे--क्षमाशीलता. झाले गेले विसरून जा. सुडाची बुद्धी ठेवू नका. मन उदार आणि विशाल ठेवा. जनतेला ज्या वेळी जुलुमाची आणि अन्यायाची चीड आली तेव्हा त्यांनी इंदिराजींना फेकून दिले. तीन वर्षांनी ती चीड व राग सौम्य झाला. जनतेकडे जाऊन आपली चूक कबूल करून पुन्हा मतयाचना केल्यावर बहुसंख्य जनतेने त्याच गांधींना आज डोक्यावर घेतले ! हा काय चमत्कार ? हा जनतेचा स्वभाव आहे. जनतेला हुकुमशाही आणि लोकशाही ही तात्त्विक भाषा आणि त्यातला सूक्ष्म फरक काही कळत नाही. तो आपण कधी शिकवलाच नाही. जुलुमी राजवट आणि प्रेमाची राजवट यांतील फरक मात्र तिला सहज कळतो. तो तिने आपल्या मतदानाने दाखवला. हा क्षमाशीलतेचा गुणही प्रत्येक व्यक्तीने अनुकरण

करण्यासारखा आहे. कुटुंबात, मैत्रीत, खेळात, सार्वजनिक कामात, व्यवसायात, अनेक व्यक्तींशी आपला संबंध येतो. त्यात क्षमाशीलता हा गुण आल्यास दोन्ही बाजूंना तो हितावह होईल. आपण सूडाची भावना ठेवण्यात, उसने फेडण्यात अभिमान बाळगतो. त्यामुळे अहंकार वाढतो आणि माणसे दुरावतात.

इंदिरा गांधी म्हणजे अगदी सदगुणांचा आदर्श असा भ्रम मला नाही. त्यांच्या गुणदोषांचा जमाखर्च मी पूर्वी एका लेखात दिला आहे. त्यातील उतारा पुढे देत आहे.

" भारताच्याच नव्हे, तर जगातील कर्तबगार महिलांत श्रीमती गांधींची गणना होते, आणि होत राहील. त्यांच्या ठिकाणी काही अलौकिक सद्‌गुण आहेत. पण त्यांना छेद देणारे अनिष्ट दोष किंवा दुर्गुणही आहेत. सद्‌गुणांमुळे त्या शिखरावर चढल्या. पण दुर्गुणांमुळे खाली कोसळल्या. हा जीवनाचा पूर्व भाग झाला; उत्तर भागात मागील जीवनाचे सिंहावलोकन व परीक्षण करून त्यांनी सुधारणा केली तर लोक पुन्हा त्यांना नेतेपद द्यायला तयार होतील. तसे झाले तर चांगल्या अर्थाने त्यांचे नाव भारतातील इतिहासात प्रामुख्याने राहील. राजकारणात अनेक चमत्कार होतात हे आपण आज पाहात आहोत.

" निर्भयता, निश्चय, करारीपणा, कष्टाची तयारी, धैर्य, निर्णयक्षमता, नेतृत्व, स्वदेशभक्ती, जनता-प्रेम हे सद्‌गुण त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने आहेत, पण त्यांच्याच जोडीला जबरदस्त अहंकार, सत्तेचा लोभ, भिन्नमतांबद्दल असहिष्णुता, सहकाऱ्यांविषयी बेदरकार, हुकुमशाही वृत्ती, पाताळयंत्रीपणा, घटना-नियम-कायदा यांचा अनादर, निर्दयता, अत्यंध पुत्रप्रेम, असे अनेक दोष आहेत. हे मी आजच लिहीत आहे असे नव्हे, समाचारमधील व सदाचार चिंतनीतील माझे पूर्वीचे अनेक लेख प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें याच विषयाला धरून आहेत ते वाचकांनी आता पुन्हा पहावेत.

" श्रीमती गांधींना निवडणुकीचा खरा अर्थ सांगून त्यांचे मतपरिवर्तन करण्याचे काम त्यांच्या सहकाऱ्यांचे आहे. पण इतका निर्भीडपणा, निःस्पृहता, मौलिक चिकित्सा वृत्ती, आणि निर्भयता त्यांच्या ठिकाणी तरी आहे काय? हा प्रश्नच आहे. शासन झाले, आता अनुशासन हवे. ते झाल्यास एक अलौकिक कर्तृत्वाची व्यक्ती पुन्हा प्रकाशात येऊन जगातील महिलांना आणि मानवाला भूषणभूत ठरेल. तथास्तु! "

माझ्या भविष्यातील अर्धा भाग खरा झाला. बाकीचाही अर्धा पुरा होईल का याची वाट पाहू या.

[१५-१-१९८०

४७. पुराणातील वांगी कुटुंबात

विविध गोष्टींकडे समाज कोणत्या दृष्टीने पहातो ते त्या समाजाच्या भाषेतील म्हणीवरून सहज लक्षात येते. एखादा वक्ता म्हण बोलून-लिहून जातो, पण ती जेव्हा अनेकांच्या मनातील विचारांशी मिळती-जुळती असते तेव्हा ती लोकप्रिय होते. ब्रह्मज्ञानाचा पंडितांनी अतिरेक केला तेव्हा म्हण पडली–" तुला आता ब्र बोलू देणार नाही. " तसेच पुराणांचेही झाले. त्यातील चांगल्या गोष्टींबरोबर अनेक चमत्कार व अशक्यप्राय घटना पुराणिक सांगू लागले, तेव्हा म्हण पडली –" पुराणातली वांगी पुराणात. " ब्रह्मज्ञानाचा आणि पुराणांचा उपयोग कुटुंबात व समाजात कसा करावा, कोणत्या गोष्टी आचरणीय-स्मरणीय व कोणत्या केवळ आबालवृद्धांच्या करमणुकीकरिता, यांचे तारतम्य न राखल्यामुळे पुराणे आणि व्यवहार यांचा काहीही संबंध नाही अशी समाजाची भावना झाली. तो केवळ श्रवणाचा व करमणुकीचा विषय राहिला; व्यवहारापासून अगदी अलिप्त !

महाभारत, रामायण व नंतर झालेली पुराणे यांच्या मुळाशी आबालवृद्धांना मनोरंजक गोष्टी व कथा यांच्या माध्यमातून सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक विचार आणि आचार देणे हा उद्देश होता. त्या उद्देशाने आजही या कथांचा उपयोग पालकांनी व लेखक–वक्ते यांनी करायला हवा. याच कथा का, नवीन का नकोत ? असा प्रश्न उत्पन्न होईल. त्याचे उत्तर असे की, या कथा हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत सर्व प्रांतांत, सर्व भारतीय भाषांत प्रचलित आहेत. त्या कथांतील पात्रे व घटना एका पिढीकडून नव्या पिढीला, तिच्याकडून पुढच्या पिढीला अशा परंपरेने चालत आलेल्या आहेत; त्यातील पात्रे, घटना, प्रसंग, व्यक्तिव्यक्तींचे संबंध, हे सार्वत्रिक व प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत. एकेक शब्द, नाव, स्वभाव किंवा प्रसंग यांचा निर्देश केला की सर्वांच्या मनात एकच विचार एकाच वेळी निर्माण होऊ शकतो. त्या सर्वांचा संदर्भ घेऊन आजच्या श्रोत्यांना, आजच्या घटनांच्या द्वारे, त्या कथांच्या मुळाशी असलेले विचार व त्यांची आज उपयुक्तता पटवून देता येते. या दृष्टीने आपल्या कुटुंबातही बालकांचे व युवकांचे नैतिक शिक्षण करता येईल. कुटुंबात कोणत्याही प्रसंगी उपयोगी पडण्यासारख्या गोष्टी प्राचीन वाङ्मयात व पुराणांत आहेत. त्या त्या प्रसंगी योग्य गोष्टींचा उल्लेख करून त्यातील मर्म मुलांना सांगणे अगत्याचे आहे .या दृष्टीने जुन्या कथा-वाङ्मयाचा कुटुंबातील व्यक्तींच्या स्वभावबांधणीकरता उपयोग कसा करून घ्यावयाचा ते पहाणे चतुर, चाणाक्ष, सुविद्य, साक्षर व विचारी पालकांचे कर्तव्य आहे.

कुटुंबात अनेक मुले-माणसे असतात, त्या प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असतो. त्यात चांगले व वाईट दोन्हींचे मिश्रण असते. सर्वांच्या स्वभावातील दोष जाऊन ते निर्दोष कसे होतील हे पाहणे मोठ्या माणसांचे काम आहे. मुलांच्या बालपणीच्या स्वभावात भावी व्यक्तिमत्त्वाचे व वाढीचे बीज असते. त्याची प्रसंगाप्रसंगाने योग्य दिशेने वाढ करण्याकरता जुन्या कथांतील प्रसंग व उदाहरणे उपयोगी पडतील. प्रत्येक वेळी संपूर्ण कथा सांगण्याची गरज नाही. बहुसंख्य मुलांच्या ठिकाणी स्वार्थ व आप्पलपोटेपणा असतो. इतरांचाही विचार करावा, केवळ आपल्यापुरते पाहू नये, हा व इतर असेच गुण बालपणापासून शिकवायला हवेत. वेळीप्रसंगी एकमेकांकरिता त्याग करायचीही तयारी हवी. पिता-पुत्रांचे, माता-पुत्रांचे, भावा-भावांचे, भाऊ-बहिणीचे, मित्रांचे, चुलतभावांचे, दोन कुटुंबांचे, गृहस्थ-अतिथीचे, शत्रू-शत्रूंचे इत्यादी अनेक संबंध कसे असावेत यासंबंधी मार्गदर्शन करणाऱ्या अनेक कथा पुराणांत आहेत. उदाहरणांचे दृष्टीने कुटुंबात घडणाऱ्या प्रसंगी त्यांचा योग्य व समर्पक उपयोग केला तर घरातील सर्वच व्यक्तींच्या स्वभावात काही सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाही. पुराणातील वांगी पुराणात न राहता कुटुंबातही त्यांचा योग्य उपयोग होऊ शकेल. [१७–३–१९८०

४८. निर्दोष सुटका! कायद्याने का न्यायाने?

बलात्कार, खून, व्यापारी व राजकीय भ्रष्टाचार, इत्यादी खटल्यांत अडकलेले लोक "निर्दोष सुटका" अशा न्यायालय-निकालामुळे शिरसलामत मुक्त झाल्याचे आपण वाचतो व ऐकतो, त्या वेळी मन अस्वस्थ होते. काही व्यक्ती निर्दोष असतात; पण सर्वच निर्दोष नसतात ही सुप्त जाणीव आपणाला असते.

पुष्कळ वेळा न्यायाधीशांचाही नाइलाज होतो. कायद्याच्या चौकटीबाहेर त्यांना जाता येत नाही. त्यामुळे गुन्ह्याचा संशय व संभव असला तरी आरोपी "निर्दोष" म्हणून सोडला जातो. भरपूर व खात्रीशीर पुराव्याचा अभाव, बुद्धिमान व फौजदारीत निष्णात वकिलाचे बुद्धिचातुर्य आणि ज्ञान (?), गुन्हेगाराचे सुदैव इत्यादी अनेक कारणांमुळे कायद्याच्या चौकटीत गुन्हेगार सापडत नाहीत. त्यांची सुटका होते, पण, समाजाचे समाधान होत नाही. सत्याच्या दृष्टीने काहीतरी चुकते असे त्याला वाटते.

१९३३ सालची गोष्ट. लंडन पहात फिरत असताना मी एका पोलिसाला

विचारले–'व्हेअर आर् दि कोर्टस् ऑफ् जस्टिस?' त्यावर तो म्हणतो, 'कोर्टस् ऑफ जस्टिस् ? दे डोंट एक्झिस्ट.' मग मी पुन्हा विचारले––'आय् मीन दि कोर्टस् ऑफ लॉ ?' त्यावर त्याने उत्तर दिले––'राइट् इन फ्रंट ऑफ् यू'.

अलीकडे गुन्हेगारांच्या कौशल्यात, ज्ञानात व तंत्रविद्येत फार प्रगती झालेली आहे ! लेखी पुराव्यात न गुंतणे, संभाव्य पुरावे आधीच टाळणे, प्रत्यक्ष पुरावे नष्ट करणे, अधिकाऱ्यांना फितवणे, थोरामोठ्यांचे वजन घालणे, इत्यादी अनेक मार्गांनी त्यांच्या 'निर्दोष सुटके' च्या वाटा ते मोकळ्या करून घेतात.

अशा स्थितीत आपण, म्हणजे समाज, काय करू शकतो ? कायद्याने 'निर्दोष' ठरविलेली व्यक्ती नैतिक व सामाजिक दृष्टीने दोषी आहे असे वाटत असेल तर निदान तिला सामाजिक प्रतिष्ठा न देणे आपल्या हातात आहे, ते तरी आपण करावे ! माणूस कितीही अनीतिमान असला तरी, आपल्याला समाजात मानमान्यता व मोठेपणा मिळावा अशी त्याला तळमळ असते. आपल्या दुराचारामुळे ती आपल्याला दिली जात नाही अशी जाणीव निर्माण झाली तरी पुष्कळ परिणाम होईल.

पण आज इतकेही नैतिक धैर्य, सत्यनिष्ठा, न्यायबुद्धी आपल्या समाजात राहिली नाही, हीच शोकान्तिका आहे. कालचा आरोपी आज समारंभात अध्यक्षस्थानी मिरवतो, निवडणुकीत विजयश्री मिळवितो आणि समाजाला, विशेषत: तरुण पिढीला उपदेशही करतो !

पण हेही दिवस जातील, हीदेखील परिस्थिती पालटेल, आपल्या भावना आपण बोलत, व्यक्त करीत राहिले पाहिजे. सदाचाराचे, सद्विचाराचे, न्यायान्याय बुद्धीचे बीज जिवंत ठेवले तर केव्हा तरी त्याला खतपणी घालणारी प्रभावी व्यक्ती निर्माण झाल्यावाचून राहणार नाही. काळोखानंतर प्रकाश येणे हा निसर्गाचा नियम आहे. स्वत:ची सद्विवेकबुद्धी जिवंत ठेवून आपण आशावादी राहू या.

[१९-४-१९८०

□ □ □

४९. इतके ठार ! इतके जखमी !

अपघात ! रोज अपघात घडत आहेत आणि त्यांची संख्या कमी न होता वाढत आहे. अपघातांचे स्वरूपही अधिकाधिक भीषण होत आहे. एखाद दुसरा ठार किंवा जखमी होतो असे नसून कित्येक दशक व्यक्तींचे समुदाय ठार व जखमी होत आहेत. वर्तमानपत्रे आहेत म्हणून आपल्याला काही अपघात कळतात तरी. प्रकाशात न येणारेही अनेक अपघात घडत असण्याचा संभव आहे.

आपण सामान्य वाचक; अधिकारहीन, साधनहीन, असहाय, वाचून उसासे टाकणे, मृतांना सद्गती चिंतणे, जखमींना आरोग्य इच्छिणे, परिचितांवर आपत्ती आलेली असल्यास त्यांच्या कुटुंबियांना यथाशक्ती मदत करणे—एवढे आपण करू शकतो. ते तरी अवश्य करावे.

ड्रायव्हरला पकडणे, पंचनामा करणे इ. कर्तव्ये पोलिस खाते करते. पुढे काय होते--राम जाणे !

आधुनिक जीवनातील, या अपरिहार्य, पण काही प्रमाणात सावधगिरीने परिहार्य अशा विभागाकडे शासनाने अधिक गंभीरपणे पहायला हवे. कारण जलद वाहतूक व यंत्रवाद हा आजच्या युगातील महत्त्वाचा भाग झाला आहे. यापुढे यांत्रिक वहातूक अधिक वाढणार, त्यांचे वेग वाढणार, या व्यवहारात अगदी सामान्य व अल्पशिक्षित लोक अधिकाधिक प्रमाणात येणार, हे निश्चित आहे, ही वस्तुस्थिती जमेस धरून अशा परिस्थितीतून निर्माण होणारे अपघात कमी करून, मानवी जीवित अधिक सुरक्षित कसे करता येईल याचा विचार सर्व पक्षांच्या सहकार्याने त्या त्या वेळी अधिकारात असलेल्या शासनाने करावा. न केल्यास ते नालायक आहे असे मानावे.

केवळ याच विषयाकरता एक चौकशी समिती नेमून तिच्याकडून आजच्या वस्तुस्थितीचा अभ्यास व दीर्घकाल उपयोगी पडणाऱ्या विधायक सूचना करण्याचे काम द्यावे. त्यात संबंधित सर्व खात्यात अनुभवी तज्ज्ञ असावेत. विधिमंडळ, मार्ग विभाग, परिवहन विभाग, परवानगी विभाग, वाहन संचालक, वाहक (ड्रायव्हर) संघ इ. सर्वांचे प्रतिनिधी असावेत, किंवा त्यांच्या अनुभवाचे संकलन करवून घेऊन त्याचा उपयोग करावा.

केवळ याच विषयाकरता एक खास विभाग व मंत्री नेमावा इतके महत्त्व या विषयाला आले आहे व येणार आहे. यापुढे वेगात चुरस, वेळबचतीची मनोवृत्ती, द्रव्य-प्राप्तीपुढे इतरांच्या प्राणाची वेपर्वाई इ. गोष्टी वाढणार आहेत. त्यांना आळा घालून मानवी जीविताला महत्त्व देण्याची वृत्ती कशी निर्माण करावी हा मूलभूत महत्त्वाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण होणार आहे.

केवळ पोलिसी कारवाईत वाढ, नियमात व कायद्यात बदल करून कार्यभाग साधणार नाही. यंत्र चालवणाऱ्या व्यक्तींच्या मनोवृत्तींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यायला हवे. यापुढे हे वाहन व्यवसाय वाढणार असून त्यात अल्प शिक्षितांचा अधिकाधिक भरणा होणार आहे. त्यांचे शिक्षण हा महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग आहे. अपघात का होतात, कसे होतात, बळी पडलेल्या जखमींचे जीवन कसे बरबाद होते, मृतांच्या कुटुंबाची कशी वाताहत होते इ. परिणाम उदाहरणे, चित्रपट, अपघातात व्यक्तींचे अनुभव इ. अनेक मार्गांनी त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजेत. अपघातामुळे विधवा झालेल्या बाया, पोरकी झालेली मुले, मातृहीन अर्भके, त्यांचे होत असलेले हाल या व्यवसायातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपाने दाखविले पाहिजेत.

मद्यपान, जागरण, अतिश्रम यांचा अपघाताशी निकटचा संबंध, मानवी जीविताची आपल्यावरील जबाबदारी इ. गोष्टी त्यांच्या मनावर ठसवल्या पाहिजेत. बेजबाबदार, व्यसनी, निष्काळजी व्यक्ती या व्यवसायातून वगळण्याच्या, आणि निर्व्यसनी, जबाबदार, सावधान चित्ताची माणसे निवडण्याच्या काही कसोट्या तयार केल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या शैक्षणिक कार्याला अग्रस्थान दिले पाहिजे व त्याला पूरक म्हणून कायदे, नियम, नियंत्रणे, इत्यादी तांत्रिक उपाय यांचाही अवलंब केला पाहिजे.

सारांश, यापुढे इतके ठार ! इतके जखमी ! असे आम्ही किती वर्षे वाचीत बसायचे ? आमच्या जीविताला काही मोल आहे की नाही ? ते निश्चित आहे; पण या सत्याची जाणीव शासनात असलेले, जाणारे व त्याशी संबंधित असलेले, या सर्वांनी ठेवावी व काही परिणामकारक कृती करून दीर्घकालीन उपाय योजावेत. वीसपंचवीस वर्षांनी असा हा लेख अनवश्यक वाटावा अशी कृती हवी. केवळ हेच कार्य एखाद्या विधिमंडळ सभासदाने, मंत्र्याने किंवा सेवानिवृत्त अनुभवी शासकीय अधिकाऱ्याने अंगावर घेऊन ते तडीला नेल्यास त्याचे नाव अजरामर होईल.

[१२-५-१९८०

५०. चूक दाखवावी, पण कशी ?

प्रत्येक माणूस चुका करीतच असतो. त्याला पालक-बालक, लहान-मोठा, वरिष्ठ-कनिष्ठ, साक्षर-निरक्षर, अधिकारी-नोकर असा कोणत्याच प्रकारचा अपवाद नाही. प्रत्येकाने आपल्या पूर्वजीवनाचे सिंहावलोकन केले तर बालपणी, किशोरवयात, तारुण्यात, मध्यमवयात व वार्धक्यातही केलेल्या चुकांची जाणीव होईल. पण आपण असे आत्मचिंतन कधी करीतच नाही. त्यामुळे इतरांच्या चुका दिसतात, पण त्याच आपणही कधीकाळी केलेल्या असतात हे लक्षात येत नाही. इतरांच्या चुका त्यांना अवश्य दाखवाव्यात, पण त्या कशा ?

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतरांची चूक दाखवणाराच्या ठिकाणी सद्‌बुद्धी, शुद्ध हेतू, दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणाची इच्छा, तो सुधारावा अशी आस्था, त्याच्याविषयी सहानुभूती, अशा भावना व वृत्ती असाव्यात. त्याची अवहेलना करणे, मानखंडना करणे, त्याला तुच्छ लेखणे, आपले श्रेष्ठत्व व त्याचे हीनत्व दाखवणे, त्याच्याविषयी तिरस्कार व्यक्त करणे, अशी वृत्ती नसावी. चूक करणाऱ्या माणसाला असा भरंवसा वाटला पाहिजे की, चूक दाखवणाराला माझी सुधारणा व्हावी, प्रगती व्हावी, कल्याण व्हावे, अशी तळमळ आहे. हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे हे मी स्वतःच्या अनुभवाने सांगतो. सदिच्छाप्रेरित सूचनांचाच नव्हे, तर शिक्षेचाही परिणाम जन्मभर राहातो व त्या करणाराविषयी कृतज्ञता राहाते. उलट सहानुभूति-विरहित सूचनांच्या विरुद्ध माणसाची प्रतिक्रिया होते. चूक असेल, ती खरीही असेल, पण ती कशा रीतीने दाखवली जाते याला फार महत्त्व आहे.

एखाद्याची चूक चार चौघात दाखवू नये. विशेषतः समान किंवा कनिष्ठ व्यक्तींच्या देखत तर कधीच तिची वाच्यता करू नये. त्यामुळे माणूस अपमानित होतो व त्याचा स्वाभिमान दुखवला जातो. तसेच ज्या प्रसंगी चूक होते त्याच वेळी ती दाखवू नये. त्यामुळे दुसरा माणूस आपणच बरोबर आहोत असे आत्मसमर्थन करतो. तो प्रसंग होऊन गेल्यावर एकांतात, दोघांनीच बसून, त्या प्रसंगीच्या चुकीबद्दल चर्चा करून योग्य त्या सुधारणा सुचवाव्यात. चुकीचा परिणाम त्या कामावर, त्या व्यक्तीवर, तिच्या भावी जीवनावर, समाजावर व संबंधित अन्य घटकांवर काय होतो ते शांतपणे समजाऊन सांगावे. दुसऱ्याच्या चुकीमुळे तुमच्या मनाचा तोल व शांती जाता कामा नये. शांतपणे, निर्विकार वृत्तीने केलेल्या सूचनांचे स्वागत होते. रागाने, तिरस्काराने, आढ्यतेने केलेल्या सूचनांविषयी प्रतिकूल भावना निर्माण होते. चूक

दाखवणाराची मनःस्थिती परिणामाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे.

वरील सर्व पथ्ये सांभाळूनही तुम्ही केलेल्या सूचनांचा नेहमीच स्वीकार होईल व दुसरा सुधारेल असे सर्वांच्या बाबतीत घडणार नाही. काही लोक सूचना पचवूनही चुका करीत राहातील. त्यांच्या बाबतीत अधिक कडक भाषा व कृती करण्याची तयारी हवी. तशी पूर्वीच जाणीव द्यावी. पण कडक कृती व सूचना करताना आपली वृत्ती शांत हवी. सूड घेण्याकरता अन्यायाने ही कृती होत आहे असे कोणालाही वाटता कामा नये. विशेषतः चूक करणाऱ्या व्यक्तीच्या कनिष्ठ व समान पातळीवर जी माणसे असतील त्यांनाही न्याय झाल्यासारखे वाटले पाहिजे. नाही तर शिक्षा झालेली चूक करणारी व्यक्तीच सहानुभूती मिळवून बसते आणि सूचना व सुधारणा करणारा सर्वांचा शत्रू ठरतो. इतरांच्या देखतही त्या चुकीचे व्यक्तीवर व कामावर दूरवर होणारे परिणाम सांगितले पाहिजेत.

हे सर्व विवेचन फार मोघम व तात्त्विक झाल्यासारखे वाटेल. एखाद्याच्या चुकीचा किंवा तुमच्याच चुकीचा प्रसंग मनात आणून या सूचनांचा विचार करा म्हणजे त्यांची उपयुक्तता व गरज लक्षात येईल. हे विवेचन पालक, शिक्षक, वडिल माणसे, श्रेष्ठ अधिकारी, मालक, अशा सर्वांना उपयोगी पडणारे आहे. त्याचा उपयोग केल्यास माणसा-माणसातील संबंध सुधारतील व घर्षणाचे आणि संघर्षाचे प्रसंग कमी येतील. तितकेच दोन्ही बाजूंच्या व्यक्तींना सुख होईल व मनःशांती लाभेल.

[१५-६-१९८०

५१. मनःशांती विकू नका

सर्व प्राणिमात्र आपल्या शारीरिक गरजा भागवण्यात आणि मानसिक सुखे संपादन करण्यात गुंतलेले दिसतात. दुःख टाळावे आणि सुख संपादन करावे असा आपला प्रत्येकाचा प्रयत्न चाललेला आहे. हा जगाचा नियम आहे. मुके प्राणी त्या त्या वेळी आपल्या गरजा भागवून सुख भोगतात. मानवाची स्थिती निराळी आहे. तो आपल्या तात्कालिक गरजा भागवण्याकरता द्रव्य संपादन करतो आणि भावी काळातील सुखे भोगण्याकरता शक्य तेवढा द्रव्यसंचय करून ठेवण्याकरता धडपडतो. नित्याचा योगक्षेम भागावा आणि भावी काळ ऐषआरामात जावा, सुख मिळावे, शांती मिळावी अशी त्याची इच्छा असते.

ही द्रव्य-प्राप्ती व हा द्रव्य-संचय सन्मार्गाने, न्यायनीतीने, धर्माने केलेला असेल तरच त्याला त्या संचयामुळे सुख आणि शांती यांचा लाभ होईल. पण अति द्रव्यसंचयाच्या लोभाने माणूस अन्याय, अनीती, अधर्म, समाजद्रोह, वाममार्ग, भ्रष्टाचार, अपहरण, हिंसा, असत्य यांचा आश्रय घेऊन भावी काळाची व्यवस्था करतो. असे करण्याने तो द्रव्य मिळवतो आणि आपले सुख व शांती यांची विक्री करतो. वाममार्गाच्या द्रव्यात सुख व शांती नाही हे सत्य त्याला फार उशिरा अनुभवाला येते.

अशी माणसे इतरांचे दृष्टीने सुखात व ऐषआरामात आहेत असे दिसते. पण अंतर्यामी त्यांना त्यांची पूर्वीची अपकृत्ये व पापे कुरतडत असतात, बोचत असतात. त्यामुळे सुखाची सर्व साधने आहेत पण शांती व सुख नाही अशी स्थिती होते. मनःशांतीवाचून सुख नाही.

अशान्तस्य कुतः सुखम् ? शांतीवाचुनि नसे सुख-प्राप्ती ।।

[२७–७–१९८०

५२. जशास तसे ! पण सर्वत्र नको

काही म्हणी मोठचा आकर्षक, गोड आणि सार्वत्रिक असतात, म्हणून त्या सत्याचा भास निर्माण करतात. प्रत्येक म्हणीत काही सत्य असते, पण बरेच वेळा अर्धसत्यही असते. सर्व परिस्थितीत, प्रसंगात व संबंधात ते सत्य ठरेल, व व्यवहारात हितावह होईल, असे नाही. अशा म्हणींपैकी, जशास तसे, शठं प्रति शाठचम्, टिट फॉर टॅट, अरेला कारे, या अर्थाच्या म्हणी आहेत.

दोन व्यक्ती किंवा समुदाय यांच्या परस्परांच्या वर्तनाविषयी ही म्हण आहे, पण तिचा वापर करताना या दोन व्यक्तींचे नाते काय, ते किती काळ राहणारे आहे, त्यांना किती काळ परस्परांच्या सहवासात राहावयाचे आहे, त्यांना परस्परांची गरज किती आहे, त्यांचे दर्जा व संबंध काय आहेत, त्यांच्या सहकाराने काय हित व कल्याण साधेल, व असहकाराने व कलहाने कोणाचे किती व किती काळाचे नुकसान होणार आहे, या सर्व गोष्टींचा विचार करणे अगत्याचे आहे.

कुटुंबात सर्व नातेवाईक एकत्र राहात असतात. त्यांत आई-बाप, मुले-मुली,

बहीण-भाऊ, बहिणी-बहिणी, इत्यादी अनेक प्रकारची नाती असतात. कुटुंबात शांतता राहण्याकरता या सर्वांचे प्रेमाचे, मायेचे व आपुलकीचे संबंध हवेत. तसे ते राहिले तरच सर्वांना सुख मिळेल. तसे राहिले नाहीत तर त्या कुटुंबात सतत कलह, कचकच, धुसफूस, अप्रिय भाषणे, अबोला, रुसवे फुगवे यांचा प्रभाव राहील. माणसे एकत्र राहिली म्हणजे एखाद्या प्रसंगी व्यक्तीची काही तरी चूक होते व त्यामुळे तिच्या वर्तनाने व बोलण्याने दुसरी व्यक्ती नाराज होते. अशा वेळी त्या दोन व्यक्ती सतत एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या व उणे-दुणे काढीत राहिल्या तर दोघांनाही सुख होणार नाही. याच्या उलट त्या व्यक्तींपैकी एखाद्या व्यक्तीने 'जशास तसे' धोरण न ठेवता, 'सूडाचे व बदला घेण्याचे' धोरण न ठेवता, 'झाले गेले विसरून जा', 'क्षमाशील वृत्ती ठेवा', 'औदार्य दाखवा', 'मन मोठे करा', असे धोरण ठेवले तर ते उभयतांना व सर्व कुटुंबालाही हितावह होईल. असे करण्यात काही वेळा थोडी पड खावी लागते, कमीपणा घ्यावा लागतो, अप्रिय गोष्ट सहन करावी लागते, ही गोष्ट खरी. पण या लहान त्यागाने फायदा किती मोठा होतो हा विचार महत्त्वाचा आहे. त्या दोन व्यक्तींचे संबंध सुधारतात व ते दोघांनाही जीवनात हितावह होतात. त्यामुळे इतरांनाही सुख मिळते. जी वृत्ती कौटुंबिक जीवनात उपयोगी पडते, तीच मैत्रीत, सार्वजनिक जीवनात, व्यवसायात व राजकारणातही उपयोगी पडेल. मुख्य म्हणजे जोपर्यंत दोन व्यक्तींचे हित एकच आहे, जोपर्यंत त्यांच्यात शत्रुत्व नाही व एक दुसऱ्याला नष्ट करण्याला टपलेला नाही, जोपर्यंत दोन व्यक्तींचे ध्येय व साध्य एक आहे, तोपर्यंत व्यक्तींनी व पक्षांनी सूडाचे धोरण ठेवण्यापेक्षा क्षमाशीलतेचे धोरण ठेवणे व्यक्तींच्या, समाजाच्या व देशाच्या हिताचे आहे. जेथे दोन देशांत शत्रुत्व असते तेथे 'जशास तसे' वागणे हा राजकारणाचा भाग आहे. कुटुंबात, समाजात व देशात राहणाऱ्या व्यक्ती एकमेकांना नष्ट करायला निघालेल्या नाहीत, अशा प्रसंगी सूडाच्या बुद्धीपेक्षा क्षमाशीलतेची वृत्ती ठेवणे हितावह ठरेल.

'जशास तसे' ला जशी 'क्षमाशीलते' ची मर्यादा आहे, तशी क्षमावृत्तीलाही मर्यादा आहेच. क्षमाशील व सहनशील व्यक्तीला किंवा पक्षाला तिच्या चांगुलपणाचा प्रतिसाद दुसऱ्या बाजूकडून मिळाला नाही तर क्षमाशीलता बाजूला ठेवून आपले तेज दाखवणे हेही अगत्याचे आहे. क्षमेच्या मागे प्रतिकाराची शक्ती आहे हेही सिद्ध करायला हवे. प्रतिकाराचे सामर्थ्य असून एकदोन वेळी, दुसऱ्या बाजूचे धोरण सुधारेपर्यंत, क्षमाशील वृत्ती दाखवणे हा सद्गुण आहे; पण सतत पड खाणे हा कमकुवतपणा आहे. सारांश, दुसऱ्याला सुधारण्याची संधी द्या.

व्यक्ति-व्यक्तींचे संबंध सुधारण्याचे दृष्टीने व दोन्ही बाजूंना सुख व शांती मिळण्याचे दृष्टीने प्रथम क्षमाशीलता, आणि तिचा उपयोग नच झाल्यास आवश्यक प्रति-



कार, अशी वृत्ती ठेवल्यास कुटुंबात, समाजात व राजकारणात सर्वांचे हित होईल.

भारतीय आदर्श जीवनात दया, क्षमा व शांती या तीन गुणांना फार महत्त्व दिलेले आहे. ते सतत लक्षात असावे. [१५–५–१९८०

५३. आरशाचा पुरा उपयोग करा

जगातील अनेक शोधांत आरशाचा शोध अत्यंत उपयुक्त आहे. पण या आरशाचा पुरेसा उपयोग आपण करून घेत नाही असे मला वाटते. शेकडा ९० इतका आरसा वाया जातो !

बहुसंख्य लोक आपला चेहेरा सुंदर दिसण्याकरता व तो कसा आहे हे पाहण्याकरता आरशाचा उपयोग करतात. केसांचे वळण, दाढीची ठेवण किंवा काढण, पावडर, लिपस्टिक, इत्यादी प्रसाधनांनी अलंकरण, अशा काही थोड्या गोष्टींकरताच आरसा वापरला जातो. एक राहिले. कपडे घातल्यानंतर किंवा नेसल्यानंतर आपण किती रुबाबदार किंवा आकर्षक दिसतो ते पाहण्याकरता आरशाचा फार उपयोग होतो. आपण आरशात पहातो तेव्हा आपला चेहेरा, जो आपण मुद्दाम आनंदी रुबाबदार असा धारण करतो, तोही आपल्याला दिसतो व आपल्या आनंदाचे व आत्मविश्वासाचे पोषण करतो.

आरशापासून दूर गेल्यानंतर आपला चेहेरा इतरांना कसा असेल ते आपण त्या वेळी आरशात पाहू शकत नाही. कुटुंबात, कचेरीत, वरिष्ठांपुढे, कनिष्ठांपुढे, चारचौघांत, सभेत स्वागत झाल्यावर, अपमान झाल्यावर, यश मिळाल्यावर, अपयश आल्यावर, इत्यादी अनेक प्रसंगी आपला चेहेरा कसा दिसत असेल ते त्या त्या प्रसंगांची कल्पना करून आपण आरशात पाहू शकतो. प्रसन्नता, राग, द्वेष, दुःख, निराशा, तिरस्कार, उपहास, गर्व, स्वाभिमान, अहंकार, तिरसटपणा, मत्सर इत्यादी अनेक भाव मुखावर आणून आपण कसे दिसतो ते पहा. मग त्या वेळी इतरांचे आपल्याविषयी काय मत होत असेल याचाही विचार करा. प्रत्येकाने आपली व्यक्तिमत्त्वाची काही आदर्श अशी प्रतिमा धारण करून ती आरशात पहावी. ती वारंवार मनात आणावी. निजताना तीं आठवावी. जाग आल्यावर आठवावी. दिवसा सवड मिळेल तेव्हा आठवावी व तशी मुद्रा त्या त्या वेळीच नव्हे, सतत धारण करावी. तुमच्या सामाजिक

व्यक्तिमत्त्वात कालांतराने फरक झालेला इतरांना जाणवेल व त्यांच्या बोलण्यावरून तुम्हाला कळून येईल. लोकांना प्रसन्न, आनंदी, समाधानी अशा व्यक्ती आवडतात. तसे आपण दिसावे असे वाटत असल्यास त्या वृत्ती व भावना सतत मनात आणा म्हणजे त्यांचे प्रतिबिंब आपोआप तुमच्या मुखावर दिसेल. त्यामुळे जगातील आनंदात तुम्ही भर घालाल. हेही एक लहानसे पण उपयुक्त असे सामाजिक कार्यच आहे.

केवळ सौंदर्य व भावना याशिवाय आपल्या आरोग्याच्या दृष्टीनेही आपण आरशाचा उपयोग करू शकतो. आपले दात आणि जीभ पहा. डोळेही पहा. ते आपल्या पचनाची व रक्ताची काय स्थिती आहे ते सांगतील. जे डॉक्टर पहातात ते तुम्हाला नाही का रोज पहाता येणार ? सिगारेट-विड्या ओढून आपले ओठ व जीभ यांच्यावर किती काजळी साचली आहे तेही पहा. वारंवार पान-तंबाखू चघळून आपल्या जिभेची, दातांची व गालाच्या आतील त्वचेची काय अवस्था झाली आहे तेही पहा. कॅन्सर झाल्यावर धायाधाव करण्यापेक्षा वेळचे वेळीच काळजी घेतली तर हजारो रुपये, नातेवाईकांचे श्रम आणि तुमचे प्राण वाचतील. 'धूम्रपान आरोग्यास अपायकारक आहे' हा जाहिरातीतील मजकूर पाव इंचाचा असतो, तर सिगारेटच्या गुणांची जाहिरात त्याच्या शंभरपट असते ! पण आरशातील जाहिरात तुमचे भविष्य अचूकपणाने सांगेल.

आता संपूर्ण देह मागून पुढून नीट पहा. अनेक व्यक्ती चेहेऱ्याने देखण्या असतात पण देहाने अगदी बेडौल असतात. अनेक भागांवर अनावश्यक मेद साचलेला आढळून येईल. गळ्याखाली, पोटावर, पाठीवर, कमरेवर ही मेदश्री विराजमान झाली असेल तर वेळीच इलाज करा. हे मेदाचे गोळे हृदयावर केव्हा गोळीबार करतील ते सांगता येत नाही. आपला देह व्यायामाने प्रमाणबद्ध झालेला आहे का अति-आहाराने बेडौल झाला आहे ते पहा. आजच व्यायामाला प्रारंभ करा आणि आहार योग्य प्रमाणात घ्या, असा आरशाचा सल्ला मिळेल, त्याला मान द्या.

जगाला आपण कसे दिसतो व आपण खरोखरी कसे आहोत हे प्रामाणिकपणे सांगणारा आरशासारखा मित्र नाही. त्याच्यावर व तो पाहणाऱ्या तुमच्या मनावर धूळ आणि घाण साठू देऊ नका म्हणजे आरसा व मन दोन्ही निर्मल राहतील.

[१४-९-१९८०

□ □ □

५४. सज्जनांना जगू द्या तरी !

प्रत्येक युगाचे एकेक वैशिष्टय असते. सत्ययुग, धर्मयुग, कलियुग इ. नावे त्यांना दिली जातात. आज भ्रष्टाचार युग किंवा लंचावतार युग अवतीर्ण झाले आहे. पंतप्रधानापासून पट्टेवाल्यापर्यंत सर्व समाजाला त्याची जाणीव झाली आहे. पण कोणी या दुष्ट चक्रातून व्यक्तीला व समाजाला सोडवू शकत नाही. तसे उत्तुंग व्यक्तिमत्त्वच आज अस्तित्वात नाही, पण ते यावे असे मात्र सर्वांना मनोमन वाटते, हाच एक आशेचा किरण आहे. भ्रष्टाचारी माणसे ही काहीशी अनिच्छेने व नाइलाजानेच त्या मार्गाकडे वळलेली असतात. त्यांना एक विनंती व प्रार्थना करावीशी वाटते. अगदी हात जोडून व पाया पडून त्यांच्याकडे एकच मागणे आहे—सभ्य गृहस्थांनो, सज्जनांना सद्वर्तनाने व सदाचाराने निदान जगू द्या तरी ! त्यांना नीति-न्यायाने वागणे अशक्य आणि असह्य करू नका. चारित्र्यवान व निर्मल शीलाच्या माणसाला आज समाजात राहाणे असह्य होत चालले आहे. आपलेच चुकत नाही ना असे त्यांनाही वाटायला लागले आहे; हे काही बरे लक्षण नाही.

परवाच माझ्याकडे एक पालक जोडपे आले होते. त्यांचा प्रश्न असा– " आम्ही आपल्या मुलांना सदाचाराने वागायला सांगतो, यात आमचेच काही चुकत नाही ना ? पुढे जीवनात मुले आम्हांलाच गुन्हेगार समजतील का ? त्यांचे जीवन अयशस्वी होऊन वाया जाईल का ? " काय उत्तर या प्रश्नांना ! सरकारी नोकरीत वा अन्यत्र काम करणाऱ्या सज्जनांचीही अशी अनेक पत्रे येतात. " लाचलुचपतीत मी भागीदार होऊन आपला वाटा घेतला नाही तर इतर लोक माझा द्वेष करतात. मला नोकरीत राहाणे असह्य करतात. मी काय करावे ? "

भ्रष्टाचारी माणसांनाही आपल्या पापाची टोचणी असते, आणि सज्जनांविषयी त्यांना आदर व भीती असते. समाजात सदाचाराचे युग यावे असे त्यांनाही वाटत असते. त्यांनी सदाचारी माणसांना शांतपणाने जगू दिले, त्यांच्या मार्गात विघ्ने न आणता त्यांना सुरक्षितपणे संसार करू दिला, तर निदान सदाचाराचे बीज तरी जिवंत राहील. एखादा चांगला नेता मिळाला तर तो समाजाचे वातावरण बदलून टाकील. त्याला मदत करणारी, पाठिंबा देणारी, चार चांगली माणसे व चांगले विचार जिवंत राहू द्या. ते जिवंत राहिले तर हेही दिवस जातील व समाजाचे वातावरण सुधारेल. बीजाचा महावृक्ष होईल.

[१९-१०-८०

□ □ □

५५. कुटुंबावर गीतेचा प्रभाव

चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी सुशिक्षित समाजातील कुटुंबात गीतेचे पाठांतर ऐकू येत असे. ती प्रथा गेल्या चाळीस वर्षांत नामशेष झाली आहे. पूर्वीसारखे थोडेबहुत पाठांतर मुले बक्षिसाकरता करतात पण ते तेथेच संपते. विचार-आचाराचे दृष्टीने गीतेचा प्रभाव आपल्या कौटुंबिक जीवनावर पडलेला नाही, हे सत्य आहे.

गीता एक धार्मिक ग्रंथ मानला जातो. आत्मज्ञान, अध्यात्म, भक्ती, मोक्ष, इत्यादी तत्त्वे गीतेत आहेत अशी सामान्य कल्पना आहे. दैनंदिन जीवनात तिचा काही उपयोग आहे याची जाणीव आपल्या कुटुंबप्रमुखात व सुशिक्षित आईबापांच्याही ठिकाणी नाही. त्या दृष्टीने त्यांनी गीतेकडे पाहिले नाही आणि ती दृष्टीही फारशी कोणी दिलेली नाही. एक सुभाषितसंग्रह म्हणून फार तर तिचा उपयोग होतो. खरोखर गीतेचा उपयोग कौटुंबिक जीवनात फार मोठा आहे. तो करून घ्यायचा असेल तर आईबापांना गीतेची थोडीतरी तोंडओळख हवी. 'गीतेत काय आहे?' असा प्रश्न मुलांनी विचारला तर तुम्ही उत्तर सांगू शकाल का ? किती पालक उत्तर देऊ शकतील ? हे उत्तर देण्याइतकी तरी आपली तयारी हवी, या दृष्टीने गीता वाचा. ती कठीण नाही. एकदा तिच्या वाचनाची दृष्टी आली की तुम्हालाही समजेल. फार मोठे ग्रंथ वाचायला नकोत. येथे थोडक्यात गीतेची रूपरेषा सांगतो म्हणजे तिचा उपयोग कळेल.

गीतेतील मुख्य प्रश्न आहेत सुख-दुःख आणि पाप-पुण्य. आपण सुखी कसे होऊ व दुःखे कमी कशी होतील हा महत्त्वाचा एक विचार गीतेत आहे. दुसरा पाप-पुण्याचा, म्हणजे सदाचार-दुराचाराचा. माणूस सदाचारी कसा राहील व दुराचारापासून दूर कसा राहील हा दुसरा प्रश्न आहे. हेच प्रश्न कुटुंबात आहेत व समाजातही आहेत. आज सगळ्या जगात तेच प्रश्न आहेत. त्यांना गीतेत उत्तर आहे. माणसा, तुझ्या दुःखाचे व पापाचे मूळ तुझ्या स्वभावात आहे. तो स्वभाव सुधार म्हणजे सुखी होशील व सदाचारी राहशील. स्वभाव सुधारायचा म्हणजे काय ? स्वभावात अनेक मनोवृत्ती असतात. त्यांतल्या अनिष्ट मनोवृत्ती हळूहळू कमी करावयाच्या व इष्ट वृत्तींचे आपल्या स्वभावात, कुटुंबात संगोपन करायचे, यालाच गीतेने 'योग' असे तांत्रिक नाव दिले आहे. गीतेची एवढी तोंडओळख तुम्ही मुलांना सहज करून देऊ शकाल, नाही का ? ती वयाच्या मानाने मुलांना पुरेशी आहे. तुम्ही मात्र अधिक वाचा.

अशा इष्ट-अनिष्ट मनोवृत्तींच्या याद्याच गीतेत दिल्या आहेत; आणि चांगल्या

वृत्ती संपादन केलेली व्यक्ती कशी असते तिचीही अनेक वर्णने मुखोद्‌गत करण्यासारखी आहेत. चांगल्या मनोवृत्तींना दैवी किंवा सात्त्विक वृत्ती म्हणतात. वाईट वृत्तींना आसुरी किंवा राजस-तामस वृत्ती अशी नावे आहेत.

मुलांच्या व आपल्या ठिकाणी चांगल्या वाईट मनोवृत्ती या, काही जन्मापासूनच असतात तर काहींची नंतर वाढ किंवा घट होते. ज्या कुटुंबात इष्ट मनोवृत्तींचे संवर्धन केले जाते ते सुसंस्कृत कुटुंब समजले जाते. त्यातील तरुण पिढीही कर्तबगार व सदाचारी निघते. कुटुंबात अनेक मनोवृत्तींच्या व्यक्ती असतात. तापट, चिडखोर, सौम्य, शांत, स्वार्थी, अहंकारी, त्यागी, परोपकारी, स्वैर, संयमी. या व्यक्तींच्या चांगल्या वृत्तींना उत्तेजन देणे व अनिष्ट वृत्तीचे निर्मूलन करणे हे पालकांचे काम आहे. सर्वच कुटुंबांकरता मी एक पंचशील कार्यक्रम सुचवतो. त्यात फेरबदल करून पालकांनी त्याचा आपापल्या कुटुंबात प्रयोग करून पाहावा. अपाय होणार नाही. फायदाच होईल. मुलांच्या जन्मभर लक्षात राहील असा फायदा होईल.

गीता-पंचशील कार्यक्रमात मी इष्ट-अनिष्ट मनोवृत्तींच्या पाच जोड्या देत आहे. कुटुंबातील व्यक्तींनी या पाच वृत्तींपैकी सर्व किंवा ३–४ मनोवृत्ती आपल्या स्वभावात आणाव्यात व त्याकरिता सर्वांनी एकमेकांना मदत करावी असे ठरवावे. प्रथम जड जाईल पण जाणीव होईल. जाणीव ही सुधारणेची पहिली पायरी. पुढे वर्षभर प्रत्येकाने स्वभावात सुधारणा करीत राहावे.

शांती, प्रेम, त्याग, संयम व अहिंसा या पाच इष्ट मनोवृत्ती; त्यांच्या अगदी उलट क्रोध, द्वेष, स्वार्थ, स्वैरता व हिंसा या अनिष्ट मनोवृत्ती. कुटुंबात इष्ट-अनिष्ट मनोवृत्तींच्या व्यापाराचे अनेक प्रसंग येतात. त्या त्या प्रसंगी इष्ट मनोवृत्ती ठेवून वर्तन करणे हे महत्त्वाचे आहे. यालाच कर्मयोग असे नाव आहे. सद्‌वृत्तीने केलेले वर्तन तोच कर्मयोग.

क्रोध आणि शांती ही जोडी घ्या. अनेक प्रसंगी आपण स्वतः निष्कारण रागावतो, चिडतो, तापटपणाने वागतो. मुलेही तसेच करतात. अशा वेळी मन शांत ठेवण्याचा निश्चय करावा व तो पाळावा. यामुळे कुटुंबातल्या सुखात पुष्कळ वाढ होईल!

प्रेम आणि द्वेष ही दुसरी जोडी. घरातली भावंडे एकमेकांशी वागताना या वृती दिसून येतात. त्यांना राम-लक्ष्मण-भरत यांच्या बंधुप्रेमाचे व कौरव पांडवांच्या बंधुद्वेषांचे उदाहरण सांगावे.

त्याग आणि स्वार्थ या वृत्तीही जन्मापासून असतात किंवा पुढे वाढतात-घटतात. दोन्ही वृत्तींच्या वापराला घरातल्या वातावरणात फार मोठा वाव आहे. विचार करा की लक्षात येईल. संयम आणि स्वैरता ही चौथी जोडी. खाणे-पिणे, झोपणे-जागरणे, बोलणे, वागणे, इ. सर्व क्रियांत आत्मसंयम हवा. मनावर ताबा हवा. ज्याने आपले मन जिंकले त्याने जग जिंकले. आपल्या मनावर ज्याचा ताबा नाही तो माणूस जीवनात अप्रिय, अयशस्वी, असमाधानी, व्यसनी आणि रोगी असा राहील. अशी अनेक उदाहरणे भोवताली दिसतील. संयम गेला की जीवनच वाया गेले.

हिंसा-अहिंसा ही पाचवी जोडी फार महत्त्वाची आहे. लहान-सहान गोष्टीवरून नवरा बायकोला मारतो, आई-बाप मुलांना मारतात, भावंडे एकमेकांना मारतात. ही बालपणाची वृत्तीच पुढे चाकू-मारीत व खुनासारखे गुन्हे करण्याच्या वृत्तीपर्यंत वाढते हे लक्षात ठेवावे, व वेळीच आळा घालावा.

गीतेतील ईश्वर, भक्ती, आत्मदर्शन, संन्यास इ. उच्च गोष्टी सध्या बाजूला ठेवून या साध्या गोष्टींवर आपण भर दिला तर आपले कुटुंब सुखी होईल. मुले सदाचारी निघतील व समाजाची नैतिक पातळी वाढेल. सदाचार व सद्वृत्ती या ईश्वराकडे नेणाऱ्या पायऱ्याच आहेत. त्या चढून गेल्याशिवाय मोक्ष वगैरे काही नाही. त्या चढून गेल्यावर माणूस व ईश्वर यांत भेदच नाही. माणूसच ईश्वर होतो !

आजपर्यंत गीतेला आपण मागील दाराने घालवून दिली, आणि नको ते वाङ्मय घरात घेतले. आता गीतेला सन्मानाने पुढील दाराने आणा आणि एक वर्षभर तरी संधी द्या.

गिव्ह हर ए चान्स अॅट लीस्ट फॉर ए इयर ! [जाने–फेब्रु. १९८१

५६. तंत्रज्ञानाला तत्त्वज्ञानाची जोड

बौद्धिक शिक्षणाला व्यावसायिक ज्ञानाची जोड मिळावी म्हणून आज तंत्र-शिक्षणाच्या खाजगी व सरकारी संस्थांची वाढ होत आहे. परंतु तंत्रज्ञानाच्या जोडीला वर्तनशास्त्राचे व तत्त्वज्ञानाचेही शिक्षण दिले पाहिजे, या गोष्टीची जाणीव अद्याप विचारवंतांमध्ये झालेली नाही. पाश्चिमात्य देशांचा अनुभव जाणून घेऊन आजच

आपल्या तंत्रज्ञान शिक्षणाला एकांगी न होऊ देण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. पाश्चिमात्य देशांत तंत्रज्ञानाच्या वाढीने सुबत्ता वाढली आहे, राहणीमान उंचावले आहे, वस्तूंची रेलचेल झाली आहे ; सारांश, ऐहिक जीवनाच्या दृष्टीने खूप संपन्नता आली आहे. पण माणूस फारसा सुधारलेला नाही, आणि माणुसकी व नीतिमत्ता यांत वाढ न होता घटच झाली आहे ! ऐहिक सुबता असली तरी माणूस सुखी व शांत नाही. त्याच्या मनाला समाधान नाही. मनःशांती मिळवण्याच्या नादात तो गुरू, बोवा, महाराज, स्वामी यांच्या शोधात आहे. दुसरा एक वर्ग केवळ इंद्रियप्रधान सुखाच्या शोधात व भोगात गर्क आहे. व्यसने, बलात्कार, चोऱ्या, दरोडे, खून, अपघात यांचे प्रमाण वाढत आहे. काही लोक या भौतिक सुधारणेला कंटाळून तिच्यापासून दूर जाऊ इच्छित आहेत. माणसाला भीती वाटत आहे. केवळ एकांगी तांत्रिक सुधारणेमुळे व मानसिक संस्कारांच्या अभावामुळे हे परिणाम आपल्याही समाजात दिसू लागले आहेत.

वीस ते तीस या वयातल्या गुन्हेगारांचे प्रमाण वाढत आहे. सर्वच गुन्ह्यांचेही प्रमाण झपाट्याने वाढत आहे. निर्जन रस्त्यातून किंवा रेल्वेच्या डब्यातून जाणे स्त्रियांना, व पुरुषांनाही, धोक्याचे झाले आहे. तरुणांत व्यसनाचा प्रसार झपाट्याने होत आहे. बलात्कार व खून यांचे प्रमाण वाढते आहे. गुन्हे करण्याकरिता व ते लपविण्याकरता आधुनिक तंत्रांचा उपयोग केला जात आहे. परंतु बौद्धिक, मानसिक आणि नैतिक जीवनाची पातळी घटत आहे. याचा विचार शिक्षणधुरीणांनी व शासक वर्गाने केला पाहिजे. तंत्रज्ञानाच्या जोडीला तत्त्वज्ञानही पाहिजे. ज्या ज्ञानामुळे माणुसकी वाढेल, सामाजिक हितबुद्धी विकसेल, नैतिक पातळी उंचावेल, केवळ इंद्रियप्रधान सुखभोगांच्या तृप्तीपेक्षा बौद्धिक–मानसिक–सांस्कृतिक सुखांचीही गोडी वाढेल, अशा कल्पना, विचार व ध्येये तरुण पिढीला दिली पाहिजेत. सारांश, तंत्रज्ञानाबरोबर जीवनाचे तत्त्वज्ञानही तांत्रिक शिक्षण संस्थांनी दिले पाहिजे.

अशा प्रकारच्या शिक्षणाचा समावेश आपल्या शिक्षणपद्धतीत असावा, अशा प्रकारची सूचना अखिल भारतीय शिक्षण आयोगाने (कोठारी कमिशनने) आपल्या अहवालाच्या पहिल्याच प्रकरणात केलेली आहे; पण तिच्याकडे शिक्षण-धुरीणांनी लक्ष दिले नाही. धर्म–नीति–संस्कृतिविषयक शिक्षणाला आठवड्यातून निदान एक तास द्यावा अशी आयोगाची शिफारस होती. राधाकृष्णन् आयोग व श्रीप्रकाश समिती यांनीही अशा सूचना केल्या आहेत. शासकीय पातळीवर याविषयी काही झालेले नाही. पण म्हणून संस्थाचालकांनी स्वस्थ, उदासीन, निष्क्रिय राहण्याचे कारण नाही. संस्थाचालकांनी या विषयाचा गंभीर विचार केल्यास त्यांना पुष्कळ करता येईल. मुख्य प्रश्न तरुण पिढीला चांगले विचार, व

चांगला ध्येयवाद देण्याचा आहे. आपले विचार, भावना आणि आचार यांत सात्त्विकता, समाजहितबुद्धी, नैतिकता व सुसंस्कार कसे आणता येतील ते नवीन पिढीला दाखवले पाहिजे. चांगले विचार व संस्कार तरुण पिढीला आवडतात व ते घेतले जातात असा माझा अनुभव आहे.

तंत्रज्ञानाच्या जोडीला संस्कारात्मक, विचारात्मक व मानवतावादी शिक्षणाचीही जोड असावी म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात तांत्रिक शिक्षण संस्थांमधून ' जनरल एज्युकेशना 'चा प्रयोग काही काळ केला गेला. यात वाङ्मय, इतिहास, तत्त्वज्ञान इ. विचारात्मक विषयांचे ज्ञान तंत्रज्ञांना देण्याची योजना होती. पण ही चळवळ आता मागे पडलेली दिसते. भारतातील सर्व प्रकारच्या शिक्षणातून विद्यार्थी पदवीधर होऊन बाहेर पडण्यापूर्वी त्याला भारतीय विचारसरणीची, तत्वज्ञानाची व जीवननिष्ठांची माहिती होणे अगत्याचे आहे. भारतीय तंत्रज्ञ व इतर देशातील तंत्रज्ञ यांच्या जीवनविषयक व समाजविषयक दृष्टिकोनात फरक दिसला पाहिजे. पाश्चिमात्य यंत्रयुग या देशात यावे पण त्याबरोबर त्यातील दोष कसे टाळता येतील ते पाहिले पाहिजे.

मी एंजिनियरिंग संस्थांतून गीतेवर व्याख्याने देतो, तेथे सांगतो की, " अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय करण्याचे काम भारतीय तंत्रज्ञान्यांचे आहे. त्यांनी एका हातात गीता व एका हातात यंत्र धरल्यास त्यांच्या विचारात, भावनेत व कृतीत हा समन्वय न कळत होईल. हीच भारताची जगाला देणगी होईल. आपणाला पाश्चिमात्यांचे तंत्रज्ञान हवे, पण त्याला आपल्या तत्त्वज्ञानाचीही जोड दिली तरच त्याचे सुपरिणाम दिसून येतील. नाही तर आज प्रगत राष्ट्रांची जी एकांगी वाढ झाली आहे तशीच आपली स्थिती होईल.

तंत्रज्ञान द्यावे, पण भारतीय तत्त्वज्ञानाचीही जोड त्याला अवश्य द्यावी. गीता हा भारतीय तत्त्वज्ञान व जीवनदृष्टी देणारा ग्रंथ आहे. शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक यांनी त्याचा सूक्ष्म अभ्यास केल्यास त्यांना जीवनदृष्टी मिळेल व ती ते विद्यार्थ्यांना प्रसंगाप्रसंगाने किंवा निश्चित अभ्यासक्रमातून देऊ शकतील.

अशा शिक्षणाची व्यवस्था संस्थांनी केली नाही तरी प्रौढ तंत्रज्ञ व्यक्तींनी स्वपरिश्रमाने भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास व संस्कृती यांचा अभ्यास करून स्वतःची व आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तींची दृष्टी विशाल व व्यापक करावी. प्रत्येक व्यक्ती ही प्रथम माणूस व नंतर तंत्रज्ञ हे तत्त्व लक्षात ठेवावे.

[२५-१२-१९८१

५७. प्राचीन वाङ्मयाची जिज्ञासा

समाजात प्रसिद्ध होणाऱ्या व खपणाऱ्या वाङ्मयावरून लोकांच्या बौद्धिक पातळीचे मोजमाप करता येते. गेल्या वीस पंचवीस वर्षांत संतवाङ्मयाचे प्रकाशन पुष्कळ प्रमाणात झाले. ज्ञानेश्वरीच्या आवृत्त्या, तुकारामाचा गाथा, नामदेवांचे वाङ्मय, ज्ञानेश्वरांचे इतर वाङ्मय, दासबोध, निरनिराळे गुरू व महाराज यांची चरित्रे व उपदेशपर वाङ्मय यांचे बरेच प्रकाशन झाले. त्यांना समाजाकडून प्रतिसादही चांगला मिळाला.

आता १९८२ सालात व आगे-मागे प्राचीन वाङ्मयाचे प्रकाशन मोठ्या प्रमाणावर होत आहे व त्यात अनेक प्रकाशकांनी पुढाकार घेतला आहे. या वाङ्मयाचा विस्तार फार मोठा आहे. त्याच्या प्रकाशनाला भांडवल खूप लागते व लेखकाचे श्रम, कागद, मुद्रण, विक्री इत्यादी व्याप फार मोठा आहे. या वाङ्मयाची किंमतही भारी असून ती सामान्य वाचकास परवडण्यासारखी नाही. तरीही आगाऊ पैसे भरून मागणी करणारे पुरेसे गिऱ्हाईक आहे. माझ्या मते मराठी वाचक, लेखक, आणि प्रकाशक या सर्वांना ही वस्तुस्थिती अत्यंत अभिमानास्पद आहे. प्राचीन वाङ्मयाविषयी जिज्ञासा, आस्था, आणि त्याकरता खर्चाची तयारी मराठी वाचकवर्गाच्या मनामध्ये आहे.

दुसरा एक अभ्यासाचा प्रवाहही असाच लक्षणीय आहे. संस्कृत वाङ्मयातील वैज्ञानिक भागाकडे अभ्यासकांचे अधिकाधिक लक्ष जात आहे. पुण्यातील वेदविज्ञान मंडळात आधुनिक विज्ञानाचे व प्राचीन वेदादी वाङ्मयाचे विद्वान नित्यनेमाने जमून वेदातील विज्ञानाचा मागोवा घेत आहेत. मुंबईत नुकतीच एक संस्कृत–विज्ञान परिषद अत्यंत उत्साहाने व उपयुक्त विचारांच्या चर्चेने पार पडली. आयुर्वेदाच्या अभ्यासाकरता काही वैद्यांना संशोधनार्थ पश्चिम जर्मनीत निमंत्रित केल्यामुळे येथे भारतातही आयुर्वेदाविषयी आदर वाढत आहे. प्राचीन योगशास्त्राचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर होत आहे. या सर्व घटना भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने स्वागतार्ह आहेत.

या प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास आजच्या युगात करताना काही पथ्ये व सावधगिरी बाळगली तरच त्याचा उपयोग होणार आहे. नाही तर एकीकडे भारतीय संस्कृतीचा अभिमान, आणि दुसरीकडे नैतिक अवःपतन, सामाजिक विषमता, स्वार्थवृत्तीची वाढ, आर्थिक दारिद्र्य, उपासमार, अन्याय, निरक्षरता, लाचलुचपत,

भ्रष्टाचार, भांडखोरीचे राजकारण, भ्रष्ट शासनसंस्था, सत्ताधीन न्यायसंस्था, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, स्वधर्मत्याग, गुन्हेगारी, दलितांवी उपेक्षा व स्त्रियांचा छळ, इत्यादी प्रकारची संकुस्तीला लांछनास्पद अशी परिस्थिती, असे जे चित्र आज आहे तसेच कायम राहील.

प्राचीन वाङमय अंद्धश्रद्धेने न वाचता चिकित्सक दृष्टीने अभ्यासले जावे. ते वाचताना ऐतिहासिक दृष्टी ठेवली पाहिजे. त्या वेळेचा समाज व त्या वेळची परिस्थिती तशी होती ; आजच्या परिस्थितीत त्यातील कोणत्या गोष्टी स्वीकार्य आणि कोणत्या त्याज्य याचा विवेक ठेवला पाहिजे. आज झालेली विज्ञानाची प्रगती, तिचे सामाजिक सुपरिणाम व दुष्परिणाम, स्त्रीस्वातंत्र्याची जागृती, दलितमुक्ती, आर्थिक समता, जगाशी संबंध, लोकशाही शासनसंस्था, नैतिक पातळी इ. वस्तुस्थिती लक्षात घेऊन विचारांतील व तत्त्वज्ञानातील कोणत्या विचारांचा आज उपयोग आहे ते आजच्या भाषेत मांडले पाहिजे. चिंतकांना, विचारवंतांना, संशोधकांना व समाजशास्त्रज्ञांना हे एक नवीन विधायक काम आहे.

अशा प्रकारचा उपयोग प्राचीन वाङमयाचा केला नाही तर ते ग्रंथ निवळ अडगळ म्हणून राहतील. या नवीन दृष्टीने भारतीय संस्कृतीचा व वाङमयाचा उपयोग केला तर भारताच्या अनुभवाचा उपयोग विकसित आणि विकासोन्मुख अशा सर्व देशांनाही होईल.

[१४–१–१९८२

५८. जीवनातील हरण व रक्षण

हरण आणि रक्षण यांतील चढाओढ समाजाच्या प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. राम-लक्ष्मण यांनी सीतेच्या रक्षणाची सर्व योजना केली तरी रावणाने सीताहरण केले. पाच पांडव सामर्थ्याने पराक्रमी असताना द्रौपदीचे अब्रूहरण करण्याचा प्रयत्न दुर्योधनाने केला. या पौराणिक कथा झाल्या. आज आपल्या हयातीत अनेक प्रकारची हरणे झाल्याचे आपण रोजच्या वृत्तपत्रांतून वाचतो.

एखाद्या धनिकाचा मुलगा पळवून न्यायचा आणि त्याचे प्राण वाचवण्याच्या मोबदल्यात मोठी खंडणी मागायची, हा आयातीचा प्रकार आपल्या समाजात वाढत आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या भगिनींचे मंगळसूत्र हरण करण्याचे प्रकार तर प्रत्यही

चालू आहेत. दिवसा ढवळचा चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. लहान सहान कुरापतींवरून चाकूने इतरांचे प्राण घेणे म्हणजे तर पोरखेळ झाला आहे. सोबत असल्याशिवाय गावातल्या गावात अथवा प्रवासास जाणे भगिनींना सुरक्षित वाटत नाही. मुले व मुली पळवून बेपत्ता केल्याची उदाहरणे गावोगावी घडत आहेत. सारांश, वित्तहरण, व्यक्तिहरण, प्राणहरण, शीलहरण आणि जीवनातील इतर मौल्यवान गोष्टींच्या हरणाचा धाक व धोका समाजात वाढत आहे, आणि आपण तो असहायतेने पहात आहोत.

याला प्रतिबंधक म्हणून रक्षणाची साधने किती अल्प आहेत तेही पहा. समाजाचे सर्वतोपरी रक्षण करण्याचे कर्तव्य शासनाचे. ते आपल्यापरी पोलीस, चौक्या, कोर्टे, तुरुंग इत्यादी मार्गांनी ही हरणांची गुन्हेगारी कमी करण्याचा प्रयत्न करते, पण तो अत्यंत अपुरा पडतो. गुन्हेगार पकडण्याचे, सापडण्याचे, गुन्हा सिद्ध होण्याचे व शिक्षा होण्याचे प्रमाण गुन्ह्यांचे मानाने नेहमीच अल्प असते. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याला शासन कधीच पुरे पड् शकणार नाही. कारण गुन्हेगारीचे व ती शिफातीने करण्याची तंत्रे शिकण्याची साधने सिनेमातून व वाङ्मयातून उपलब्ध झाली आहेत. गुन्हा करायला थोडचा दुष्ट समाजघातक व्यक्ती पुरतात. त्यांना आळा घालायला मोठी यंत्रणा लागते व तिला अफाट खर्च येतो. एक माणूस एकच गुन्हा करतो, पण तो शोधून काढणे, साक्षीपुरावा जमा करणे, कोर्टात खटला चालवणे, वकील उभे करणे, अपील करणे, तुरुंगात त्याला पोसणे, याला किती तरी अफाट खर्च येतो! हा सगळा खर्च भागवण्याकरता आपल्या सर्वांना वाढत्या प्रमाणात कर भरावा लागतो. समाजातील गुन्हेगार आपण दिलेल्या करावर पोसले जातात. गुन्हेगारी शासनाला म्हणजे समाजाला महाग पडते.

यावर प्रतिबंधक उपाय काय ? पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे सावधानता. वाढती गुन्हेगारी व तिचे प्रकार लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीने व कुटुंबाने सतत सावधगिरी बाळगली पाहिजे. गाफीलपणाने गुन्हेगारांना निमंत्रणच दिल्यासारखे होते. सावधानता प्रत्येक क्षणाला हवी. गाफीलपणाची शिक्षा कधी, केव्हा मिळेल सांगता येत नाही. प्रतिकाराचे सामर्थ्य असणे व ते धैर्य असणे ही दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे. अनेक अबलांनी सबल गुन्हेगारांना प्रतिकार केल्याची अनेक उदाहरणे वाचनात येतात त्यापासून बोध घेत रहा. वाचून विसरू नका. आवश्यक त्या प्रसंगी सामुदायिक संघटना निर्माण करून आपले संरक्षण करणे हे समाजाच्या अंगवळणी पडले पाहिजे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजात सदाचाराचे व सद्विचारांचे वाता-

वरण निर्माण करणे ही आहे. नीतीचे धडे शासन देऊ शकत नाही, आणि शासनाने दिले तरी समाजाला ते रुचणार नाहीत. नैतिक वातावरण निर्माण करणे हे आपले सर्वांचेच काम आहे. चांगले विचार व आचार यांचा आदर्श असणाऱ्या व्यक्तींचा सार्वजनिक सत्कार करा. त्यांच्या विचारांचा आपापल्या वर्तुळात, कुटुंबात, मित्र-मंडळीत, कार्यालयात, कारखान्यात, सर्वत्र प्रसार करा. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, आणि काळाबाजार वाढत आहे म्हणून नुसती चर्चा करून थांबू नका. या सर्व गुन्हेगारीचा जन्म होतो व्यक्तीच्या मनात, वृत्तीत, विचारात, भावनेत. ते विचार व त्या मनोवृत्ती शुद्ध राहतील असे वातावरण निर्माण करणे व वाढवणे प्रत्येक व्यक्तीच्या हातात आहे. प्रत्येकाच्या प्रभावाचे लहान मोठें क्षेत्र असते, तेथे तेथे त्याने चांगल्या विचारांचे व आचारांचे बीज आपल्या वागण्याने, बोलण्याने, वाङ्मय प्रसाराने पेरण्याचा प्रयत्न करावा. हे न करणारा अप्रत्यक्षपणे गुन्हेगारीला मदत करीत असतो, असे समजावे.

खळाची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ॥

अशी प्रार्थना म्हणताना स्वतः काही तरी त्याकरता प्रयत्न करायला हवा ही जाणीव ठेवा.

[१७-२-१९८२

५९. स्वभाव सुधारता येतो

काही काही चुकीच्या म्हणी प्रचारात असतात. त्यांची नीट छाननी करून त्या सुधारल्या पाहिजेत. 'स्वभावः दुरतिक्रमः ।' ही एक अशा म्हणींपैकी आहे. ती निखालस खोटी आहे. 'स्वभावाला औषध नाही' हा त्या म्हणींचाच एक खोटा पर्याय आहे. स्वभाव बदलता येतो. नराचा नारायण होऊ शकतो. वाल्याचा वाल्मीकि होऊ शकतो. या म्हणी वस्तुस्थितीला, सत्याला व अनुभवाला धरून आहेत. स्वभाव बदलता येत नाही असा समज करून घेतला की माणसाची प्रगतीच होणार नाही. तो जन्मभर आहे तेथेच राहील. मग त्याच्यात आणि दगडात काय फरक राहिला? 'मूळ स्वभाव जाईना' याचा मर्यादित अर्थ इतकाच घ्यायचा की माणसाचा स्वभाव दुसरा कोणी बदलू शकत नाही, तो ज्याचा त्यानेच बदलला पाहिजे. दुसरा माणूस आपल्या स्वभावातले गुणदोष सांगू शकेल; पण गुणांचे संवर्धन आणि दोषांचे निर्मूलन हे ज्याचे त्यानेच केले पाहिजे. 'एव्हरी चाइल्ड्

हॅज् टु डू इट्स् ओन ग्रोइंग' अशी शिक्षणशास्त्रात म्हण आहे. पालक, कुटुंब, शिक्षण संस्था, समाज हे फार तर अनुकूल वातावरण व परिस्थिती निर्माण करू शकतील. पण त्यातून चांगल्या गोष्टी घेऊन आपला स्वभाव घडवणे हे काम ते ते मूलच करू शकते. जे मुलांच्या बाबतीत सत्य आहे तेच थोरांच्याही बाबतीत लागू आहे.

उपदेश श्रवणाने, वाचनाने, निरीक्षणाने, चांगले वर्तन कसे असावे हे माणसाला समजू शकेल. पण हे ज्ञान देण्याचे काम समाजात अनेक मार्गांनी सतत चालूच असते. चांगले ग्रंथ, व्याख्याने, प्रवचने, रोडिओ, टी. व्ही., आदर्श व्यक्ती, यांच्या वातावरणाचा फायदा आज पूर्वीपेक्षा आपल्या पिढीला फार मोठ्या प्रमाणात मिळतो. त्यात इष्ट आणि अनिष्ट अशा दोन्ही प्रकारच्या वृत्ती, प्रवृत्ती किंवा गुण, आपल्या मनावर आघात करीत असतात. त्यांतील ग्राह्य कोणत्या आणि त्याज्य कोणत्या हा विचार ज्याचा त्यानेच करायला पाहिजे. चांगले आणि वाईट, इष्ट आणि अनिष्ट, हितकारक आणि अहितकारक, तारक आणि घातक, असे दोन्ही संस्कारांचे प्रकार वातावरणात आहेत. त्यांतील कोणत्या इष्ट वृत्ती आपल्या स्वभावात असाव्यात याचा प्रत्येकाने विचार करावा. आपल्याला आपला स्वभाव कसा असला म्हणजे समाधान व सुख होईल हे ज्याचे त्याने प्रथम ठरवावे. ही सुधारणेची पहिली पायरी आहे. आपल्याला जी व्यक्ती पूज्य, अनुकरणीय व आदर्श वाटते तिच्यासारखे होण्याचा प्रयत्न करणे हा एक मार्ग आहे. पण यात आपले व्यक्तिमत्त्व, आपले वैशिष्ट्य, आपल्या स्वभावातील विशेष चांगले गुण, यांचा लोप होता कामा नये, याची काळजी घ्यावी. आपले 'मीपण' राखून इतरांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण अवश्य करावे.

मनाचा संकल्प आणि दृढनिश्चय, या दोन गोष्टी स्वभाव-संवर्धनात महत्त्वाच्या आहेत. अनेक माणसांना आपला स्वभाव ही काय चीज आहे व ती सुधारायला पाहिजे हे काय प्रकरण आहे, याची जाणीवच नसते. दिवस आला अन् गेला. खाणे-पिणे, सुखे भोगणे, करमणूक करणे, आपला उद्योगधंदा करणे व झोपणे, यापलीकडे जीवनात काही आहे याची जाणीवच शेकडा नव्वद लोकांना नसते! ती जाणीव विचारपूर्वक झाल्यावर, आपल्या स्वतःच्या स्वभावाचे आत्मनिरीक्षण करावे. तुमच्या ठिकाणी आजच अनेक चांगल्या वृत्ती व गुण आहेत, पण त्याबरोबर काही अनिष्ट वृत्तीही आहेत. चांगले गुण बलवत्तर करा व वाईट वृत्ती हळूहळू कमी करा. प्रेम, दया, क्षमा, त्याग सेवावृत्ती, प्रामाणिकपणा, शांती, उद्योगशीलता, अहिंसा, मनमिळाऊपणा, सहकार्य, औदार्य, आत्मसंयम, बौद्धिक आवड, चिंतनशीलता इत्यादी अनेक चांगल्या वृत्ती तुमच्या ठिकाणी आजही असतील, त्या पहा. याच्या

उलट ज्या वृत्ती ते सर्व दुर्गुण. त्यांपैकी आपल्या स्वभावात काही आहेत का पहा द्वेष, क्रूरपणा, निर्दयता, सूडबुद्धी, स्वार्थी दृष्टी, लबाडी, तापटपणा, चिडखोरपणा, भांडखोरपणा, राग, आळस, तुसटपणा, कंजूषपणा, स्वैर वृत्ती, हिंसाचार, इत्यादी काही अनिष्ट वृत्तीही आपल्या स्वभावात असतील. त्यामुळे तुम्ही इतरांत अप्रिय होता. लोक तुमचा द्वेष करतात, तुम्हाला टाळतात. चांगल्या वृत्तीमुळे लोकांना तुमच्याविषयी प्रेम वाटते, वाईट गुणांमुळे लोकांना तुम्ही नकोसे होता.

स्वभाव सुधारण्याला वयाचे बंधन नाही. मरेपर्यंत माणूस आपल्यात सुधारणा करू शकतो. ज्या स्वभावपातळीवर आपण या जगात आलो त्यापेक्षा जीवनात आपण किती वरची पातळी संपादन केली, हे जीवनाचे प्रमुख मोजमाप आहे. संपत्ती, कीर्ती, सामाजिक दर्जा इ. गोष्टी महत्त्वाच्या आहेत, पण त्यांच्या जोडीला हा सद्-गुण-प्रधान स्वभाव नसला तर इतर सर्व गोष्टी व्यर्थ आहेत.

मानवाचा स्वभाव व त्याचा जीवनावर प्रभाव, हा सर्व वाङ्मयाचा मुख्य विषय आहे. स्वभावातील एकेक सद्गुण माणसाला उच्च पदावर बसवतो, तर एकेक दुर्गुण त्याच्या जीवनाचा सत्यानाश करतो. हा स्वभावाचा विषय सतत मनात घोळवा व त्या दृष्टीने निरीक्षण आणि आत्मपरीक्षण करीत रहा. तुम्ही स्वतःच्या मूर्तीचे शिल्पकार व मूर्तिकार आहात. आपल्या स्वतःला आपणच घडवायचे आहे. 'आय हॅव्ह टु री–फॉर्म मायसेल्फ' हे सूत्र लक्षात ठेवा. हा re–form शब्द फार चांगला अर्थवाहक आहे. मीच मला स्वतःला सतत घडवणारा आहे. अंतापर्यंत ही क्रिया चालणारी आहे, तिला अंत नाही.

[२६–३–१९८२

६०. तुमची बांधिलकी

या जगात कोणी एकटा नाही. प्रत्येक मनुष्य स्वतःखेरीज एका समुदायाचा भाग आहे. त्यांतील पहिले वर्तुळ आहे कुटुंबाचे; दुसरे त्याच्या आळीचे; नंतर गावाचे; नंतर सर्व समाजाचे व देशाचे; आणि शेवटी या विशाल जगाचे वा विश्वाचे. माणूस विचाराने जसजसा प्रौढ व परिपक्व होत जाईल तसतशी या वाढत जाणाऱ्या वर्तुळांची व आपण त्यांचा एक भाग असल्याची त्याला जाणीव होईल.

प्रत्येक माणूस आपल्या कुटुंबाचा एक घटक असतो. त्यामुळे त्या कुटुंबाच्या हिताच्या, सुखाच्या व कल्याणाच्या दृष्टीने पाहणे हे त्याचे कर्तव्य असते. हीच त्याची बांधिलकी असते. पण ही जाणीव पुष्कळ वेळा आई-बापांना नसते आणि मुला-मुलींतही ती जागी झालेली नसते. आपण आई-बाप जसे वागतो त्याचा ठसा मुलांच्या मनावर कायमचा राहतो, आणिमुले कालांतराने आई बाप झाल्यावर आपल्या आईबापांच्या साच्याप्रमाणे वागतात. त्यानंतर तोच परिणाम त्यांची मुले आई बाप झाल्यावर त्यांच्यावर होते. म्हणजे आज तुम्ही आम्ही आई बाप जे वर्तन मुलांपुढे ठेवतो त्याचा परिणाम पुढील तीन पिढ्यांवर आणि त्यानंतरही रेंगाळत राहतो म्हणून मुले-मुली आई बाप झाल्यावर त्यांनी कुटुंबात कसे वागावे याचा विचार करून तुम्ही आपले वर्तन आज ठेवा. हा फार लांबचा विचार झाला नाही का? पण तो खरा आहे का नाही याचा विचार करा. मुला-मुलींच्या भावी कौटुंबिक, जीवनाचे सुख व कल्याण आज आपल्या वागण्यावर अवलंबून आहे म्हणून त्यांच्या सुखाकरता, आणि आपल्याही सुखाकरता, आपली वागणूक चांगली ठेवा. आपल्या सवयी, नैतिक विचार व आचार, व्यसनमुक्ती किंवा व्यसनाधीनता, काटकसर किंवा उधळपट्टी, सभ्य राहाणी किंवा छानछोकी, उद्योगशीलता किंवा आळशीपणा, प्रेमाची वागणूक किंवा तुसडेपणा, पति-पत्नींची एकमेकांशी वागण्याची समतेची किंवा विषमतेची वृत्ती, विनयशीलता किंवा उद्धटपणा, भाषणातील गोडवा किंवा कटुता, अशा कितीतरी चांगल्या आणि वाईट, इष्ट आणि अनिष्ट वर्तनाचा विचार करता येईल. जरा अंतर्मुख होऊन या विषयाचा जरा विचार करा. तुमचे अपत्यांवर प्रेम आहे म्हणून त्यांच्या भावी हिताच्या दृष्टीने विचार करा. त्यामुळे आज तुम्हा-लाही सुख मिळेल.

कुटुंबाच्या अगदी जवळचे क्षेत्र म्हणजे आपला शेजार व व्यापक समाज. समाज सुखी तर मी सुखी, ही भावना फ़ार थोडया माणसांना असते. मी माझे सुख पाहिले म्हणजे सुखी होईन हाच प्रत्येकाचा विचार असतो. नागरिकत्वाची भावना, व नागरिकत्वाचे गुण संवादन केले पाहिजेत, वाढवले पाहिजेत ही जाणीव आपण ठेवावी व मुलामुलींना करून द्यावी. 'हे विश्वचि माझे घर' हा वेदांत आपण तोंडाने उच्चारतो परंतु तो आपल्या हृदयापर्यंत पोचत नाही. विश्व राहू द्या, पण आपला शेजार व आपला गाव यांच्या हिताचा तरी विचार करायला लागा व लावा. अगदी लहान सहान गोष्टींतही आपण इतरांचा विचार करीत नाही रस्त्यात मध्यभागी मोठा दगड पडला असेल तर शंभर माणसे तो ओलांडून किंवा टाळून जातील ; उचलून बाजूला टाकणारा एखादाच. तो तुम्ही व्हा. तो मी असावा रस्त्यात आपली वाहने उभी करताना इतरांच्या वाहतुकीला व वापराला अडचण

होणार नाही असे पहा. अगदी शिकलेली माणसे देखील सायकली, स्कूटर आणि मोटारी आडनीड उभ्या करताना हा विचार ठेवीत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. चाळीची व गावाची स्वच्छता, आरोग्य, शोभा या गोष्टी सांभाळण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. समाजहिताच्या अनेक संस्था असतात. आपली गरज लागल्यावरच त्यांची तुम्हांला आठवण होते ना? इतरांच्या गरजा भागवण्याकरता अशा संस्था चालल्या पाहिजेत म्हणून कधीं हात सैल सोडता का? लांबच्या नातेवाईकाचा मुलगा अनाथ झाला आहे त्याची जबाबदारी स्वतःवर पडायला लागली की अनाथ विद्यार्थी गृहाची आठवण होते, पण त्यापूर्वी कधी देणगी देण्याचा विचार येत नाही. स्वतःचे म्हातारपण आले तर किंवा घरात म्हाताऱ्याला जागा नाही अशी स्थिती झाली तर वृद्धाश्रमाची आठवण येते. पण या संस्था समाजहितार्थ चालाव्यात म्हणून आपणही आपल्या मिळकतीतून नित्यनेमाने दानधर्म करीत रहावे ही जाणीव आपण ठेवीत नाही. ही जबाबदारी व बांधिलकीही ओळखली पाहिजे.

कोणी एकटा नाही. तो एका वाढत्या वर्तुळाचा घटक आहे. त्या वर्तुळाची बांधिलकी त्याच्यावर आहे. आपुलकीचे वर्तुळ विकासशील ठेवा.

[१५-४-८२


REFBK-0024797



□ □ □

लेखक परिचय

डॉ. गजानन श्रीपत खैर

एम्. ए. (बॉंबे व कोलंबिया युनि.),
पीएच्.डी. (न्यूयॉर्क युनि.)
जन्म : १५ जून १८९८
१९२० ते १९७० पुणे विद्यार्थी गृहाचे
आजीव सेवक व प्रमुख
महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक
मुख्य अध्यापक व मार्गदर्शक

संस्थेची ५० वर्षे सेवा आणि ५० हजारांचे संचयदान करून सेवानिवृत्त

- ☆ पूना, बॉंबे व कर्नाटक युनि. मधील एम्. एड्. वर्गाकरिता कंपॅरेटिव्ह एज्यु. विषयाचे सन्मान्य प्राध्यापक व पीएच्. डी. करता संशोधन-मार्गदर्शक.
- ☆ १९५२ ते ५८ विधान परिषदेचे सभासद.
- ☆ बॉंबे युनि. सेनेट, पूना युनि. कोर्ट, एस्. एस्. सी. बोर्ड, सेकंडरी एज्यु. बोर्ड, इंटिग्रेशन कमिटी, एज्युकेशन कमिशन टास्क फोर्स, इलाखा प्राथमिक शिक्षक संघ, टीचर्स व हेडमास्टर्स फेडरेशन, सरकारी टेक्स्ट बुक्स व करीक्युलम रिसर्च ब्युरो इ. मध्ये प्रमुखत्वाने शैक्षणिक कार्य.
- ☆ अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी, जपान इ. देशांत प्रवास व शिक्षण-पद्धतीचे निरीक्षण.
- ☆ प्रवास, शिक्षण, गीता इ. विषयांवर व्याख्याने, लेख, ग्रंथ व संशोधन.

गीतेवरील वाङ्मय व इतर ग्रंथ :

- ☐ सर्वबोध पद्यगीता रु. ३-५० ☐ मराठी गीता व विवरण रु. ६/-
- ☐ गीतेतील मुख्य विचार रु. ६/- ☐ गी. मु. विचार-पुरवणी मराठी श्लोक रु. २/-
- ☐ मूळ गीतेचा शोध रु. १०/- ☐ गीतेचा दृष्टिकोन रु. १०/-
- ☐ त्रिकाल गीता In Press ☐ गीताविकास २ री आवृत्ती मुद्रणावस्थेत
- ☐ बालगड In Press ☐ सदाचार चिंतनी भाग १ ते ४ प्रत्येकी रु. ६/-
- ☐ Quest for The Original Gita, Rs. 32/- (सोमैया प्रकाशन)
- ☐ जीवनात गीता रु. १२/-